# “सातारा जिल्ह्यातील मराठेकालीन वास्तूंचा अभ्यास”

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

### तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध


**संशोधक**

**श्री.राजेंद्र कृष्णा देशमुख**

(रजि. नं.०२११५००४९९६)

**मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी**

**इतिहास विभाग**



एप्रिल, २०१९

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, “सातारा जिल्ह्यातील मराठेकालीन वास्तूंचा अभ्यास” हा शोधप्रबंध मी प्रा. डॉ. स्वराली कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी सादर केला आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : सातारा<br>
दिनांक : / /

संशोधक<br>
श्री. राजेंद्र कृष्णा देशमुख

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्री.राजेंद्र कृष्णा देशमुख यांनी ''सातारा जिल्ह्यातील मराठेकालीन वास्तूंचा अभ्यास'' या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ : सातारा
दिनांक : / /

मार्गदर्शक
प्रा. डॉ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी
एम.ए., पीएच.डी., सेट
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled, "सातारा जिल्ह्यातील मराठेकालीन वास्तूंचा अभ्यास" submitted by Shri. Rajendra Krishna Deshmukh to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the degree of Doctor of Philosophy (Ph. D.) is a bonafide record of the research work carried out by him under my supervision. The contents of the thesis, in full or parts have not been submitted to any other Institute or University for the award of any other degree or diploma.

Furthermore, in accordance with the UGC rules 2009 : that govern the Ph.D. students, the students has completed the due process that includes Interview.

Place: Pune

Signature of Research Guide

Date - / /

Signature of Head of the Department

Office seal

# ऋणनिर्देश

सातारा जिल्ह्यातील मराठाकालीन वास्तूंचा अभ्यास या शिर्षकाचा शोध प्रबंध तात्विक सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. शोधप्रबंध विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर करीत आहे. यादव सत्तेचा ऱ्हास झाल्यानंतर आजच्या सातारा जिल्ह्याच्या प्रदेशावर दिर्घकाळ इस्लामी राजसत्तेचा प्रभाव होता. या काळामध्ये समाजामध्ये सांस्कृतिक देवाण घेवाण झाली. अनेक बाबतीमध्ये याचे परिणाम दिसून येतात. सतराव्या शतकामध्ये मराठा सत्तेची स्थापना झाली. अठराव्या शतकामध्ये या सत्तेचा विस्तार झाला. याचा परिणाम राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिकदृष्टया झालेला दिसतो. या काळामध्ये बांधलेल्या विविध प्रकारच्या वास्तूंमधून दिसून येतो. या काळातील विविध प्रकारच्या वास्तू वेगवेगळया शैलीमध्ये बांधलेल्या आहेत. या वास्तूंवर प्रकाश टाकण्यासाठी हा विषय निवडला आहे.

माझ्या मार्गदर्शिका डॉ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी यांनी मला संशोधनासाठी त्यांचा कामाचा व्याप सांभाळून आस्थेने व सातत्यपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांचे प्रोत्साहन व कौटुंबिक जिव्हाळा यामुळे मी माझे संशोधन पूर्ण करू शकलो. मी माझ्या गुरूवर्यांचा अंत:करणपूर्वक सदैव ऋणी राहीन.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे आदरणीय प्रा.डॉ. बी.डी.कुलकर्णी (अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे विभाग) यांनी माझ्या या संशोधन कार्यात मोलाचे सहकार्य केले. तसेच इतिहास विभाग प्रमुख डॉ.सौ. नलिनी वाघमारे यांनीही महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. याबद्दल मी या सर्वांचे आभार मानतो. याशिवाय विद्यापीठातील कार्यालयीन सेवकांचा मी आभारी आहे.

'जिज्ञासा इतिहास संशोधन मंच, सातारा'चे अध्यक्ष श्री निलेश पंडीत, सचिव योगेश चौकवाले, श्री. धैर्यशील पवार यांनी सातारा प्रदेशातील वास्तूंची माहिती दिली. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. डॉ. अवनीश पाटील, इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, प्रा.राम घुले व डॉ. निरंजन कुलकर्णी यांनी काही ग्रंथ उपलब्ध करून दिले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

शिवाजी ट्रेलचे बाळकृष्ण ठेंबरे, पाटणचे माजी आमदार विक्रमसिंह पाटणकर यांनी त्यांचा वाडा व काही ऐतिहासिक ग्रंथ दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. फलटणचे रघुनाथराजे नाईक निंबाळकर यांनी त्यांचा वाडा दाखविला त्यामुळे मी त्यांचा आभारी आहे.

श्री अशोक गरड, व विविध देवस्थान ट्रस्ट यांनी त्याकडील असणारे ग्रंथ उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. शिरवळ येथील संतोष देशमुख, भुईंज येथील भैय्यासाहेब जाधवराव, किसन चिकणे, शुभम जाधव यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

माझ्या या संशोधनासाठी कोल्हापूर पुराभिलेखागार, शिवाजी विद्यापीठ येथील बॅरिस्टर खर्डेकर ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथील ग्रंथालय, सातारा येथील नगर वाचनालय, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड येथील ग्रंथालय इ. ठिकाणी मला संशोधन पूरक माहिती उपलब्ध झाली. त्याबद्दल सर्व ग्रंथपाल व सेवकांचे आभार.

या संशोधनासाठी प्राचार्य डॉ. बावधनकर आर.बी. यांनी मोलाचे सहकार्य केले याबद्दल त्याचे आभार. कु.सायली मोहिते, प्रा. डॉ. शिंदे एस.पी., प्रा.डॉ. कोरडे डी.डी., प्रा.डॉ. विकास कदम, प्रा. डॉ. विकास येलमार, प्रा.डॉ. धनाजी मासाळ, गिरवी येथील श्री. राजेंद्र कदम, निमसोड येथील श्री. आप्पासाहेब देशमुख व खंडाळा येथील श्री. संतोष देशमुख यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार.

या प्रबंधासाठी माझी पत्नी सौ. अमिता, चिरंजीव सनी व कन्या कु.स्वरांजली यांनी सर्वोतोपरी सहकार्य केले. त्यांच्यामुळेच मी हा प्रकल्प पूर्ण करू शकलो. त्याबद्दल त्यांचे शतश: आभार. या शोधप्रबंधाचे टायपिंग समृद्धी टाईपरायटींगच्या प्रमुख सौ. वैशाली कोरडे यांनी सुबकरित्या करून दिल्याबद्दल त्यांचेही आभार. धन्यवाद

श्री.राजेंद्र कृष्णा देशमुख

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रं |
|---|---|---|
| ● | प्रतिज्ञापत्र | I |
| ● | प्रमाणपत्र | II |
| ● | प्रमाणपत्र (इंग्रजी) | III |
| ● | ऋणनिर्देश | IV-VI |
| १. | प्रस्तावना, उद्दिष्टे, गृहीतके, व्याप्ती व मर्यादा व संदर्भ साधनांचे पुनर्विलोकन | १ ते ९ |
| २. | संदर्भ साधनांचे पुनर्विलोकन | १० ते २१ |
| ३. | संशोधन पद्धती | २२ ते २९ |
| ४. | माहितीचे सादरीकरण | ३० ते २२३ |
| ५. | उपसंहार | २२४ ते २४१ |
| ६ | मूल्यमापन/निष्कर्ष, शोध आणि शिफारशी | २४२ ते २६४ |
|  | संदर्भ ग्रंथ सूची | २६५ ते २७२ |
|  | परिशिष्टे | २७३ ते २८८ |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना, उद्दिष्टे, गृहीतके, व्याप्ती व मर्यादा व संदर्भ साधनांचे पुनर्विलोकन

## १.१ प्रस्तावना

प्रागैतिहासिक काळापासून मानवाच्या जीवनामध्ये कलेला महत्त्वाचे स्थान राहिलेले आहे. ज्याप्रमाणे मानवाने आपल्या जीवनामध्ये विकास घडवून आणला त्याचप्रमाणे कला व स्थापत्याचाही विकास घडवून आणला. आपल्या मनातील भावना तो चित्रांच्या व शिल्पांच्या माध्यमातून व्यक्त केल्या. प्रारंभीच्या काळामध्ये गुहांमध्ये असणारी कला नंतरच्या काळामध्ये मंदिरे, निवासस्थाने, दुर्ग व जलस्थापत्याच्या माध्यमातून दिसू लागली. यामध्ये स्थापत्य़कला, चित्रकला, शिल्पकला, वास्तूकला व जलस्थापत्याचा समावेश होतो.

भारताला प्राचीन संस्कृतीची परंपरा आहे. भारताचा एक भाग असणारे महाराष्ट्र हे एक संस्कृतीप्रधान राज्य आहे. या संस्कृतीत निसर्ग, माणसे, समाजसंस्था आणि ईश्वरविषयक कल्पना या चार गोष्टींशी माणसाचा विविध प्रकारे संबंध येतो. त्या सर्व संबंधाचा विचार संस्कृतीमध्ये अंतर्भूत होतो. या निसर्गामध्ये भूप्रदेश, भौगोलिक वैशिष्टये, त्या समाजातील लोकांचा पूर्वेतिहास किंवा वांशिक आणि भौतिकशास्त्रे किंवा विज्ञान यांचा समावेश होतो. त्यामध्ये माणसामाणसातील नाते संबंधाचा बोध होतो. सामाजिक संस्था यामध्ये राजकीय, धार्मिक, औद्योगिक किंवा व्यावसायिक संघटना, चालीरिती, रूढी, पंथ, संप्रदाय या सर्वाचा समावेश होतो.

### १.१.१ सातारा जिल्हयाची भौगोलिक स्थिती

सातारा जिल्हयाचे भौगोलिक स्थान १७$^{\circ}$ ४०′ उ.,७३$^{\circ}$ ०५′ पू. आहे. सातारा शहरास अजिंक्यतारा किल्ल्यामुळे नाव प्राप्त झाले. सहयाद्रीतील महाबळेश्वर व कासची डोंगररांगा, कृष्णा व वेण्णा नदीचे खोरे सज्जनगड, कल्याणगड, चंदनवंदन, वसंतगड, जरंडेश्वर डोंगर व वासोटा इत्यादी किल्ले व जावळीचे खोरे यामुळे या स्थानास भौगोलिक महत्त्व प्राप्त झाले आहे. सातारा जिल्हयास पूर्वी 'प्रांत ' म्हणून संबोधले जात होते .इ.स. १८४८ मध्ये सातारा जिल्हयाचे अकरा शासकीय विभाग होते . भारताला स्वांत्रंय प्राप्त झाल्यानंतर मांडलिक संस्थानाचे विलीनीकरण झाले व त्यातून सातारा जिल्हयाचे दोन विभाग करण्यात आले होते. 'दक्षिण सातारा' विभाग 'उत्तर सातारा' विभाग हे होत. सन २००१ च्या जनगणनेनुसार

सातारा जिल्हयाचे क्षेत्रफळ १०,७८० चौ. कि.मी.आहे. सातारा जिल्हा हा महाराष्ट्राच्या दक्षिणेच्या मध्यभागी आहे. तो दक्षिण पठाराच्या पश्चिम मध्यवर्ती भागात १७°५० ते १८°११ उत्तर अक्षांश आणि ७३°३३ ते ७४°५४ पुर्व रेखांशावर आहे. जिल्हयाच्या पूर्वपश्चिम विस्तार सुमारे १४५ कि. मी. आहे. भौगोलिकदृष्टया साताऱ्याचे हवामान उष्ण व कोरडे असून प्राकृतिक रचनेनुसार उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तीन ऋतु आहेत. सहयाद्री रांगाच्या सुमारे २५ ते ३५ कि.मी. रूंदीच्या पट्टयात सर्वात जास्त पाऊस पडतो. सातारा जिल्हयात हवामानविषयक वेदशाळा फक्त महाबळेश्वर येथे आहे.

सातारा जिल्हयास प्राचीन काळापासून ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. प्रागैतिहासिक काळातील हत्यारे सातारा जिल्हयातील आसगाव, पाचवड, मर्ढे, माहुली, लिंब आणि सोनगाव इत्यादी ठिकाणी सापडली आहेत. मध्याश्मयुगीन काळातील पुरावशेष हे सातारा जिल्हयातील उंब्रज, कराड, काशिळ, कोपर्डे, गोवरे, चिंचनेर, टेंभू तारगाव, धामणेर, माहुली, लिंब, वेणेगाव इत्यादी ठिकाणी आढळले आहे. तर उत्तर अश्मयुग व ताम्रपाषाणयुगीन हत्यारे सातारा जिल्हयातील कराड येथे सापडली आहेत. त्यावरून त्या काळातील परिस्थिती समजण्यास मदत होते. कराड येथे उपलब्ध झालेल्या आहत नाण्यावरून इ. स. पू. ५ व्या शतकात सांस्कृतिकदृष्टया साताऱ्याचा परिसर हा महाराष्ट्राशी संबंधित होता हे दिसून येते. मौर्य, सातवाहन काळातील अवशेष उत्खननातून कराड व कोल्हापूर याठिकाणी उपलब्ध झाले आहेत. इ. स. पूर्व तिसऱ्या शतकात सातारा जिल्हयावर सातवाहनांचे राज्य होते. पुढे सातवाहन साम्राज्याचे विभाजन होऊन महाराष्ट्रात अनेक शाखा निर्माण झाल्या. त्यामध्ये कुंतल शाखेत सातारा–सांगली–कोल्हापूर हा दक्षिण महाराष्ट्रातील प्रदेश मोडत होता. सातारा जिल्हयाच्या परिसरात मानपूरचे राष्ट्रकूट हे पहिले घराणे स्थापन झाले होते. हे राज्य वाकाटक सम्राटाच्या समकालीन होते. राष्ट्रकूटानंतर सातारा परिसरावर वाकाटक बदामीचे चालुक्य शिलाहार व देवगिरीचे यादव यांची सत्ता होती. देवगिरीच्या यादवांनी ११८५ पासून ते ११३८ पर्यंत आपले साम्राज्य निर्माण केले होते. महाराष्ट्राच्या राजकीय स्थित्यंतरात यादवांच्या नंतर शिलाहार घराण्याचे महत्त्व आहे. शिलाहार घराण्याचाही सातारा जिल्हयाच्या परिसराशी संबंध आलेला आहे. द्वितीय जतिग (सन १००० ते १०२०) याच्या कारकिर्दीपासून संबंध आलेला होता. या राजाने सिंदवंशीय राजाचा पराभव करून कराड येथे आपली राजधानी स्थापन केली होती.

१३व्या शतकात महाराष्ट्र प्रथमच इस्लामी सत्तेखाली गेला होता. जेव्हा दिल्लीचे अल्लाउद्दीन खिलजी व नंतर मुहम्मद बिन तुघलक यांनी दख्खनचे काही भाग काबीज केले. इ.स.१३४७ मध्ये तुघलकांच्या पाडावानंतर बहामनी सुलतानांनी सुमारे १५० वर्षे राज्य केले. बहामनी राज्याचे पाच राज्यात विभाजन झाले. सातारा प्रदेश निजामाच्या ताब्यात व निजामशहाच्या ऱ्हासानंतर अदिलशहाचे वर्चस्व या प्रदेशावर होते. १७ व्या शतकात छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू १६८० मध्ये झाला. त्यानंतर मराठयांचे छत्रपती म्हणून युवराज संभाजी यांनी इ.स.१६८९ पर्यत राज्यकारभार पाहिला. त्यानंतर सत्तेवर आलेले छत्रपती राजाराम महाराज हे संकटात सापडले त्यावेळी ते मुघल सरदार झुल्फिकारखान याचा पाठलाग चालू असताना ते जिंजि किल्ल्यावर पोहचले. या किल्ल्यास झुल्फिकारखान या सरदाराने वेढा दिला. छत्रपती राजाराम महाराज जिंजी किल्ल्यावर असताना त्यांच्यापुढे मोठे संकट उभे राहिले. पण त्यांनी गणोजी शिर्के यांच्या मदतीने २६ डिसेंबर, १६९७ रोजी जिंजी वेढयातून आपली सुटका करून पन्हाळा किल्ल्यावर आले. तेथून ते विशाळगडावर आले. विशाळगडावर रामचंद्रपंत अमात्य मराठा राज्याचा कारभार पाहत होते. विशाळगडावरून मोगली हालचालींवर नजर ठेवणे सोईचे नाही म्हणून छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या सर्व मुत्सद्यांशी चर्चा करून ऑक्टोबर १६९८ मध्ये आपली राजधानी सातारा येथे आणली. त्यामुळे सातारा किल्ल्याला व परिसराला महत्त्व प्राप्त झाले. मराठयांनी सातारा येथे राजधानी केल्यानंतर मोगलांविरूध्द हालचालींचा वेग वाढला. छत्रपती राजाराम महाराजांचा २ मार्च, १७०० रोजी सिंहगड किल्ल्यावर अचानक मृत्यू झाला. छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूमुळे मराठयांच्याबरोबर सुरू असलेल्या लढयास पूर्णविराम मिळेल असे औरंगजेबास वाटत होते. पण प्रत्यक्षात लढा आणखी तीव्र झाला. मराठे सेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी आपल्या 'गनिमी कावा' युध्द पध्दतीने मोगली फौजांना हैराण करून सोडले होते. छत्रपती राजाराम महाराजांची पत्नी महाराणी ताराबाई हिने आपला चार वर्षे वयाचा मुलगा शिवाजी दुसरा यास मराठा राज्याचा छत्रपती म्हणून घोषित करून त्याच्या नावे राज्यकारभार पाहण्यास नेटाने सुरूवात केली होती. औरंगजेब बादशहास सळो की पळो करून सोडले. त्यानंतर छत्रपती शाहू महाराजांच्या काळात सातारा शहरास राजधानीच्या दृष्टीने स्थिरता प्राप्त झाली.

छ.संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर छ.राजाराम महाराज व नंतर महाराणी ताराबाई यांनी १७०७ पर्यत मोगलाशी संघर्ष करून मराठी राज्याचे अस्तित्व टिकविले. छ.शाहू

महाराजांना महाराष्ट्रात राजकीय स्थैर्य लाभल्यानंतर मराठी सत्तेचे केंद्र पेशव्यांकडे आले. छत्रपती शाहू महाराजांच्या मार्गदर्शनाखाली बाळाजी विश्वनाथ पेशवे व पुत्र बाजीराव पहिले यांनी मराठा राज्य वाढविले.

सन १७६१ मध्ये पानिपतच्या तिसऱ्या लढाईत मराठयांचा झालेल्या पराभवामुळे नानासाहेब पेशव्यांना धक्का बसून त्यांचा मृत्यू झाला. माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर मराठा साम्राज्याची एकसंधता संपली. महाराष्ट्राबाहेरील मराठी सरदारांनी आपल्या सुभ्यामध्ये एकछत्री वर्चस्व निर्माण केले. या राजकीय स्थित्यंतराचा स्थापत्य कलेवर प्रभाव पडलेला दिसतो.

सध्याचा सातारा जिल्हा मराठा साम्राज्याचा भाग असल्याने राजकीय स्थित्यंतराच्या परिणामास अपवाद राहिला नाही. सातारा जिल्हयामध्ये शिरवळ, वाई व कराड येथील लेणी, जलस्थापत्य व शिवमंदिरे या प्राचीन शिल्पांचा समावेश होतो. मध्ययुगामध्ये इस्लामी सत्ता व नंतर मराठी सत्ता या प्रदेशावर स्थापन झाली. या काळामध्ये अनेक प्रकारच्या वास्तू बांधल्या. या वास्तूवर तत्कालिन कला व स्थापत्याचा प्रभाव आढळतो. जलस्थापत्यामध्येही प्रगती होत गेली. यातील अनेक वास्तू नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत, आधुनिकीकरणामुळे नष्ट झालेली आहेत. काही वास्तू अजूनही तग धरून आहेत. त्यातील काही वास्तूंचा अभ्यास झाला आहे. परंतु अनेक वास्तूंचा अभ्यास झाला नाही. त्यांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यांचे जतन होणे गरजेचे आहे. त्यांना प्रकाशात आणणे गरजेचे आहे. यातून उपेक्षित ऐतिहासिक स्मारकांचा इतिहास पुढे येईल. हा यामागील माझा उद्देश आहे.

## १.२ संशोधनाची उद्दिष्टे :

१. सातारा जिल्ह्यातील मराठी संस्कृतीचा अभ्यास करणे
२. सातारा जिल्ह्यातील धार्मिक शिल्पांचा आढावा घेणे.
३. सातारा जिल्ह्यातील निवासी वास्तूचे संशोधन करणे.
४. सातारा जिल्ह्यातील जल वास्तूंचा परामर्ष घेणे
५. मराठे काळातील वास्तूंचे सांस्कृतिकदृष्टया महत्त्व जाणून घेणे.

## १.३ संशोधनाची गृहीतके :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील काही गृहीतके निश्चित केलेली आहेत.

१. सातारा जिल्ह्यातील मराठेकालीन स्थापत्य शिल्पांना राजकीय, सामाजिक व धार्मिक दृष्टीने वारसा निश्चितच आहे.

२. सातारा जिल्ह्यातील मंदिर वास्तूशिल्पामुळे धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास समजतो.

३. सातारा जिल्ह्यातील निवासी वास्तूशिल्पामुळे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती प्रकाशात येते.

४. जल वास्तू स्थापत्य शैलीने धार्मिक व सांस्कृतिक, सामाजिक माहिती मिळते.

५. आजच्या पिढीला मराठे काळातील वास्तू शिल्पशैली निश्चितच मार्गदर्शक ठरणारी आहे.

## १.४ प्रबंधाचे शिर्षक:

**"सातारा जिल्ह्यातील मराठेकालीन वास्तूंचा अभ्यास"**

## १.५ विषयाची निवड

सातारा जिल्ह्याचा आजपर्यंत राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक दृष्टीने मोठया प्रमाणावर अभ्यास झालेला आहे. शिवपूर्वकाल, शिवकाल, व पेशवेकाल या कालखंडामध्ये लेणी, मंदिरे, वाडे, बारव, विहीरी इ. वास्तूशिल्पांची निर्मिती झाली आहे. तसेच या काळातील हा सांस्कृतिक ठेवा मोठया प्रमाणावर जतन करून ठेवलेला आहे. तेव्हा कालाच्या ओघात याकडे समाजाचे दुर्लक्ष होऊ नये. समाजाला या सांस्कृतिक शिल्पांची इत्यंभूत माहिती मिळाल्यास या वास्तूंचे जतन व संवर्धन होऊ शकते. यातून इतिहासाची प्राथमिक साधने टिकून राहण्यास मोठया प्रमाणावर मदत होईल. तसेच यातून काही प्रमाणात स्थानिक वास्तू कलेवर प्रकाश पडेल. म्हणून या वास्तूवर प्रकाश टाकण्यासाठी हा विषय निवडला आहे.

## १.६ व्याप्ती व मर्यादा

सातारा जिल्हयातील शिवकाळ व पेशवेकाळातील मराठेकालीन वास्तूंचाच फक्त या संशोधनात अभ्यास केला जाईल.

## १.७ संशोधनाचा आराखडा :–

संशोधनाची रूपरेखा एकंदरीत खालीलप्रमाणे राहील.

### १. प्रकरण पहिले – प्रस्तावना, उद्दिष्टे, गृहीतके, व्याप्ती व मर्यादा व संदर्भ साधनांचे पुनर्विलोकन

या प्रसंशोधन उद्दिष्टये, संदर्भ साधनांचे पुनर्विलोकन यामध्ये माटे म.श्री., मराठा आर्क्टिटेक्चर(इ.स.१६५० ते १८५०), प्रकाशित शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६० २) पाटील अभय, कराड शहराचा इतिहास, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, २०११ कु.आगाशे अनिता, पंधरा मोटेची विहीर व लिंबचा परिसर, लघुप्रकल्प, डेक्कन महाविद्यालय, पुणे येथ सन २०१४ मध्ये सादर केलेला आहे. कोरडे डी.डी., वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास(इ.स.१९०० ते २०००) अप्रकाशित पीएच.डी.शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१३, सोहोनी आशुतोष, टेम्पल आर्किटेक्चर मराठाज इन महाराष्ट्र, अप्रकाशित पीएच.डी.शोधप्रबंध, डी मॉंटफोर्ट युनिव्हर्सिटी, लैसेस्टर, १९९८, डॉ.साराय दोशी(संपा.), शिवाजी अँड फॅसेट्स ऑफ मराठा कल्चर, मार्ग प्रकाशन मुंबई, १९८२, संशोधनाची गृहितके, संशोधन विषय निवड, व्याप्ती व मर्यादा, संशोधन आराखडा, संशोधनाची उद्दिष्टये इ.ची माहिती दिलेली आहे.

### २. प्रकरण दुसरे – संदर्भ साधनांचे पुनर्विलोकन(Review of Literature)

सातारा जिल्ह्यातील काही वास्तू शिल्पांचा अभ्यास झालेला आहे पण त्यामध्ये सखोलता नाही. तेंव्हा या प्रकरणात संशोधन विषयाशी संबंधित संदर्भ साधनांचा आढावा घेतलेला आहे. या संदर्भ साधनामध्ये Review म्हणजे काय? संबंधित साहित्याचा आढाव्याची उद्‌दिष्टे संबंधित संदर्भ साधनांच्या आढाव्याचा आवश्यकता संशोधन समस्येशी निगडीत संदर्भ साधनांचे स्वरूप, माटे म.श्री., मराठा आर्क्टिटेक्चर(इ.स.१६५० ते १८५०), प्रकाशित शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६०, पाटील अभय, कराड शहराचा इतिहास, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, २०११, कु.आगाशे अनिता, पंधरा मोटेची विहीर व लिंबचा परिसर, लघुप्रकल्प, डेक्कन महाविद्यालय, पुणे, कोरडे डी.डी., वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास(इ.स.१९०० ते २०००) अप्रकाशित पीएच.डी.शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१३, सोहोनी आशुतोष, टेम्पल आर्किटेक्चर मराठाज इन महाराष्ट्र, अप्रकाशित पीएच.डी.शोधप्रबंध, डी मॉंटफोर्ट युनिव्हर्सिटी,

लैसेस्टर, १९९८, डॉ.साराय दोशी(संपा.), शिवाजी अँड फॅसेट्स ऑफ मराठा कल्चर, मार्ग प्रकाशन मुंबई, १९८२, कान्हेरे गोपाळ कृष्ण, टेम्पल्स ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र माहिती केंद्र(माहिती व जनसंपर्क संचालनायलय–जनरल) सरकार महाराष्ट्र, १ जानेवारी १९८९, मिशेल जॉर्ज, आर्किटेक्चर अँण्ड आर्ट इन डेक्कन– सल्तनत, मुघल अँण्ड मराठा पिरीयड(कप), अँण्ड केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, १९९९, गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, गव्हमेंट प्रेस बॉम्बे, १८९६, रिपोर्ट ऑफ द आर्किओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, (१९३१, ३२, ३३), कुलकर्णी अनुश्री, वाडा आर्क्टिटेक्चर ऑफ महाराष्ट्र प्रिझर्व्हेशन ऑफ महाराष्ट्रीयन कल्चरल हेरिटेज, एम.एस्सी. लघुप्रबंध, द युनिव्हर्सिटी ऑफ ईडनबर्ग(स्कॉटलंड), शिवदे सदाशिव, महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे, खंड १ व २, स्नेहल प्रकाशन, २०११, पाठक अरूणचंद्र, महाराष्ट्रातील बारव स्थापत्य आणि पारंपारिक जलव्यवस्थापन, अपरांत प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, २०१७, मोरवंचीकर रा.श्री., भारतीय जलसंस्कृती, सुमेरू प्रकाशन, डोबिवली, मुंबई, २००६, दळवी दाऊद, भारतातील मुस्लिम स्थापत्यकला, ग्रंथाली प्रकाशन, माटुंगा, मुलुंड मुंबई, २०१४, दळवी दाऊद, भारतातील मुस्लिम स्थापत्यकला, ग्रंथाली प्रकाशन, माटुंगा, मुलुंड मुंबई, २०१४ व खांडगे मंदा, वैभव पेशवेकालीन वाडयांचे, साई प्रकाशन, पुणे, २००२ इत्यादी संदर्भ साधनांचा आढावा घेतलेला आहे.

### ३. प्रकरण तिसरे – संशोधन पध्दती (Research Methodology)

प्रस्तुत संशोधन मुलभूत संशोधन असल्यामुळे ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. पण आवश्यक तेथे खाली संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे.

यामध्ये मराठाकालीन धार्मिक वास्तूंचे टप्प्यानुसार वर्गीकरण केलेले आहे. वर्गीकरण असताना शिवजन्मापासून ते पेशवेकाळापर्यत म्हणजेच(इ.स.१६३० ते १७२०) हा पहिला कालखंड, दुसरा कालखंड हा पेशवेकाळाची सुरूवात ते तिसऱ्या पानिपतच्या लढाईपर्यंतचा होय. (इ.स.१७२० ते १७६१) तर तिसरा कालखंड हा पेशवे पहिले माधवराव ते दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या कारकिर्दीच्या अखेरीपर्यंत(१७६२ ते १८१८) होय. या टप्याचे **विश्लेषणात्मक** पद्धतीने माहिती दिलेली आहे. या पद्धतीसाठी नकाशे, स्केचेस, छायाचित्रे नोट्सचा वापर केलेला आहे.

अशाप्रकारे या संशोधनात सर्व्हेक्षण, निरीक्षण, तुलनात्मक, ऐतिहासिक व संदर्भग्रंथ साधने इत्यादी पद्धतीचा वापर केलेला आहे. याची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**४. प्रकरण चौथे– माहितीचे सादरीकरण :**

या प्रकरणामध्ये सध्याच्या सातारा जिल्हयातील मराठाकालीन धार्मिक, निवासी, संरक्षण, जलवास्तूंचा अभ्यास करण्यासाठी वापरलेल्या संदर्भ साधनांचा संशोधन पद्धतीने अभ्यास करून त्याचे उपप्रकरणानुसार मांडणी केलेली आहे. त्यामध्ये सातारा जिल्हयाचे क्षेत्रफळ स्थान व सीमा हवामान, नदीप्रणाली व जलाशये, सातारा जिल्हयाची सामाजिक परिस्थिती, पोषाख, आहार,- घरे,- दागदागिने,- सण व उत्सव–इ. धार्मिक परिस्थितीमध्ये हिंदू धर्म, ख्रिश्चन धर्म, इस्लाम धर्म,- जैन, बौद्ध, शीख धर्म, पारशी धर्म,- सातारा जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सातारा जिल्हयाची राजकीय परिस्थिती, प्राचीन काळ,- मध्ययुगीन कालखंड,- मराठा काळ, आधुनिक कालखंड, प्राचीन महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास, १) कला–परंपरा २) प्राचीन महाराष्ट्रात उत्खननात सापडलेली शिल्पे, ३) प्राचीन महाराष्ट्रातील स्थापत्यकला मंदिर स्थापत्य, प्राचीन काळातील विटांनी बांधलेली मंदिरे राष्ट्रकुट कालीन मंदिरे चालुक्य कालीन मंदिरे, उत्तर चालुक्यकालीन मंदिरे, शिलाहारकालीन मंदिरे यादवकालीन मंदिरे, बारव स्थापत्य, पोखरणी, तडाग(तळे किंवा तलाव), मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास, सुलतान व मुघल काळातील समाजजीवन व धार्मिक परिस्थिती, सुलतान व मुघल काळातील आर्थिक परिस्थिती, सुलतान व मुघल काळातील स्थापत्य कला, बहामनीशाही काळातील स्थापत्य कला, सातारा जिल्हयातील धार्मिक वास्तू, पहिला टप्प्यातील सातारा जिल्हयातील मंदिरे पालीचे खंडोबाचे मंदिर, शिखर शिंगणापूर, प्रतापगड किल्ल्यावरील भवानी मंदिर, आसले येथील भवानी मंदिर, तडवळे येथील रामेश्वर मंदिर, वाईचे रोकडोबा मंदिर इत्यादी मंदिरे अस्तित्वात आहेत.

दुसऱ्या टप्प्यातील सातारा जिल्हयातील मंदिरामध्ये प्रामुख्याने खवलेश्वर मंदिर बोरखळ, शकुंतलेश्वर मंदिर वडूथ, महादेव मंदिर विरमाडे, ब्रम्हेंद्रनाथ स्वामी मंदिर धावडशी, येथील मेरूलिंग मंदिर मोरघर, अतिबलेश्वर मंदिर महाबळेश्वर, माहूली येथील काशीविश्वेश्वर मंदिर, शिवमहादेव मंदिर (श्रीपतराव पंतप्रतिनिधी), बिल्वेश्वर मंदिर, रामेश्वर मंदिर, विष्णू मंदिर, विठोबा मंदिर, भैरोबा मंदिर वकाशिविश्वेश्वर मंदिर वाई इत्यादी मंदिरांचा समावेश होतो. सातारा जिल्हयातील मंदिरामध्ये भिमाशंकर मंदिर बोपर्डी, माहुली येथील राधाशंकर मंदिर, ओझर्डे येथील सोनेश्वर मंदिर, धोम येथील सिद्धेश्वर मंदिर, झीनत उन्निसाची मशीद (बेगम मशीद), रहिमतपूर येथील मशीद इ.महत्त्वाच्या धार्मिक स्थळांची माहिती दिलेली आहे. घाट व धर्मशाला, छत्र्या व समाध्या, औंध येथील रूपपुरी समाधी, भुईंज येथील रायाजी जाधव यांची

समाधी, बोरगाव येथील भाऊसिंग जाधवराव यांची समाधी, गिरवी येथील अज्ञात समाधी, जांब येथील पतंगराव जाधवरावांची समाधी, कण्हेरखेड येथील बायजाबाई यांची समाधी, जनकोजी शिंदे व सोळा अज्ञातांच्या समाध्या, राजापूर येथील अंबोजी घाटगे यांची समाधी, मर्ढे येथील ब्रह्मेंद्र स्वामीची समाधी, मांडवे येधील संताजी जाधव यांची समाधी, सातारा जिल्ह्यातील मराठेकालीन निवासी वास्तू, भुईंज येथील जाधवराव यांचा वाडा, अनपटवाडी येथील अनपट यांचा वाडा, बावधन येथील गायकवाडांचा वाडा, फत्त्यापूर येथील शाळुंकर वाडा, साप येथील कदमांचा वाडा, तारळे येथील महाडीक यांचा वाडा, नाना फडणिसांचा येथील वाडा(मेणवली), अदालतवाडा, रंगमहाल, तख्ताचा वाडा, मोतीबाग, जयराम स्वामी वाडा, ऐतिहासिक वास्तू किन्हईचा वाडा, सातारा जिल्ह्यातील मराठाकालीन संरक्षण वास्तू, संरक्षक वास्तूंचे प्रकार, गढी, कोट, प्रवेशद्वारे, खंदक, किल्ले, किल्ले संरक्षण व्यवस्था अ) किल्ल्यास निसर्गतः लाभणारी अभेद्यता १) तटबंदी२) माची ३) गडाचे दरवाजे, ४) खंदक ५) मेट ६) किल्ल्यावरील संरक्षण वास्तूंचे बांधकाम ७) पहारेकरी ८) किल्ल्यावरील दारूकोठाराच्या संरक्षणाबाबतची दक्षता ब) किल्ल्यावरील संरक्षण व्यवस्था अ) बहिर्गत संरक्षण व्यवस्था किल्ल्यावरील अंतर्गत संरक्षण व्यवस्था, १) हवालदार २) सबनीस ३) कारखानीस, किल्ल्यावरील जलव्यवस्थापन, शिवकालीन किल्ल्यावरील जलव्यवस्थापन, मराठेकालीन जल वास्तू शैली, विहीर, तळी/टाकी, लिंब येथील बारा मोटेची विहीर, भुईंज येथील जाधवरावांची विहीर, चाहूर येथील बारामोटेची विहीर, चाहूर येथील राजा राणीची विहीर, बावधन येथील गोखले यांची विहीर, बावधन येथील थोरली विहीर, कोरेगाव येथील कमानीची विहीर, नागेवाडी येथील विहीर, सोळशी येथील महाजन यांची विहीर, सातारा येथील बाजीराव पेशवे यांची विहीर, कराड येथील नकटया रावळाची विहीर, बारव स्थापत्य, कुंड, बारव, साहित्यिक संदर्भ व देवदेवतांचे स्थान, साहित्यिक संदर्भ व देवदेवतांचे स्थान, पोखरणी, तडाग इ. होत.

**५. प्रकरण पाचवे –उपसंहार**

या प्रकरणात उपप्रकरणानुसार गृहितकांस अनुसरून माहितीचे विश्लेषण केलेले आहे.

**६. प्रकरण सहावे – मूल्यमापन/निष्कर्ष, शोध आणि शिफारशी**

या प्रकरणात संशोधनाच्या निष्कर्षाचे सादरीकरण केलेले आहे. तसेच अनुमान व काही शिफारशी दिलेल्या आहेत.

वरील प्रकरणाशिवाय संदर्भग्रंथ सूची व परिशिष्टे यांचा समावेश केलेला आहे.

# प्रकरण दुसरे
# संदर्भ साधनांचे पुनर्विलोकन

**प्रस्तावना**

संशोधन विषयाशी संबंधीत जे महत्वपूर्ण ज्ञान उपलब्ध आहे. त्याचा सारांश देणे व त्या विषयात उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा आधार घेऊन त्यापुढील ज्ञानाचा शोध घेण्यासाठी किंवा उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा नवीन परिस्थितीमध्ये बदललेला अर्थ स्पष्ट करण्यासाठी संबंधित संशोधन विषयाचा पाया भक्कम करणे म्हणजे संबंधित साहित्याचा आढावा घेणे होय. हे महत्वपूर्ण ज्ञान संशोधन विषयाच्या संबंधातील विविध ग्रंथालयामध्ये व लेखामध्ये उपलब्ध असते. त्यातील योग्य घटकाचे वाचन, चिंतन व उपयोजन म्हणजे संबंधित साहित्याचा आढावा होय.

तसेच संशोधनाविषयी संबंधित यापूर्वी कोणते संशोधन झाले आहे का? त्यामधील कोणत्या संशोधनातील कोणते निष्कर्ष प्रस्तुत संशोधनात सुरु आहेत? कोणते निष्कर्ष वेगळे आहेत? कोठे साम्य व तफावत आहे? याचा प्रथमतः अभ्यास करणे आणि त्याचा आधार घेवून त्यापुढील गोष्टी शोधून काढणे अथवा जुन्या निष्कर्षांना बदलत्या परिस्थितीत नवे उपयोजन करणे म्हणजे संबंधित संशोधनाचा आढावा होय.[१]

**Review म्हणजे काय?**

1. To take over again.
2. The general survey.
3. A Criticism as review of new book

तसेच Review या संबंधी थहळींपशू यांनी आपल्या 'The elements of research' या ग्रंथात म्हटले आहे.

The Review of the literature promoter a gather understanding of the problem and its crucial and ensure the avoidance of unnecessarily it who provided competitive data on the base of which to evaluate and interpreter the significance of and finding in addition it contributes the scholarship of the investigator on experienced research would think of

understanding a study without enquiry himself with contribution of the previous investigator.[2]

The part of research report provide a background or the development of present study and bring the red ear up to date good research is based of the report given evidence of the investigator knowledge of field.[3]

**संबंधित साहित्याचा आढाव्याची उद्दिष्टे –**

१. निवडलेल्या विषयासंबंधी आवश्यक योग्य पद्धत तंत्रे यांच्याबद्दल माहिती मिळविणे.

२. निवडलेल्या विषयासंबंधी आवश्यक योग्य अशी पूर्ण झालेल्या संशोधनाची कल्पना प्राप्त करून त्याची पुनरावृत्ती टाळणे व योग्य संशोधन विषय निवडण्यास योग्य मार्गदर्शन मिळविणे.

३. संशोधन विषयासंबंधित सिद्धांत व गृहितके यांच्या मांडणीबद्दल निश्चित कल्पना करून देणे.

४. संदर्भ साहित्याचा अभ्यास करून स्वतःचे ज्ञान वाढविणे.[४]

**संबंधित संदर्भ साधनांच्या आढाव्याचा आवश्यकता–**

१. संबंधित संशोधन पूर्ण झालेले आहे की नाही ते समजते.

२. संशोधकाला आपल्या संशोधनाची कार्यपद्धती समजते.

३. संशोधन समस्येशी निगडीत असलेल्या संशोधनाची माहिती मिळते.

४. संशोधनात माहिती मिळविण्यासाठी कोणती साधने वापरावीत यांचे मार्गदर्शन मिळते.

५. संशोधनाची गृहितके व मर्यादा ठरविता येते.

६. वेळ व श्रम यांचा अपव्यय टाळता येतो.

७. संख्याशास्त्रीय पद्धतीचा वापर कसा करावा हे समजते.

८. संशोधनातील माहितीला आधार देता येतो.[५]

**संशोधन समस्येशी निगडीत संदर्भ साधनांचे स्वरूप**

१. ग्रंथ स्वरूपातील संदर्भ साधने, संदर्भ ग्रंथ, शब्दकोष, अप्रकाशित साहित्य, गॅझेटियर इ.

२. संशोधन पदवीसाठी विद्यापीठातून सादर केलेले शोधप्रबंधाच्या स्वरूपातील साहित्य.

३. इंटरनेट, वृत्तपत्रे, नियतकालिके इ. द्वारा प्राप्त होणारी माहिती.[५]

सदर संशोधनासाठी वरील प्रकारच्या विविध साहित्यातून प्रस्तुत संशोधनासंबंधी घेतलेला संशोधन संदर्भ साधनांचा आढावा पुढीलप्रमाणे.[५]

१. **माटे म.श्री., मराठा आर्क्टिटेक्चर(इ.स.१६५० ते १८५०), प्रकाशित शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६०**

या शोधप्रबंधामध्ये मराठाकालीन स्थापत्यावर माहिती दिलेली आहे. महाराष्ट्रातील मराठा सत्तेचे राजकीय परिस्थितीचा आढावा घेतलेला आहे. त्यामध्ये पहिल्या विभागात राजकीय इतिहासामध्ये बहामनीशाही व पाच सुलतान, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, छत्रपती शाहू महाराज, बाळाजी विश्वनाथ, बाळाजी बाजीराव, पेशवा माधवराव पहिला व मराठेशाहीचा शेवट इत्यादीचा समावेश केलेला आहे. दुसऱ्या विभागामध्ये नागरी वास्तूकलेविषयीची माहिती दिलेली आहे. त्यामध्ये वाडे, रस्ते, पूल, घरे, बागा, पाणीपुरवठा वगैरेची माहिती दिलेली आहे. तिसऱ्या विभागामध्ये लष्करी वास्तूकलेविषयी माहिती आहे. त्यामध्ये गढया, लष्करी व्यवस्था, किल्ले यांच्याविषयी माहिती दिलेली आहे.

चौथ्या विभागात यादव काळ ते मराठा काळातील मंदिरे, वाडे, जलस्थापत्य व संरक्षण स्थापत्याची माहिती दिलेली आहे. यात मंदिराचे वर्गीकरण केलेले आहे. या शोधप्रबंधामध्ये सातारा जिल्हयातील माहूली, वाई, धावडशी येथील मंदिर स्थापत्याचा व सातारा येथील राजवाडा, बारा मोटेची विहिर शेरी (लिंब) याचीच माहिती थोडक्यात दिलेली आहे.[६]

**२) पाटील अभय, कराड शहराचा इतिहास, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, २०११**

या प्रबंधामध्ये कऱ्हाडचा राजकीय इतिहास, कऱ्हाडचा आर्थिक इतिहास, कऱ्हाडचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान, कऱ्हाड शहरातील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक लोकजीवन, आधुनिक कऱ्हाडचे निर्माते, कऱ्हाडमधील ऐतिहासिक स्थळे व स्मृतिचिन्हे इत्यादीची सविस्तर माहिती दिलेली आहे. यामध्ये कऱ्हाड शहरातील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक लोकजीवन या प्रकरणामध्ये हिंदू, मुस्लिम, जैन, बौद्ध व ख्रिस्ती संस्कृती, सांस्कृतिक वारसा, कीर्तनकार, प्रवचन, साहित्य व लेखक, साहित्य संमेलन, नाटक, कथा, शाहिरी, तमाशा, संगीत, चित्रकला, चित्रपटगृहे, नगरपालिका प्रशासन, प्रशासन व कार्य, कऱ्हाड नगरपालिकेचे पर्यावरण व इतर कामकाज, कऱ्हाड शहरातील वैद्यकीय सेवा, कऱ्हाड शहरातील लोकसंख्येचा अभ्यास, वृत्तपत्रे व पत्रकारिता, क्रिडाक्षेत्र इत्यादीची सविस्तर माहिती दिलेली आहे.

प्रकरण पाचमध्ये कऱ्हाड शहरातील ऐतिहासिक स्थळे व स्मृतिचिन्हे यामध्ये आगाशिव बौद्धलेणी, जैन अवशेष, हिंदू अवशेष, मध्ययुगीन काळातील कऱ्हाडमधील मुस्लिम स्मृतिचिन्हे, शहरातील अर्वाचीन स्मारके इत्यादींची सविस्तर माहिती दिलेली आहेत. यामध्ये कऱ्हाडमधील मंदिरे, ऐतिहासिक स्थळे, राजवाडे यांची माहिती दिलेली आहे. नकटया राऊळाच्या विहिरीची अत्यल्प माहिती मिळते.[७]

**३) कु.आगाशे अनिता, पंधरा मोटेची विहीर व लिंबचा परिसर, लघुप्रकल्प, डेक्कन महाविद्यालय, पुणे येथ सन २०१४ मध्ये सादर केलेला आहे.**

या लघुशोधप्रबंधात छत्रपती शाहू महाराजांच्या काळात विरूबाई हिने बांधलेली पंधरा मोटेची विहीर यासंबंधीची माहिती दिलेली आहे. या विहिरीच्या बांधकामामध्ये कोरेलेल्या शिल्पांची माहिती दिलेली आहे. याशिवाय लिंब गावची पांढरी व परिसराची ही सविस्तर माहिती दिलेली आहे. पण त्यामध्ये विहिरीमध्ये असलेल्या शिल्पांचा फक्त उल्लेख केलेला आहे.[८]

**४) कोरडे डी.डी., वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास(इ.स.१९०० ते २०००) अप्रकाशित पीएच.डी.शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१३**

या शोधप्रबंधामध्ये प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत. वाई शहराची पार्श्वभूमी, वाई शहराचा राजकीय इतिहास, वाई शहराचा सामाजिक इतिहास, वाईतील संस्था, वाई शहराचा सांस्कृतिक इतिहास इत्यादींचा समावेश केलेला आहे. यातील वाई शहराचा सांस्कृतिक इतिहास या प्रकरणामध्ये पुढीलप्रमाणे माहिती दिलेली आहे. त्यामध्ये पेशवेकाळात वाईतील सांस्कृतिक कला भरभराटीस आली होती. वाईतील वास्तुशिल्पशैलीत मंदिरातून गर्भगृह, अंतराळ, रंगमंडप, सभामंडप आणि नंदीमंडप ही प्रमुख दालने आढळतात. मंदिराची शिखरे उत्तरेकडील नागर व भूमिज या वास्तूप्रकारांच्या निर्माण झालेली असली तरी यामध्ये मुख्यत्त्वे भुमिज वास्तुशैलीचे घटक आहेत. स्तरावर स्तर रचना मजल्याप्रमाणे बांधलेल्या शिखरावर मूर्तीसाठी चुनेगच्चीतील देवळया ठेवल्या असून बहुतांशी मंदिरावर वैशिष्टयपूर्ण पेशवेकालीन मूर्तीकाम आढळते. ही मंदिरे वास्तूशिल्पाच्या दृष्टीने माळव्यातील भूमीज या उपवास्तू शैलीतून उत्क्रांत झालेल्या नागरशैलीत बांधलेली आढळतात. पुढे त्यात हेमाडपंत याने काही बदल केले या बदलामुळे ही वास्तु हेमांडपंथी शैली या नावाने प्रसिद्ध झाली. मंदिरातील पाषाणमूर्ती ही तात्कालीन शिल्पकलेचा उल्लेखनीय नमुना आहे. पेशवेकाळातील वाडे हा एक स्वतंत्र वास्तुविषय झालेला असून या वाडयाची आकारनिर्मिती, भक्कम पाया व इमारत बांधणी,

सुक्ष्म कलाकुसर, छाया प्रकाशाचे कार्यानुरूप नियोजन इत्यादी वैशिष्ट्ये त्यात आढळतात. वाडयातील लाकडी नक्षीकाम हे कलाकुसरयुक्त आहे. वाडयाच्या भिंतीच्या बांधकामासाठी मातीत चुना, गवत, भूसा, राळ, साबुदाणा, डिंक व सरस वगैरेचा वापर केल्याने मजबुती येऊन भेगा पडत नसत. दगडाच्या भिंती बांधताना सांधे घट्ट सांधण्यासाठी शिशाचा रस ओतीत असत. वाईतील भित्तिचित्रकला ही वाडे व मंदिरांच्या भिंतीवर दर्शनी भागावर काढलेली दिसून येते. या चित्रामध्ये पौराणिक प्रसंग रेखाटले आहेत. या चित्रामध्ये रंगसंगती, रंगयोजना आणि रेषांचे लालित्य हे चित्रांच्या विषयाला अनुरूप आढळतात.

अशाप्रकारे या प्रकरणात शिवकाळ व पेशवेकाळातील काही मंदिरे व वाडे यांची थोडक्यात माहिती दिलेली आहे. तसेच या शोधप्रबंधात आधुनिक काळातील फक्त वाई शहरातील सांस्कृतिक इतिहासाची माहिती दिलेली आहे.[९]

**६) सोहोनी आशुतोष, टेम्पल आर्किटेक्चर मराठाज इन महाराष्ट्र, अप्रकाशित पीएच.डी.शोधप्रबंध, डी मॉंटफोर्ट युनिव्हर्सिटी, लैसेस्टर, १९९८**

यामध्ये महाराष्ट्रातील मराठाकालीन मंदिर स्थापत्याचा अभ्यास केलेला आहे. मंदिर स्थापत्याची अत्यंत चांगल्यारितीने निवडक मंदिराची माहिती दिलेली आहे. या शोधप्रबंधाची मांडणी ९ प्रकरणात केलेली असून त्यामध्ये मराठा परंपरेचे ऐतिहासिक घटक, स्थापत्याची साधने, मराठा मंदिरांची मूलभूत वैशिष्टये, प्रारंभीचा टप्पा, मध्य टप्पा, अखेरचा टप्पा, नागपूरची मंदिरे, मराठा परंपरेचे स्वरूप इत्यादीमध्ये विभागणी केलेली आहे. यातील मराठा मंदिराची मूलभूत वैशिष्टये या प्रकरणात प्रामुख्याने मराठा काळातील मंदिराचीतीन टप्प्याची उत्क्रांती झाली आहे. ते तीन टप्पे म्हणजे शिवकाळ ते शाहूकाळ(इ.स.१६५० ते १७२०), छ.शाहू महाराजांची राजकीय स्थैर्य ते पेशवा नानासाहेबाच्या कारकिर्दीची अखेर(इ.स.१७२० ते १७६३), पेशवा माधवराव ते मराठा सत्तेचा अस्त(१७६३ ते १८१८) हे होत. या टप्प्यातील मंदिरांच्यामध्येही रचनेच्या बाबतीत दोन प्रवाह होते. ते म्हणजे स्वदेशी व पुनरूत्थानवादी होत. साध्या भिंती व सजावटीचे जोते यावर स्वदेशी स्थापत्य अवलंबून आहे. तर पुनरूत्थानवादी मंदिरात यादवकालीन मंदिराचे पुनरूज्जीवन करण्याचा प्रयत्न केलेला होता. देशी प्रकारचे मराठा मंदिरे इस्लामिक बांधकाम तंत्र पालन आणि सजावट त्याच्या गर्भागृहामध्ये इस्लामिक आर्किटेक्चर मोठा प्रभाव दाखवते.

या  मंदिराची माहिती देत असताना त्यानी मंदिराचे छप्पर किंवा शिखर, सामग्री व बांधकाम, मूळ मंदिर, चौथरा, भिंत पृष्ठभाग, शिखर प्रकार, त्याचे सामग्री व बांधकाम इत्यादीची सविस्तर माहिती दिलेली आहे.[१०]

**७) डॉ.शरयू दोशी(संपा.), शिवाजी अँड फॅसेट्स ऑफ मराठा कल्चर, मार्ग प्रकाशन मुंबई, १९८२**

यामध्ये ऑर्किटेक्चर, कला, लष्करी संघटन व मराठी जीवनाचे धार्मिक पैलू या संदर्भात संक्षिप्त लेख दिलेले आहेत. या लेखातून महाराष्ट्रातील मराठा काळातील स्थापत्य, कला, लष्करी संघटन व मराठा काळातील रितिरिवाज यावर चांगल्याप्रकारे माहिती दिलेली आहे. त्यातून मराठा काळातील स्थापत्य शैली समजण्यास मदत होते. या स्थापत्य शैलीत प्रामुख्याने मंदिरांची सविस्तरपणे माहिती समजण्यास मदत होते.[११]

**८) कान्हेरे गोपाळ कृष्ण, टेम्पल्स ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र माहिती केंद्र(माहिती व जनसंपर्क संचालनायलय–जनरल) सरकार महाराष्ट्र, १ जानेवारी १९८९**

यामध्ये महाराष्ट्रातील निवडक मंदिरांची माहिती दिलेली आहे. यासाठी या मंदिराची यादी तयार करून त्यानुसार प्रत्येक मंदिराची थोडक्यात माहिती सांगितलेली आहे. या मंदिराविषयीच्या अनेक कल्पना सांगितलेल्या आहेत. या कल्पनावरून प्रारंभीच्या समजूती समजण्यास मदत होते. या मंदिराची माहिती देताना त्यांनी असे स्पष्ट केले आहे की, मराठा वास्तुशिल्प हे एक गंभीर कलात्मक प्रयत्न पेक्षा इस्लामिक आणि यादव वास्तुकलेची पुननिर्मिती आहे.[१२]

**८) मिशेल जॉर्ज, आर्किटेक्चर अँण्ड आर्ट इन डेक्कन– सल्तनत, मुघल अँण्ड मराठा पिरीयड(कप), अँण्ड केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, १९९९.**

या संदर्भ ग्रंथामध्ये सुरूवातीच्या मराठा मंदिराची थोडक्यात माहिती दिलेली आहे. या पुस्तकात असे म्हटले आहे की, १६७४ मध्ये शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेका दरम्यान रायगड येथे शिवाचे मंदिर बांधले हे मराठयांचे प्रथम मंदिर म्हणून ओळखले जाते. त्याने सुरुवातीपासून छत्रपती, पेशवे आणि मराठा सामंत यांच्या काळातील मराठा परंपरेच्या विकासाची चर्चा केली आहे. तथापि, या कामात विशिष्ट मंदिरावर त्यांच्या औपचारिक रचना आणि घटकांच्या संदर्भात सविस्तर चर्चा नाही. त्याने विविध प्रकारची मंदिरे कशी सर्वसमावेशक विकसित नाहीत हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. मिशेलची गुणवत्ता काम

संरक्षणातील पैलुंच्या परिचयाने, वास्तुशिल्पीय उत्क्रांती कालावधी आणि प्रदेशानुसार आणि काहींची ओळख प्रायोजकासह स्मारके यावरील सर्वसाधारण चर्चेवर आधारित आहे.[१३]

**९) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, गव्हमेंट प्रेस बॉम्बे, १८९६**

गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी हे महाराष्ट्राच्या विविध भागातील मंदिर स्थळांचे वर्णन करणारे आहे. यामध्ये अद्ययावत माहिती नाहीं आणि माहिती बहुधा अपुरी आणि दिशाभूल करणारी आहे. विषयामध्ये चांगल्या प्रकारे पारंगत नसलेल्या अधिकाऱ्यांनी माहिती संकलित केलेली आहे. बॉम्बे गॅझेटियर्स कधीकधी प्रत्यक्ष इमारतीसंबंधी, त्याचा प्रायोजक, गुंतवणुकीचा खर्च आणि तारखांविषयीच्या माहिती प्रदान करतात. ही माहिती सामान्यत: शिलालेख आणि अभिलेखीय स्रोतांवर आधारित असे दिसते.[१४]

**१०) रिपोर्ट ऑफ द आर्किओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, (१९३१, ३२, ३३)**

या अहवालामध्ये एखादे गाव अस्तित्वात नसतानासुद्धा किंवा मंदिर नष्ट झालेल्या मंदिराचे रेकॉर्ड नाहीसे केलेले आहे. तसेच सामान्य वर्णन, परिभाषा आणि स्मारकांच्या कालनिर्णयामध्ये गोंधळ आहे. कारण आधारित माहितीची अपुरी पडताळणी आहे. याबाबत स्थानिकाकडून मिळालेली माहिती ही केवळ कथा, सांगितल्यासारखे आहे. कौटुंबिक अनुभवातून या कथा आलेल्या आहेत.[१५]

**११) कुलकर्णी अनुश्री, वाडा आर्क्टिटेक्चर ऑफ महाराष्ट्र प्रिझर्व्हेशन ऑफ महाराष्ट्रीयन कल्चरल हेरिटेज, एम.एस्सी. लघुप्रबंध, द युनिव्हर्सिटी ऑफ ईडनबर्ग(स्कॉटलंड)**

यामध्ये महाराष्ट्रातील निवडक वाडयांची माहिती दिलेली आहे. यामध्ये वाडयांचे स्थापत्य, वाडयांची सद्यस्थिती, वाडयाने तोंड दिलेली आव्हाने, नमुना वाडा यात विश्रामबागवाडा, कल्याणचा साठेवाडा, रास्तेवाडा वाई इत्यादींची सविस्तर माहिती दिलेली आहे.

फर्ग्युसन जेम्स, हिस्ट्री ऑफ इंडियन अँण्ड इस्टर्न आक्टिटेक्चर, व्हॉल्युम ख जॉन मरे, एलबेमरले स्ट्रीट, वेस्ट लंडन, १९१०

यामध्ये प्राचीन ते यादवकालीन भारतातील मंदिराच्या स्थापत्याचा माहिती दिलेली आहे. या ग्रंथात पुढील प्रकरणे आहेत. बौद्ध स्थापत्य, हिमालयातील स्थापत्य, द्रविडीयन शैली, चालुक्यीन शैलीची चर्चा केली आहे.[१६]

**१२) शिवदे सदाशिव, महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे, खंड १ व २, स्नेहल प्रकाशन, २०११.**

या ग्रंथामध्ये सातारा जिल्हयातील सोळा वाडयांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये खंड १ मध्ये भुईंजचा जाधववाडा, तारळे येथील महाडीकांचावाडा, पसरणीचा शेखमिरांचा वाडा, कोपर्डे येथील शिंद्यांचा वाडा, पाटण येथील पाटणकरांचावाडा, किन्हई येथील पंतप्रतिनिधींचा वाडा, शिरवळचा पंतसचिवांचा वाडा इत्यादीचा समावेश आहे. खंड २ मध्ये सातारा जिल्हयातील अदालतवाडा व शाहूमहाराजांच्या ऐतिहासिक वास्तू, प्राज्ञ पाठशाळा, जयराम स्वामी वाडा, छ.प्रतापसिंह महाराज वाडा, सेनापती प्रतापराव गुजर वाडा, सरदार महादजी शिंदे वाडा, कराड येथील पंतप्रतिनिधींचा भुईकोट, नाईक–निंबाळकर यांचे वाडे, खटावचा ऐतिहासिक भुईकोट, राजे नाईक निंबाळकर गढी, गँट डफ बंगला, सेनापती धनाजीपुत्र संताजी यांचा वाडा, शिवदे इनामदार वाडा कुडाळ इत्यादीचा समावेश केला आहे. या ग्रंथामध्ये वास्तू स्थापत्याच्या दृष्टीने माहिती नाही. याशिवाय इतर अनेक वाडे दुर्लक्षितच राहिले आहेत.[१७]

**१३) पाठक अरूणचंद्र, महाराष्ट्रातील बारव स्थापत्य आणि पारंपारिक जलव्यवस्थापन, अपरांत प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, २०१७.**

या संदर्भग्रंथामध्ये प्राचीन काळातील महाराष्ट्रातील बारव स्थापत्याची सविस्तर माहिती दिलेली आहे. त्यात महाराष्ट्रातील बारव स्थापत्य, पारंपारिक जलव्यवस्थापन, उत्तरकाळातील जलव्यवस्थापन असे दोन भाग केलेले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने बारव स्थापत्य एक अभ्यास, बारवांचा काळ इत्यादी प्रकरणे केलेली आहेत. यावरून बारव स्थापत्यांचा इतिहास समजण्यास मदत होते.[१८]

**१४) मोरवंचीकर रा.श्री., भारतीय जलसंस्कृती, सुमेरू प्रकाशन, डोबिवली, मुंबई, २००६**

यामध्ये प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यत जलव्यवस्थापनाची भारतातील माहितीची चर्चा केली आहे. या ग्रंथामध्ये जलसंस्कृतीच्या अभ्यासाची साधने, भौगोलिक वास्तव, ऐतिहासिक वाटचाल व जलव्यवस्थापनाचा इतिहास, नद्यांचे ऐतिहासिक व सांस्कृतिक योगदान, प्राचीन जलशास्त्राच्या विकासाचा इतिहास, जलसंवर्धनाचे अंतरंग, लोकअभियांत्रिकी व स्थापत्य विकासाचा आढावा, नागरी जलव्यवस्थापन, जलसंस्कृतीचे काही पैलू, जल आणि लोकसंस्कृती इत्यादी प्रकरणाची मांडणी केलेली आहे. यात भारतीय जलसंस्कृतीची माहिती मिळण्यास मदत होते.[१९]

**१५) दळवी दाऊद, भारतातील मुस्लिम स्थापत्यकला, ग्रंथाली प्रकाशन, माटुंगा, मुलुंड मुंबई, २०१४**

यामध्ये भारतातील उत्तर व दक्षिण भारतातील स्थापत्यकलेविषयीची माहिती दिलेली आहे. त्यात १२ व्या शतकापासून ते औरंगजेब बादशहाच्या काळापर्यंतची मुस्लिम स्थापत्य कलेचा आढावा घेतलेला आहे. यामध्ये एकूण १६ प्रकरणे आहेत. त्यात इस्लामी स्थापत्य शैलीचा विकास, भारतातील मुस्लिम स्थापत्यशैलीची सुरूवात, मुघलपर्व भाग १, २, ३, ४, दख्खनचे स्थापत्य भाग १, २, ३ प्रादेशिक स्थापत्याचा विकास भाग, १ ते ४ इत्यादी प्रमुख प्रकरणे आहेत. या प्रकरणांच्या अभ्यासातून असे दिसते की, इस्लामी स्थापत्य शैली ही मुघलकाळात फार मोठया प्रमाणावर विकसित झाली होती. तिचा विकास उत्तर भारतात मोठया प्रमाणावर झालेला होता. त्यानंतर तो दक्षिण भारतातही सुरू झाला होता.[२०]

**१६) खांडगे मंदा, वैभव पेशवेकालीन वाडयांचे, साई प्रकाशन, पुणे, २००२**

या संदर्भ ग्रंथामध्ये केवळ पुण्यातील पेशवेकालीन वाडयाविषयीची माहिती दिलेली आहे. त्यामध्ये पारसनीस वाडा, शितोळे वाडा, सिरोळे वाडा, सर सेनापती दाभाडे वाडा, दीक्षित वाडा, रास्तेवाडा, आप्पा बळवंतांचा वाडा, होनप वाडा, मुजुमदार वाडा, खाजगी वाडे वाडा, नाना वाडा, तुळशीबाग, विंचुरकर, फडतरे, मेहुणपुऱ्यातील रास्तेवाडा, आंग्रेवाडा, शनिवारवाडा, पर्वतीवरील पेशवेवाडा, विश्रामबागवाडा, पेशवेकालीन वैभवाचे वाडयाचे अवशेष इत्यादी महत्त्वाची प्रकरणे दिलेली आहेत. यावरून पेशवेकालीन वाडयाचे स्थापत्यकला समजण्यास मदत होते. स्थापत्यशास्त्राची माहिती मिळते.[२१]

सातारा जिल्हयाच्या प्राचीन काळापासून राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीचा परामर्श घेतलेला आहे. सातारा जिल्हयाच्या प्रदेशामध्ये अनेक राजवटीच्या काळामध्ये कला व स्थापत्याचा विकास झाला. मंदिर वास्तूकलेच्या विकासाची चर्चा केलेली असून मंदिर स्थापत्यकलेमध्ये कोरलेल्या शिल्पांचा अर्थ, त्याची कारणमीमांसा, त्यापाठीमागील लोकपरंपरा, मंदिराची रचना व मंदिराचे वास्तूशास्त्र याचा तथ्यावर आधारित अभ्यास केलेला आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये शिलालेख, मंदिर स्थापत्यातील प्रकाशयोजना, गर्भगृहातील छतामधील वेगळेपणा, मंदिर स्थापत्याच्या विधानातील वेगळेपण, वाड्यातील सांडपाण्याची व्यवस्था, शौचालयाची रचना, वाडयांची रचना, मंदिर व वाडयामधील तळघरे व गुप्तखोली, बारव व विहीरीमधील रचना, त्याचे भौगोलिक महत्त्व, त्यांच्यातील वेगळेपण, संरक्षण

स्थापत्यामधील किल्ल्यावरील संरक्षणाच्या दृष्टिने असणारे वेगळेपण, संरक्षणात महत्त्वाची भूमिका बजावणारे किल्ल्यावरील जलव्यवस्थापन इत्यादीचा अभ्यास केलेला आहे. तसेच यामध्ये वरील सर्व प्रकारच्या स्थापत्यामध्ये असणाऱ्या शिल्पांचा अभ्यास केला जाणार आहे.

ऐतिहासिक वाडयांची चर्चा करताना वाडयांची संकल्पना, संकल्पनेचा विकास, त्याचे बदलते स्वरूप, संरक्षणाच्या दृष्टीने महत्व, वाडयामधील शिल्पे, वाडयाचे बांधकाम, बांधकामाचे तंत्र व त्यामागील तांत्रिक मीमांसा याची सविस्तर माहिती दिलेली आहे.

जलस्थापत्य शिल्पांचा अभ्यास करताना संकल्पना, संकल्पनेत होत गेलेले बदल, जलस्थापत्याचे तंत्र, जलस्थापत्यामधील शिल्पांचा अर्थ व कारणमिमांसा, सातारा जिल्हयाची जलसंस्कृती व आधुनिक काळामध्ये त्याचा होऊ शकणारा उपयोग याचा अभ्यास केलेला आहे.

## संदर्भ

१) भिंताडे वि. रा., १९९९, शैक्षणिक संशोधन (तिसरी आवृत्ती), नित्य नुतन प्रकाशन, पुणे.

२) Best J. W., 'Research in Education,' New Delhi, Prentice Hall of India. 1996

३) Buch, M. B. (ED), Fourth Survey of 'Research in Education' Vol. II. New Delhi, Prentice Hall of India, 1991.

४) मुळे, रा. रा., व उमाटे, वि.तु., शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे (तिसरी आवृत्ती) सवंत पिंपळापुरे, विद्या बुक्स, औरंगापुरा, औरंगाबाद, १९८९,

५) मंगरूळकर, मिना, आवटे कमलादेवी, कट्टी आर. एस., भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण, एप्रिल २००८

६) माटे म.श्री., मराठा आर्क्टिटेक्चर(इ.स.१६५० ते १८५०), प्रकाशित शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६०

७) पाटील अभय, कराड शहराचा इतिहास, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, २०११

८) कु.आगाशे अनिता, पंधरा मोटेची विहीर व लिंबचा परिसर, लघुप्रकल्प, डेक्कन महाविद्यालय, पुणे येथ सन २०१४ मध्ये सादर केलेला आहे.

९) कोरडे डी.डी., वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास(इ.स.१९०० ते २०००) अप्रकाशित पीएच.डी.शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१३

१०) सोहोनी आशुतोष, टेम्पल आर्किटेक्चर मराठाज इन महाराष्ट्र, अप्रकाशित पीएच.डी.शोधप्रबंध, डी मॉंटफोर्ट युनिव्हर्सिटी, लैसेस्टर, १९९८

११) डॉ.दोशी साराय(संपा.), शिवाजी ॲण्ड फॅसेटस ऑफ मराठा कल्चर, मार्ग प्रकाशन मुंबई, १९८२

१२)कान्हेरे गोपाळ कृष्ण, टेम्पल्स ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र माहिती केंद्र(माहिती व जनसंपर्क संचालनालयजनरल) सरकार महाराष्ट्र, १ जानेवारी १९८९

१३) मिशेल जॉर्ज, आर्किटेक्चर ॲण्ड आर्ट इन डेक्कन सल्तनत, मुघल ॲण्ड मराठा पिरीयड(कप), ॲण्ड केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस लंडन, १९९९, गव्हमेंट प्रेस बॉम्बे, १८९६

१४) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, गव्हमेंट प्रेस बॉम्बे, १८९६

१५) रिपोर्ट ऑफ द आर्किओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, (१९३१, ३२, ३३)

१६) कुलकर्णी अनुश्री, वाडा आर्क्टिटेक्चर ऑफ महाराष्ट्र प्रिझर्व्हेशन ऑफ महाराष्ट्रीयन कल्चरल हेरिटेज, एम.एस्सी. लघुप्रबंध, द युनिव्हर्सिटी ऑफ ईडनबर्ग(स्कॉटलंड)

१७) शिवदे सदाशिव, महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे, खंड १ व २, स्नेहल प्रकाशन, २०११.

१८) पाठक अरूणचंद्र, महाराष्ट्रातील बारव स्थापत्य आणि पारंपारिक जलव्यवस्थापन, अपरांत प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, २०१७.

१९) मोरवंचीकर रा.श्री., भारतीय जलसंस्कृती, सुमेरू प्रकाशन, डोबिवली, मुंबई, २००६

२०) दळवी दाऊद, भारतातील मुस्लिम स्थापत्यकला, ग्रंथाली प्रकाशन, माटुंगा, मुलुंड मुंबई, २०१४

२१) खांडगे मंदा, वैभव पेशवेकालीन वाडयांचे, साई प्रकाशन, पुणे, २००२

# प्रकरण तिसरे

# संशोधन पद्धती

मराठ्यांच्या मंदिर स्थापत्याचे मूल्यमापन करताना मराठ्यांचे मंदिर आर्किटेक्चरची गुणवैशिष्ट्ये व तत्वज्ञान समजून घेण्यासाठी दक्षिणेतील आधीच्या स्थापत्तीय परंपरा, समजून घेणे आवश्यक होते. यासाठी यादव मंदिराची परंपरा आणि इस्लामी स्थापत्य यावर दृष्टीक्षेप टाकला. या नंतर मराठा मंदिराच्या सर्वेक्षणावर दृष्टिक्षेप टाकला.

दक्षिणेतील इस्लामिक सत्ता व मराठा कालखंडाचा राजकीय, सांस्कृतिक व धार्मिक परिणाम समजून घेणे अत्यावश्यक आहे. कारण मराठा कलात्मक भावनेबद्दल असणारा साधारण प्रभाव होय. इस्लामिक राज्यामध्ये हिंदुत्वाची पुनर्स्थापना व स्थानिक समाजात घडणाऱ्या बदलांमुळे मराठी सत्तेने महाराष्ट्रामध्ये अंतर्गत सांस्कृतिक आणि धार्मिक पुनर्विकासाला चालना दिली. मुस्लिम आणि स्थानिक लोक यांच्यातील धार्मिक, सांस्कृतिक आणि कलात्मक देवाणघेवाण हे दोन्ही समाजाच्या दैनंदिन जीवनशैलीवर व इतर मूल्यांवर झालेल्या परिणामांचे प्रतिक आहे.

मराठयांपूर्वीची महाराष्ट्रातील वास्तू परंपरा आणि या क्षेत्रातील सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय इतिहास समजून घेण्यासाठी काही निवडक मंदिरांचे सर्वेक्षण केले. या माहितीचा उपयोग लोकसंख्या, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक कृतीची एकाग्रता निश्चित करण्यासाठी केला. महाराष्ट्रामध्ये मंदिर आणि धर्म हे हिंदू जीवन पद्धतीचा एक आवश्यक भाग आहेत त्यामुळे त्यास आश्रयदाते मिळाले. हा मराठा साम्राज्यातील संभाव्य व महत्वाची मंदिर ठिकाणे ओळखण्याचा पहिला स्त्रोत आहे.

परीक्षणासाठी महत्वपूर्ण मंदिरांच्या ठिकाणांची माहिती मिळविण्यासाठी मराठी राज्यातील सध्याच्या सातारा जिल्हयातील महत्त्वाच्या ऐतिहासिक वास्तू निवडल्या. मराठा इतिहासात मंदिर बांधणीच्या माध्यमातून धार्मिक संरक्षणास प्रोत्साहन हे दिल्याचे दिसते. पुढील सर्वेक्षण आणि दस्तऐवजीकरण यासाठी मंदिरांच्या ठिकाणांची निवड करण्याचा हा आधार होता. एएसआय अहवाल आणि अन्य काही प्रकाशने यांनी मागोवा घेतलेले बॉम्बे गॅझेटियर हा सर्वात महत्वाचा स्त्रोत होता. पण बॉम्बे गॅझेटियर आणि एएसआयच्या अहवालात दुय्यम माहिती आहे, ज्याची सत्यापित होणे आवश्यक आहे.

**सर्वेक्षण पध्दती**

सातारा जिल्हयातील मराठाकालीन मंदिरे, वाडे, किल्ले, बारव, विहीरी इत्यादीना क्षेत्र भेट देऊन माहिती मिळविलेली आहे. या क्षेत्र भेटीमुळे अनेक आश्चर्यकारक बाबी पुढे आल्या. काहीवेळा मंदिराचे अस्तित्वाचे पुरावे मिळत नाहीत, काही वेळेस विशेष स्मारक नव्हते. कधीकधी मराठा वास्तूची उत्तम उदाहरणे आहेत. परंतु जसे दिसते तसे चित्र नाही. उपलब्ध माहितीच्या आधारावर मराठ्यांच्या बहुतांश धार्मिक, निवासी, संरक्षक व जलवास्तूसारख्या स्मारकांचे सर्वेक्षण केले आहे. कित्येक वास्तू इतक्या मोठ्या प्रमाणात जिणोद्धार झालेला आहे. त्यामुळे जवळजवळ मूळ रचनेची कल्पना करता येऊ शकत नाही. या शोधप्रबंधात शिवकाळापासून ते पेशवेकाळाच्या अखेरीपर्यंतच्या सध्याच्या सातारा जिल्हयातील ऐतिहासिक वास्तूचा अभ्यास केलेला आहे.

क्षेत्र सर्वेक्षणामध्ये ऐतिहासिक वास्तूंचे मंदिर, वाडे, किल्ले, बारव, विहीरी इत्यादीचा विश्लेषणात्मक रेखाटनांच्याव्दारे केले आहे. मंदिराचे प्रमाण, भूमिती आणि आकार यावरील विशेष भर दिला आहे.

क्षेत्र रेखांकनांच्या दुसरा भागामध्ये बाहय वैशिष्ट्यांसह आणि आंतरिक तपशील यामध्ये स्तंभ, भिंती, तुळया, जमीन आणि छत यांचा समावेश होतो. जोते व पागोळयांचा उपयोग आणि सर्वात महत्वाचे म्हणजे मंदिराचे शिखर यांची नोंद घेतली आहे. शिखराच्या विविधतेमुळे शिखराचा अभ्यास जास्त केला आहे.

हा अभ्यास प्रामुख्याने निरिक्षण, नोट्स, स्केचेस आणि स्केच प्लॅनवर आधारित केला आहे आणि क्षेत्र कामाच्यावेळी छायाचित्रे. रेखाचित्र घेतलेली आहेत. रेखाचित्रातून ऐतिहासिक वास्तूंची रचनात्मक वैशिष्ट्ये आणि विविध स्थापत्य घटक वास्तूंचे रचनाशास्त्र स्पष्ट केले आहेत. विश्लेषणात्मक रेखाचित्रे आणि छायाचित्रे यांच्या साह्याने घेतलेली माहितीचे विवेचन केले.

**मराठाकालीन मंदिरांचे वर्गीकरण**

सातारा जिल्हयातील धार्मिक वास्तूमध्ये तीन टप्प्यात वर्गीकरण केले आहे. पहिल्या टप्प्यातील सातारा जिल्हयातील मंदिरे पालीचे खंडोबाचे मंदिर, शिखर शिंगणापूर, प्रतापगड किल्ल्यावरील भवानी मंदिर, आसले येथील भवानी मंदिर, तडवळे येथील रामेश्वर मंदिर,

वाईचे रोकडोबा मंदिर इत्यादी मंदिरे अस्तित्वात आहेत. त्याच्या रचनेसह सविस्तर माहिती घेण्यासाठी सर्व्हेक्षण करून माहिती घेतलेली आहे.

दुसऱ्या टप्प्यातील सातारा जिल्हयातील मंदिरामध्ये प्रामुख्याने खवलेश्वर मंदिर बोरखळ, शकुंतलेश्वर मंदिर वडूथ, महादेव मंदिर विरमाडे, ब्रम्हेंद्रनाथ स्वामी मंदिर धावडशी, येथील मेरूलिंग मंदिर मोरघर, अतिबलेश्वर मंदिर महाबळेश्वर, माहूली येथील काशीविश्वेश्वर मंदिर, शिवमहादेव मंदिर (श्रीपतराव पंतप्रतिनिधी), बिल्वेश्वर मंदिर, रामेश्वर मंदिर, विष्णू मंदिर, विठोबा मंदिर, भैरोबा मंदिर व काशिविश्वेश्वर मंदिर वाई इत्यादी मंदिरांचा समावेश होतो. तर तिसऱ्या टप्प्यातील सातारा जिल्हयातील मंदिरामध्ये भिमाशंकर मंदिर बोपर्डी, माहुली येथील राधाशंकर मंदिर, ओझर्डे येथील सोनेश्वर मंदिर, धोम येथील सिद्धेश्वर मंदिर, झीनत उन्निसाची मशीद (बेगम मशीद), रहिमतपूर येथील मशीद इ. महत्त्वाच्या धार्मिक स्थळांची माहिती दिलेली आहे.

याशिवाय धार्मिक वास्तूमध्ये घाट व धर्मशाला, छत्र्या व समाध्या, औंध येथील रूपपुरी समाधी, भुईंज येथील रायाजी जाधव यांची समाधी, बोरगाव येथील भाऊसिंग जाधवराव यांची समाधी, गिरवी येथील अज्ञात समाधी, जांब येथील पतंगराव जाधवरावांची समाधी, कण्हेरखेड येथील बायजाबाई यांची समाधी, जनकोजी शिंदे व सोळा अज्ञातांच्या समाध्या, राजापूर येथील अंबोजी घाटगे यांची समाधी, मर्ढे येथील ब्रहमेंद्र स्वामीची समाधी, मांडवे येधील संताजी जाधव यांची समाधी इ. समाध्यांना प्रत्यक्ष भेट देऊन माहिती घेतलेली आहे.

सातारा जिल्ह्यातील मराठेकालीन निवासी वास्तू यामध्ये भुईंज येथील जाधवराव यांचा वाडा, अनपटवाडी येथील अनपट यांचा वाडा, बावधन येथील गायकवाडांचा वाडा, फत्त्यापूर येथील शाळुंकर वाडा, साप येथील कदमांचा वाडा, तारळे येथील महाडीक यांचा वाडा, नाना फडणिसांचा येथील वाडा(मेणवली), अदालतवाडा, रंगमहाल, तख्ताचा वाडा, मोतीबाग, जयराम स्वामी वाडा, ऐतिहासिक वास्तू किन्हईचा वाडा या वाडयांना प्रत्यक्ष भेट देवून त्याच्या रचनेविषयी व ऐतिहासिक महत्त्व जाणून घेण्यासाठी संदर्भ ग्रंथाचा आधार घेतला आहे.

सातारा जिल्ह्यातील मराठाकालीन संरक्षण वास्तू, संरक्षक वास्तूंचे प्रकार, गढी, कोट, प्रवेशद्वारे, खंदक, किल्ले, किल्ले संरक्षण व्यवस्था अ) किल्ल्यास निसर्गतः लाभणारी अभेद्यता १) तटबंदी २) माची ३) गडाचे दरवाजे, ४) खंदक ५) मेट ६) किल्ल्यावरील

संरक्षण वास्तूंचे बांधकाम ७) पहारेकरी ८) किल्ल्यावरील दारूकोठाराच्या संरक्षणाबाबतची दक्षता ब) किल्ल्यावरील संरक्षण व्यवस्था अ) बहिर्गत संरक्षण व्यवस्था किल्ल्यावरील अंतर्गत संरक्षण व्यवस्था, १) हवालदार २) सबनीस ३) कारखानीस इ.संबंधीची माहिती घेताना प्रत्यक्ष किल्ल्यास भेट दिलेली आहे. पाहणी करून सर्व्हेक्षण केले आहे. तसेच याची माहिती घेताना संदर्भ साधनाचा आधार घेतलेला आहे.

जलस्थापत्यामध्ये माहिती घेत असताना शिवकालीन किल्ल्यावरील जलव्यवस्थापन, मराठेकालीन जल वास्तू शैली, विहीर, तळी, /टाकी, लिंब येथील बारा मोटेची विहीर, भुईंज येथील जाधवरावांची विहीर, चाहूर येथील बारामोटेची विहीर, चाहूर येथील राजा राणीची विहीर, बावधन येथील गोखले यांची विहीर, बावधन येथील थोरली विहीर, कोरेगाव येथील कमानीची विहीर, नागेवाडी येथील विहीर, सोळशी येथील महाजन यांची विहीर, सातारा येथील बाजीराव पेशवे यांची विहीर, कराड येथील नकटया रावळाची विहीर, बारव स्थापत्य, कुंड, बारव, पोखरणी, तडाग इ. ना प्रत्यक्ष भेट देऊन त्याची माहिती घेतलेली आहे. याशिवाय संदर्भ साधनामधूनही त्याची माहिती मिळविलेली आहे.

मराठा वास्तूचे बदलते स्वरूपाविषयी सामान्य कल्पना देण्यासाठी वर्गीकरणांची टप्पा–वार रचना मर्यादित आहे. जी त्याबद्दल आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणच्या अहवालातील व गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सीमधील तारखा फक्त मार्गदर्शनकारक म्हणून घेतले जाते. वर्गीकरण मुख्यत्वे शैलीगत विचार आणि आकृतीबंधाचा नमुना यावर आधारित आहे. हा स्थापत्यातून पुरावा आहे. आर्किटेक्चर, एएसआय अहवाल आणि बॉम्बे गॅझेटियरमध्ये इमारतीच्या उभारणीची व दुरुस्तीची संबंधित आश्रयदात्याच्या माहितीसह बदलांची नोंद आहे, परंतु ही नोंद दुय्यम माहितीवर आधारली आहे त्याची सत्यापित झाले पाहिजे.

या अभ्यासातील मर्यादांनुसार, केवळ पडताळणी करणारे स्त्रोत स्मारके आणि त्यांची वैशिष्ट्ये आहेत ती एका अनुक्रमिक क्रममध्ये मांडली आहेत. पण एएसआय अहवाल आणि ऐतिहासिक कागदपत्रांचा संदर्भ देऊन बॉम्बे गॅझेटियरमधील माहितीची तपासणी केली जाऊ शकते. हे मराठा इतिहासामध्ये असंख्य विद्वानांनी आपल्या कामामध्ये मांडले आहे. प्रायोगिक सत्यापित माहिती विरूद्ध चाचणी केली जाऊ शकते. हे एखाद्याला वास्तूच्या शैलीशास्त्राद्वारे अंदाजे सांगितलेल्या तारीखेची पुष्टी करण्यास मदत करू शकते. अशी वर्गीकरण प्रणाली एक दोन मार्ग प्रक्रिया आहे जेथे स्मारके आणि ऐतिहासिक रेकॉर्ड एकमेकांना सत्यापित करतात. अभिलेखीय रेकॉर्डमधील सखोलता या संशोधनाच्या व्याप्तीच्या पलीकडे असल्याने कोणत्याही

परिस्थितीत वास्तूंचा काळ अचूक सांगता येत नाहीं. अनेक अभ्यासामध्ये कालक्रम पद्धतीऐवजी भौगोलिक किंवा इतर वर्गीकरण प्रणाली वापरली आहे. खरं तर, टप्प्यांनुसार वर्गीकरणाची पध्दत स्मारके वितरणाची पुनरावृत्ती यातून भौगोलिकदृष्ट्या कालक्रमानुसार नमुने दिसतात. या संशोधनाचा उद्देश स्थापत्यशास्त्रीय उत्क्रांतीचे वर्णन शैलीशास्त्रीय आणि ऐतिहासिक दृष्ट्या करणे हा आहे.

**विश्लेषणात्मक, स्केचेस, छायाचित्रे व नोट्स पध्दत :-**

मराठा संस्कृतीबाबत माहिती सांगताना महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थितीचे थोडक्यात विश्लेषण केले आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील राजकीय सत्तांतर, सामाजिक रूढी, चालीरिती, परंपरा, सण–उत्सव यांचे विश्लेषण केले आहे. त्याचा सामाजिक एकता निर्माण होण्यास फार मोठया प्रमाणावर उपयोग होवून उच्चनीच भेदभाव कमी होण्यास मदत झाली. त्यामध्ये संतांची कामगिरी थोडक्यात विश्लेषित केलेली आहे. धार्मिक परिस्थितीमध्ये धार्मिक परंपरेचा वारसा थोडक्यात मांडला आहे.

या पद्धतीमध्ये सातारा जिल्हयातील मराठाकालीन धार्मिक वास्तू, निवासी, संरक्षण, जलस्थापत्य याविषयी विश्लेषण करत असताना या वास्तूंची रचना, वास्तूमध्ये असणारी शिल्प, मूर्ती, लाकूडकाम, कोरीवकाम, बाहयरचना, संरक्षक भिंत, त्याची वैशिष्टये यांचे विश्लेषण केले आहे. मंदिर, जलवास्तू, निवासी व संरक्षक वास्तूमध्ये असणाऱ्या शिल्पांना धार्मिक बाजू असल्याने त्याच्या मिथकाचाही वापर केलेला आहे. मराठा स्थापत्यावर प्रारंभीच्या काळामध्ये इस्लामी स्थापत्याचा असणारा प्रभाव नंतरच्या काळामध्ये बाजूस सारण्याचा केलेला प्रयत्न याचेही विश्लेषण सप्रमाण केले आहे. याशिवाय मंदिराच्या शिखरावर इस्लामी स्थापत्याचा असणारा प्रभाव हळूहळू कमी होत जाऊन उत्तरेकडील नागर शैली व दक्षिणेकडील द्राविड शैलीचे मिश्रण मंदिर स्थापत्यामध्ये झाल्याचे दिसते. प्रारंभीच्या काळामध्ये मंदिर स्थापत्य व नंतरच्या काळातील मंदिर स्थापत्यातील झालेला बदल सविस्तररित्या मांडलेला आहे. समाधी, छत्र्या व मशिदी यांच्या स्थापत्याबद्दलही चर्चा करून त्यावरील असणाऱ्या शिल्पांचा व कलेच्या प्रभावाचे विश्लेषण केलेले आहे.

निवासी वास्तूंमध्ये प्रामुख्याने सरदारांच्या वास्तूंचा विचार केला आहे. या वास्तूंचे वर्णन करताना त्याची रचना त्याची मुख्य प्रवेशद्वार, दालने, पाणीव्यवस्था, सांडपाण्याची व्यवस्था, शौचालये, छत, स्तंभ, लाकूडकाम यावरून तत्कालिन सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक आकलन करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच वाडयांच्या भिंतीवर असलेली

भित्तिचित्रे यांचाही अभ्यास केला जाणार आहे. त्यामध्ये भित्तीचित्राचे स्वरूप, रचना, रंगसंगती यांचाही अभ्यास विश्लेषणात्मक पद्धतीने केलेला आहे.

संरक्षण स्थापत्यामध्ये सध्याच्या सातारा जिल्हयातील फक्त किल्ल्यांचाच अभ्यास विश्लेषणात्मक पद्धतीने केलेला आहे. सर्वसाधारण संरक्षण घटकाबरोबर संबंधित किल्ल्यावरील वैशिष्टयपूर्ण असलेल्या बाबींचे विश्लेषण केले आहे. त्यामध्ये जलव्यवस्थापन, लगोरी, तटबंदी, बुरूज, अस्तित्वात असलेली प्रवेशद्वारे इत्यादीची माहिती घेतलेली आहे.

जलस्थापत्यामध्ये जलवास्तूंची रचना त्यावर असणारी शिल्पांची कारणे शोधण्याचा प्रयत्न विश्लेषणाद्वारे केलेला आहे. यासाठी मिथकाचा वापर केलेला आहे. त्या काळामधील जलवास्तूमधील असणारे नाविण्य व त्यामागील तथ्य सप्रमाण विश्लेषण मार्फत सांगितले आहे.

वरील पद्धतीसाठी नकाशे, स्केचेस, छायाचित्रे नोट्सचा वापर केलेला आहे.

अशाप्रकारे वरील पद्धतीचा वापर संशोधनासाठी केलेला आहे. त्या पद्धतीच्या साहाय्याने संशोधन पूर्ण केलेले आहे. याशिवाय खालील संदर्भ ग्रथांचा अभ्यास केलेला आहे.

१) महाराष्ट्र संस्कृती १८१८ पर्यंत, डॉ. शुभांगणा अत्रे व इतर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०११

२) मंदिरातील प्राणी विश्व – मोरेश्वर कुंटे, सौ.विजया कुंटे, प्रकाशक प्रियांका कुंटे, पुणे, डिसेंबर, २००८

३) भारतीय मूर्तीपूजेचा इतिहास – प्र.रा.अहिरराव, वरदा प्रकाशन, पुणे, ऑगस्ट २०१४

४) महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे भाग १, डॉ.सदाशिव स.शिवदे, स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१३

५) महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे भाग १, डॉ.सदाशिव स.शिवदे, स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१५

६) गड मंदिरावरील द्वारशिल्प – महेश तेंडुलकर, स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती,२०११

६) मंदिर स्थापत्याचा इतिहास – प्रभाकर गद्रे

७) शिवमूर्तीयनमः – डॉ.गो.बं.देगलुरकर स्नेहल प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर २०१४

८) शिल्पायन – रायकिणीकर

९) मार्कंडदेव – डॉ.गो.बं.देगलुरकर

१०) दक्षिणेचा लोकदेव श्री.खंडोबा – रा.चिं.ढेरे पद्मगंधा प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर २०१२

११) आधुनिक विज्ञान व प्राचीन मंदिरे - मोरेश्वर कुंटे, सौ.विजया कुंटे, मंदिर कोष प्रकाशन, पुणे, सप्टेंबर २०१०

१२) भारतीय मूर्तीशास्त्र – नि.पु.जोशी, प्रसाद प्रकाशन, पुणे, प्रथमा आ. १९७९, द्वितीय आ. २०१३

१३) मराठवाडयातील प्राचीन मंदिर स्थापत्य व शिल्पाविष्कार– डॉ.प्रभाकर देव

१४) महाराष्ट्रातील बारव स्थापत्य आणि पारंपारिक जलव्यवस्थापन – अरूणचंद्र पाठक, अपरांत प्रकाशन, पुणे, सप्टेंबर २०१७

१५) भारतातील मुस्लिम स्थापत्यकला – दाऊद दळवी

१६) मराठेशाहीतील वास्तूशिल्प – म.श्री.माटे, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००८

१७) मंदिरशिल्पे मराठवाडयातील काही शिल्पे आणि मंदिर स्थापत्य – डॉ.माया पाटील ग्रंथली प्रकाशन, एप्रिल २०१४

१८) इतिहासाचे साक्षीदार– मुकुंद कुळे, मनोविकास प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २०११

१९) पुरासंचय – डॉ.अरविंद जामखेडकर, अपरांत प्रकाशन, पुणे, सप्टेंबर २०१६

२०) वैभव पेशवेकालीन वाडयाचे – डॉ.मंदा खांडगे, साई प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००२

२१) छत्रपती शिवरायांचे वैभवशाली किल्ले – दत्ताजी नलावडे

२२) शिवाजी महाराजांचे सहा किल्ले –प्राचार्य आर.डी.गायकवाड व डॉ.एस.पी.शिंदे

२३) महाराष्ट्रातील देव–देवता– प्रतापराव अहिरराव, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, नोव्हेंबर २००९

२४) आज्ञापत्र – संपा.रा.चि.ढेरे

२५) गडकोट– भगवान चिले

२६) शिवकालीन किल्ल्यांचा समग्र अभ्यास– डॉ.ग.का.माने, महाडीक

२७) मध्ययुगीन कलाभारती – म.श्री.माटे कमल चव्हाण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००२

२८) महाराष्ट्रातील किल्ले – डी.जी.देशपांडे

२९) कोल्हापूरातील मंदिरसंपदा– योगेश प्रभुदेसाई

३०) अथातो दुर्गजिज्ञासा– प्र.के.घाणेकर

३१) शैक्षणिक संशोधन– भिंताडे वि. रा.,

३२) Research in Education- Best J. W.

३३) Fourth Survey of ‘Research in Education’ Vol. II. - Buch, M. B.

३४) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे –मुळे रा. रा. व उमाटे, वि.तु.

३५) भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण– मंगरूळकर, मिना, आवटे कमलादेवी, कट्टी आर. एस.,

३६) शिवाजी अँड फॅसेट्स ऑफ मराठा कल्चर – डॉ.साराय दोशी(संपा.)

३७) टेम्पल्स ऑफ महाराष्ट – कान्हेरे गोपाळ कृष्ण

३८) महाराष्ट्रातील बारव स्थापत्य आणि पारंपारिक जलव्यवस्थापन– पाठक अरूणचंद्र अपरांत प्रकाशन, पुणे, सप्टेंबर २०१७

३९) भारतीय जलसंस्कृती स्वरूप व व्याप्ती– मोरवंचीकर रा.श्री. सुमेरु प्रकाशन, डोंबिवली, ११ जुलै २००६

४०) डेक्कन वूडवर्क –□म.श्री.माटे,

४१) भारतीय शिल्पातील प्राणी, अहिरराव प्र.रा., वरदा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००५

४२) श्री क्षेत्र धौमा नृसिंह महात्म, पांब्रे गणेश, जान्हवी प्रकाशन, धोम, प्रथम आवृत्ती, २०१२

४३) परमहंस (ब्रह्मेंद्रस्वामी महाराज), तांबे जगन्नाथ, विश्वस्त श्री देव भार्गवराम देवस्थान कमिटी, धावडशी, द्वितीय आवृत्ती, २०१८

४४) महाराष्ट्राची मंदिरशैली, डॉ.भाग्यश्री काळे–पाटसकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, नोव्हेंबर २००९

४५) सातारा जिल्हयातील शिवकालीन गडकोट किल्ले, गणपतराव साळुंखे, संजीवन प्रकाशन, सातारा, २०१८

४६) दुर्गाच्या देशातून, संदिप तापकीर, गणेश खंडाळे(संपा.), गरूडझेप प्रकाशन, पुणे, २०१२

४७) भवताल, अभिजीत वसंत घोरपडे(संपा.), दिवाळी विशेषांक, पुणे, २०१८,

४८) Mate M.S., Deccan Woodork, Deccan College, Poona, 1967

अशाप्रकारे वरील संदर्भ साधनाचा अभ्यास करून संशोधन पूर्ण केले आहे.

# प्रकरण चौथे

# माहितीचे सादरीकरण

## ४.१ मराठाकालीन संस्कृती :–

### ४.१.१ प्रस्तावना :–

'सातारा जिल्हयातील मराठाकालीन वास्तूंचा अभ्यास' या विषयाचा अभ्यास करीत असताना प्रथमतः मराठा संस्कृतीच्या विकासाबाबत माहिती घेणे आवश्यक ठरते. कोणताही समाज हा विकसित होण्यासाठी भौगोलिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा विचार करावा लागतो. समाज ज्या भौगोलिक परिस्थितीमध्ये राहतो त्या भौगोलिक परिस्थितीचा समाजाच्या शारीरिक व मानसिकतेवर परिणाम होत असतो. समाजाची जडणघडण त्या समाजाला लाभलेल्या भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असते. भौगोलिक परिस्थितीवरच समाजाचे स्थैर्य व स्थलांतर अवलंबून असते. त्यामुळे समाजाच्या संस्कृतीवर परिणाम होत असतो. समाजामध्ये असलेल्या सामाजिक रचनेमुळे समाजाची जीवनावस्था समजते. ज्या समाजामध्ये सामाजिक रचनेला महत्त्व दिले गेले नाही आणि सर्वांना त्यांच्या योग्यतेनुसार स्थान दिले तर समाज विकसित पावतो. समाजातील रूढी व परंपरा यांचाही प्रभाव समाजाची संस्कृती घडविण्यास कारणीभूत ठरतो. मराठा समाजामध्ये शिवकाळात ही बाब प्रकर्षाने आढळते. त्यामुळे शिवकाळामध्ये स्वराज्याची निर्मिती झाली. कोणताही समाज हा विकसित पावताना त्या समाजाची आर्थिक परिस्थिती जबाबदार असते. जर आर्थिक परिस्थिती बिकट असेल तर समाजाच्या विकासाचा वेग ढासळतो. यासाठी व्यापार, शेती व उद्योगधंद्याचा विचार करावा लागतो. राजकारण हे समाजाच्या प्रत्येक अंगावर परिणाम घडवून आणणारा घटक आहे. त्यामुळे कोणत्याही संस्कृतीचा अभ्यास करताना राजकीय बाबींचा विचार करावा लागतो. जर समाजामध्ये शांतता असेल तर सांस्कृतिक विकासाला चालना मिळते. जर अशांतता असेल तर त्याचा परिणाम सर्वच क्षेत्रामध्ये होऊन ते राज्य किंवा समाज लयाला जाण्याची शक्यता असते. मराठा संस्कृती याच टप्प्यातून गेली, त्यामुळेच मराठा संस्कृतीचा अभ्यास करताना या घटकांचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

### ४.१.२ संस्कृती शब्दाचा अर्थ व व्याख्या

'कृ म्हणजे करणे' या धातूपासून बनलेल्या 'कृति' या शब्दाला 'प्र', 'वि' आणि 'सम' असे उपसर्ग लागून प्रकृति, संस्कृति असे शब्द अनुक्रमे बनतात. प्रकृति म्हणजे निसर्ग,

विकृति म्हणजे त्यात होणारा बिघाड आणि संस्कृति म्हणजे प्रकृतित विकार किंवा बिघाड होऊ नये, या उद्देशाने तिच्यावर करावयाचे सम्यक संस्कार होत.[१]

संस्कृती या शब्दाचा अर्थ मानव हा आपल्या अवतीभोवतीच्या निसर्गामध्ये आपल्याला हवे तसे बदल करून त्यावर चांगले संस्कार करून आपले जीवन कार्य चालवत असतो. एवढेच नव्हे तर मानव हा सुद्धा एक निसर्गातील घटक असून तो निसर्गातील वस्तूबरोबर स्वतःचा देह, बुद्धी व मन यांच्यावरही संस्कार करून स्वतःमध्ये बदल घडवून आणत असतो. त्यामध्ये तो आपले जीवन सफल करण्याचा प्रयत्न करत असतो. अशाप्रकारे मानव हा आपले आंतर्बाह्य जीवन सुखी व्हावे, या उद्देशाने निसर्गावर आणि स्वतःच्या बुद्धीवर विजय मिळविण्यासाठी एकटा किंवा समुदायाने संघर्ष करत असतो. या संघर्षातूनच मानवास भौतिक वस्तुरूप आणि मानसिक सृष्टी निर्माण होते. ही दोन्ही प्रकारची निर्मिती म्हणजेच संस्कृती होय.[२]

कोणतीही संस्कृती ही तेथील भौगोलिक व ऐतिहासिक परिस्थितीवर अवलंबून असते. याचाच अर्थ त्या संस्कृतीची जडणघडण ही त्या परिसरातील घडणाऱ्या घडामोडीवर आधारित असते. त्यामुळे सातारा जिल्हयातील मराठाकालीन संस्कृतीचा अभ्यास करताना सातारा जिल्हयाच्या भौगोलिक परिस्थिती व ऐतिहासिक घडामोडी परामर्श घेणे आवश्यक आहे.

### ४.१.३ सातारा जिल्हयाची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी

#### ४.१.३.१ सातारा जिल्हयाची भौगोलिक परिस्थिती

सातारा जिल्हयाचे सन १८४८ मध्ये विजापूर, जावळी, कराड, खानापूर, खटाव, कोरेगाव, पंढरपूर, सातारा, तासगाव, वाळवा व वाई इत्यादी अकरा शासकीय विभाग होते. इ.स.१९४७ नंतर साताराचे विलीनीकरण होऊन दोन विभाग करण्यात आले. सन १८६२ मध्ये विजापूर विभाग बेळगाव जिल्हयास जोडण्यात आला. खानापूर, तासगाव, वाळवा व शिराळापेठ या तालुक्याचा समावेश असलेला 'दक्षिण सातारा' विभाग, तर जावली, कराड, खटाव, कोरेगाव, सातारा व वाई या विभागास उत्तर सातारा जिल्हा म्हणून संबोधण्यात आले. इ.स. १९६० मध्ये उत्तर सातारा जिल्हयाचे 'सातारा' व दक्षिण सातारा जिल्हयाचे नाव 'सांगली' ठेवण्यात आले. सातारा जिल्हयाचे सातारा, महाबळेश्वर, पाटण, फलटण हे चार उपविभाग असून त्यात सातारा, कोरेगाव, जावली, वाई, महाबळेश्वर पाटण, कराड, फलटण, खटाव, खंडाळा व माण असे ११ तालुके आहेत.[३]

### ४.१.३.१.१ सातारा जिल्हयाचे क्षेत्रफळ

अरबी समुद्रापासून ६० मैल दूर असलेल्या या सातारा जिल्हयाचे सन २००१ च्या जनगणनेनुसार क्षेत्रफळ १०,७८० चौ. कि.मी.आहे. लोकसंख्या २८,०८,९९४ ही आहे. १४,०८,३३६ पुरूष व १४,०६६८ स्त्रियांची संख्या आहे.[४] जिल्हयात एकूण ११ तालुके, ८ नगरपालिका व १,५४७ खेडी आहेत. जिल्हयाची समुद्र सपाटीपासूनची उंची २,३२० फुट आहे.[५]

### ४.१.३.१.२ स्थान व सीमा

महाराष्ट्राच्या दक्षिणेस मध्यभागी सातारा जिल्हा आहे. तो दक्षिण पठाराच्या पश्चिम मध्यवर्ती भागात १७° ५० ते १८° ११ उत्तर अक्षांश आणि ७३° ३३ ते ७४° ५४ पुर्व रेखांशावर आहे. जिल्हयाच्या पूर्वपश्चिम विस्तार सुमारे १४५ कि. मी. आहे व दक्षिणोत्तर विस्तार सुमारे १२० कि.मी. आहे.[६] सातारा जिल्हयाच्या पूर्वेस सोलापूर, पश्चिमेस रत्नागिरी, दक्षिण व आग्नेय दिशेस सांगली, वायव्येस रायगड जिल्हा आहे व उत्तरेस निरा नदी आहे. सहयाद्रीच्या मुख्य रांगा नैऋत्येस आहेत.[७]

### ४.१.३.१.३ हवामान

सातारा जिल्हयाचे किमान तापमान हिवाळयात ११.६° सें व उन्हाळयातील कमाल तापमान ३७.५° सें. इतके असते. साताऱ्याचे हवामान उष्ण व कोरडे असून ते तीन ऋतुत विभागलेले आहे. पर्जन्याच्या दृष्टीने पाहिले असता जुलै महिन्यात सर्वाधिक पाऊस पडतो. जून ते सप्टेंबर या कालावधीत पावसाळा असतो. ऑक्टोबर ते जानेवारी या महिन्यात हिवाळा असून थंडी मोठया प्रमाणावर असते. तर उन्हाळा फेब्रुवारी ते मे या चार महिन्यात असून या काळात तापमानात मोठया प्रमाणात वाढ होते.

सातारा जिल्हयात हवामान विषयक वेदशाळा महाबळेश्वर येथे असून या हवामान शाळेतील आकडेवारी पश्चिम घाट प्रदेशासाठी प्रमाण मानली जाते.[८]

### ४.१.३.१.४ लोकसंख्या

सातारा जिल्हयाची लोकसंख्या ही सन १९९१ मध्ये ८,४९,६७२ होती. त्यामध्ये वाढ होऊन ती २००१ मध्ये २७,९६,९०६ इतकी झाली. तर सन २०११ मध्ये ही लोकसंख्या २८,०८,९९४ इतकी झाली. याचाच अर्थ १९९१ च्या जनगणनेपेक्षा २००१ ची लोकसंख्या ही १४.३९ टक्क्यांनी वाढलेली आहे. जिल्हयाची वार्षिक लोकसंख्या वाढ दर १.५ टक्के आहे.

लोकसंख्येची घनता १९९१ मध्ये २३३ प्रती चौ.कि.मी. आहे. तर २००१ मध्ये २६७ प्रती चौ.कि.मी. आहे.[९]

### ४.१.३.१.५ नदीप्रणाली व जलाशये

सातारा जिल्हयात प्रामुख्याने कृष्णा, नीरा, माणगंगा व येरळा नदी खोरे इत्यादी चार नद्यांची खोरी आहेत. यातील कृष्णा नदी ही महाबळेश्वर पठाराच्या पुर्वेकडील भागातून उगम पावलेली आहे. तिची एकूण लांबी ही १,२८० कि.मी असून कृष्णा नदीची सातारा जिल्हयातील

लांबी १७६ कि. मी. आहे. तिचे एकूण पाणलोट क्षेत्र २,४३,६१० चौ. कि. मी. भरते. कृष्णा नदीच्या सातारा जिल्हयातील उपनद्या या कुडाळी, वेण्णा, उरमोडी, तारळी, वसना नदी व कोयना इ. नद्या आहेत. . या नदीवर सन १९७६७७ मध्ये वाई शहराशेजारी धोम धरण बांधलेले आहे.

नीरा नदीच्या खोरे सातारा व पुणे जिल्हयाचा सरहद्दवरील आहे. ही नदी भोर तालुक्यात सहयाद्री पर्वताच्या रांगेमध्ये उगम पावते. या नदीवर पुरंदर तालुक्यातील वीर गावाजवळ सन १९६५ मध्ये मोठे धरण बांधण्यात आलेले आहे.

माणगंगा नदीचे खोरे हे सातारा जिल्हयाच्या दुष्काळी भागात मोडत असून या नदीस केवळ पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह असतो. ही नदी दहिवडीजवळील टिटा नावाच्या डोंगरात उगम पावते. या नदीची एकूण लांबी ही १६० कि.मी. तर सातारा जिल्हयातील लांबी ही केवळ ६४ कि.मी आहे.

येरळा नदीचे खोरे हे खटाव तालुक्यात येत असून ही नदी खटाव तालुक्याच्या उत्तरेस सोलकनाथ टेकडीत उगम पावते. ही नदी खटाव तालुक्यात १२० कि.मी.वाहत जाते.

याशिवाय सातारा जिल्हयात पुढील उपनद्या आहेत. त्यामध्ये तारळी, उरमोडी, वेण्णा, कुडाळी, कोयना व वसना इत्यादी आहेत. कोयना नदीवर कोयना नदीवर देशमुखवाडी जवळ १९५४ मध्ये कोयना जलविद्युत प्रकल्पाचे बांधकाम सुरू होऊन ते १९६० ला पूर्ण झाले.[१०]

## ४.१.३.२ सातारा जिल्हयाचा इतिहास

साताऱ्याला प्रागैतिहासिक काळापासूनचा इतिहास आहे. अगदी पुराश्मयुगापासून ते आधुनिक काळापर्यंतचा इतिहास आहे. या प्रत्येक कालखंडात इतिहासाचे वेगळेपण दिसून येते.

### ४.१.३.२.१ अश्मयुगीन सातारा

सातारा जिल्हयात आसगांव, मर्ढे, माहुली, लिंब आणि सोनगांव इत्यादी ठिकाणी या कालखंडातील हत्यारे उपलब्ध झाली आहेत. यावरून प्राचीन अश्मयुगीन काळातील मानवाचे अस्तित्व दर्शवितात. तसेच त्यावेळचे हवामान व बदल समजण्यास मदत होते.[११]

### ४.१.३.२.२ मध्याश्मयुगीन मानवाचे अस्तित्व

सातारा जिल्हयात कृष्णा व वेण्णानदीच्या संगमावर संगम माहुली येथे मध्याश्मयुगीन सुक्ष्मास्त्रे सापडली आहेत.[१२] उंब्रज, कराड, कोपर्डे, गोवरे, चिंचणेर, टेंभू, तारगांव, धामणेर, माहुली, लिंब व वेणेगांव इ. ठिकाणी सापडलेल्या अवशेषावरुन मध्याश्मयुगीन मानवाचे अस्तित्व आढळते.[१३]

### ४.१.३.२.३ इ. स. पू. चौथ्या शतकापासून ते यादव काळापर्यंतचा इतिहास

प्राचीन कालखंडाचा प्रारंभ इ. स. पु. चौथ्या शतकापासूनचा मानला जातो.[१४] इ. स. पूर्वीच्या दुसऱ्या शतकात कराड येथील यात्रेकरूनी भारहूत स्तुपाच्या(मध्यप्रदेश) बांधकामासाठी अनुदाने दिल्याचा उल्लेख तेथील अभिलेखात आहे.[१५] सातवाहन कालखंडात कराड येथील बौद्धलेणी (आगाशिवाची लेणी) तसेच शिरवळ, वाई, भोसे, माळेवाडी व कुंडल इत्यादी ठिकाणच्या गुंफा खोदल्या गेल्या होत्या.[१६]

सातारा परिसरात पहिले मानपूरचे राष्ट्रकुट हे राष्ट्रकुटांचे राज्य स्थापन झाले होते. राष्ट्रकूट हे गुप्तांच्या वर्चस्वाखाली होते. याची माहिती कालीदासाने लिहीलेल्या कुंतलेश्वरदौत्य या काव्यात मिळते.[१७] पुढे लवकर द्रितीय पुलकेशीने दक्षिण महाराष्ट्र ताब्यात घेतल्याचे त्याचा भाऊ विष्णुवर्धन यांच्या सातारा ताम्रपटावरून समजते.[१८]

सातवाहन काळानंतर इसवी सनाच्या चैथ्या शतकांपासून सहाव्या शतकापर्यंत मानपूरच्या राष्ट्रकुटांनी दक्षिण महाराष्ट्रावर राज्य केले. डॉ. भाऊ दाजी लाड यांच्या संग्रहातील ताम्रपट.[१९] व पांडरंगपल्ली ताम्रपटांच्या आधारे प्रथमतः डॉ. मिराशी वा.वि. यांनी मानपूर हे मध्यप्रदेशातील नसून महाराष्ट्राच्या सातारा जिल्हयातील माण आहे हे प्रथम स्पष्ट केले.[२०] पुढे डॉ. हरिहर ठोसर यांनी याबाबत आणखी संशोधन करून माण नदी काठावरील मानपूर हे राष्ट्रकुटांशी संबधित असल्याचे दर्शविले.[२१] यानंतर उपलब्ध झालेल्या वळई ताम्रपटांमुळे व त्यातील दान दिलेल्या प्रदेशाच्या स्थान निश्चितीमुळे असे म्हणता येईल की, सातारा जिल्हयातील मानपूर येथील माण नदीच्या काठावरील या राष्ट्रकुट वंशजांनी महाराष्ट्रातील पुणे,

सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि बेळगांव जिल्हयांच्या प्रदेशावर आपली सत्ता प्रस्थापित केली [२२] यानंतर काही काळ साताऱ्यावर वाकाटकांची सत्ता होती [२३]

वाकाटकांच्या नंतर साताऱ्यावर दिर्घकाळ (२७०वर्षे) राज्य करणारे घराणे हे बदामीचे चालुक्य होय [२४] प्रथम विष्णूवर्धनच्या सातारा ताम्रपटात प्रथम पुलकेशी याने आपल्या असामान्य कर्तृत्वाने 'सत्याश्रम भवितैश्चरितै' ही उपाधी मिळवल्याचे म्हटले आहे.[२५] या घराण्यातील राजा विजयादित्य हा कराडच्या सेंद्रक विष्णुराजाचा जावई होता.[२६]

चालुक्य राजाचे पारिपत्य करून राष्ट्रकुट घराण्याने या संपूर्ण प्रदेशावर आपले वर्चस्व स्थापन केले. राष्ट्रकुट घराण्यातील तृतीय गोंविद याचा इ.स. ९५९ सालचा ताम्रपट महत्वाचा आहे. या मगगन शिवनामकफ व्यक्तीला मिरज जवळ व कराड (प्राचीन करहार) विषयातील कंकी हे गाव दान दिले होते. हे दान विशेष म्हणजे करहार, कराड येथे राहणाऱ्या भिक्षुंचा चरितार्थ चालवण्यासाठी दिले होते तसेच, इसवी सनाच्या प्रारंभिक काळात कोरलेल्या कराड येथील बौद्ध लेणीत राहणाऱ्या बौद्ध भिक्षुंच्या योगक्षेमाची काळजी इसवी सनाच्या दहाव्या शतकापर्यंत तरी येथील राजे लोक घेत होते यावरून साताऱ्याच्या परिसरात बौद्ध धर्म तोपर्यंत चांगलाच टिकून होता, असे दिसते.[२७]

शिलाहारांच्या तीन घराण्यापैकी १०व्या शतकात पुढे आलेले दक्षिण महाराष्ट्रातील शिलाहार घराणे हेच कोल्हापुरचे शिलाहार घराणे म्हणून प्रसिद्ध आहे. या घराण्याची आरंभीची राजधानी करहार(कराड) ही होती. नंतर ती कोल्हापुरला हलविली गेली. या घराण्यातील द्वितीय भोज याच्या कारकिर्दीपासून हा स्वतंत्र राजा झाला, याने सिंदवंशीय राजाचा पराभव करून कराड येथे आपली राजधानी स्थापली होती.[२८] या शिलाहार वंशीय राजा भोज द्वितीयने सातारा जिल्हयात १०–१२ किल्ल्यांचे बांधकाम केल्याचा उल्लेख इतिहासात मिळतो. यादव नृपांचे किंवा त्यांच्या मांडलिकांचे काही अभिलेख या परिसरात मिळतात. त्यांच्या काळात उभारलेली मंदिरे ही अनेक गावी आढळतात. या त्यांच्या अधिपत्याच्या खुणा आहेत. देवगिरीच्या यादव घराण्यातील रामचंद्रदेव हा शेवटचा हिंदू राजा होय. अल्लाउद्दीन खिलजीने त्याचा पाडाव करून त्यास बंदिवान म्हणून दिल्लीला नेले. पुढे त्याचा मुलगा शंकरदेवने बंड केले असता, मलिक कफूरने त्याचा पराभव करून त्यास ठार केले. पुढे रामचंद्रचा जावई हरपालदेवने देवगिरी परत मिळवली, परंतु कुतबुद्दीन मुबारकाने यादवांचा पाडाव करून त्यास ठार केले.[२९]

सातारा परिसरात प्राचीन काळात मंदिर स्थापत्याची जी निर्मिती झाली आहे. त्यामध्ये हेमाडपंथी मंदिराची उभारणी झाली. परळी, विटा, फलटण, शिगंणापूर, चिमणगाव, बहुले, बावधन व देवराष्ट्र इ. गावी अशी मंदिरे आहेत.[३०]

एकूण सातारा व सातारा परिसराच्या इतिहासाचा आढावा घेतल्यास या परिसरात झालेल्या राजकीय घडामोडी सत्तास्पर्धा, लढाया, धार्मिक श्रद्धा, देवालये व तलावासारखी लोकोपयोगी कामे विद्यार्जनासाठी केलेल्या सोयी विद्वान महर्षी आणि कुशल प्रशासन करणाऱ्या राण्या यांची माहिती मिळते.

**४.१.३.२.४ मध्ययुगीन कालखंड**

यादव सत्तेच्या ऱ्हासानंतर दक्षिण भारतातील लहान मोठी हिंदू राज्ये मुस्लिम आक्रमणास बळी पडली. परंतु कोणत्याही मुस्लिम सत्तेस संपूर्ण दक्षिण भारतावर एकछत्री अंमल स्थापन करता आला नाही. मुस्लिमांत देखील स्थानिक व परकीय असे दोन गट प्रभावी होते व या दोन गटात कायम संघर्ष चालू असे. बहामनी सत्तेचा साधारणपणे १५० वर्षाचा कालखंड सोडला तर मुस्लिम सत्ता सतत भांडत असल्याचे दिसून येते. विजयनगर विरोधात तालीकोटचा अपवाद वगळल्यास परस्परांमधील संघर्ष हे त्यांच्या विनाशाचे कारण होते. या सततच्या संघर्षामुळे सर्व हिंदूच्या विरोधात त्यांना समान धोरण अवलंबता आले नाही. शिवाय नेहमी त्यांना मातब्बर हिंदू सरदारांच्या मदतीवर विसंबून राहवे लागत असे. बहामनी साम्राज्याची शकले पडल्यानंतर स्थानिक हिंदू गटाचे त्यांच्या दरबारात महत्त्व वाढले. यातून त्यांना आपल्या पदरी सतत सैन्य बाळगावे लागे व पुढे यामुळे हिंदुच्यांत आपण राज्यकर्ते असल्याची भावना निर्माण झाली व तिची जोपासना करण्यात आली. थोडक्यात दक्षिणेत इस्लामी सत्तांमध्ये असणारा परस्पर संघर्षच त्यांना क्षीण करत गेला व देशमुख, देशपांडे या स्थानिकांनी त्याचा लाभ घेऊन स्वतःची प्रभाव क्षेत्रे निर्माण केली. जोपर्यंत बहामनी सत्ता महमूद गवान सांभाळत होता. तोपर्यंत ही मुस्लिम बहामनी राजवट टिकून होती. मात्र काही कट कारस्थानी सरदारानी त्याच्या विरोधात बादशहाचे कान फुंकले व त्याच्या खुनाची आज्ञा बादशहाने दिली. महमूद गवानच्या मृत्यूनंतर विजापूर, अहमदनगर, वऱ्हाड, बिदर व गोवळकोंडा येथील सरदार स्वतंत्र झाले, आणि त्यांनी आपले सवते सुभे निर्माण केले. अशा रीतीने साताऱ्यावरील बहामनी राजवट समाप्त झाली.

महमूद गवानच्या मृत्यूनंतर त्याची विजापूर सुभ्यातील जहागिरी युसूफ आदिलखान या सरदारास देण्यात आली. यामध्ये सातारा जिल्हयाचा समावेश होतो. यानेच विजापूरमध्ये इ. स.

१४८९ साली आदिलशाही सत्ता स्थापन केली. ही राजवट छत्रपती शिवाजी महाराजांच्या उदयापर्यत अत्यंत विकसित झाल्याचे दिसते परंतु सातारा परिसरावर ताबा मिळवल्यास आपण मोगल विजापूर व कोकणातील सिद्दी या सर्वांशी चांगली लढत देऊ शकतो, असा आत्मविश्वास बाळगून महाराजांनी आपल्या सर्व डावपेचांची सुरूवात साताऱ्यापासून केली. म्हणजे जोपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजानी साताऱ्यात राजकीय हालचालीना प्रारंभ केलेला नाही तोपर्यंत साताऱ्यावर आदिलशाही वर्चस्व अतिशय मजबूत असल्याचे दिसते.

आदिलशाहीच्या वारसा हक्कांच्या युद्धातही साताऱ्याचा संबध येतो. इब्राहिमशहा नंतर अली आदिलशहा(पहिला) विजापूरचा सुलतान झाला. अहमदनगरची राजकन्या चांदबीबी ही त्याची राणी होती. अली आदिलशहाच्या मृत्यूनंतर गादीवर आलेल्या इब्राहिमशहा(दुसरा) हा अल्पवयीन असल्याने पालकत्वाची जबाबदारी चांदबीबीकडे होती. कामीलखान या कराडच्या जहागिरदाराशी तिचे जमत नव्हते तिने किश्वरखान या सरदाराला हाताशी धरून त्याचा काटा काढला. परंतु पुढे किश्वरखानाचे दरबारात फार महत्त्व वाढले व त्याच्या मार्गातील अडचण चाँदबीबी होत असल्याने तिच्यावर फंदफितुरीचा आरोप करून तिला कैद केले व साताऱ्याच्या किल्ल्यावर बंदिस्त केले. परंतु लवकर किश्वरखानाची कर्मे जाहीर झाली व साताऱ्याच्या बंदिवासातून चांदबीबीची सुटका झाली. पुढे या ठिकाणी हमीदखान, दिलावरखान अशा मातब्बर विजापूर सरदारांना कैदेत ठेवण्यात आले. यावरून एक शाही तुरूंग म्हणून विजापूरच्या आदिलशाही कालखंडात साताऱ्याच्या किल्ल्याचे महत्त्व होते.

आदिलशाही कालखंडात साताऱ्याच्या प्रशासनात हिंदू व मुस्लिम असा संबंध होता . या डोंगराळ प्रदेशात हिंदुचे वर्चस्व होते तर शहरी व मैदानी भागावर मुस्लिमांचे वर्चस्व होते.[३१] साताऱ्याच्या पश्चिमेकडील डोंगराळ भाग ज्याला खोरे मुऱ्हे (मुरे) अथवा मावळ म्हणून ओळखत तो हिंदू प्रशासकांकडे (देशमुखांकडे) होता. या कालखंडात साताऱ्याच्या वायव्येकडे ५६ कि.मी.वर असणाऱ्या सह्याद्रीच्या दुर्गम प्रदेशात जावळी प्रदेश वसलेला होता. या ठिकाणी मोरे घ़राणे राज्यकारभार पाहत होते. साताऱ्याच्या ईशान्येस ५६ कि.मी. अंतरावर निंबाळकर घराणे फलटणचा कारभार पाहत होते. साताऱ्याच्या पूर्वेस व ९६ कि.मी. अंतरावर म्हसवडला माने घराण्याची सत्ता होती. साताऱ्याच्या आग्नेय दिशेला १४४ कि.मी. अंतरावर जत येथे डफळे घराण्याकडे देशमुखी होती. कराडच्या दक्षिणेस वारणा नदीच्या काठी ४८ कि.मी. वर कापशी येथे घोरपडे हे वतनदार होते.[३२]

या कालखंडात साताऱ्याच्या परिसरात कडेकपाऱ्यात मराठा सरदांराचे, देशमुखांचे आणि पाटलांचे वजन होते. त्यांच्या बळावरच विजापूरकरांनी कोकण प्रदेशावर आपले वर्चस्व निर्माण केले आणि नंतरच्या कालखंडात छ. शिवाजी महाराजांनाही विरोध करण्याचा प्रयत्न केला परंतु या सर्व सरदारांनी पुढे स्वराज्य कार्यात राजांनाच मदत केल्याने विजापूरकरांचे सातारा परिसरावरील वर्चस्व नष्ट होत गेले होते.

### ४.१.३.२.४.१ मराठा कालखंड

१७व्या शतकात महाराष्ट्रात मराठी सत्तेचा उदय झाला होता. शहाजीपुत्र छ.शिवाजी महारांजानी विजापूरची आदिलशाही, उत्तरेतील अतिशय बलाढय असणारी मुगल सत्ता पश्चिमेकडे समुद्रावर वर्चस्व ठेवणारा कोकण विभागातील सिद्दी, गोव्यामधील पोर्तुगीज व इंग्रज यांच्याशी अविश्रांत लढत देऊन मराठ्यांचे सार्वभौम असणारे स्वतंत्र राज्य निर्माण करण्यात यश मिळविले. सहिष्णुता आणि लोकोपयोगी, लोककल्याणाची कामे हा या स्वराज्याचा पाया होता. सातारा व साताऱ्याचा परिसर हा शिवाजीराजे व त्यांच्या वंशजांच्या कर्तबगारीशी अत्यंत जवळून निगडीत होता.

मालोजीराजे पुत्र शहाजी राजे हे निजामशाहीतील एक मातब्बर सरदार होते. मुघलांच्या विरोधात संघर्ष करून त्यांनी निजामशाही वाचवण्याचा खूप प्रयत्न केला परंतू त्यात त्यांना यश आले नाही. यानंतर शहाजीराजे आदिलशाहीचे सरदार बनले. आदिलशहाने पुणे, सुपे, चाकण व इंदापूर या भागांची जहागिरी शहाजी राजांना दिली त्याच बरोबर कऱ्हाड तालुक्यातील मसूर या गावासह बावीस खेडयांची देशमुखीही दिली.[३३] शहाजी राजांना कर्नाटकात कामगिरीसाठी आदिलशहाने पाठवले असता बाल शिवाजी व राजमाता जिजाऊस त्यांनी हा कारभार पाहण्यासाठी पाठवून दिले व ते कर्नाटकात गेले. या जहागिरीच्या प्रदेशातच छत्रपती शिवाजीराजांनी स्वराज्याचा प्रारंभ केला.

साताऱ्याच्या वायव्येस असणारा जावळीचा प्रदेश राजकीय दृष्टया अत्यंत महत्वाचा होता. कोकण प्रदेशात उतरण्याचे घाटमार्ग त्यामधूनच जात येत त्यामुळे या भागास कोकणाचे द्वार असे म्हटले जात असे. 'ज्याच्या ताब्यात जावळी त्याच्या ताब्यात वाई प्रांत, सहयाद्री घाटमाथा व त्यासमोरचे सबंध कोकण ' असे म्हणत असत. अशा या प्रदेशावर आपली मजबूत पकड असावी या उद्देशाने छ. शिवाजी महाराजांनी इ.स. १६५६ साली जावळी जिंकली.[३४] साताऱ्याच्या पश्चिमेस असलेला मोऱ्यांच्या ताब्यातील वासोटा किल्ला उर्फ व्याघ्रगड आणि शिवथरघळ शिवाजी महाराजांनी काबीज करून जावळी मोहिम पूर्ण केली.[३५] नवीन जिंकून

घेतलेल्या प्रदेशाला अधिक संरक्षण मिळावे व पारघाटचे नाके ताब्यात रहावे, या हेतुंनी महाराजांनी जावळीमध्ये भोरप्या डोंगरावर इ.स.१६५७ मध्ये किल्ला बांधला हा प्रसिद्ध प्रतापगड होय.[३६]

या कालखंडात औरंगजेब हा मुघलांचा दक्षिणेकडील सुभेदार म्हणून काम पहात होता कुतुबशाहीनंतर त्याने आपला मोहरा आदिलशाहीकडे वळवला होता त्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा संभाव्य धोका ओळखला होता. परंतु उत्तरेत मुघल बादशहा शहाजहान आजारी पडल्याचे कळताच छत्रपती शिवाजी महाराजांच्या सोबत मैत्री करून तो घाईने उत्तरेस परत गेला.

जावळी विजयाने आनंदीत होऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिलशाहीचा उत्तर कोकणाचा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. या काळात आदिलशाहीत अंतर्गत कलह माजलेला होता परंतु जेव्हा यातून त्यांना मोकळीक मिळाली. तेव्हा आदिलशहाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या विरोधात मोहीम काढली व आपला सरदार अफजलखानास छत्रपती शिवाजी राजांवर पाठवले. खानाचा उघडया मैदानावर सामना करण्याऐवजी महाराजांना जावळीचा बिकट प्रदेश निवडला व महाराजांनी आपला मुक्काम जावळीला हलवला. खान पंढरपूर, भोसे, शंभूमहादेव, मलवडी मार्गे रहिमतपूर वरून वाईस पोहोचला. अफजलखान महाराजांच्या भेटीस प्रतापगडाखाली जाण्यास तयार झाला, व छत्रपती शिवाजी महाराज व खान यांची भेट प्रतापगडाच्या पायथ्याशी झाली. याप्रसंगी झालेल्या भेटीत खानाने महाराजांना दगा फटका करण्याचा प्रयत्न केला. महाराजांनी राजनितीचा अवलंब करून १० नोव्हेंबर १६५९ रोजी अफजलखानास ठार केले. मराठयांचे स्वराज्य अफजलखान प्रसंगानंतर खऱ्या अर्थाने अस्तित्वात आले. आदिलशाही मुलुख लगेच काबीज करावा. या हेतूने महाराज वाईला पोहोचले पुढे त्यांनी वाई जिंकून घेतली व माणकोराम यास तेथील ठाणेदार नेमले.[३७]

तुळजापूरची भवानीदेवी ही भोसल्यांची कुलदेवता होय. तुळजापुरास देवीचे दर्शन घ्यावयास जाणे दूर पडत असे, म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी या अष्टभुजा देवीची स्थापना प्रतापगडावर एप्रिल १६६२ मध्ये केली.[३८] छत्रपती शिवाजी महाराज पन्हाळयावर वेढयात अडकलेले असताना शाहिस्तेखान पुण्यात ठाण मांडून बसला होता. त्याने त्याच्या फौजेच्या दोन तुकडया करून एक उत्तर कोकणात चौलजवळ व दुसरी घाटावर साताऱ्याजवळील रहिमतपूर येथे ठेवली होती.[३९] महाराजांनी शाहिस्तेखानावर ५ एप्रिल १६६३ रोजी लाल महालात जावून हल्ला केला व त्याला पळवून लावला. या नंतर महाराजांनी इ. स.

१६६४ मुघलांचे सुरत बंदर लुटले. राजांचा पूर्ण बंदोबस्त करण्यासाठी औरंगजेब बादशहाने जयसिंगास स्वारीवर पाठवले. या मुघल सत्तेसमोर आपला निभाव लागणार नाही, हे ओळखले व पुरंदरचा तह केला. या तहानंतर जयसिंगाने आदिलशहाच्या विरोधात मोहीम काढली. तहात ठरल्याप्रमाणे महाराजांनी मुघलांना सहाय्य केले. मुघल व मराठयांच्या संयुक्त फौजांनी फलटण, ताथवडा व खटाव ही ठिकाणे जिंकली.[४०] पुढे महाराजांनी आगऱ्याहून परतल्यावर दुसऱ्यांदा इ.स.१६७० मध्ये सुरतेवर स्वारी केली. याबरोबर आदिलशाही मुलखावरही त्यांनी आक्रमणे केली. त्यांनी इ.स. १६७३ मध्ये पन्हाळा जिंकून घेतला. साताऱ्यापासून ७ कि.मी.अंतरावरील परळीचा किल्ला जिंकून घेतला. २७ जुलै १६७३ रोजी सातारा किल्लाही काबीज केला.[४१] तसेच चंदनवंदन, पांडवगड, नांदगिरी, केळंजा आणि ताथवडा हे किल्ले महाराजांच्या ताब्यात आले. सन १६७४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. तसेच सन १६७५ मध्ये वाई छत्रपती शिवाजी महाराजांच्या ताब्यात आली. इ.स.१६७६ च्या सुमारास शिवाजी महाराज साताऱ्यास आजारी पडले. या वेळी दोन महिने त्यांचे वास्तव्य साताऱ्यात होते. या आजारातून बरे होऊन महाराज पुढे काही काळ पन्हाळयास जाऊन राहिले, तरी साताऱ्याकडील खटाव इत्यादी आदिलशाही प्रदेशावर त्यांचे आक्रमण चालूच होते.[४२] सन १६७७ साली छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिणेत कर्नाटक मोहिम केली, व परतल्यावर संभाजी महाराजांच्या वागणुकीत सुधारणा व्हावी, म्हणून त्यांना समर्थ रामदासांच्या सहवासात सज्जनगड (परळी) येथे ठेवले. परंतु संभाजी सन १६७८ मध्ये मुघलांना जावून मिळाला. परंतु पुढे दिलेरखानासोबत मतभेद झाल्याने सन १६७९ मध्ये ते माघारी आले. पन्हाळा येथे छत्रपती शिवाजी व संभाजी यांची भेट झाली. यानंतर ३ एप्रिल १६८० रोजी शिवाजी महाराजांचे रायगडावर निधन झाले. [४३]

छत्रपती शिवाजी महाराजांना सत्पुरूषांबद्दल नितांत आदर व पुज्यभाव होता. त्यापैकी बाबा याकूत केळशीकर, संत तुकाराम, मौनीबाबा पाडगावकर, निश्चलपुरी गोसावी, जयराम स्वामी वडगावकर, नारायणदेव चिंचवडकर, रंगनाथस्वामी व आनंदमुर्ती ब्रम्हणाळकर इत्यादींचा उल्लेख करता येईल. समर्थ रामदास स्वामी १६४४ साली कृष्णातीरी आले, कराडजवळ मसूर येथे राहू लागले . अंगापूरच्या डोहात सापडलेल्या श्रीरामांच्या मुर्तीची त्यांनी चाफळ येथे इ. स. १६४८ मध्ये स्थापना केली. तेंव्हापासून चाफळ येथे दरवर्षी रामजन्माचा उत्सव सुरू झाला. समर्थ रामदासही तेथेच वास्तव्यास राहीले. चाफळ देवस्थानास छत्रपती शिवाजी राजांनी २०२ वार्षिक इनाम दिले होते. त्याचप्रमाणे विजापूरच्या मुसलमानी राज्याकडून इनामे

मिळाली होती. समर्थ रामदासांनी ज्या अकरा मारूतींची स्थापना केली, त्यात मसूर, माजगाव व उंब्रज इ. ठिकाणे सातारा जिल्हयात येतात. याशिवाय त्यांचे काही मठही सातारा जिल्हयात आहेत.[४४] समर्थ रामदास स्वामी ज्या परळीच्या गडावर राहत त्या गडास नंतर सज्जनगड असे म्हटले जावू लागले. एकूण शिवकालाशी संबधीत सातारा परिसरातील घटना अत्यंत स्फुर्तीदायक अशा असल्याचे दिसून येतात.

छत्रपती शिवाजी राजांच्या मृत्यूनंतर राज्यपदासाठी सत्तासंघर्ष झाला. शेवटी त्यात संभाजी सरस ठरले, याच सुमारास औरंगजेबपुत्र अकबराने पित्या–विरोधात बंड पुकारले परंतु त्यात तो अयशस्वी झाला व आश्रयास छत्रपती संभाजीकडे आला. इकडे स्वराज्यात छत्रपती संभाजी विरूद्ध कटकारस्थाने चालू होती. अशाच एका कटात अकबरास समाविष्ट करण्याचा हेतुने अण्णाजी दत्तो यांनी प्रयत्न केला. परंतु अकबराने छत्रपती संभाजीराजांना सावध केले. परिणामी जुनीजाणती मंडळी या कटात असल्याने त्यांना ठार करण्यात आले. औरंगजेब बादशहादेखील इ. स. १६८२ मध्ये दक्षिण विजयासाठी दक्षिणेत उतरला. छत्रपती संभाजी राजांना एकाच वेळी मुघल, पोर्तुगीज व सिद्दी या सर्व शत्रुंशी लढा द्यावा लागला. मराठयांच्या विरोधात यश मिळत नसल्याने औरंगजेबाने प्रथमतः आदिलशाही संपवली. तेथील सरदार सर्जाखान यास वाई प्रांतावर पाठवले. वाई येथे सर्जाखान व हंबीरराव मोहिते यांच्या लढाईत मराठयांचा विजय झाला. परंतु हंबीरराव मोहिते ठार झाले. कोल्हापूर प्रांतावर नेमणुकीस असणाऱ्या मुकर्रबखानास संभाजी राजांना संगमेश्वर येथे पकडण्यात यश मिळाले. सन १६८९ मध्ये छ.संभाजी राजांना हालहाल करून ठार करण्यात आले. सन १६८९ च्या सप्टेंबर पर्यंत सातारा परिसरातील सातारा, परळी, निंब, चंदनवंदन, माजगाव, मसूर इत्यादी प्रदेश मराठयांच्या ताब्यात होता. छत्रपती संभाजीच्या हत्येनंतर राजाराम महाराजांना गादीवर बसविण्यात आले व त्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी जिंजीस पाठविण्यात आले. इकडे सातारा परिसरातील विविध किल्ले सन १६९० पर्यत मुघलांनी जिंकून घेतले. रायगडाचा पाडाव झाला. येसूबाई आणि बाल शाहू मुघल कैदेत गेले. पुढे मात्र चित्र बदलत गेले व स्वराज्यातील एक एक किल्ला मराठी फौजा जिंकू लागल्या.

सातारा परिसराची चांगली माहिती असणाऱ्या सर्जाखानास सातारा जिंकण्याकरिता पाठवण्यात आले. परंतु त्याचाही पराभव सेनापती संताजी व धनाजी जाधवने केला. खुद्द सर्जाखानास व त्याच्या मुलास संताजीने सातारा किल्ल्यावर अडकवून ठेवले.[४५] सर्जाखानाच्या पाडावानंतर मराठयांनी प्रतापगड व वाई इत्यादी प्रदेश घेतले.[४६]

प्रतिनिधी घराण्याची स्थापना करणारा संस्थापक मपरशूराम त्रिंबकफ हा या काळात प्रसिद्धीस आला. हा नांदगिरी जवळील किन्हई गावचा होता. राजाराम महाराज जिंजींत असल्याने जिंजी जिंकण्यासाठी झुल्फीकारखानास पाठवण्यात आले. मराठयांनी आठ वर्षे जिंजी लढवली. पण १६९८ साली जिंजी मुघलांनी जिंकली. परंतु त्यापूर्वी राजाराम महाराज जिंजीहून विशाळगडावर आले. काही महिन्यांच्या नंतर त्याने विशाळगडावरून गादी साताऱ्यास आणली. सातारा किल्ला हा बादशहावर लक्ष ठेवण्यास योग्य होता, म्हणून त्याने असा निर्णय घेतल्याचे दिसते.

मराठयांची खरी शक्ती किल्ल्यांमध्ये असल्याने औरंगजेबाने स्वतः किल्ले घेण्यास प्रारंभ केला. सन १६९९ मध्ये वसंतगड जिंकून त्याने स्वतः साताऱ्याच्या किल्ल्यास वेढा दिला. तो स्वतः साताऱ्याजवळच्या करंजे गावात येऊन राहीला. सातारा किल्ल्यास मुघलांचा वेढा पडला तेंव्हा राजारामाने सिंहगडावर निवासस्थान केले. तेथे छत्रपती राजाराम महाराजांचा सन १७०० साली मृत्यू झाला.[४७] परंतु त्याची पत्नी ताराबाई हिने मराठा राज्याची सुत्रे हाती घेतली. मराठा राज्यास खंबीर नेतृत्त्व दिले.

महाराणी ताराबाईने राज्याची सुत्रे हाती घेतली, तेव्हा औरंगजेब बादशहाचा सातारच्या किल्ल्याचा वेढा चालू होता. यावेळी बादशहा सोबत शहजादा मुअज्जम, तर्बियतखान, रहूल्लाखान, मन्सूरखान व मुनिमखान इत्यादी सेनानी होते. मराठयांनी मुघलांना मिळणारी रसद तोडण्याचे काम सतत चालू ठेवले होते. तर सज्जनगड (परळी) किल्ल्यावरून परशूराम त्रिंबक मराठयांना धान्य पुरवठा करत होता. यावेळी मुघलांनी तटाला सुरूंग लावून पाडण्याचा प्रयत्न केला व तटबंदीची बरीच हानी झाली शेवटी २१ एप्रिल १७०० रोजी वाटाघाटी करून मराठयांनी मुघलांना हा किल्ला दिला. शहजादा आझम याने केलेल्या वाटाघाटींमुळे किल्ला मुघलांना मिळाला. म्हणून औरंगजेबाने या किल्ल्याचे नाव 'आझमतारा' असे ठेवले.[४८] २२ एप्रिल १७०० रोजी औरंगजेबाने सातारा किल्ल्यात प्रवेश केला. आणि छत्रसाल राठोड याची किल्लेदार म्हणून नियुक्ती केली.[४९] परळीचा किल्ला म्हणजेच सज्जनगड १० जून १७०० रोजी मुघलांच्या ताब्यात आला. औरंगजेब बादशहाने त्याचे नाव 'नवरसतारा' असे ठेवले.[५०] इकडे बादशहा मराठयांचे किल्ले घेत होता तर तिकडे मराठयांच्या फौजा मुघलांच्या मुलखात मोहिमा काढत होत्या. पंचवीस वर्षाच्या प्रदिर्घ लढयानंतरही औरंगजेब मराठयांच्या राज्यावर ताबा मिळवू शकला नाही. व विमनस्क अवस्थेत २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर

मुक्कामी तो मरण पावला. त्याच्या मृत्यूने मराठयांचे स्वातंत्र्ययुद्ध संपले व एका नव्या अध्यायास प्रारंभ झाला.

औरंगजेबाच्या मृत्यूची बातमी त्याचा मुलगा आझमशहास समजताच त्याने स्वतःला बादशहा घोषीत केले आणि आपला भाऊ शहाआलम याचा विरोध मोडून काढण्यासाठी तो उत्तरेकडे निघाला. यावेळी छत्रपती संभाजी पुत्र शाहू व राणी येसूबाई मुघलांच्या कैदेतच होती. दिल्लीच्या रोखाने जात असताना भोपाळजवळ दोराहा येथे आपला सरदार झुल्फीकारखान व आणखी काही मुत्सद्दयांच्या सल्ल्याने आझमशहाने शाहूची ८ मे १७०७ रोजी कैदेतून मुक्तता केली. यामागे शाहू व ताराबाई यांच्यात यादवी होऊन मराठयांची शक्ती कमी व्हावी, हा अंतस्थ हेतू होता.

शाहूची सुटका झाल्यानंतर तो दक्षिणेकडे निघाला असता बिजागड येथे अमृतराव कदमबांडे, लाबंकानी येथे परसोजी भोसले, नेमाजी शिंदे, हैबतराव निंबाळकर, चिमणाजी मोघे असे अनेक सरदार येऊन मिळाले. यावेळी मराठी सत्तेचे प्रमुख केंद्र सातारा हे होते. साताऱ्यातून राणी ताराबाई कारभार पहात होती. अहमदनगरला पोहचण्यापुर्वीच शाहूने राणी ताराबाईस कळवले की आम्ही निघून स्वदेशी परत येत आहोत, आता राज्य आम्ही करू.[५१] इकडे मात्र ताराबाईने शाहूच्या वारसा हक्काच्या दाव्याला तीव्र विरोध केला. युद्धाचे सावट वाढले पण यावेळी खेड जवळ धनाजी जाधव छत्रपती शाहूच्या पक्षात गेला. खेडच्या युद्धात ताराबाईच्या पक्षाचा पराभव झाला. धनाजी जाधवांसोबत खंडो बल्लाळ चिटणीस, बाळाजी विश्वनाथ, बहिरोपंत पिंगळे या सारखी माणसे शाहूस येऊन मिळाली.[५२] यानंतर छत्रपती शाहूने मावळ परिसरावर आपले वर्चस्व निर्माण केले आणि साताऱ्याच्या रोखाने निघाला. वाटेतील चंदनवंदन किल्ल्यावरील किल्लेदारांनी शाहूचे वर्चस्व मान्य केले. शाहू साताऱ्यास येत आहे हे समजताच ताराबाईने परशुरामपंत प्रतिनिधीवर साताऱ्याच्या रक्षणाची जबाबदारी सोपवून तिने स्वतः पन्हाळा किल्ल्याचा आश्रय घेतला. सातारा किल्ल्याचा किल्लेदार शेखमिरा वाईचा राहणारा होता. शाहूने त्यास शरण आणले आणि सातारा किल्ला इ. स. १७०७ मध्ये शाहूच्या ताब्यात आला. जानेवारी १७०८ मधील शनिवारी शाहूने समारंभपूर्वक सातारा शहरात प्रवेश केला.[५३] तेव्हापासून या सुखद घटनेची आठवण म्हणून साताऱ्याच्या किल्ल्यावर दर शनिवारी चौघडा वाजवण्याची प्रथा सुरू झाली. १२ जानेवारी १७०८ रोजी शाहूने स्वतःस राज्याभिषेक करवला व सातारा ही राजधानी त्यांनी निश्चित केली.

मुघल बादशहा बहादूरशहा १७०९ साली दक्षिणेत आला असता छत्रपती शाहू व ताराबाई या दोघांनीही दक्षिणेतील सहा सुभ्यांची चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मागितल्या. बादशहाने दोघांमध्ये विजयी होणाऱ्या पक्षास सनदा मिळतील असे सांगितले परिणामी हा तंटा वाढतच राहिला.

ताराबाईने १७१० मध्ये पन्हाळा येथे आपला पुत्र दुसरा शिवाजी यास समारंभपूर्वक गादीवर बसवले. अशा प्रकारे करवीर गादीची स्थापना झाली. याच कालखंडात साताऱ्यात काही सरदारांऩी शाहू विरोधी बंड केले परंतु बाळाजी विश्वनाथाने ही बंडे मोडून शाहूचे आसन स्थिरावण्याकरिता मोलाची मदत केली. उत्तरेत मराठी सैन्याने स्वारी करून चौथाई व सरदेशमुखाच्या सनदा मिळवल्या. बादशाही कैदेत असणारे शाहूचे बंधू मदनसिंग आणि मातोश्री येसूबाई यांची सुटका केली. छत्रपती शाहूच्या या नव्या राज्य रचनेत अनेक नामवंत घराणी उदयास आली व त्यांना आपल्या पराक्रमासाठी नवीन कार्यक्षेत्र मिळाले म्हणून वेगवेगळया प्रदेशावर त्यांची नियुक्ती करण्यात आली.

१७२० साली बाळाजी विश्वनाथ मरण पावला त्याच्या मृत्यूनंतर छत्रपती शाहूने त्याचा पुत्र बाजीराव यास १७ एप्रिल १७२० रोजी कराड जवळील मसूर मुक्कामी पेशवाईची वस्त्रे दिली. इकडे दक्षिणेतील निजामाने कोल्हापूर राज्यक्रांतीनंतर गादीवर आलेल्या संभाजीस फूस लावून आपल्या सोबत केले व शाहू विरोधी कारवाया करू लागला. परंतु पालखेडच्या युद्धात त्याचा बाजीरावाने पराभव केला. यानंतर मराठयांनी पुन्हा उत्तरेस लक्ष घातले परंतु कोल्हापूरच्या संभाजीच्या चिथावणीने काही सरदार शाहूच्या मुलखात लुटालुट करू लागले तेंव्हा शाहूने स्वतः मोहिम काढली व भिलवडी पर्यंत कोल्हापूर राज्याच्या हद्दीपर्यत गेले. दोन्ही फौजा वारणा नदीवर  भिडल्या. यात कोल्हापूरकर संभाजीचा पराभव झाला राणी राजसबाई व संभाजीची पत्नी यांना पन्हाळयावर आदरपूर्वक पोहोच करण्यात आले ताराबाईने शाहूजवळ राहण्याचे ठरविल्याने ती सातारच्या किल्ल्यावर बंदिवासात ठेवण्यात आले. शाहू व संभाजी यांच्यात वारणेचा करार झाला त्यानुसार वारणा नदी दोन्ही राज्यांची सरहद्द झाली आणि कोल्हापूरकर गादी व सातारची गादी यांच्यात चाललेला तंटा मिटला.

इ. स. १७३७ मध्ये चिमाजी आप्पाने पोर्तुगिजाविरूद्ध मोहिम काढली. या मोहिमेमुळे वर्सोवापासून दमणपर्यंतचा प्रदेश मराठयांना मिळाला. या घटनेने सावध होऊन इंग्रजानी मराठयांशी तह केला. तसेच मुंबईच्या कौन्सीलने कॅप्टन विल्यम गॉर्डन नावाचा वकिल शाहूस भेटण्यास पाठवला. ८ जून १७३९ मध्ये शाहूची व त्याची सातारा येथे भेट झाली.[५४]

१७३९ मध्ये इराणचा बादशहा नादिरशहाने केलेल्या आक्रमणास उत्तर देण्यासाठी बाजीराव उत्तरेस निघाला असता नर्मदा काठी रावेरला २८ एप्रिल १७४० रोजी त्याचा मृत्यू झाला. बाजीरावाच्या मृत्यूनंतर पेशवाईची वस्त्रे त्याचा मुलगा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यास २५ जून १७४० रोजी सातारा येथे दिली.

इ. स. १७४३ पासून छत्रपती शाहूची प्रकृती ढासळू लागली. शाहूच्या राण्या आपापसात भांडत असत. छत्रपती शाहू निपुत्रिक असल्याने वारसाचा प्रश्न होता त्यामुळे शाहूस कायम त्रास होत असे. १७४८ मध्ये छत्रपती शाहूची धाकटी पत्नी सगुणाबाई वारली. हळूहळू छत्रपती शाहूने संसारातून आपले लक्ष काढले त्याचे मन साताऱ्यात रमेना म्हणून त्याने वनवासवाडी येथे निवास केला. परंतु प्रकृती खालावल्याने त्यास पुन्हा साताऱ्यात आणण्यात आले. वारसाचा प्रश्न अजूनही तसाच होता. कोल्हापूरच्या छत्रपती संभाजीस इकडे गादीवर बसवावे असा काहीचा होरा होता. परंतु छत्रपती शाहूस ते मान्य नव्हते. यावेळी सातारा किल्ल्यात कैदेत असलेल्या ताराबाईने आपला नातू रामराजा(दुसऱ्या शिवाजीचा पुत्र) हा अजून जिवंत व सुरक्षित आहे. असे जाहीर केले. शाहूने हा वारस स्वीकारला परंतु त्याच्या पत्नीने त्यास प्रखर विरोध केल्याने त्याने पेशव्यांना बोलावून आपल्या मरणानंतर रामराजास दत्तक म्हणून आपल्या गादीवर बसवावे असे सांगितले. छत्रपती शाहू १५ डिसेंबर १७४९ रोजी सातारा(शाहूनगर) येथे मरण पावला.[५५] शाहूने साताऱ्यात अनेक लोकोपयोगी कार्ये केली. तो अतिशय धार्मिक होता. ब्रम्हेंद्रस्वामी यांना धावडशी व कचरेश्वरबाबा यांना चाकणहून साताऱ्यात वास्तव्य करण्याचे आवाहन करून त्याना साताऱ्यात आणले.

छत्रपती शाहूची राजधानी प्रथम किल्ल्यावर होती. पुढे किल्ल्याच्या उत्तरेकडील उतारावर शाहूनगर नावाचे शहर त्याने इ. स. १७२०–२१ मध्ये वसविले. हेच आजचे सातारा होय.[५६] या शाहूनगरची स्थापना सन १७२१ च्या सुमारास झाली व तिचा सर्वाधिक विस्तार छत्रपती शाहूच्या कारकिर्दीतच झाला. या शहराची रचना व त्यातील भागांची नावे शाहूच्या आमदानीची आठवण करून देतात. शाहूनगर येथे शाहूने रंगमहाल, अदालतवाडा, यासारख्या वास्तू बांधल्या. यवतेश्वराहून खापरी नळाने पाणी आणून साताऱ्यात पाण्याची व्यवस्था लावली. हौद बांधले. उत्तर हिंदुस्थानातून व दक्षिणेकडून सावकारी, वकिली, देवतार्चन इत्यादी कामे करणारी अनेक कुंटुबे शाहूनगरात आणून वसवली. त्याचबरोबर आशानंद, सुखानंद, मनसापुरी, बनसीपुरी, सुमेरगिरी, गोसावी यासारखे नामांकित व्यापारी साताऱ्यात येऊन राहिल्यामुळे शहराची भरभराट झाली. सातारा ही मराठयांची राजधानी असल्यामुळे प्रधानांचे, सरदारांचे

वाडेही येथे बांधले गेले. नविन पेठा वसविल्या गेल्या. सातारा शहराच्या सौंदर्यात शाहूने भर घातली. छत्रपती शाहूने करंजे येथे बागा लावल्या. विविध प्रकारची फळझाडे व फुल–झाडे येथे होती. छत्रपती शाहूस शिकारीचा शौक होता. प्राणी पाळण्याची त्यास हौस होती.[५७]

छत्रपती शाहूच्या मृत्यूनंतर ४ जानेवारी १७५० रोजी रामराजास समारंभपूर्वक राज्यारोहण करण्यात आले. ताराबाईने त्याच्यावर वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याने ताराबाईऐवजी पेशव्यांना जवळ केल्याने तिने विरोध करण्यास प्रारंभ केला. यातूनच पुढे सांगोला करार झाला. त्यान्वये छत्रपती नामधारी होऊन खरी सत्ता पेशव्यांच्या हाती गेली. पेशव्यांची सरशी झाल्याने ताराबाईचे प्रस्थ कमी झाले. ताराबाईची शेवटची नऊ–दहा वर्षे निष्क्रियतेत गेली होती. ताराबाईचा मृत्यू १० डिसेंबर १७६१ रोजी साताऱ्यात झाला.

पानिपतच्या युद्धात मराठयांचा पराभव झाल्याने नानासाहेबांचा मृत्यू झाला. त्यामुळे त्याचा पुत्र माधवराव पेशवेपदी आला. नानासाहेबाचा भाऊ रघुनाथरावासही पेशवेपद हवे असल्याने रामराजावर ताबा मिळविण्यासाठी त्याने सातारा किल्ला आपल्या ताब्यात असावा असा आग्रह धरला परंतु त्याचा बिमोड झाल्यावर माधवरावाने रामराजाची सढळ हाताने व्यवस्था लावून दिली. सातारा किल्ल्यावरील घरे व वाडे यांची दुरूस्ती माधवरावाने सन १७६७ मध्ये केल्याची माहिती मिळते.[५८] कर्नाटक स्वारीस जातायेता माधवराव साताऱ्यात जाऊन रामराजाची भेट घेत असे.[५९] रामराजा ९ डिसेंबर १७७७ रोजी निपुत्रिक मरण पावला. मात्र मृत्यूपुर्वी त्याने बावी येथील भोसल्यांच्या वंशातील विठोजी यास दत्तक घेतले व त्याचे नाव धाकटे शाहूराजे असे ठेवले.

दुसऱ्या शाहूचा राज्याभिषेक ११ डिसेंबर १७७८ रोजी साताऱ्यात मोठया दिमाखात पार पडला. परंतु छत्रपतींचे अधिकार व महत्त्व हळूहळू कमी करत आणून पेशव्यांनी अखेरच्या छत्रपतींना तर बंदिवासाची वागणूक दिली. सर्व महसूल पुण्यात जमा होऊ लागला दुसऱ्या शाहूस कोणी भेटू नये म्हणून चौकी पहारे ठेवले. चाकर मंडळींची संख्या मर्यादित केली. या विरोधात छत्रपतींचा बंधू चतूरसिंगने बंड करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो अयशस्वी ठरला. या दुसऱ्या शाहूंना तीन पुत्र झाले. पहिला प्रतापसिंह उर्फ बुवासाहेब, दुसरा रामचंद्र उर्फ भाऊसाहेब, तिसरा शहाजी उर्फ आप्पासाहेब हे होत. दुसरा शाहू ४ मे १८०८ रोजी मरण पावला. त्यानंतर छत्रपती प्रतापसिंह गादीवर आले.

### ४.१.३.२.५ आधुनिक कालखंड

इ.स.१८०८ साली छत्रपती प्रतापसिंह सातारच्या गादीवर बसले. सातारच्या आधुनिक इतिहासाच्या नव्या पर्वास प्रारंभ झाला. १९व्या शतकात दोन बाणेदार मराठी राज्यकर्ते झाले. पहिले छ.प्रतापसिंह व दुसरे बडोद्याचे सयाजीराव गायकवाड या दोन्ही राजांनी आपल्या राज्याच्या संरक्षणासाठी इंग्रजाशी जोरदार लढा दिला. या लढयात शस्त्रास्त्रे नव्हती परंतु आत्मनिष्ठा, मुत्सद्देगिरी आणि कर्तव्यनिष्ठा होती.

२५ सप्टेंबर १८१९ च्या तहानुसार इंग्रजांचे सार्वभौमत्व मान्य करून छत्रपती प्रतापसिंह राजांना मराठा गादी प्राप्त झाली. त्यानुसार १८४८ मध्ये अस्तित्त्वात आलेल्या सातारा जिल्हयातील प्रदेश तासगाव वगळता समाविष्ट होता. याचप्रमाणे सोलापूर जिल्हयातील सांगोला, माळशिरास व पंढरपूर उपविभाग विजापूर जिल्हयाचा विजापूर शहरासह काही भागसुद्धा या संस्थानात होता. मात्र ब्रिटिशांनी प्रतापसिंहाना सर्वाधिकार न देता सातारला इंग्रज रेसिडेंट नियुक्त केला होता. व त्याच्या सहमतीनेच या राजांना या राज्यांचा राज्यकारभार पाहणे गरजेचे ठरवले होते. या योजनेनुसार जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ साताऱ्याचा पहिला रेसिडेंट म्हणून कार्यरत झाला. व त्याला सहाय्यक म्हणून माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या विश्वासातील बाळाजीपंत नातू याची नियुक्ती करण्यात आली.

छत्रपती प्रतापसिंहास ग्रँट डफने राज्यकारभारविषयक मार्गदर्शन केले. त्यांना राज्यकारभारविषयक नवनव्या योजना सांगितल्या आणि उत्तेजन देऊन साताऱ्याचे राज्य अतिशय उत्तम कसे होईल याची शिकवण दिली. ग्रँट डफच्या सल्ल्यानुसार राजांनी आपल्या राज्यात प्रजाहिताच्या अनेक सुधारणा केल्या. राज्यकारभार व न्यायनिवाडा करण्यासाठी ते स्वतः कचेरीत जाऊ लागले. रयतेशी जनसंपर्क ठेऊन पिकांच्या प्रत्यक्ष पाहणीसाठी ते प्रसंगी ग्रँट डफ बरोबर जात असत. ग्रँट डफ व प्रतापसिंह यांच्या परस्पर सहकार्याने सातारा संस्थान खूपच चांगले झाले. असा अभिप्राय एका सुप्रसिद्ध लेखकाने दिला आहे.[६०]

छत्रपती प्रतापसिंहाच्या पुर्वी शाहू सोडून सातारच्या कोणत्याही छत्रपतींना सातारा शहरात सुधारणा करण्यात यश आलेले दिसत नाही. किंबहुना सततच्या अस्थैर्यी राजकीय परिस्थितीने त्यांना ते करण्याकरिता आवश्यक वेळ मिळाला नसेल. परंतु छत्रपती प्रतापसिंहाना आपली राजवट स्थिर करण्यासाठी इंग्रजांची मदत मिळाली व त्यांचे बस्तान लवकर बसले. परिणामी त्यांना लोककल्याणाची कामे करण्यास वेळ मिळाला. राजधानी असलेल्या सातारा शहरातही या काळात पाण्याचे दुर्भिक्ष असे. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी

यवतेश्वर देवालयाच्या मागे एक मोठा तलाव बांधून खापरी नळाने त्याचे पाणी शहराला पुरविले. महादरा येथेही तलाव बांधून खापरी नळाने त्याचे पाणी सातारा शहरात आणले. (१८२९). या सोईसाठी एक लाख रूपये खर्च झाला.[६१] सातारा शहरात सरळ व आखीव हमरस्ते तयार केले. साडेपाच लाख रूपये खर्च करून १८२६ साली छत्रपती प्रतापसिंह यांनी मोठा राजवाडा बांधला. तोच जुना राजवाडा म्हणून ओळखला जातो. त्यांनी आणखी वाडे बांधले व इतरांना बांधण्यासाठी वित्तसहाय्य केले. रस्त्याच्या दोन्ही बाजूस वृक्षारोपन केले. दुकाने बांधण्यासाठी होतकरू लोकांना तगाइची कर्जे दिली. मुलामुलींच्या संस्कृत शिक्षणास्तव एक मोठी पाठशाळेची इमारत बांधली. तेथे १२,००० रूपये खर्च करून एक छापखाना काढून अनेक उपयुक्त ग्रंथ छापून घेतले. दरबारी मानकऱ्यासाठी अनेक वाडे बांधले. साताऱ्याच्या किल्ल्यावरील मंगळाईच्या देवळाच्या जिर्णोद्धारासाठी पाच हजार रूपये, प्रतापगडावरील भवानीदेवीच्या देवळाचा जिर्णोद्धार चाळीस हजार रूपये, सज्जनगडावरील रामदास स्वामींच्या देवळाचा जिर्णोद्धार वीस हजार रूपये, यवतेश्वराचे देऊळ व तलाव याकरिता दहा हजार रूपये छत्रपती प्रतापसिंह राजांनी खर्च केल्याची नोंद आहे.[६२] लोककल्याणासाठी शहरात पंचपाळी हौद, छत्रीहौद इ. पाणीपुरवठा केंद्रे बांधली.

थोडयाच कालावधीत छत्रपती प्रतापसिंहानी सातारा राजधानीची चांगली सुधारणा घडवून आणली. कारागीर, उद्योगधंदे व व्यापारास राजाश्रय प्राप्त झाला. छत्रपती प्रतापसिंहानी साताऱ्यात शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या. बहुजन समाजामधील मुलामुलींच्या शिक्षणासाठी पाठशाला बांधली. मुंबई येथील डॉ. मिलन यांच्या मदतीने राजांनी दोन तीन विद्वान मिशनऱ्यांना आणून पाठशाळेचा उपक्रम निर्धार पूर्वक राबविला. पाश्चात्य शिक्षणाचे सामर्थ्य लोकांना पटवून देण्यासाठी उपयुक्त इंग्रजी ग्रंथाचे मराठीत भाषातंर करण्याचे तत्त्व त्यांनी प्रत्यक्षात उतरविले नामवंत लेखकांना उत्तेजन देऊन काही पुस्तके लिहून घेतली.[६३]

मराठा मुलांमुलींनी लष्करी शिक्षण घ्यावे यासाठी राजांनी ग्रँट डफच्या सल्ल्यानुसार रेसिडेन्टीतील एक इंग्रज अधिकारी नियुक्त केला. आपली कन्या गोजराबाई आणि इतर सरदारांच्या मुली यांना लष्करी शिक्षण देण्याची व्यवस्था केली.[६४]

छत्रपती प्रतापसिंहराजे लोककल्याणाची कार्ये उत्तमरित्या पार पाडत असूनही ब्रिटिशांनी सातारचे राज्य खालसा करण्याचा प्रयत्न सुरू केला होता. एलफिन्स्टन व ग्रँड डफ साताऱ्यात असताना त्यांनी छत्रपती प्रतापसिंह महाराजांना सहकार्य केले, परंतु पुढे आलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांनी सातारचे संस्थान खालसा करण्याकरिता प्रयत्न चालू केले. या कटात

छत्रपतीचे कनिष्ठ बंधू श्रीमंत आप्पासाहेब यांना सहभागी करून घेण्यात आले. त्यांनी मला गादीवर बसवले तर मी छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या विरोधात सरकारला सर्वतोपरी मदत करीन असे वचन दिले.[६५] हा कट यशस्वी झाला व छत्रपती प्रतापसिंहाना पदच्युत करण्यात आले. त्यांच्या जागी त्यांचे बंधू श्रींमत आप्पासाहेब यांना १८३९ मध्ये करार करून गादीवर बसविले.[६६] छ. प्रतापसिंहाना पदच्यूत करून साताऱ्याहून १६ कि.मी. वरील लिंब येथे गोठयात ठेवण्यात आले. व पुढे काशीस त्यांची रवानगी करण्यात आली. काशी येथे १८४७ साली त्यांचे निधन झाले.[६७]

रंगो बापूजी यांनी छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्यावरील झालेल्या अन्यायाला इंग्लडमध्ये जाऊन दाद मागितली परंतु त्याचा उपयोग झाला नाही. छत्रपती प्रतापसिंहाच्या मृत्यूनंतर सातारा संस्थान जास्त दिवस टिकले नाही श्रीमंत आप्पासाहेब यांना औरस संतती नसल्यामुळे दत्तक वारस नामंजूर करून १६ मे १८४९ रोजी सातारा येथे जाहिरनामा काढून त्यानुसार सातारा संस्थान खालसा केले.

आपली राजवट स्थिर करण्याच्या धोरणानुसार इंग्रजांनी १८५० साली नगरपालिका अधिनियम (क्रमांक २६) अमलात आणला त्यानुसार १ ऑगस्ट १८५३ रोजी सातारा येथे टाऊन म्युनिसीपालीटी स्थापन झाली.

१२ जून १८५७ रोजी इंग्रजांच्या विरूद्ध उठाव कानपूरला झाला. त्याच दिवशी सातारा येथे सशस्त्र उठाव करण्याची तयारी पूर्ण झाली होती. परंतु फितुराकडून ही बातमी इंग्रजांना समजली. त्यामुळे उठावकर्त्यांना पकडून तोफेच्या तोंडी देण्यात आले. त्यामुळे त्या दिवशी उठाव होऊ शकला नाही.

सन १८७१ मध्ये सातारा येथे सार्वजनिक सभेची स्थापना झाली. सन १८८५ मध्ये हिंदी राष्ट्रीय सभेची स्थापना मुंबईस झाली. त्यावेळी सातारा येथील दादासाहेब करंदीकर, बळवंटराव कोल्हटकर, गोविंदराव लिमये यांनी राष्ट्रीय सभेच्या प्रचारासाठी दौरे काढले. सन १९०० मध्ये हिंदी राष्ट्रीय सभेची प्रांतिक परिषद साताऱ्यात भरली होती. लोकमान्य टिळक यांनी सुरू केलेली गणेशोत्सव व शिवजयंती उत्सव यामध्येही सातारा येथील कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. लोकमान्य टिळक राष्ट्रीय शाळा सातारा येथे स्थापन करण्यात आली होती. या शाळेत राष्ट्रीय शिक्षण दिले जात होते. त्यांनी जी चतुःसूत्री जाहीर केली होती. त्यामध्येही सातारा येथील क्रांतीकारकांचा मोठा सहभाग होता.[६८]

महात्मा गांधीजींनी सुरू केलेली स्वदेशीची चळवळ सातारा येथे जोरात सुरू झाली होती. विमा महर्षी अण्णासाो चिरमुले यांनी स्वदेशीच्या मालाचे दुकान सुरू केले आणि सहकारी पतपेढी सुरू केली. सन १९१६ साली त्यांनी सातारा येथे शेतकरी सहकारी परिषद भरविली होती. भारतात इंग्रजी राज्याशी असहकार आणि सत्याग्रह या मार्गाचा अवलंब स्वातंत्र्य चळवळीत सुरू झाला. या असहकारितेच्या चळवळीत साताऱ्यातील पंढरीनाथ घाणेकर व निळूभाऊ घाणेकर, भाऊसाहेब सोमण अशासारख्या अनेक कार्यकर्त्यांनी भाग घेतला. महात्मा गांधी खादीचे प्रचारासाठी दौऱ्यावर असताना त्यांना सातारा शहर नगरपालिकेतर्फे मानपत्र दिले. सन १९३० मध्ये राष्ट्रीय निशाण लावण्याची मोहिम निघाली त्यावेळी न्यू इंग्लिश स्कूल सातारा येथे पहिले निशाण फडकविण्यात आले होते. शिरोडा येथील सत्याग्रहात सातारा येथील कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. नवीन कार्यकर्ते तयार करण्यासाठी सातारा शहरात भाऊसाहेब मोडक यांनी राष्ट्रीय दलाची स्थापना केली होती.

८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे महात्मा गांधीजीनी ब्रिटिशांना चले जावची घोषणा दिली. काही करून कोणत्याही मार्गाने हिंदुस्थानातून इंग्रजांना घालविण्याचे प्रयत्न देशभर सुरू होते. त्यातूनच प्रतिसरकारची स्थापना झाली. या कामी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे फार मोठे योगदान आहे. पुढे १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वंतत्र झाला. अशाप्रकारे स्वातंत्र्य चळवळीतील देशातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व सल्ला साताऱ्यातून मिळत होता. एवढेच नव्हे तर सातारा येथील क्रांतिकारकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता हा लढयात सहभाग घेऊन फार मोठे कार्य केले होते. त्यामुळे सातारा हा क्रांतिकारकांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो.[६९]

## सारांश

साताऱ्याला प्रागैतिहासिक काळापासूनचा इतिहास आहे. सातारा जिल्हयात विविध ठिकाणी सापडलेल्या अवशेषावरुन प्रागैतिहासिक मानवाचे अस्तित्व आढळते. सातारा परिसरावर प्राचीन काळात राष्ट्रकुट, बदामीचे चालुक्य व सातवाहन घराण्याची सत्ता होती. पुढे शिलाहार वंशीय राजा भोज द्वितीयने सातारा जिल्हयात १०-१२ किल्ल्यांचे बांधकाम केल्याचा उल्लेख इतिहासात मिळतो. यादव सत्तेच्या ऱ्हासानंतर दक्षिण भारतातील लहान-मोठी हिंदू राज्ये मुस्लिम आक्रमणास बळी पडली. तेव्हापासून साताऱ्यावर बहामनीची सत्ता सुरु झाली. बहामनी राजवटीनंतर आदिलशाही सत्ता स्थापन झाली होती.

१७ व्या शतकात महाराष्ट्रात मराठी सत्तेचा उदय झाला होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी सहिष्णुता आणि लोकोपयोगी, लोककल्याणाची कामे करुन स्वराज्याचा पाया रचला. छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स. १६५६ साली जावळी जिंकली. छत्रपती शिवाजी महाराज व खान यांची भेट प्रतापगडाच्या पायथ्याशी झाली. याप्रसंगी १ नोव्हेंबर १६५९ रोजी अफजलखानास ठार केले.

छत्रपती शिवाजी राजांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजीराजे झाले. त्यांनीही औरंगजेब बादशहाच्या विरूद्ध लढा दिला. शेवटी कोल्हापूर प्रांतावर नेमणुकीस असणाऱ्या मुकर्रबखानास संभाजी राजांना संगमेश्वर येथे पकडण्यात यश मिळाले. सन १६८९ मध्ये छत्रपती संभाजी राजांना हालहाल करून ठार करण्यात आले. छत्रपती संभाजीच्या मृत्यूनंतर राजाराम महाराजास गादीवर बसविण्यात आले व त्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी जिंजीस पाठविण्यात आले. छत्रपती राजाराम महाराजांचा सन १७०० साली मृत्यू झाला. त्यानंतर त्यांची पत्नी ताराबाई हिने मराठा राज्याची सुत्रे हाती घेतली. तेव्हा औरंगजेब बादशहाचा सातारच्या किल्ल्याचा वेढा चालू होता. २२ एप्रिल १७०० रोजी औरंगजेबाने सातारा किल्ल्यात प्रवेश केला आणि छत्रसाल राठोड याची किल्लेदार म्हणून नियुक्ती केली. पंचवीस वर्षाच्या प्रदिर्घ लढयानंतरही औरंगजेब मराठयांच्या राज्यावर ताबा मिळवू शकला नाही. शेवटी २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर मुक्कामी तो मरण पावला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहूची सुटका झाली. त्यावेळी मराठी सत्तेचे प्रमुख केंद्र सातारा हे होते. साताऱ्यातून राणी ताराबाई कारभार पहात होती. शाहू व महाराणी ताराबाई यांच्यात यादवी युद्ध झाले. त्यात शाहूचा विजय झाला. छत्रपती शाहूने साताऱ्यात अनेक लोकोपयोगी कार्ये केली. छत्रपती शाहूची राजधानी प्रथम किल्ल्यावर होती. पुढे किल्ल्याच्या उत्तरेकडील उतारावर शाहूनगर नावाचे शहर त्याने इ. स. १७२०–२१ मध्ये वसविले. हेच आजचे सातारा होय. शाहूनगर येथे छत्रपती शाहू महाराजांनी राजधानीस शोभेल अशा वास्तूंचे बांधकाम केले. तसेच अनेक लोकोपयेगी कामे केली. छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर ४ जानेवारी १७५० रोजी रामराजास समारंभपूर्वक राज्यारोहण करण्यात आले.

दुसऱ्या शाहूचा राज्याभिषेक ११ डिसेंबर १७७८ रोजी झाला. परंतु छत्रपतींचे अधिकार व महत्त्व हळूहळू कमी केले. दुसरा शाहू ४ मे १८०८ रोजी मरण पावला. २५ सप्टेंबर १८१९ च्या तहानुसार इंग्रजांचे सार्वभौमत्व मान्य करून छत्रपती प्रतापसिंह राजांना मराठा गादी प्राप्त झाली. ब्रिटिशांनी प्रतापसिंहाना सर्वाधिकार न देता सातारला इंग्रज रेसिडेंट नियुक्त केला होता.

व त्याच्या सहमतीनेच या राजांना या राज्यांचा राज्यकारभार पाहणे गरजेचे ठरवले होते. या योजनेनुसार जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ सातान्याचा पहिला रेसिडेंट म्हणून कार्यरत झाला. त्याला सहाय्यक म्हणून माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या विश्वासातील बाळाजीपंत नातू याची नियुक्ती करण्यात आली. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. छत्रपती प्रतापसिंहाना ब्रिटिशांनी पदच्युत केले. त्यांच्या जागी त्यांचे बंधू श्रीमंत आप्पासाहेब यांना १८३९ मध्ये करार करून गादीवर बसविले.

श्रीमंत आप्पासाहेब यांना औरस संतती नसल्यामुळे दत्तक वारस नामंजूर करून १६ मे १८४९ रोजी सातारा येथे जाहीरनामा काढून त्यानुसार सातारा संस्थान खालसा केले.

### ४.१.३.३ प्राचीन महाराष्ट्रातील स्थापत्यकला :–

महाराष्ट्रात प्राचीन काळापासून मराठा काळापर्यंत स्थापत्य कलेचा विकास मोठया प्रमाणावर झालेला दिसत नाही. याचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील लोकांचे राहणीमान हे साधे असून त्यांनी सांस्कृतिक विकासाच्यादृष्टिने कलेच्या क्षेत्राकडे लक्ष दिले नाही. केवळ गरजेपुरत्याच आवश्यक असणाऱ्या कलेकडे लक्ष पुरविलेले दिसते. दक्षिणेत मौर्य, चालुक्य आणि पल्लव यांच्या काळात स्थापत्य शिल्प यांचा पूर्ण विकास झाला होता. पुढे मराठा काळात म्हणजेच छ.शिवाजी महाराजांच्या काळात मुघल शाहयांच्या धामधुमीमुळे विकास झाला नाही. पेशवे काळात मात्र थोडयाफार प्रमाणात हा विकास झालेला आढळून येतो.

मौर्य सातवाहन कालात लेणी खोदण्याची कला उदयास आली. वाकाटक आणि राष्ट्रकूट यांच्या राजवटीत ही कला परिणत अवस्थेला पोचली. यादवकाळात कोरीव लेण्याऐवजी बांधकाम स्थापत्य महाराष्ट्रात उदयास आले. 'हेमाडपंती' या नावाने प्रसिद्ध असलेली अनेक मंदिरे यादवकाळात बांधली गेली.पल्लव आणि चालुक्य यांच्या मंदिरांच्या मानाने हेमाडंपती मंदिरे आकाराने लहान व कमी कलाकुसरीची आढळून येतात.

यादवकाळानंतर बहामनी राजवटीत वास्तुशिल्पाकडे दुर्लक्षच झालेले आढळून येते. सरंक्षणाच्या दृष्टीने भरभक्कम स्वरूपाचे किल्ले या काळात बांधले गेले. विजापूरच्या आदिलशाहीत स्थापत्यशास्त्राचा विकास झाला. यादवकाळात खऱ्या अर्थाने महाराष्ट्र–संस्कृतीला आकार आला. परंतु या कालखंडात दक्षिणेत इस्लामी लोकांच्या आक्रमणामुळे मराठयांचा बराचसा भूभाग हा इस्लामांच्या वर्चस्वाखाली गेला. त्यांच्याशी संघर्ष करूनच मराठयांनी आपल्या स्वराज्याची स्थापना केली. परंतु या मुस्लीम सत्ताशी लढण्यातच या मराठयांचा बराचसा कालखंड गेला असल्याने मराठयांच्या आर्थिक तिजोरीवर ताण आलेला

होता. त्यामुळे या काळात कलेच्या क्षेत्रात फार मोठया प्रमाणावर प्रगती झालेली दिसून येत नाही. केवळ किल्ले उभारणे आणि किल्ल्यांची डागडुजी करणे एवढेच स्थापत्याच्या दृष्टीने पाहिले गेले होते. मराठा संस्कृतीमध्ये परकीय सत्तांच्या रूढी व परंपरा यांचा प्रभाव पडून प्राचीन काळातील परंपरेने चालत आलेली संस्कृतीत बदल होत गेला.

### ४.१.३.३.१ बांधीव स्थापत्य :–

बौद्ध काळात निर्माण झालेल्या बांधीव स्थापत्याचे पुरावे हे स्तूप रूपात आढळतात. हे स्तूप प्रामुख्याने पवनी, सोपारा, तेर, कोल्हापूर, कान्हेरी व महाकाली येथे आढळतात.[७०]

### ४.१.३.३.२ कोरीव स्थापत्य :–

या शैल्यस्थापत्यामध्ये प्रामुख्याने चैत्यगृह आणि विहार आढळून येतात., याशिवाय सभागृह, भोजनगृह, स्मशाने, न्हाणपोढी(आंघोळीच्या पाण्याची टाकी), पाणपोढी (पिण्याच्या पाण्याची टाकी), कोढी(पुजेचे कोनाडे), विश्रांतीसाठी बांधलेले कट्टे इ.चा समावेश होतो. या सर्व घटकाचा समावेश कान्हेरी, जुन्नर आणि भाजे येथील स्थापत्यात होतो.[७१]

### ४.१.३.३.३ मंदिर स्थापत्य

हिंदू धर्मातील विविध पंथाच्या आणि जैन मंदिराच्या स्थापत्याचा समावेश हा बांधीव मंदिरात होतो. वैदिक संस्कृतीत देवांना यज्ञातील अग्निमध्ये आहुती दिल्या जात असत. ती आहूती अग्नी देवांना पोहचवते, असे मानले जात असे. त्यामुळे यज्ञविधी हाच पूजेचा प्रकार वेदकाळात प्रचलित होता. मात्र त्या काळात मूर्तीपूजा केली जात नव्हती. त्यामुळे त्या काळात मूर्ती बनवणे आणि मूर्तीकरिता वास्तू किंवा मंदिरे बांधणे ही संकल्पनाच अज्ञात होती. पुढे बौद्ध धर्मियांनीही वेदकाळातील पद्धतीला विरोध करून स्तूपाची पूजा करण्यास प्रारंभ केला. हिंदू धर्मात ही स्थिती भक्ती आणि अवतार या कल्पनामध्ये तसेच विष्णू, शिव, बुद्ध व महावीर या सर्वांना सामायिक असलेल्या भगवान या संज्ञेने महत्त्वाचे स्थान मिळाले. परंतु यामध्ये देवाचे स्वरूप कसे असावे. म्हणजेच मूर्ती कशी असावी हे स्थानिक कला परंपरेवर अवलंबून होते. सपाट दगडावर देवमूर्ती व दगडी कठडा असे प्रथमतः देववास्तूंचे किंवा मंदिराचे स्वरूप होते.

इतिहासकाळाच्या प्रारंभी मंदिराचे जे 'देवगृह' स्वरूप होते ते जाऊन त्याला प्रासादाचे स्वरूप मिळाले. राजा हा विश्वातील महत्त्वाचे कार्य करणाऱ्या आठ देवांचा पृथ्वीवरील प्रतिनिधी आहे. अशी श्रद्धा होती. राजा हा प्रासादात राहतो. त्यामुळे देवाचे निवासस्थान हे अनेक मजली प्रासादात आले. देवाची दिनचर्या राजाच्या दिनचर्येशी मिळतीजुळती केली गेली. देवासाठी चौघडा वाजविण्यात आला. भूपाळ्या, नैवद्य दाखविणे, देवापुढे संगीत व नृत्य करणे

यातूनच पुढे गर्भगृहावरील अनेक मजले अभिव्यक्त करणारे शिखर आणि गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला द्वारपाल निर्माण करण्यात आले.[७२]

### ४.१.३.४ बारव स्थापत्य :–

महाराष्ट्राच्या जलव्यवस्थापनात असाधारण महत्त्व असलेल्या बारव स्थापत्य यास महत्त्वाचे स्थान आहे. बारव ही चालुक्यकालीन असून ती बाराव्या शतकातील आहे. एक प्रवेश असलेली  व अष्टकोनी आकाराची बारव नांदेड जिल्हयातील मरळक येथे असून या बारवेजवळ दगडी हौद आहे. बारवेतील पाणी रहाटाद्वारे उपसून ते प्रणालाद्वारे हौदात जमा केले जात असे. अशा प्रकारच्या बारव प्रामुख्याने पुणे जिल्हयातील मंचर, औरंगाबाद जिल्हयात सिल्लोड, सातारा जिल्हयात गुरसाळे व पुणे जिल्हयातील पुरंदर येथे आहेत. बारवचे प्रकार पुढीलप्रमाणे सांगितले जातात.

#### ४.१.३.४.१ तीन प्रवेशयुक्त बारव :–

अशा प्रकारच्या बारव या प्रामुख्याने नांदेड जिल्हयातील एरगी, परभणी जिल्हयातील एरंडेश्वर, जालना, जळगाव जिल्हयातील तोंडापूर, सातारा जिल्हयातील कातरखटाव, बीड जिल्हयातील मानूर व सोलापूर जिल्हयातील वेळापूर येथे या प्रकारच्या बारव आहेत.

#### ४.१.३.४.२ चार प्रवेशयुक्त बारव :–

हा स्थापत्य प्रकार सर्वत्र रूढ आहे. अशा प्रकारच्या बारव नांदेड जिल्हयातील माहूर, जालना जिल्हयातील अंबड, परभणी जिल्हयातील वालूर व गौर येथे अशा बारव आहेत. या बारवांवर मोठे शिल्पांकन आहे.

#### ४.१.३.४.३ मंडपयुक्त बारव किंवा जलमांडवी

या प्रकारात एक, दोन,  तीन मंडपयुक्त बारव इत्यादी प्रकार पडतात. एकमंडपयुक्त बारव या जालना जिल्हयातील महाकाळा, नांदेड जिल्हयातील मुदखेड, उस्मानाबाद जिल्हयातील उपळा, पुणे जिल्हयातील लोणी भापकर येथे आढळतात. दोन मंडपयुक्त बारव या जालना जिल्हयातील अंबड येथे आढळते. तीन मंडपयुक्त बारव ही नाशिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर येथे आढळते.[७३]

अशाप्रकारच्या अनेक बारवा महाराष्ट्रात आढळून येतात. या बारवांची निर्मिती आठव्या व नवव्या शतकापासून झालेली आढळून येते. त्याची भरभराट अकराव्या व तेराव्या शतकात झाली. या बारवा तंत्रदृष्टया उत्कृष्ट होत्या. आजही अशा बारवा उपयोगात आणलेल्या दिसून येतात. या बारवामध्ये असलेल्या शिलालेखावरून याची निर्मिती ही त्या काळातील सेनानी,

सामंत, श्रेष्ठी व सामान्य गणिकांनी केली होती हे स्पष्ट होते. चौदाव्या शतकानंतर बारवांची निर्मिती संपुष्टात आली.

**४.१.३.५ पोखरणी –**

बारवेपेक्षा मोठे विस्तारित स्वरूपात पोखरणीचे असते. पोखरणी या शब्दास यादव काळात पुष्करणी म्हटले जात होते. याचे स्थापत्य शास्त्रीय वैशिष्टये म्हणजे कमी खोलीवर विस्तीर्ण असा भाग तळासी ठेवून बांधकाम करतात. याचा समतल भाग जास्तीत जास्त मोठा ठेवून कमीतकमी टप्प्यात बांधकाम पूर्ण करतात. याच्या मध्यभागी मंडप उभारतात. महाराष्ट्रात परभणी जिल्हयातील औंढा नागनाथ, जालना जिल्हयातील अंबड, नाशिक जिल्हयातील त्रयबंकेश्वर, नांदेड जिल्हयातील होट्टल येथे अशा प्रकारच्या कमलवेलीनीयुक्त असणाऱ्या पुष्करणी आहेत.

**४.१.३.६ तडाग(तळे किंवा तलाव):–**

पोखरणीपेक्षा मोठया जलाशयाला तडाग म्हणतात. योग्य पाणलोटाचे क्षेत्र निवडून त्याठिकाणी बंधारा बांधला जातो. त्या बंधाऱ्यात पाण्याचा साठा होतो. अशा जलाशयास तडाग असे म्हणतात. महाराष्ट्रात असे तडाग अनेक ठिकाणी आढळून येतात.[७४]

## संदर्भ


१) जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतीकोश, खंड १– साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, प्रस्तावना

२) शेणोलीकर ह.श्री. व देशपांडे प्र.न., महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, मोघे प्रकाशन कोल्हापूर, १९७२, पृ.२, ३

३) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, पृ.५९५

४) सातारा जिल्हा जनगणना अहवाल, २००१, पृ.४

५) काळे व्ही.सी., सातारा जिल्हयातील किल्ल्यांचे मराठा स्वातंत्र्य युद्धातील ऐतिहासिक महत्त्व, १६८९–१७०७, टि. म. वि. पुणे, एम.फिल. प्रबंध, जुलै २००८ पृ.३

६) भोसले एस.एच., सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा–एक चिकित्सक अभ्यास (इ. स.१६०० ते १९००), टि. म. वि. पुणे, एम. फिल. प्रबंध, ऑक्टोबर २००८ पृ.६

७) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.४

८) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १८८५ पृ.१७

९) सातारा जिल्हा जनगणना अहवाल, सन १९०१ ते २००१

१०) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.१४, १५

११) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटिअर, १९९९,पृ. ७९

१२) Malik A.C., Stone of the Bombay and Satara District Badoda , 1959, P.3342

१३) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ. ८०

१४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ. ८२

१५) Canigham, Stup Of Bharhut Lekh No. 135, 138, 139, P.11

१६) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८३

१७) Mirashi V.V., Studies In Indology, Vol. 1, P., 5

१८) Indian Antiquery, Vol- 9, P.303

१९) Journal of the Bombay branch of the Royal Asiyatik Society Vol. 8, Bombay, P.164

२०) Mirashi V.V., Apigraphiya India, Delhi, Vol. 29, P.178

२१) ठोसर हरीहर, राष्ट्रकुटांचा प्रारंभिक इतिहासावर नविन प्रकाश, भारतीय इतिहास आणि

२२) काळे व्ही.सी., सातारा जिल्हयातील किल्ल्यांचे मराठा स्वातंत्र्य युद्धातील ऐतिहासिक महत्त्व, (१६८९–१७०७), टि. म. वि. पुणे, एम. फिल. प्रबंध, जुलै २००८ पृ.३

२३) कित्ता, पृ.३

२४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.९०.

२५) कित्ता, पृ.८४

२६) कित्ता, पृ.१४७

२७) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.९३

२८) काळे व्ही.सी., उपरोक्त, पृ. ४

२९) कित्ता, पृ.४

३०) Deglurkar J.B., Temple Architecture And Sculpture of Maharashtra, P.109

३१) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.१२०

३२) कित्ता पृ.१२५,१२६

३३) शिवकालीन पत्रसारसंग्रह पुणे, १९३०, पत्र क्रं.८८५

३४) आपटे द.वि., स.म.दिवेकर(संपा.), शिवचरित्र प्रदिप शिवापूर दप्तर यादी, पुणे,१९२५, पृ.५०

३५) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ. १३०

३६) मेंहदळे ग.भा., श्री राजा छत्रपती खंड २, भाग २, पुणे, १९९६, पृ.७७१

३७) काळे व्ही.सी., उपरोक्त, पृ.८

३८) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड१, मुंबई १९८८, पृ.१६६.

३९) कित्ता, पृ. २११

४०) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.१३४

४१) आपटे द.वि., दिवेकर स.म.(संपा.), शिवचरित्र जेधे शकावली, पुणे, १९२५ पृ.२७

४२) Sardesai G.S.(Ed.), Selection from the Peshwa Duftar Vol.42, Bombay, 1934, P.20

४३) Sardesai G.S., New History of the Marathas, Vol. 2, Bombay 1971, P.274, 276.

४४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.१३६

४५) सरदेसाई गो.स., रियासत खंड २, मुंबई १९८८, पृ.१८६

४६) कित्ता, पृ.१८६

४७) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.१४३

४८) Kulkarni G.T., The Maratha Mughal relations Twenty five fateful Years (1682 to 1707 A.D.) Poona, 1983, P.148

४९) कित्ता, पृ.१९१

५०) कित्ता, पृ.१९३

५१) राजवाडे वि.का., मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड १८, मुंबई, १९१४ लेख क्रं.४६

५२) कित्ता, पृ.१४७

५३) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.१४७

५४) कित्ता, पृ.१५४

५५) कित्ता, पृ.१५६

५६) कित्ता, पृ.१५७

५७) कित्ता, पृ. १५७

५८) कित्ता, पृ.१५९

५९) कित्ता, पृ.१५९

६०) ठाकरे के.सी., प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी, १९४८, पृ.८०

६१) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.१६३

६२) कित्ता, पृ.१६३

६३) कित्ता, पृ.१६३

६४) कित्ता, पृ.१६४

६५) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड,८, १९९२, पृ.६४३,६४८

६६) कित्ता, पृ.६४३

६७) कित्ता, पृ.६४४

६८) पाटणे संभाजीराव, स्वातंत्र्य संग्रामातील सातारा जिल्हा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सवी समिती सातारा, १९९२, पृ.२०

६९) कित्ता, पृ.३४

७०) पाठक अं.श.(संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, महाराष्ट्र : इतिहास प्राचीन काळ (खंड–१ व २), स्थापत्य व कला, दर्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, प्रास्ताविक, पृ.२, ३

७१) कित्ता, पृ.५, ६

७२) पाठक अं.श.(संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, महाराष्ट्र : इतिहास प्राचीन काळ (खंड–१ व २), स्थापत्य व कला, दर्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृ.११९–१२२

७३) पाठक अं.श.(संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, महाराष्ट्र : इतिहास प्राचीन काळ (खंड–१ व २), स्थापत्य व कला, दर्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृ. २७१ ते २७८

७४) कित्ता, पृ.२७९

## ४.२ सातारा जिल्हयातील धार्मिक वास्तू

मराठा काळात सातारा जिल्हयात धार्मिक दृष्टया त्यामध्ये मंदिरे, मशिदी, दर्गे मोठया प्रमाणात निर्माण झालेली आहेत. याचा सविस्तर अभ्यास यात केलेला आहे.

### ४.२.१ पहिला टप्पा–

पहिला टप्पा हा शिवजन्मापासून ते छ.शाहू महाराजांच्या स्थिरतेपर्यत म्हणजेच इ.स.१७१९ पर्यतचा होय. १४ व्या शतकाची अखेर ही महाराष्ट्रातील सामाजिक पुनर्रचनेचा प्रारंभीचा कालखंड मानला जातो. याचे कारण राजकीय दृष्टीने पाहिल्यास असे दिसते की, जी परकीय सत्तांनी उत्तरेतून दक्षिणेत प्रवेश केल्यानंतर आपली सत्ता स्थिर केली होती. मुस्लिम सत्ताधीश हे परकीय असले तरी त्यांनी आपली सत्ता दक्षिणेत स्थिर झाल्यानंतर मराठयांशी सलोख्याचे संबंध निर्माण केल्याने मराठयांनी राजकारणात भाग घेण्यास सुरूवात केली. पुढे १६ व्या शतकात विजापूरचा सहिष्णू वृत्तीचा इब्राहिम आदिलशहा याच्या कारकिर्दीत हिंदू व मुस्लीम यांच्यात सांस्कृतिक देवाण घेवाण होवून नवीन सामाजिक रचना विकसित झाली. या काळात हिंदू हे इस्लामी सत्तांच्या दरबारामध्ये प्रशासनामध्ये विविध पदावर कार्यरत होते.

मराठयांच्या सुलतानशाहीशी असलेल्या एकनिष्ठतेमुळे मराठयांचे त्यांच्या दरबारात महत्त्व वाढले. सुलतानांनी मराठा सरदारांना मराठयांना वतने दिल्यामुळे त्यांना अमर्याद अधिकार मिळाले. त्यामुळे ते आर्थिकदृष्टया सक्षम बनून स्थानिक जनतेवर वर्चस्व गाजवू लागले. उदा. शहाजीराजे भोसले इ.स.१६०० मध्ये मुघल सत्तेने दक्षिणेत प्रवेश केल्याने मराठयांना एक नवीन संधी मिळाली. त्यामुळे मराठयांची पूर्वीची सुलतानशाहीशी असलेली निष्ठा कमी झाली.

मराठा वर्गाचा उदयामुळे मराठा प्रदेशामध्ये सुरूवातीस अनेक धार्मिक घडामोडी घडून आल्या होत्या. त्यावरून सुलतानांनी हिंदूबाबत सहिष्णू धोरण स्वीकारले होते हे सिद्ध होते. वतनदारांनी स्थानिक जनतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रामुख्याने मंदिराचा आश्रयदाते, उदारतेचे काम, सामाजिक कारणे याच्या माध्यमाचा वापर केला. मराठा वतनदारांनी सुलतानशाहीसाठी कर वसूली व जनतेवर नियंत्रण ठेवल्याने सुलतानांनी सहिष्णू धोरण स्वीकारले. त्यामुळे सुलतानांनी वतनदारांच्या धार्मिक कृत्यांना विरोध केला नाही. याशिवाय सूफी पंथ व इतर धार्मिक चळवळींचा एकमेकावर प्रभाव पडला.

सुलतानी स्थापत्यातील कोरीव काम, सजावटीचे कौशल्य व आकृतीबंधामध्ये स्थानिक दक्षिणी घटकांचा इस्लामी गरजेनुसार समावेश केल्यामुळे यादवकालीन कला

विस्कळीत स्वरूपात टिकण्यास मदत झाली. या काळात प्रत्यक्षात मंदिर स्थापत्य थांबले असले तरी कौशल्याचा वापर तसाच सुरू राहिला. त्यामुळे त्याच्या स्वरूपामध्ये मोठा बदल घडून आला. हे यादवकालीन कला स्थापत्याचे अवशेष पुढील मराठा वास्तुविद्याविशारद व प्रायोजकांना गत कौशल्याचे स्मरण देत राहिले.

सुलतानकाळातील स्थापत्यामध्ये यादवस्थापत्याच्या काही घटकांचा नेहमी वापर केल्यामुळे आणि मराठा प्रदेशामध्ये विस्कळीत स्वरूपातील यादव मंदिरे मराठा वास्तुविद्याविशारद त्यांच्या पूर्वजांच्या नष्ट झालेल्या परंपरेचे आठवण करून देत राहिले. यावरून यादव काळातील स्थापत्य हे लोकप्रिय होते हे सिद्ध होते. आजही यादव मंदिरे हेमाडपंथी मंदिरे म्हणून प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रामध्ये इस्लामी सत्तेच्या काळात व पुढे मराठा काळात यादव स्थापत्याची कल्पना नेहमी वापरली गेली, हे वास्तव आहे. यादव परंपरा लोप पावली आणि त्यांची कारागिरी मूळ स्वरूपात अस्तित्वात नाही. पण मराठयांनी त्याची तोंडओळख प्रतिकात्मक स्वरूपामध्ये ठेवली.

१७ व्या शतकामध्ये मराठा कारागीरांनी इस्लामी स्थापत्यातील तत्कालिन लोकप्रिय असलेले तंत्र स्वीकारले. १७ व्या शतकात वतनदार हेच प्रायोजक होते. अशा परिस्थितीत कारागीरांचा वेगवेगळया परंपराचा अनुभव व वतनदारांची प्रायोजिकतेची गरज एकमेकांना पुरक ठरली. इस्लामी काळामध्ये बांधलेली सुरूवातीची व मराठा स्वातंत्र्य युद्धा अगोदरची मराठा मंदिरे ही संमिश्र परंपरेचे फलीत होते. अशा प्रायोजकतेखाली संमिश्र विस्ताराला, विकासाला आणि मोठया प्रमाणावरील बदलास संधी होती. नवीन उदयास आलेला राजकिय व सामाजिक वर्गाच्या गुणविशेषामुळे स्थापत्यीय विकासावर मोठया प्रमाणावर प्रभाव पडला.

स्वातंत्र्ययुद्धातील यशामुळे मराठयांनी स्वतंत्र राज्य निर्माण झाले. या युद्धातून उदयास आलेल्या सरदारांना आपले अस्तित्व दाखविण्याची आवश्यकता वाटली. यासाठी धार्मिक कृती व मंदिरांचे माध्यम स्वीकारले. त्यामुळे मराठयांनी पडझड झालेल्या यादव वास्तूंचे संवर्धन व जतन करण्यास सुरूवात केली. नवीन मंदिरे बांधली.मराठयांना इस्लामी स्थापत्याकडून मिळालेल्या नवीन दृष्टीकोन, रचनेचा विस्तार आणि सौंदर्य या बाबी यादव स्थापत्यापेक्षा वेगळया होत्या. इस्लाम स्थापत्य व यादव स्थापत्य यांचा एकत्रित परिणाम म्हणजे मराठा स्थापत्याचा विकास होय.

प्रारंभीच्या काळात टिकून राहिलेली मंदिरे अल्प प्रमाणात पाहावयास मिळतात. या मंदिरांची पडझड झाल्यामुळे स्थापत्याचा नमुना स्पष्ट मिळत नाही. प्रारंभीच्या काळातील टिकून राहिलेल्या मंदिरामधील स्थानिक दक्षिणी कौशल्य व परंपरेचा धागा आणि इस्लामीक रचना व घटक हे सर्वात महत्त्वाचे पैलू आहेत.

प्रारंभीचा काळ हा मराठी राज्याची स्थापना व स्वातंत्र्य युद्धाचा काळ असा होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांनी छ.शिवाजी महाराजांचे अनुकरण करून आक्रमक मुघलांशी संघर्ष केला. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात १७१३ मधील पेशवे बाळाजी विश्वनाथ यांचा उदय हा मोठा राजकीय परिणाम होता. छत्रपती शाहू महाराजांनी १७१९ मध्ये सक्रीय राजकारण सोडले. त्यावेळी प्रारंभीचा काळ संपतो. औरंगजेबाच्या मृत्यूने मराठा–मुघल संबधात बदल होऊन मराठी राज्यात यादवी झाली. यातून पेशव्याचा उदय झाला. या काळात राजकीय व आर्थिक स्थैर्य नसल्याने स्थापत्य प्रायोजक निर्माण झाले नाहीत. त्यामुळे प्रारंभीच्या काळात शिवराज्याभिषेकानंतर काही मंदिरांची निर्मिती करण्यात आली.

### ४.२.१.१ साहित्य आणि बांधकाम :

प्रारंभीच्या काळातील मंदिराच्या बांधकामात विट व दगड यांचा वापर केला जात होता. यादव काळात केवळ दगडी बांधकामात चुना व माती यांचा वापर केला जात नसे. परंतु या काळात त्याचा वापर मोठया प्रमाणावर केलेला होता. प्रारंभीच्या काळातील मंदिरामध्ये यादव परंपरेचे खांबाची व तुळईची रचनात्मक पद्धत व इस्लामिक रचनेतील कमानी, घुमटाकार व घुमट हे एकत्रित दिसतात. या मंदिराच्या सजावटीमध्ये यांचा वापर केला. या सजावटीचा विषय हिंदू असला तरी त्याचे मूळ इस्लामिकमध्ये आहे. अशा प्रकारची रचना असलेली मंदिरे सातारा जिल्हयात थोडयाफार प्रमाणात दिसतात.

### ४.२.१.२ पहिल्या टप्प्यातील सातारा जिल्हयातील मंदिरे –

पहिल्या टप्प्यातील मंदिराची संरचना हिंदू मान्यतेनुसार बांधण्यात आली. पुणे येथील कसबा पेठ, चिंचवड, थेऊर येथील गणेश मंदिरे, रायगडावरील जगदीश्वर(वाढेश्वर) मंदिर, रायगड जिल्हयातील सिंधुदुर्ग येथील शिवमंदिर, सांगली जिल्हयातील बहे येथील रामलिंग मंदिर, देवराष्ट्रे येथील जोतिर्लिंग मंदिरांचा समूह ही मंदिरे या टप्प्यातील आहेत. सातारा जिल्हयामधील पाल, शिखर शिंगणापूर, प्रतापगड किल्ल्यावरील भवानी मंदिर, आसले येथील

भवानी मंदिर, तडवळे येथील रामेश्वर मंदिर, वाईचे रोकडोबा मंदिर इत्यादी मंदिरे अस्तित्वात आहेत.

### ४.२.१.२.१ पालीचे खंडोबाचे मंदिर

सातारा जिल्हयात कराड तालुक्यात तारळी नदीच्या दोन्ही काठावर पाल हे खेडेगाव वसलेले आहे. या गावाचे मूळ नाव राजापूर असून येथील खंडोबाचे मंदिर प्रसिद्ध आहे. म्हणून या गावास खंडोबाची पाल म्हणून ओळखले जाते.

सातारा गॅझेटच्या नोंदीनुसार हे मंदिर ५०० ते ५५० वर्षापूर्वी आबाबिन शेठी पाघोडे नावाच्या वाण्याने बांधले आहे. या मंदिराचे संपूर्ण बांधकाम दगडात केलेले आहे. या मंदिराचे गर्भगृह व त्याच्या बाहेरील बाजूस ३५.५३ X २८.४३ फूट आकाराचा द्वारमंडप बांधलेला आहे. मंदिराचे गर्भगृह ५.०० X ५.०० फूट आकाराचे असून त्यात खंडोबा व म्हाळसाबाई यांची पितळी मुखवटा बसविलेली मूर्ती आहे. उजव्या बाजूला खंडोबाची दुसरी पत्नी बानुबाईची मूर्ती आहे. अशाप्रकारे हे मंदिर जरी शिवपूर्वकाळात बांधले गेले असले तरी या मंदिरास मराठा सेनापती संताजी घोरपडे याने इ.स.१६९० मध्ये प्राकारात बांधलेला २१.०० X २१.०० फूट आकाराचा मंडप बांधलेला आहे. हा मंडप १६ स्तंभावर आधारित असून चहुबाजूंनी अर्धा उघडा ठेवलेला आहे. आधुनिक काळातील मार्बल स्तंभाना लावल्यामुळे त्याची मूळ रचना सांगता येत नाही. परंतु स्तंभाच्या शीर्षावर हस्त साधे असलेले दिसतात. हस्तावर लांब दगडाच्या तुळया आहेत. या तुळयांनाही हस्त आहेत. मंडपावरील वळचणी साधी असून वळचणीला एक बाजूस दगडी ९ पानाच्या आकृती कोरलेल्या आहेत. मंडपाचे छत तीन टप्प्यामध्ये कमी होत जाणारे चौरसाचे आहे. या मंडपाच्या वरील शिखर आधुनिक काळात बनविले गेल्याने त्याची माहिती देता येत नाही.

नंदी मंडपाच्या दक्षिणेला एक शिवकालीन मंदिर आहे. प्रागंणाच्या भिंतीत उत्तरेकडील अर्ध्या भागात चिरेबंदी दगडांचे बांधकाम केलेले मठ आहेत. या मठाचे सुरूवातीचे बांधकाम मराठा सरदार शिंदे व नंतरचे बांधकाम सेनापती धनाजी जाधव यांनी केलेले आहे. या प्रांगणाला तीन प्रवशद्वारे आहेत. पूर्वेकडील प्रवेशद्वार लहान असून त्याच्या आतील बाजूस ३०.४६ फूट उंचीच्या दोन दीपमाळा आहेत. या दीपमाळेस दिवे लावण्यासाठी १२ खोबण्या आहेत. दीपमाळाचा चौथरा साधा असून ५ X ५ फूट असून दीपमाळ पाच टप्प्यात बांधलेल्या आहेत.दीपमाळांच्या हस्तांना हत्तीच्या सोंडेचे व मोरांचा आकार दिलेला आहे. या प्रवेशद्वाराचे व दीपमाळेचे काम नेर गावचा पाटील गमाजी चव्हाण यांनी केलेले आहे.[१]

उत्तरेकडील प्रवेशद्वार लहान असून ते शिवकालीन सरदार शिंदे यांनी बांधलेले आहे. दक्षिणेकडील प्रवेशद्वार धनाजी जाधवांच्या मठाजवळील प्रवेशद्वार मुख्य असून ते १३ फूट उंचीचे १.७ फूट रूंदीचे आहे. या प्रवेशद्वाराच्या आतमध्ये मठांची दोन दालन आहेत. ती मुधोळच्या बाजी घोरपडे यांनी बांधलेली आहेत. त्यातील एका दालनात गणपतीची मूर्ती आहे. प्रवेशद्वाराच्या वर नगारखाना असून या नगारखान्याचे व प्रवेशद्वाराचे बांधकाम रहिमतपूरच्या माने सरदारांनी बांधलेला आहे.दक्षिणेकडे पूर्व बाजूस काही इमारती आहेत. या इमारतींच्या बाजूला घडीव दगडाचे ३०.४ फूट उंचीचे व २०.३ फूट रूंदीची कमान असलेले एक महाद्वार आहे. याचे बांधकाम कराड येथील यमाजी शिवदेव मुतालिक  याने केले आहे.[२]

या मंदिरास तीन प्रवेशद्वार आहेत. पूर्वेकडील प्रवेशद्वार लहान असून त्याच्या आतील बाजूस ९.१४ मी.उंचीच्या दोन दीपमाळा आहेत. या दीपमाळांचे बांधकाम नेर गावाचा पाटील गमाजी चव्हाण याने सन १७६६ मध्ये केले आहे.[३] उत्तरेकडील प्रवेशद्वार लहान असून ते मराठा सरदार महादजी शिंदे यांनी सन १७७० मध्ये बांधले आहे. दक्षिणेकडील मुख्य प्रवेशद्वार ३.६५ मीटर उंच व ५२ मीटर रूंद आहे. या प्रवेशद्वाराजवळ नगारखाना असून त्यांची व प्रवेशद्वाराच्या कमानीचे बांधकाम रहिमतपूरच्या माने यांनी सन १८०० मध्ये केले आहे. दक्षिणेकडील पूर्व बाजूला ज्या इमारती आहेत. या इमारतींच्या बाजूला घडीव दगडाचे ९.१४ मी.उंचीचे ६.०९ मी.रूंदीचे व आतील बाजूने १.८२ मी.रूंदीची कमान असलेले महाद्वार आहे. याचे बांधकाम कराडच्या मुतलिक घराण्यातील यमाजी शिवदेव याने केले आहे.[४]

### ४.२.१.२.२ प्रतापगडावरील तुळजाभवानी देवीचे मंदिर

प्रतापगडावर छ.शिवाजी महाराजांनी इ.स.१६६१ मध्ये मोरो त्रिंबक पिंगळे यांच्या हस्ते तुळजाभवानीचे मंदिर स्थापन केले. हे मंदिर मूळचे केवळ दगडी गाभाऱ्याचे होते. इ.स.१८२० मध्ये या मंदिरावर सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी लाकडी मंडप बांधला होता. हा मंडप जळल्यामुळे पुढे नवीन मंडप बांधलेला दिसतो. या मंदिरापासून काही अंतरावर दोन उंच दीपमाळा आहेत.[५]

छ. शिवाजी महाराजांनी सन १६६१ मध्ये मोरो त्रिंबक पिंगळे यांच्या हस्ते स्थापन केले. मूळ मंदिर हे फक्त दगडी गाभारा होता. सन १८२० मध्ये प्रतापसिंह महाराजांनी लाकडी मंडप बांधला. हा मंडप आगीमध्ये जळाला. हे मंदिर पूर्वाभिमुख असून काही अंतरावर दोन उंच दीपमाळा आहेत. दीपमाळांजवळच नगारखाना आहे. राज्याभिषेकांनंतर या मंदिरावर वीज

पडल्याने मंदिराचे नुकसान झाले. परंतु नंतर ते दुरूस्त करण्यात आले.[६] या मंदिराचे मंडप व गर्भगृह अशी रचना आहे. शिवकालातील हे महत्त्वाचे मंदिर आहे.

### ४.२.१.२.१ मंडप:

मंडप हा ८ फूट लांबी रूंदीचा असून मंडपाला समोरासमोर तीन प्रवेशद्वार असून त्यांची उंची ४ फूट व रूंदी २.६ फूट आहे. दोन्ही दरवाजाच्या वरील बाजूस गणेशपट्टी असून त्यावर कणी मोलीमेच्या वर तीन पूर्ण कमळकळी व दोन्ही बाजूंच्या कडेला अर्ध्या कमळकळीजवळ दोन मनोरे कोरलेले आहेत. अशा प्रकारचे कोरीव काम रायगडावरील जगदीश्वर मंदिराच्या चौकटीवर आहे. मंडप साधाच असून मंडपामध्ये स्तंभ नाहीत. मंडपाचा छत मध्यभागापर्यंत असून बाजूचे चारी कोपरे एकत्र आलेले आहेत. मध्यभाग सपाट आहे.[७]

### ४.२.१.२.१.२ गर्भगृह:

गर्भगृह हे ८ फूट लांबी रूंदीचे आहे. गर्भगृहाची चौकट साधी आहे. गर्भगृहामध्ये चार फूट लांबीच्या व ३ फूट उंचीच्या पीठावर ३ फूट उंचीची व चार हात असलेली देवीची मुर्ती आहे. देवीच्या दोन्ही बाजूस १.६ फूट उंची व ९ इंच रूंदीची चौकोनी देवळी आहे. गर्भगृहामध्ये चार अर्धस्तंभ असून त्या स्तंभावर हस्त असून त्यावर अष्टकोन तयार करून घुमटाकार छत आहे. या छताला लहान आठ पट्टया मध्यभागापर्यंत गेलेल्या आहेत. मध्यभागी सहस्त्रदल आहे.[८] मंदिर पीठावर उभारलेले असून पीठाची उंची दोन फूट उंचीचे आहे. पीठाची रचना साधी आहे. पीठापासून भिंती पागोळयापर्यंत साध्या आहेत. त्यावर कोणत्याही प्रकारचे शिल्प नाही. पागोळयास आकर्षक हस्त आहेत. मंडपाच्या पागोळयावर साधारणपणे तीन फूटाचे पॅरापीट(कठडा) आहे. मंडपावर शिखर नाही. गर्भगृहावर शिखर असून ते अत्यंत साधे आहे. अगदी कमी चढामध्ये चारी बाजू एकत्र केलेल्या आहेत. मध्यभागी अर्धगोल ग्रीव्हा असलेल्या कमलदलातून घुमटाकार अमलक वर आलेले आहे. त्यावर उलटया कमळकळीच्या देठातून कळस वर आलेला आहे.[९]

### ४.२.१.२.३ शिखर शिंगणापूरचे शंभू महादेव मंदिर

या मंदिराची उभारणी देवगिरीच्या यादव वंशातील सिंघण राजाने केली आहे. या गावाचे प्रारंभीचे नाव सिंघणपूर होते. या नावावरूनच पुढे शिंगणापूर हे रूढ झाले. या ठिकाणी अतिप्राचीन व भव्य शिवालय आहे. बॉम्बे गॅझेटियरने नोंदविले की, शिवाजीने या मंदिरास निधी दिला आणि बलवंतराव सावकाराने त्यांच्यावतीने बांधले. या मंदिराचे शिखर ५५ फूट उंचीचे आहे. मंदिरात जाण्यासाठी तळापासून दगडी पायऱ्या आहेत. हे अंतर १८३ मी. उंचीची चढण

चढावी लागते. तेथे मंदिरात जाण्या साठी पहिले महाद्वार लागते त्या महाद्वाराची कमान ४१.६ X ४०.८ X ३१.५ फूट आहे. ही कमान नाझरे गावच्या एका धनगर भक्ताने सुमारे २५० वर्षापूर्वी ही उभारली. या कमानीतील दरवाजा ५३.३ फूट उंचीचा आहे. हा दरवाजा सरदार शेंडगे यांनी बांधला आहे.[१०]

महाद्वारापासून १५० पायऱ्या चढून गेल्यावर दुसरा दरवाजा लागतो. येथूनच मुख्य मंदिराचे प्रांगण सुरू होते. हे महाद्वार आणि प्रांगण छ. शिवाजी महाराजांच्या काळातील आहे. हे काम छ.शिवाजी राजांनी बळवंतराव नावाच्या कारभाऱ्याकडे द्रव्य देऊन पूर्ण करण्यास सांगितले होते. हे प्रवेशद्वार ३४.५ फूट रूंदीचे व ३८.६ फूट उंचीचे असून कमान २६.४ फूट उंच व १४.४ फूट रूंदीची आहे. या दरवाज्याच्या सभोवती गवाक्षे आहेत. कमानीच्या भिंतीवर नागबंध, कालियामर्दनचे शिल्प आहे. दरवाज्याच्या उंच उंबरठयावर मधोमध मंडारक व कीर्तिमुखे आहेत. प्रांगणात मंदिराच्या दोन्ही बाजूस दोन दिपमाळा असून त्यातील एक दीपमाळ विरूबाई यांनी बांधल्याचे दीपमाळेवरील शिलालेखावरून सिद्ध होते. प्रांगण फरसबंद असून सगळीकडे प्राकारभिंत आहे. या भिंतीची उंची ८ फूट आहे. प्रांगणाला ईशान्य, वायव्य, पश्चिम व दक्षिण या चार दिशांना चार प्रवेशद्वारे आहेत. प्रागणात मधोमध शंभू महादेवाचे देवालय आहे. हे मंदिर गर्भगृह, अंतराळ, सभामंडप, मुखमंडप, व नंदीमंडप यांनी युक्त आहे.

### ४.२.१.२.३.१ गाभारा

गाभारा हा ८ फूट X ८ फूट चौरस असून मध्यभागी चौकोनी आकाराचे शिवलिंग आहे. शिवलिंगावर एकापुढे एक असे दोन शाळुंखे आहेत. शिवलिंगाचा आकार चौकोनी आहे. गाभाऱ्याच्या दक्षिण भिंतीत ४ फूट X ६ फूट एवढया आकाराचा मोठा कोनाडा आहे. गाभाऱ्याचे छत हे रचनात्मक प्रमाणात कमी होत गेलेल्या चौरसाकृतीमध्ये आहे.

### ४.२.१.२.३.२ जोते किंवा पीठ

या मंदिराचे जोते दोन असून पहिले जोते साधे आहे. ते जमिनीपासून ३ फूट उंचीचे आहे. हे जोते अलंकृत केलेले आहे. या जोत्यास दगडाचे चार थर आहेत. या जोत्याचा वरील थर भिंतीच्या बाहेरील बाजूस आल्याने त्याचा उपयोग प्रदक्षिणा पथ म्हणून केला जातो. त्यावर असलेले दुसरे जोतेही तीन फूट उंचीचे असून त्यावर दगडांचे तीन थर आहेत. या जोत्याचा सर्वात वरील थर हा पागोळयासारखा बाहेरील बाजूस उतरता आहे. हा थर खालील थरांचे संरक्षण करतो. वरील थराच्या पुढील बाजूस उलटया पानांच्या शिल्पांची रांग कोरलेली आहे. मूळ मंदिर हे या चौथऱ्याच्या पायावर उभारलेले आहे.

**४.२.१.२.३.३ अंतराळ –**

गाभारा व सभामंडपास जोडणारे अंतराळ आहे. हे अंतराळ ८ द १२ फूट आहे. याच्या प्रवेशमार्गावर दोन स्तंभ आहेत. सभामंडपाचे वितान अर्धस्तंभ व स्तंभ याच्या रचनेमुळे नऊ भागात विभागले आहे. मंडपाच्या मध्यभागी चौरस आकाराची रंगशिला आहे आणि चाहोकडून कडेला कक्षासनाची रचना आहे. या कक्षासनावर एकूण १४ अर्धस्तंभ आहेत. त्यावर नक्षी व शिल्पे कोरलेली आहेत. रंगशिलेच्या कोपऱ्यावरील चार स्तंभ सुमारे ८ फूट उंचीचे असून तळखडयावर कोणतेही शिल्प नाही. स्तंभाची रचना प्रथम चौकोन, गोल, अष्टकोन, गोल व त्यावरचौकोन अशी आहे. या स्तंभाच्या चारही बाजूला शिल्पे कोरली आहेत. त्यात शिकारीचे प्रसंग, गोपी वस्त्रहरण, मार्कण्डेयानुग्रह शिवमूर्ती, गोपालकृष्ण, वीणाधारी संत इत्यादी शिल्पे तसेच माकडे, हंस, कुस्तीचे प्रसंगही कोरलेले आहेत. उत्तरेकडील मुखमंडपाचे बाजूकडील स्तंभावर कामशिल्पे(मैथुन शिल्प) आहेत. स्तंभशीर्षाचे वर कीचक आहेत.

**४.२.१.२.३.४ मंदिराच्या भिंती –**

या मंदिराच्या भिंती दगड व चुन्यात बांधलेल्या आहेत. त्या घडीव दगडात आहेत. शिंगणापूरमधील पुनरूत्थानवादी मंदिराच्या भिंती कोरडया दगड चुन्यात बांधलेल्या आहेत आणि मोठया प्रमाणात घडीव आहेत. या मंदिराच्या भिंतीत एक चरणबद्ध बाहयरेषा दिसतात. खालचा दगडांच्या थराचा जोते व पॅरापेट्सशी संबंधित असतो. देवतांच्या प्रतिमा असलेल्या मुख्य प्रक्षेपणातील लहान कोनाडे साधे आहेत. प्रसंगानुरूप आढळणाऱ्या प्रक्षेपणासारख्या सर्वसाधारण उलटया पानासह आडव्या पट्ट यात साकारलेले आहेत. उतरत्या पागोळयापर्यंत याची रचना केलेली आहे. या मंदिराचा मंडप खुला असल्याने भिंतीचे बांधकाम हे जोत्यावर नाही.भिंतीतील स्तंभ व हस्त स्पष्टपणे दिसतात. याशिवाय मंदिराभोवती पागोळे आहेत.

मंडपाला दक्षिणोत्तर व पूर्वेकडील असे तीन प्रवेशमार्ग आहेत. या मंडपात दक्षिणेला गणेशाची मूर्ती आहे. ती उत्तराभिमुखी असून त्या मूर्तीसमोर उभे असलेले दोन फिरकीचे स्तंभ आहेत. गणेशाच्या मूर्तीजवळच उमा महेश्वराची मूर्ती आहे. रंगशिलेच्या पूर्वेकडील कडेवर पितळी पत्र्याने मढविलेले पाच नंदी आहेत. हे सर्व नंदी गाभाऱ्याकडे तोंड करून आहेत.[११]

मंदिराच्या मुख्य मंडपासमोर काही अंतरावर नंदीमंडप आहे. तो चार खांबानी बनविलेला असून उंच ओटयावर आहे. मंदिराच्या मागील बाजूस एक ओवरी असून त्यात ओवरी गणेश, पार्वती व खंडोबा यांच्या मूर्ती आहेत.

#### ४.२.१.२.३.५ जोते/चौथरा

आरंभिक टप्प्यातील मंदिराचे चौथरे हे साधे व उपयुक्त आहेत. त्याची जमिनीपासून मंदिराची उभारणी करणे हा त्यांचा एकमेव हेतू होता. हे जोते दगडाने बांधलेले असून विस्तारलेले व सजावटीशिवाय आहेत. चौथरे हे एकावर एक दगडांचे तीन किंवा चार थर चौरस, सपाट व मोलुमेशिवाय असतात. त्या ज्योत्यांना सरळपणा आणण्यासाठी थोडासा आकार दिलेला असतो. जोते मंदिराच्या कडेने सभोवती भिंतीच्या थोडेसे बाहेरील बाजूस असते. पहिल्या टप्प्यातील नंतरच्या मंदिरामध्ये विस्तारित जोते मंदिराभोवती प्रदक्षणापथ तयार केलेला असतो. तीन प्रवेशद्वाराच्या पायऱ्यांमुळे तो खंडित होतो.

#### ४.२.१.२.३.६ भिंतीचा पृष्ठभाग :

पहिल्या टप्प्यातील मंदिराची भिंत ही दगड व चुन्यात बांधलेली दिसते. दगड हे सपाट आहेत आणि प्रत्येक थरामध्ये बदलणारे लंबकेंद्रित जोड आहेत. शिखर शिंगणापूरमधील पुनरूत्थानवादी मंदिराच्या भिंती पागोळयाच्याखालील दगडी जाळीसह किंवा जाळीशिवाय साध्या आहेत. काही मंदिरामध्ये पागोळे नाममात्र असून ते उथळ आहे. या भिंतीमध्ये हस्त थोडयाफार प्रमाणात गुंतवलेले दिसतात. पागोळयावरील भिंत दगड व विटांमध्ये बांधलेली आहे. हे शिखर उभारलेल्या छप्परावरील आयताकृती रचनेच्या अनुसरून असते. या पॅरापेटसवर नेहमी दोन्ही टोकांच्यामध्ये एक कमळकळीची रांग गिलाव्यामध्ये कोरलेली असते. दगडी बांधकाम पॅरापेट खुल्या प्रकारचा असतो. या टप्प्यात, पॅरापेटवर दिसणारी कमळकळीची रांग सजावटीचा एक महत्त्वपूर्ण वैशिष्टय बनली आहे.[१२]

#### ४.२.१.२.४ तडवळे येथील रामेश्वर मंदिर :–

सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्यात उत्तर भागात सातारपासून साधारणतः ३२ कि.मी. अंतरावर तडवळे गावच्या हद्दीत हे रामेश्वर मंदिर शिवकाळात बांधले गेले आहे. या मंदिराचे वैशिष्टये म्हणजे त्याची उभारणी मुळातच डोंगरदरीत झालेली आहे. त्यामुळे ते एक निसर्गरम्य ठिकाण असल्याचे पाहावयास मिळते. हे मंदिर शिवकाळात बांधले असून ते पूर्वाभिमुख आहे. हे त्याच्या रचनेवरून दिसून येते.

#### ४.२.१.२.४.१ संरक्षक तटभिंतः–

रामेश्वर मंदिराच्या परिसरात प्रवेश करताना एक संरक्षक तटभिंत आहे. या तटभिंतीची उंची ९'.७' असून या तटभिंतीस दक्षिण दिशेस एक व दुसरा पूर्व दिशेस कमानीच्या आकाराचा दगडात बसविलेला दरवाजा आहे. दक्षिण दरवाजाची उंची ही ८'.६' वरूंदी ४'

आहे. तटबंदीच्या बांधकामास ११.५' X ७' X २' मापाची वीट वापरलेली दिसून येते. चौकटीवर गणेशपट्टी आहे. मंदिरात जाताना या दरवाजातून प्रवेश करावा लागतो. या तटभिंतीत भक्त निवासासाठी एकूण आठ खोल्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या खोल्यावरील छत हा सपाट दगडांचा असून दगड एकमेकात खाच्या करून चुन्यात बसविलेले आहेत. याचे छत त्रिकोनी दगड तिरपे बसवून तीन टप्प्यात प्रमाणात कमी होत जाणारे चौरस साधलेले आहेत. या खोल्यांना बाजूच्या भिंती नाहीत. या तटभिंतीतील खोल्यांचे खांब हे तळखडा चौरसाकृती असून त्याचे मोजमाप १'.३' आहे. त्याच्यावर १' मापाचा लंब चौरस खांब आहे. त्याच्यावर ताशीव पद्धतीने लंब चौरसाकृती दगड बसविलेला आहे. त्यावर पुन्हा १'.३' उंची व ३' जाडीचा चौरस आहे. त्याच्यावर हस्त आहे.

मंदिराच्या पूर्व दिशेला कोपऱ्यात दोन कुंडे आहेत. पहिले कुंड दोन टप्प्यात असून वरच्या टप्प्याचे माप ९' चौरसाकृती खालचा टप्पा ६'.१०' चौरस मापाचा आहे. या कुंडामध्ये शिलालेख असून तो ८' लांब व २'.८' रूंदीच्या दगडावर कोरेलेला आहे. या शिलालेखातील अक्षरे अस्पष्ट झाल्याने तो वाचता येत नाही. दुसरे कुंड आकाराने छोटे असून त्याची लांबी ८' व रूंदी २'.५'आहे. या कुंडामध्ये सांडणीस्वार, हत्ती यांची चित्रे रेखाकिंत आहेत. तटबंदीचा पूर्वेकडील दरवाजाची उंची ही ८'. ६' व रूंदी ४' आहे. चौकटीवर गणेशपट्टी आहे.[१३]

### ४.२.१.२.४.२ नंदीमंडप :–

या मंदिराचे सभामंडप व गर्भगृह असे विधान आहे. सभामंडपाच्या पुढे एक नंदीमंडप आहे. या नंदीमंडपाचा चौथरा हा ६'.४' चौरस आकाराचा आहे. या नंदीमंडपाच्या खांबाची उंची ४'.६' तर रूंदी १'.६' आहे. असून या नंदीमंडपामध्ये ३'.४' लांबी १'.५' रूंदी व २' उंचीची नंदींची मूर्ती आहे. या मंडपाचे छत त्रिकोनी दगड एकावर एक तिरपे बसवून तीन टप्प्यात प्रमाणात कमी होत जाणारे चौरस साधलेले आहेत.[१४]

### ४.२.१.२.४.३ सभामंडप

सभामंडपाचा आकार चौरसाकृती असून त्याचा बाहयआकार हा २०' X २०' आकाराचा आहे. खांबाची उंची ५'.९' असून खांबाची रचना तळखडा चौरस त्याच्यावर दुसरा भाग चौरस असून त्यावर अष्टकोन व त्याच्यानंतर निमुळता होत गेलेला गोल, त्याच्यावर गोल नंतर पुन्हा निमुळता होत गेलेला गोल त्यावर दंड त्याच्यावर चौरस आकार त्यावर हस्त अशी आहे. या खांबावर कोरीवकाम नाही. सभामंडपाचा छत हा कोनाडयानी बनवलेला असून चार खांबामधील एका छतामध्ये १२ कोनाडे आहेत.[१५]

**४.२.१.२.४.४ गर्भगृह**

गर्भगृह ८.९ फूटांचा चौरस असून गर्भगृहातील शिवलिंग हे ४.४ फूट लांब३.६ फूट रूंद व १ फूट उंचीचे आहे. गर्भगृहातील दर्शनी भिंतीवर पार्वतीची मूर्ती कोरलेली आहे. गर्भगृहाच्या चौकटीचा आकार हा कमानीकृती असून ती ३'.६' उंच व २' रूंद आहे. या चौकटीवर वरील बाजूस गणेशपट्टी तर उंबऱ्यावर किर्तीमुख आहे. गर्भगृहाचा छत हा पाच टप्प्यामध्ये त्रिकोणी दगड एकावर एक तिरपे बसवून प्रमाणात कमी होत गेलेल्या चौरसाचे आहे. मध्यभागी पद्मदले कोरेलेली आहेत.[१६]

**४.२.१.२.४.५ दीपमाळः–**

सभामंडपाच्या बाहेरील बाजूस नंदीमंडपाच्या दक्षिणेस ४' उंचीची एक दीपमाळ आहे. या दीपमाळेचा परीघ ९' असून ती ३' उंचीच्या चौथऱ्यावर उभारलेली आहे. दीपमाळेच्या हस्तावर व्याघ्र व मयुरमुख कोरलेले आहे. तटबंदीच्या पूर्वेकडील टेकडीवर ५'.६' उंचीची दुसरी दीपमाळ असून ती ७'.४' चौरस चौथऱ्यावर उभारलेली आहे. या दीपमाळेचा परीघ १५' आहे.[१७]

**४.२.१.२.४.६ कुंड :–**

या मंदिरातून ओढयामध्ये उतरण्यासाठी एकूण १३ पायऱ्या आहेत. या पायऱ्यावरून कमान असलेल्या चौकटीतून उतरताना डाव्या बाजूला १ X १ फूटाचे घोडयावर आरूढ झालेले स्त्री–पुरूषाचे शिल्प कोरलेले आहे. येथून खाली उतरल्यानंतर डाव्या बाजूस एक कुंड बांधले असून त्यात पूर्ण गाईचे दगडी शिल्प बसवलेले आहे. या गाईच्या मुखातून सतत पाणी पडत असते. गाईला वासरू पीत असल्याचे शिल्प कोरलेले आहे. हे शिल्प त्या मंदिराचे वैशिष्टये आहे.[१८]

**४.२.१.२.४.७ शिखर :–**

या शिखराचा वारंवार जिर्णोद्धार होत गेल्याने आज या शिखरात बदल झालेला दिसून येतो. या शिखराचा जिणोद्धार हा आधुनिक काळात केला गेला असल्याने शिखराविषयीची माहिती निश्चितपणे देता येत नाही.[१९]

**४.२.१.२.५ माहूली येथील रामेश्वर मंदिर–**

हे मंदिर कृष्णा नदीच्या पूर्व किनाऱ्यावर बांधलेले आहे. हे मंदिर इ.स.१७०० मध्ये देगावच्या परशुराम नारायण अनगळ याने बांधले आहे. मंदिरासमोर ३५ पायऱ्यांचा घाट आहे.

या ठिकाणी दुसरा एक घाट दुसरा बाजीराव पेशवा याने अर्धवट बांधलेला आहे. या मंदिराचे सभागृह व गर्भगृह असे दोन भाग पडतात.

**४.२.१.२.५.१ गर्भगृह :**

या मंदिराच्या गर्भगृहात अंतराळातून प्रवेश करताना केवळ उंबरा ओलांडून जावे लागते. हे चौरसाकृती असून त्याचे माप ११′ X ११′′ एवढे आहे. याचे छत हे अष्टकोनी आकारात वरील दिशेने सात टप्प्यात निमुळते होत गेले आहे. छतावर कोणत्याही प्रकारचे नक्षीकाम केलेले नाही.[२०]

**४.२.१.२.५.२ शिवलिंग :**

या मंदिरातील गर्भगृहात जे शिवलिंग आहे. ते ४′ X ३′ X २′.५′.८२४२′ एवढया आकाराचे आहे.[२१]

**४.२.१.२.५.३ अंतराळ :**

अंतराळातून गर्भगृहात जाताना जे प्रवेशद्वार आहे. त्या प्रवेशद्वाराची चौकट ४′.३′ X ३′ एवढया आकाराच्या मापाची आहे. अंतराळाचे माप ४′.३′ X ३′ आहे.

**४.२.१.२.५.४ सभामंडप :**

सभामंडपाचे माप १३′ X १५′ सभामंडपाच्या मध्यभागी कासवाचे दगडात कोरलेले शिल्प आहे. त्याचे माप २′ X २′ एवढे आहे. सभामंडपाचे छत चौरसाकृती असून ते आठ टप्प्यात वरील बाजूस निमुळते होत गेलेले आहे. शेवटच्या टप्प्यात चौरसाकृतीमध्ये एक आहे. हे बांधकाम पुर्णपणे काळया पाषाणात केलेले आहे.

**४.२.१.२.५.५ शिखर :**

या मंदिराच्या प्रांगणातील राम मंदिराचे शिखर द्रविड पद्धतीचे असून त्याच्यावर उत्फूल कमळात एक घुमटाकार आमलक आहे. हे शिखर चुना दगड यात बांधकाम केलेले आहे. शिखरावरील कळस ही दगडाचाच आहे.

मुख्य रामेश्वर मंदिराच्या सभामंडपावरील शिखर हे साधे असून शिखराच्या वरील बाजूस एक उत्फूल कमळ आहे. त्या कमळामध्ये एक घुमट आहे. त्याच्यावर एक उलटे कमळ आहे. या कमळाच्या देठातून वरील बाजूस एक कळस आहे. या शिखराच्या चारी कोपऱ्यावर छत्रीच्या प्रतिकृती आहेत. अंतराळावरचे शिखर हे ठोकळयाच्या स्वरूपात एका टप्प्यात आहे. या ठोकळयामध्ये साग्रपर्णी कमानी कोरलेल्या आहेत. या दोन ठोकळयांच्यामध्ये गजमुख

आहेत. याच्यावर कमळकळी कोरलेली असून त्याच्यावर प्रत्येक ठोकळयाच्या वरील बाजूस एक उत्फूल कमळ आहे. त्या कमळामध्ये एक घुमट आहे. त्याच्यावर एक उलटे कमळ आहे. या कमळाच्या देठातून वरील  बाजूस एक कळस आहे. याच्या वरच्या बाजूला कणीची ग्रीव्हा असून शिखराच्या वरील बाजूस एक उत्फूल कमळ आहे. त्या कमळामध्ये एक घुमट आहे. त्याच्यावर एक उलटे कमळ आहे. या कमळाच्या देठातून वरील  बाजूस एक कळस आहे. गर्भगृहावरील शिखर चार टप्प्यात कोरलेले आहे. पहिल्या टप्प्यात मुख्य दिशेला छत्रीच्या प्रतिकृती असून उपदिशा कोनाकृती ठोकळयांनी जोडलेल्या आहेत. दुसऱ्या टप्प्यामध्ये मुख्य दिशेला चौकोनी देवकोष्ठके असून उपदिशेंना अष्टकोनी खांबावर उत्फूल कमळाची प्रतिकृती कोरेलेली आहे. तिसऱ्या टप्प्यामध्ये साग्रपर्णी कमानीचे देवकोष्टे असून उपदिशेला अष्टकोनी खांब आहेत. दोन्हीच्या मधील भाग कोनाकृती ठोकळयांनी भरून काढलेला आहे. या खांबावर व देवकोष्ठकावर उपशिखरे असून त्यावर शिखराच्या वरील बाजूस एक उत्फूल कमळ आहे. त्या कमळामध्ये एक घुमट आहे. त्याच्यावर एक उलटे कमळ आहे. या कमळाच्या देठातून वरील  बाजूस एक कळस आहे. शेवटच्या टप्प्यात छत्रीच्या प्रतिकृती असून दोन्हीमध्ये कणीच्या आकाराचे खांब आहेत. सर्व छत्रीच्या वरील बाजूस एक उत्फूल कमळ आहे. त्या कमळामध्ये एक घुमट आहे. त्याच्यावर एक उलटे कमळ आहे. या कमळाच्या देठातून वरील बाजूस एक कळस आहे. शिखराची ग्रीव्हा कणीची असून त्यावर एक उत्फूल कमळ आहे. त्या कमळामध्ये खाचलेले एक घुमटाकृती आमलक आहे. त्याच्यावर एक उलटे कमळ आहे. या कमळाच्या देठातून वरील  बाजूस एक कळस आहे.[२२]

### ४.२.१.२.५.६ नंदीमंडप :

मंदिरासमोर असलेल्या नंदीमंडप हा ६′ X ६′ X ३′ एवढया आकाराच्या चौथऱ्यावर बांधलेला आहे. या मंडपास चार खांब असून त्यांची उंची ६ फूट आहे. खांबाचा आकार हा तळखडा चौरस, त्यावर चौकोनी त्याच्यावर अष्टकोनी पुढे निमुळता गोल त्यानंतर पुन्हा गोल असे आहे. या चार खांबाबर जे छत आहे ते सपाट आहे. त्यावर दोन टप्प्यात शिखर आहे. शिखराच्या वरील बाजूस एक उत्फूल कमळ आहे. त्या कमळामध्ये एक घुमट आहे. त्याच्यावर एक उलटे कमळ आहे. या कमळाच्या देठातून वरील  बाजूस एक कळस आहे. तो पितळेच्या धातूचे आहे. या नंदीमंडपात असलेला नंदी हा एकाच काळया पाषाणात आहे. त्याचा आकार ४′X३′.५′.८२४२′X४′ एवढा आहे. हा नंदी बसलेल्या अवस्थेत असून त्याच्या पुढील दोन्ही

पायाजवळ एक लिंग आहे. त्यावर पाच फणाधारी नागाने छत्र धरलेले असून शेजारी दोन महिला पूजाकरतात असे शिल्प कोरेलेले आहे. नंदीच्या गळयामध्ये घंटयाची व घ्‌ुंगराच्या माळा आहेत. तसेच मानेवर तीन कंडे आहेत. तसेच एक म्होरकी व नाकातून वेसन घातलेले शिल्प कोरलेले आहे. हा नंदी अत्यंत रेखीवपणे कोरेलेला आहे. तसेच नंदीच्या वशिंडाच्या दोन्ही बाजूस व पाठीवरून झालरयुक्त झुले टाकलेले शिल्प आहे. नंदीच्या चारही पायात चाळ घातलेले आहेत.[२३]

### ४.२.१.२.५.७ मंदिराची बाहयबाजू :

या मंदिराचा चौथरा ४१'.६' X ८२४२' X २२'.७' X ८२४२' X ४' एवढा आहे. बाहयभिंतीवर कोणत्याही प्रकारचे शिल्प नाही. मात्र गाभाऱ्याच्या बाहेरील बाजूस जे गोमुख आहे. ते बसलेल्या गाईचे आहे. या मंदिरास चौफेर तटबंदी असून तटबंदीच्या देवकोष्टकामध्ये बम्हदेवाची दगडातील मूर्ती आहे. या मंदिराच्या पाठीमागील बाजूस राममंदिर आहे.राममंदिराचा गाभारा ८'.९' X ८२४२' मापाचा आहे. याची चौकट ४'.१०' X ८२४२' X २'.७' X ८२४२' एवढया मापाचे असून यामध्ये दोन फूट उंचीच्या चौथऱ्यावर रामाच्या मांडीवर बसलेल्या सीतेची मूर्ती आहे. या मूर्तीच्या दोन्ही बाजूस दोन द्वारपाल असून रामाच्या मूर्तीच्या उजव्या बाजूस मारूतीची व डाव्या बाजूस लक्ष्मणाची मूर्ती हात जोडलेली आहे. या सर्व मूर्ती तीन फूट उंचीच्या आहेत. रामाच्या मूर्तीच्या पायाशी एक शिलालेख आहे. त्यामध्ये श्रीरामसीता चरणी तत्पर परशुराम नारायण अनगळ असा मजकूर कोरलेला आहे. त्यावरून हे मंदिर परशुराम नारायण अनगळ यांनी बांधलेला आहे हे सिद्ध होते. याशिवाय या मंदिराचा व्हरांडा ५०' X १२' X ६'.८२४२'एवढया आकाराचा असून व्हरांडयाचा प्रत्येक खणाचा छत अष्टकोनी असून तो सहा टप्प्यामध्ये वरील बाजूस निमूळता होत गेलेला आहे.[२४]

### ४.२.१.२.५.८ दीपमाळा :

या मंदिराच्यासमोर दोन दीपमाळा असून त्याचा चौथरा षटकोनी आहे. त्याची उंची ३.५ फूट आहे. या दीपमाळेची उंची ३० फूट आहे. या दीपमाळाच्या हस्तावर मोत्याची माळ चोचीत घेतलेला मोरांची शिल्पे कोरेलेली आहेत.

मराठाकालीन मंदिराच्या या पहिल्या टप्प्याच्या मंदिराचे बांधकाम व रचना पाहिली असता असे दिसते की, त्या मंदिराच्या बांधकामावर यादव शैलीतील मंदिर स्थापत्याचा प्रभाव पडलेला होता. ही मंदिरे समकालीन हिंदू व इस्लामी सल्तनत विशेषतः आदिलशाही स्थापत्य

तंत्राच्या बांधकामाचे मिश्रण असलेले दिसते. या टप्प्यातील मंदिराची मूळ संरचना केवळ एक चौरस दगडी विभक्त मंडपाची आहे. या मंदिराच्या स्थापत्यामध्ये घटकांच्या आंतरक्रिया व मराठयांची अनुकूलता ही फार वेगाने होणारी प्रतिक्रिया होती.

या टप्प्यातील मंदिराचे जोते हे साधे विस्तारीत आहे. ते दगडाने बांधलेले आहे. ते लहान असून सजावट केलेले आहे. चौथऱ्यामध्ये एकावर एक दगडांचे तीन किंवा चार थर चौरस व सपाट व कोणत्याही मोलुमेशिवाय असतात. नंतर सरळ काढण्यासाठी त्यास थोडासा आकार दिलेला आहे. जोते मंदिराच्या कडेने सभोवती भिंतीच्या बाहेर किंचित प्रक्षेपित होतात. पहिल्या टप्प्यातील नंतरच्या मंदिरामध्ये विस्तारित जोते मंदिराभोवती प्रदक्षिणा पथाची रचना करते

पहिल्या टप्प्यातील मंदिराची भिंत दगड चुन्यात बांधण्यात आली आहेत. दगडी बांधकाम केलेला पॅरापेट खुल्या प्रकारचा आहे. या टप्प्यात, पॅरापेटवर दिसणारी कमळ कळीची पंक्ती सजावटीचा एक महत्त्वपूर्ण वैशिष्टये बनली आहेत.[२५]

मराठाकालीन पहिल्या टप्प्यातील मंदिरे ही गावाच्या बाहेर बांधलेली आहेत. या मंदिराचे गर्भगृह हे चौरसाकृती असून त्याचे माप ८ फूट लांब व ८ फूट रूंद असे आहे. या मंदिरांच्या गर्भगृहामध्ये दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यामध्ये दिसणारे प्रकाश योजना किंवा वायूविजनासाठी तयार केलेल्या जाळीदार खिडक्या नाहीत.

**४.२.२ दुसरा टप्पा :-**

दुसरा टप्पा हा पेशव्यांच्या उदयापासून ते पानिपतच्या तिसऱ्या युद्धापर्यंतचा आहे. छत्रपती शाहू महाराजांच्या संमतीने पेशव्यांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी उत्तरेमध्ये आक्रमक साम्राज्य विस्ताराचे धोरण स्वीकारले. त्यांनी गुजरात, माळवा, बुंदेलखंड या प्रदेशावर वर्चस्व निर्माण केले. दिल्लीवर आक्रमण करून मुघल सत्तेवर दहशत बसविली. मराठयांच्या या धोरणामुळे उत्तरेत मोठया साम्राज्याची स्वामीत्व व प्रभावी धोरणाचा एकाधिकार मिळाला. पेशव्यांच्या नेतृत्वाखाली मराठयांच्या उत्तरेकडील मोहिमा यशस्वी झाल्यानंतर तेथे पेशव्यांनी शिंदे, होळकर व पवार, नागपूरकर भोसले या सरदार घराण्यातील व्यक्तींची नियुक्ती केली. मराठयांना उत्तरेत सत्ता मिळाल्याने आनंदी जीवन जगण्यास सुरूवात केली. तेथे मराठयांची सत्ता निर्माण झाल्याने तेथून मोठया प्रमाणात पैसा तिजोरीत येऊ लागला.

मध्यकाळात राजकिय स्थिरता व समृद्धता लाभल्याचा परिणाम मराठयांच्या जीवन पद्धतीवर झाला. पेशव्यांनी मराठा साम्राज्याचा विस्तार महाराष्ट्राबाहेर विस्तारल्यामुळे

उत्तरेकडील संस्कृतीचा प्रभाव व मुस्लिम जीवनशैली यांच्यात चढाओढ सुरू झाली. साम्राज्य विस्तारा करताना मराठा सरदार समृद्ध व शक्तीशाली बनले. राजकिय विकासामुळे कला आणि कलात्मक कृतीला प्रेरणा मिळते. त्यातूनच मंदिर स्थापत्याला प्रोत्साहन मिळाले. अशी कलात्मक कृती किंवा मंदिर स्थापत्य हे पेशवे व त्यांचे सरंजामदार यांचा आवडता विषय होता. पेशव्याच्या प्रशासनाखाली धार्मिक विधी, मूर्तीपुजा राजवाडयांमध्ये सुरू झाली. शिंदे व होळकर सरदारांनी धार्मिक कृतींना मदत केली. आजही महाराष्ट्रात मंदिर व घाटाच्या रूपाने त्याचे अस्तित्त्व टिकून आहे.

आर्थिक समृद्धीतील वाढ ही कुशल कारागीरीच्या उपलब्धतेस पूरक होती. पुढे मोगल व राजपूतांशी असणारे संबंध जतन करणे म्हणजे पैसा व कलात्मक कृतीच्या उपलब्धतेचा प्रारंभ होता. पुरात्वीय खात्याच्या नोंदीनुसार महाराष्ट्रातील कारागीरांची चळवळ ही उत्तर भारतातील मराठयांनी काबीज केलेल्या नवीन प्रदेशातील होती. या स्थलांतरामुळे स्थापत्यामध्ये नवीन पद्धत व संस्कृती दिसू लागली. यामुळे मराठयांचा कला व स्थापत्याबाबतचा दृष्टीकोन विस्तारला. मुघल स्थापत्याने मराठे प्रभावित झाले. १७ व्या शतकातील प्रारंभीच्या मुघलांच्या दक्षिण आक्रमणानंतर महाराष्ट्रामध्ये मुघल स्थापत्याचा प्रभाव पडला. मुघल स्थापत्याची काही उदाहरणे वगळता महाराष्ट्रामध्ये प्रारंभीची मुघल शैलीचे बांधकाम मिळत नाहीत. पेशवे काळात मुघल स्थापत्याचे घटक मराठा मंदिरांमध्ये दिसू लागले.

मराठा संस्कृतीत नद्यां व नद्यांचे संगम यांना धार्मिकदृष्टया महत्त्व होते. महाराष्ट्रामध्ये नदीकाठावर अनेक मंदिरांची निर्मिती झाली. पेशवा व सरंजमादार यांनी नदीकाठी मंदिराची उभारणी केली. त्यातच अनेक शहरे नदीकाठी वसविल्याने आणखी त्यात भर पडली. अशाप्रकारे ही शहरे पुढे तीर्थक्षेत्रे म्हणून उदयास आली. त्यांचे महत्त्व वाढले. त्यामुळे मध्यकाळातील मराठा स्थापत्याचे आकर्षण बनली.

मध्यकाळातील मंदिरांचा सर्वात महत्त्वाचेअंग म्हणजे घाट होय. घाट म्हणजे मंदिर व नदीला जोडणाऱ्या उंच पायऱ्या होत. घाटाचे बांधकाम हे मंदिराच्या प्रायोजक व आश्रयदात्याइतकेच महत्त्वाचे होते. त्यांचा वापर धार्मिक विधी, दैनंदिन आंघोळीसाठी, धुण्यासाठी व पाणी पिण्यासाठी केला जात असे. त्यामुळे ही सामाजिक व सांस्कृतिक देवाणघेवाणीची ठिकाणे बनली. धार्मिक पावित्रय, संतांची मंदिरे, नदया व घाट यांच्यामध्ये महाराष्ट्राचा स्थापत्तीय विकास दिसतो.

प्रारंभीच्या कालखंडाच्या अखेरीस मराठा मंदिर स्थापत्यामध्ये दोन प्रवाह उदयास आले. प्रारंभीच्या काळातील मंदिरांचे प्रकार मध्यकाळामध्ये स्थानिक व पुनरूत्थान या दोन प्रकारात परिवर्तीत झाला. स्थानिक मराठा मंदिराचा विकास झाला. यामध्ये भूमिज तत्त्वांचा समावेश केला असला तरी यावर इस्लामीक रचनेचा विस्तार आणि सजावट यांचा प्रभाव दिसतो. प्रारंभीच्या स्थापत्याची योजना शिखर शिंगणापूर येथील पुनरूज्जीवनवादी दगडी मंदिरामध्ये समजते. स्थानिक व पुनरूत्थानवादी प्रकाराच्या संमिश्रणातून मराठा मंदिर प्रकार विकसित झाला.

दुसऱ्या टप्प्यातील सातारा जिल्हयातील मंदिरामध्ये प्रामुख्याने खवलेश्वर मंदिर बोरखळ, शकुंतलेश्वर मंदिर वडूथ, महादेव मंदिर विरमाडे, ब्रम्हेंद्रनाथ स्वामी मंदिर धावडशी, येथील मेरूलिंग मंदिर मोरघर, अतिबलेश्वर मंदिर महाबळेश्वर, माहूली येथील काशीविश्वेश्वर मंदिर, शिवमहादेव मंदिर (श्रीपतराव पंतप्रतिनिधी), बिल्वेश्वर मंदिर, रामेश्वर मंदिर, विष्णू मंदिर, विठोबा मंदिर, भैरोबा मंदिर वकाशिविश्वेश्वर मंदिर वाई इत्यादी मंदिरांचा समावेश होतो. त्यातील निवडक मंदिरांची माहिती पुढीलप्रमाणे–

**४.२.२.१ बोरखळ येथील खवलेश्वर मंदिर :**

बोरखळ हे सातारापासून पूर्वेस १२ कि.मी. अंतरावर व वडूथ गावापासून ४ कि.मी. अंतरावर कृष्णा नदीच्या तीरावर वसलेले आहे. या गावाच्या उत्तरेस कृष्णा नदीच्या काठावर नदीकडे तोंड करून खवलेश्वर मंदिर उभारले आहे. या मंदिराचे गर्भगृह व मंडप असे त्याचे विधान आहे.

**४.२.२.१.१ मंडप :**

या मंदिराच्या मंडपामध्ये प्रवेश करण्यासाठी असणाऱ्या चौकटीचे माप ४.९ X २.६ फूट आहे. चौकटीच्या उंबऱ्यावर किर्तीमुख व वरील बाजूस गणेशपट्टी आहे. मंडप १३ X १३ फूट आहे. मंडपाच्या दोन्ही बाजूलाही चौकटी आहेत. यापैकी दक्षिण बाजूकडील प्रवेशद्वाराची चौकट ४.९ X २.६ फूटाची आहे तर उत्तरेकडील चौकट ३.६ X २.६ फूट आहे. या चौकटीमध्ये ९ उंचीचा दगड बसविल्याने त्याची उंची कमी झालेली आहे. मंडपाचा मध्यभाग थोडासा उंचवटयाचा असल्याने मंडपातील पाणी बाहेर जाते.

मंडपामध्ये १.२ फूट उंचीचा व १.५ फूट रूंदीचा व १.६ फूट लांबीचा नंदी आहे. नंदी हा उठत असतानाच्या अवस्थेतील आहे. त्याच्या गळयामध्ये चाळ व अंगावर झूल पांघरलेली असून तोंडाला म्होरकी आहे. हा नंदी नंतर कधीतरी मंडपामध्ये आणला असावा.

कारण मंदिराच्या समोर नंदीमंडप असल्याच्या स्पष्ट खुणा दिसतात. नंदीला लागूनच लगेच कासवाचे शिल्प आहे. मंडपाचे संपूर्ण छत भिंतींवर पेलले आहे. मंडपाचा छत चारी बाजूने कोपऱ्यामध्ये अर्धगोलाकार आकारामध्ये कोन साधत चौकोन निमूळते होत गेलेले आहेत. दगडांचे पाच थरांच्या साह्याने छत पूर्ण केले आहे छताच्या सहाव्या थरावर छोटया आकाराचे उत्कल स्वरूपाचे कमलदल कोरलेले आहे.

मंडपातून गर्भगृहामध्ये जाताना दोन्ही बाजूस भिंतीत दोन फूट आत, तीन फूट उंच व दोन फूट रूंदीच्या दोन कमानीचे देवकोष्टके असून डाव्या बाजूस १.६ फूट उंचीची गणेशाची मूर्ती आहे. उजव्या बाजूस समाधी आहे. [२६]

**४.२.२.१.२ गर्भगृह :**

गर्भगृहाची चौकट ४.९ X २.४ फूट आकाराची आहे. चौकटीच्या उंबऱ्यास किर्तीमुख व वरील बाजूस गणेश पट्टी आहे. गर्भगृहाची एक पायरी उतरल्यानंतर उजव्या व डाव्या बाजूस ५.११ फूट उंच, ३.११ फूट रूंद व ४ फूट लांबीच्या दोन खोल्या आहेत. डाव्या बाजूच्या खोलीमध्ये कार्तिकेयची दोन फूट उंचीची मूर्ती आहे. उजव्या बाजूची खोली रिकामी आहे. गाभाऱ्यातील उजव्या बाजूच्या भिंतीमध्ये १.६ X १.६ X २ फूट आकाराचा गुप्त कप्पा आहे. गर्भगृह १० X १० फूट चौरस आहे. गाभाऱ्यामध्ये प्रकाश येण्यासाठी तिन्ही बाजूस ३.७ X २.११, २.३ X ३, २.३ X २.११ फूट मापाच्या तिरक्या कापाच्या दगडी जाळी असलेल्या खिडक्या आहेत. डाव्या व उजव्या भिंतीमध्ये प्रत्येकी तीन कप्पे आहेत. गर्भगृहामध्ये ३ फूट लांब, २ फूट रूंद व १.५ फूट उंचीचे शिवलिंग आहे.

गर्भगृहाचा छत मंडपाप्रमाणे भिंतींवर पेललेला आहे. गर्भगृहाच्या भिंतीचा शेवटचा थर एक इंच बाहेर आलेला आहे. गर्भगृहाचा छत चारी बाजूने कोपऱ्यामध्ये अर्धगोलाकार आकारामध्ये कोन साधत चौकोन निमूळते होत गेलेले आहेत. छताला दगडांचे पाच टप्प्यामध्ये छत पूर्ण केले आहे. छताच्या मध्यभागी सहाव्या टप्प्यात छोटया आकाराचे उत्कल स्वरूपाचे कमलदल कोरलेले आहे. छताला दगडांचा वापर करण्यात आला आहे. [२७]

**४.२.२.१.३ पीठ :**

८ इंच उंचीच्या खूरावर मंदिराचे पीठ उभारले असून पीठाची उंची ३ फूट आहे. चौथऱ्याची रचना जाडया कुंभ, उपपीठ व उलट कुंभ अशी आहे. उपपीठास मंडपातील पाणी बाहेर येण्यासाठी दक्षिण व उत्तर दिशेस मंडपाच्या सुरूवातीस दोन व मंडपाच्या शेवटी दोन असे चार साधारण दोन इंचाची छिद्रे आहे. [२८]

### ४.२.२.१.४ बाह्यभिंत :

चौथऱ्याच्या चारी बाजूंनी ६ इंच अंतर सोडून मंदिराच्या भिंतीचा पहिला थर कुंभाचा आहे. त्याच्यावरील भिंत साधी आहे. भिंतीचा शेवटचा थर उलट कुंभाचा असून त्यावर पागोळे आहे. मंडपास एकूण तीन चौकटी आहेत. या चौकटी साधारण एक इंच बाहेर आल्या आहेत. मुख्य प्रवेशद्वाराच्या वरील बाजूस साधे तोरण आहे.उत्तर दिशेकडील प्रवेशद्वारातून प्रवेश करताना पायऱ्या आहेत. दक्षिण दिशेकडील प्रवेशद्वारास उंबऱ्यावर कीर्तीमुख आहे.[२९]

### ४.२.२.१.५ शिखर :

पागोळ्यातील पहिल्या दगडी थरावर वीटांच्या बांधकामाचे तीन थर झाल्यानंतर विटांच्या कुंभाचा मंदिराच्या सभोवती पट्टा आहे. या पट्टयाच्या वरील बाजूस विटांचे बांधकाम करून चुन्यामध्ये कमळकळी कोरलेली आहे. या थरामध्ये गर्भगृहाच्या मागील बाजूस मधोमध एका लहान देवकोष्टकात गणपतीचे शिल्प आहे. मंडपाच्या छप्परावर व गर्भगृहाच्या शिखराच्या चारी कोपऱ्यावर चार असे एकूण आठ छत्र्या आहेत. या छत्र्याच्या चारी बाजूस त्रिपर्णी कमानी कोरलेल्या आहेत. छत्रीवर उलटे कमळाच्या देठातून मधोमध वर कळस आलेला आहे.

मंडपावरील शिखराचा पाया अष्टकोनी असून पायामध्ये प्रथम कुंभाचा थर असून यानंतर कणीचा थर आहे. त्यानंतर उलट कुंभाचा थर आहे. त्यावर आठ दिशेला आठ छत्र्या आहेत. या छत्रीला त्रिपर्णी कमानी आहेत. दोन छत्र्यांमध्ये एक कोपरा असलेला खांब आहे. छत्र्यांवर कमलदलामध्ये घुमटाकार खाचलेले आमलक असून त्याच्यावर उलटे कमळाच्या देठातून मधोमध वर कळस आलेला आहे. मुख्य चार दिशेच्या छत्र्यांवरील बाजूस आमलकापर्यंत पट्टीका आहेत. या पट्टीका कमलदलातून वर आलेल्या घुमटाकार खाचलेले अमलकास जोडलेल्या आहेत. या अमलकावर उलटे कमळाच्या देठातून मधोमध वर कळस आलेला आहे.

गर्भगृहाच्या छप्परावर वर उल्लेख केल्याप्रमाणे चार कोपऱ्यावर छत्र्या आहेत. गर्भगृहावरील शिखराचापाया बारा कोनी ते तीन भूमीमध्ये असून दोन थरामध्ये कुंभाच्या, कणीच्या मोलीमेचा व उलट कुंभाचा मोलीमे आहेत. पहिल्या मजल्यामध्ये त्रिपर्णी कमानी असलेल्या बारा छत्र्या आहेत. दोन छत्र्यांच्या जागेमध्ये एकावर एक सहा भांडी कोरलेली आहेत. या भूमीमध्ये दोन छत्र्याच्या मोकळया जागेमध्ये रांजणाच्या आकाराचे भांडयाच्या पायावर गोल कुंभ कोरलेले आहेत. या भूमीच्या छत्रीवरील शिखर कंदाच्या आकाराचे आहेत.

या भूमीवरील पाठीमागील बाजूच्या एका छत्रीमध्ये विठ्ठलाचे शिल्प आहे. सर्व छत्र्यांवर शिखरे असून त्यावर कमलदलातून वर आलेले घुमटाकार आमलक असून त्याच्यावर कळस बसविलेले आहेत. यानंतर कुंभाच्या मोलीमेचा थर असून शिखराच्या ग्रीव्हेवर गोल मणी कोरलेले आहेत. याच्यावर कमलदलातून वर आलेले घुमटाकार आमलक आहे. या आमलकास प्रमुख चार दिशेकडील छत्रीपासून निघालेली पट्टिका जोडलेली आहे. आमलकावर कळस बसविलेला आहे. मंदिरावरील सर्व कळस लाकडी आहेत.[३०]

## ४.२.२.२ वडूथ येथील शकुंतेश्वर मंदिर

सातारा फलटण रस्त्यावर सातारापासून १२ कि.मी. अंतरावर असलेल्या वडूथ या गावी कृष्णा नदीच्या पात्रात एका उंच खडकावर पूर्वाभिमुखी शकुंतेश्वर मंदिर बांधलेले आहे. हे मंदिर नानासाहेब पेशवे यांनी इ.स.१७५९ मध्ये बांधले. मंदिरास चोहोबाजूने उंच तटबंदी बांधलेली आहे. १३ पायऱ्या चढून गेल्यानंतर द्विशाखी बहूपर्णी कमान असलेले प्रवेशद्वार लागते. प्रवेशद्वाराची चौकट ७फूट उंच व ४ फूट रूंद आहे. चौकटीच्या वरील बाजूस गणेशपट्टी आहे. प्रवेशद्वाराच्या आत समोर मारूतीची लहान मूर्ती असून तिच्या दोन्ही बाजूने तेरा पायऱ्या चढून वरती गेल्यानंतर मंदिरामध्ये जाता येते. मंडप, अंतराळ, गर्भगृह असे त्याचे विधान आहे.

### ४.२.२.२ .१ नंदीमंडप :

मंदिराच्या समोर ३ फूट उंच व ५ फूट लांबी रूंदीच्या चौथऱ्यावर नंदीमंडप आहे. नंदीमंडप चार खांबावर आधारलेला आहे. त्याच्या चारी बाजूने बहुपर्णी कमान आहे. नंदीमंडपामध्ये ४फूट लांब, ३ फूट रूंद व ४ फूट उंचीचा नंदी आहे. नंदीच्या पुढील दोन्ही पायांमध्ये लहान आकाराचे नागाचे छत्र धारण केलेले शिवलिंग असून त्याच्यामागे हात जोडून उभ्या असलेल्या मानवाची लहान आकृती आहे. नंदी घुंगरू, साखळी, मणी व घंटांच्या माळांनी अलंकृत केलेला आहे. नंदीसम्होरकी व वेसन आहे. नंदी मंडपाचे छत चौकोनी असून ते निमुळते होत गेले आहे. नंदीमंडपाच्या कमानीवरील बाजूस अंतर्गोल मोलीमेवर पागोळे आहे. शिखराचा पाया चौरसाकृती असून त्याच्या चारी कोपऱ्यावर कणी असलेल्या ग्रीव्हावर उत्फूल कमळाच्या फूलातून वर आलेले घुमटाकृती आमलक आहे. आमलकावर उलटे कमळाच्या फूलाच्या देठातून कळस वर आलेला आहे. याच्या मध्यभागी कणी असलेल्या ग्रीव्हावर उत्फूल कमळाच्या फूलातून वर आलेले घुमटाकृती आमलक असून त्याच्यावर उलटे कमळाच्या फूलाच्या देठातून कळस वर आलेला आहे.[३१]

**४.२.२.२.२ मंडप :**

मंडप चौरसाकृती असून त्याचे माप १४ फूट आहे. मंडपाची चौकट ५.६फूट उंच व २.९ फूट रूंद आहे. चौकटीच्या वरील बाजूस पाच सहस्त्रदले कोरलेली आहेत. चौकटीच्या उंबऱ्यावर  किर्तीमुख आहे. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस दोन ओटे बांधले आहेत. मंडपाच्या दक्षिण व उत्तर बाजूस ५.६फूट उंच व २.९ फूट रूंद चौकटी आहेत. चौकटींच्या बाहेरील बाजूस किर्तीमुखे आहेत परंतु पायऱ्या नाहीत. मंडपाचे छत हे भिंतीवर पेलले आहे. मंडपामध्ये दोन्ही बाजूस दोन ३.६ फूट उंच व ३ फूट रूंदीची देवकोष्टके असून त्यामध्ये मारूती व गणपतीच्या मूर्त्या आहेत. मंडपाचे छत सपाट असून त्यावर फुलांची नक्षी आहे. मध्यभागी सहस्त्रदल कोरलेले आहे.[३२]

**४.२.२.२.३ अंतराळ :**

मंदिराचे अंतराळ ८ फूट लांब व ३ फूट रूंद आहे. अंतराळाचे छत सपाट असून त्यावर फुलांची नक्षी आहे. मध्यभागी सहस्त्रदल कोरलेले आहे.[३३]

**४.२.२.२.४ गर्भगृह :**

गर्भगृहाच्या द्विशाखी चौकटीच्या दोन्ही बाजूस भौमितिक आकारामध्ये दोन खांब असून त्यावर लहान द्वारपाल कोरलेले आहेत. चौकटीच्या पहिल्या शाखेत साखळीची नक्षी कोरलेली आहे. चौकटीच्या उंबऱ्याच्या मांडरिकावर किर्तीमुख आहे. चौकट ५.८ फूट उंच व २.१० फूट रूंद आहे. चौकटीवर तोरण असून त्यावर द्रविड शैलीतील तीन शिखरे आहेत. गर्भगृहामध्ये दोन पायऱ्या उतरून जावे लागते. गर्भगृह चौरसाकृती असून त्याचे माप १२ फूट आहे. समोरील भिंतीमध्ये एक देवकोष्टक आहे. दोन्ही बाजूच्या भिंतीमध्ये खालील बाजूस २.६ फूट उंच व १.६ फूट रूंदीची दगडी जाळी असलेली खिडकी आहे. गर्भगृहामध्ये ४ फूट लांब, ३ फूट रूंद व २ फूट उंचीचे शिवलिंग आहे.गाभाऱ्याचे छत अंतर्गोल मोलीमेवर चौरसाचे चारी कोन आकारमध्ये मध्यभागी कमलदलामध्ये एकत्र आलेले आहेत.[३४]

**४.२.२.२.५ मंदिराची बाह्यबाजू :**

**अ) पीठ :**

मंदिर तीन फूट उंचीच्या पीठावर असून पीठाची रचना खूर,.कणी, अंतर्गोल मोलीमे, कणी, अंतर्गोल मोलीमे, पुन्हा अंतर्गोल मोलीमे अशी आहे. त्याच्यावर मंदिराच्या भिंती उभारल्या आहेत.[३५]

**ब) बाह्यभिंत**

मंदिराच्या भिंती साध्या आहेत. पागोळयाच्या खाली भिंतीचा सर्वात वरचा एक थर थोडासा बाहेर आलेला आहे. त्याच्यावर कणी असून त्यावर अंतर्गोल मोलीमेवर पागोळे आहे. पागोळयाच्या खालील कडेला चौफेर लहान गोल कोरलेले आहे.[३६]

**क) शिखर:**

पागोळयाच्या वरील बाजूस अंतर्गोल मोलीमेवर मोठया कणीवर लहान कणी कोरलेली असून त्यावर उलट अंतर्गोल मोलीमेवर पानांची नक्षी कोरलेली आहे. त्यावर शिखर उभारलेले आहे. मंडपावरील छप्पर सपाट असून चारी कोपऱ्यावर चार छत्रीच्या प्रतिकृती आहेत. छत्रीला पंचपर्णी कमानी आहेत. अंतराळावर अर्धगोल मोलीमेवर कणीची ग्रीव्हा पानाच्या आकारातून कमलदलातून वर आलेल्या घुमटाकृती अमलकावर उलटया कमलदलाच्या देठातून कळस वर आलेला आहे. गर्भगृहावरील शिखर दोन भूमीमध्ये आहे. पहिल्या भूमीवर चार कोपऱ्यावर चार ठोकळे असून दोन ठोकळयांमध्ये तीन ठोकळे असून दोन ठोकळयांमध्ये मानवी आकृती कोरलेल्या आहेत. ठोकळयांवर जाळीदार नक्षी कोरलेली आहे. पहिल्या भूमीप्रमाणेच दुसऱ्या भूमीचा पाया आहे. पायाच्या चारी कोपऱ्यावर बसलेल्या सिंहाच्या चार लहान मूर्त्या आहेत. सिंहाच्या मूर्तींमागे मिनार आहेत. मिनारच्या पायावर एक पाय ठेवून उभ्या राहिलेल्या व मनोऱ्यास पकडलेल्या पगडीधारी मानवाची शिल्पे आहेत. मनोऱ्यावर कणीची ग्रीव्हा असलेल्या उत्फूल कमळदलातून वर आलेल्या घुमटाकृती आमलकावर उलटया कमळफूलाच्या देठातून कळस आलेला आहे. शिखराच्या मध्यभागी आठ दिशेला आठ छत्रीच्या प्रतिकृती आहेत. छत्रींच्या दोन्ही बाजूस अर्धषटकोनी मनोरे असून साखळी व डमरू यांची मोलीमे आहेत. मनोऱ्यांवर कणीची ग्रीव्हा असलेल्या उत्फूल कमळदलातून वर आलेल्या घुमटाकृती आमलकावर उलटया कमळफूलाच्या देठातून कळस आलेला आहे. छत्रीमधील देवकोष्टकामध्ये पदम्‌ासनामध्ये बसलेली देवता, विठ्ठल रूक्मीणी व नागधारी देवतेची शिल्पे आहेत. छत्रींवर व मुख्य शिखरावर कणीची ग्रीव्हा असलेल्या उत्फूल कमळदलातून वर आलेल्या घुमटाकृती आमलकावर उलटया कमळफूलाच्या देठातून कळस आलेला आहे. कळस लाकडी आहेत.[३७]

मंदिराच्या परिसरामध्ये विष्णू, लक्ष्मी व गरूडाची मूर्ती आहे. गणपतीचे छोटेसे मंदिर आहे.

### ४.२.२.३ मर्ढे येथील रामेश्वर मंदिर

पुणे बंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील आनेवाडी गावाच्या पूर्वेला एक कि.मी. अंतरावर कृष्णा नदीच्या पूर्व किनाऱ्यावर मर्ढे हे गाव वसलेले आहे. या गावामध्ये ब्रम्हेंद्रस्वामींनी रामेश्वर मंदिर बांधले. मंडप व गर्भगृह अशी त्याची रचना आहे. या मंदिरास मंडप असून तो अलिकडील काळात बांधलेला आहे.

### ४.२.२.३.१ गर्भगृहः

गर्भगृहाची रचना ही तळघर व तळमजला स्वरूपाची आहे. गर्भगृहातील तळघरात जाण्यासाठी कमान असून तिची उंची ५ फूट व रूंदी २.६ फूट आहे. आत जाण्यासाठी २.६ फूट रूंदीच्या ८ दगडी पायऱ्या आहेत. गर्भगृह चौरसाकृती असून त्याचे माप७.६ फूट आहे. ६ फूट उंच व ४ फूट रूंदीच्या टोकदार कमान असलेल्या देवकोष्टकामध्ये राम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्त्या आहेत. यामध्ये रामाची मूर्ती तीन फूट असून ती सर्वात उंच आहे. त्यामानाने बाकीच्या दोन मूर्त्या लहान असून डाव्या बाजूस सीतेची व उजव्या बाजूस लक्ष्मणाची मूर्ती आहे. राम व लक्ष्मणाच्या डाव्या खांद्यावर धनुष्य अडकविलेले आहे. सीतेच्या मूर्तीच्या डाव्या हातामध्ये म्हाळुंग असून उजव्या हातामध्ये कमळाचे फूल आहे. तिन्ही मुर्त्यांच्या डोक्यावर दाक्षिणात्य शैलीचा मुकूट आहेत. या देवकोष्टकाभोवती पणत्या ठेवण्यासाठी १३ लहान देवळया आहेत. गर्भगृहाच्या उजव्या भिंतीमध्ये ६ फूट उंच व ४ फूट रूंदीच्या टोकदार कमान असलेल्या देवकोष्टकामध्ये तीन फूट उंचीची हात जोडून उभ्या असलेल्या हनुमानाची मूर्ती आहे. याही देवकोष्टकाभोवती पणत्या ठेवण्यासाठी १३ लहान देवळया आहेत. याच्या समोरच्या भिंतीमध्ये ६ फूट उंच व ४ फूट रूंदीच्या टोकदार कमान असलेल्या देवकोष्टकातून वरील मजल्यावर जाण्यासाठी पायऱ्या आहेत. याही देवकोष्टकाभोवती पणत्या ठेवण्यासाठी १३ लहान देवळया आहेत. या गर्भगृहाचे छत त्रिकोणी दगड तिरपे ठेऊन तीन टप्प्यामध्ये प्रमाणात कमी होत गेलेल्या चौरसाच्या आकारात असून मध्यभागी सहस्त्रदल कोरलेले आहे. वरील गर्भगृह चौरसाकृती असून त्याचे माप १२ फूट असून गर्भगृहास दोन चौकटी आहेत. पूर्वेला मुख्य द्विशाखी चौकट ३.६ फूट उंच व २.१ फूट रूंद असून उंबऱ्यावर किर्तीमुख व ललाटबिंबावर गणेशपट्‌टी आहे. दुसरी त्रिशाखी चौकट दक्षिणेस असून ललाटबिंबावर फूल कोरलेले आहे. तळघरातील गर्भगृहापेक्षा हे गर्भगृह रूंद असून समोर पाच फूट रूंदीची व ८ फूट उंचीची टोकदार कमान आहे. यामध्ये एक फूट उंचीच्या पीठावर राम, लक्ष्मण, सीता व हनुमान यांच्या संगमरवराच्या मूर्त्या आहेत. या मूर्तीमध्ये रामाची मूर्ती दोन फूट उंच तर लक्ष्मण व सीतेची

मूर्ती १.९ फूटाच्या आहेत. यात राम व लक्ष्मण यांच्या डाव्या खांद्यावर धनुष्य असून लक्ष्मणाच्या उजव्या हातात बाण आहे. रामाचा उजवा हात अभय स्थितीत आहे. लक्ष्मणाच्या मूर्तीसमोर १ फूट उंचीची हनुमानाची वीरासनात मूर्ती आहे. कमानीच्या दोन्ही बाजूस दोन फूट उंचीच्या व १.६ फूट रूंदीच्या दोन देवळया आहेत. डाव्या बाजूच्या भिंतीमध्ये पाच फूट रूंदीची व ८ फूट उंचीची टोकदार कमान आहे. गर्भगृहाचे छत दोन थर त्रिकोणी दगड तिरपे बसवून अष्टकोन तयार केलेले आहेत. त्यावरीलसोळा कोनांच्या थरावर घुमटाकार छत आहे.मध्यभागी सहस्त्रदल कोरलेले आहे.[३८]

### ४.२.२.३.२ बाह्यबाजू:

मंदिर पीठावर उभारलेले असून पीठाची रचना साधी आहे. पागोळयापर्यंत बाह्यभिंत साधी आहे. दक्षिणेकडील चौकटीवर साधे तोरण आहे.[३९]

### ४.२.२.३.३ शिखर:

पागोळयावर शिखराच्या चौकानी पायावर कणीचे मोलीमे आहे. पायाच्या चारी कोपऱ्यावर अष्टकोनी कुंभाच्या मोलीमेवर अष्टकोनी लहान उंचीचे मनोरे आहेत. मनोऱ्यांवर कणीच्या ग्रीव्हेवर कमलदलातून वर आलेला घुमटाकार आमलकावर उलटया कमळकळीच्या देठातून वर आलेला कळस आहे. दोन भूमीवर शिखर आहे. पहिल्या भूमीवर अष्टदिशांना पंचपर्णी कमान असलेले ठोकळे आहेत. दुसऱ्या भूमीवर पंचपर्णी कमानी असलेल्या छत्रीच्या प्रतिकृती आहेत. दोन ठोकळयांच्यामधील जागा स्तंभांच्या कोपऱ्यांनी तर छत्र्यांमधील प्रतिकृतीमधील जागा सायप्रस स्तंभांनी भरून काढलेली आहे. ठोकळे छत्र्या व घुमटाकृती आमलक मुख्य शिखराच्या कणीच्या ग्रीव्हेवर कमलदलातून वर आलेल्या घुमटाकृती आमलकावर उलटया कमळकळीच्या देठातून कळस वर आलेला आहे.[४०]

### ४.२.२.३.४ मोरघर येथील मेरूलिंग मंदिर

राष्ट्रीय महामार्गावरील आनेवाडी गावापासून पश्चिमेस १० कि.मी. अंतरावर मेरूलिंगचा डोंगर आहे. या डोंगरावर मेरूलिंगचे मंदिर आहे. हे मंदिर ब्रह्मेंद्रस्वामींनी इ.स.१७२८ मध्ये बांधले आहे.[४१] या मंदिराचे मुखमंडप,मंडप, गर्भगृह व नंदीमंडप असे विधान आहे. या मंदिराचे तीन टप्प्यामध्ये काम झाल्याचे दिसते.

### ४.२.२.३.५ मुखमंडप:

मुखमंडप हा १४.६ फूट लांबी रूंदीचा असून या मंडपास तीन प्रवेशद्धार आहेत. या प्रवेशद्वारास टोकदार कमान असून त्याची उंची ६फूट व रूंदी २.६ फूट आहे. या मंडपाच्या

भिंती टोकदार कमानींनी बनविलेल्या असून छत स्क्विंचच्या साह्याने गोल मोलीमेवर घुमटाकृती बनविलेले आहे.[४२]

### ४.२.२.३.६ मंडप:

मंडपाची चौकट त्रिशाखी असून ती ४.१० फूट उंच व ३.३ फूट रूंदीची आहे. उंबऱ्यावर किर्तीमुख असून ललाटबिंबावर गणेश पट्टी आहे. या चौकटीवर वेलीची नक्षीकाम केलेले आहे. चौकटीवर टोकदार कमान आहे. मंडप १६ फूट लांबी रूंदीचा असून समोर द्विशाखी तर बाजूस टोकदार कमानी आहेत. बाजूच्या दोन्ही भिंतीमध्ये एक फूट लांबी रूंदीच्या प्रत्येकी दोन खिडक्या आहेत. स्क्विंचचा वापर करून वरील बाजूस अष्टकोनी गोल मोलीमेवर घुमटाकार छत आहे.[४३]

### ४.२.२.३.७ गर्भगृह:

गर्भगृहाची चौकट ४.१० फूट उंच व ३.३ फूट रूंदीची आहे. उंबऱ्याला मांडरिक असून ललाटबिंबावर गणेशपट्टी आहे. चौकटीच्या दोन्ही बाजूस लहान आकाराचे दोन खांब असून त्याची रचना अनुक्रमे खूर, तळखडा, अष्टकोन, गोल, साखळी, गोल, साखळी, अष्टकोन, चौकोन, तीन टप्प्यांत प्रमाणामध्ये कमी होत जाणारे अष्टकोन, कुंभ व चौकोन अशी आहे.[४४] या स्तंभांवरील तुळईवर टोकदार कमानीमध्ये गजलक्ष्मीचे शिल्प आहे. गर्भगृह १९ फूट लांबी रूंदीचे असून मध्यभागी स्वयंभू शिवलिंग आहे. मंडपाप्रमाणे गर्भगृहामध्ये टोकदार कमानीवर स्क्विचंच्या साह्याने अष्टकोनी गोल मोलीमेवर घुमटाकार छत आहे.[४५]

### ४.२.२.३.८ नंदीमंडप:

मंदिराच्यासमोर नंदीमंडप असून ५ फूट लांबी रूंदी व ३ फूट उंचीच्या पीठावर उभारलेला आहे. नंदी ४ फूट लांब, ३ फूट रूंद व ३ फूट उंचीचा आहे. नंदीमंडपाचा वरील भाग नवीन आहे.[४६]

### ४.२.२.३.९ बाह्यभाग:

मंदिर तीन टप्पे असलेल्या पीठावर उभारले आहे. गर्भगृह व जोडून असणाऱ्या पीठाची रचना थोडीशी वेगळी आहे. खूर, कुंभ, उपपीठ व कुंभ मोलीमे अशी पीठाची रचना आहे. मुखमंडपाचे पीठ जमीनीबरोबर आहे. याच्यावर भिंती उभारलेल्या आहेत. पागोळ्यापर्यंत भिंती साध्या व सरळ आहेत. गर्भगृहाच्या भिंतीमध्ये मधोमध एक कणीचा पट्टा आहे तर मंडपाच्या भिंतीमध्ये चौकोनी पट्टा आहे. गर्भगृहाच्या चारी कोपऱ्यावर अष्टकोनी अर्धस्तंभ आहेत. स्तंभाची रचना अनुक्रमे अष्टकोनी खूर, कणी, कुंभ, कणी, अष्टकोन, कणी, कुंभ, कणी व

अष्टकोन अशी आहे. त्यावरील हस्तावर पागोळे आहे. गर्भगृहाच्या चारी कोपऱ्यावरील हस्ताचा आकार हस्तमुखी आहे. गर्भगृहाला बाहेरून अर्धस्तंभ आहेत. मुखमंडपाच्या कोपऱ्यावर दोन अष्टकोनी स्तंभ पागोळयापर्यंत आहेत. अशाप्रकारचे स्तंभ विरमाडे येथील गणेश महादेव मंदिरास आहेत.[४७]

### ४.२.२.३.१० शिखर:

गर्भगृहाच्या चारी कोपऱ्यावर कमळदलातून वर आलेले घुमटाकृती आमलकावर उलटया कमळकळीवर कमळदलातून वर आलेले घुमटाकृती आमलकावर उलटया कमळकळीवर देठातून कळस वर आलेला आहे. मंडपाच्या दोन्ही कोपऱ्यावर मनोरे आहेत. मंडपावरील शिखर तीन टप्प्यात असून गर्भगृह व त्यास जोडून असलेल्या मंडपावर अष्टकोनी शिखर आहे. शिखरावर कमळकळीच्या देठातून वर आलेला आमलकावर आमलकातून वर आलेला कळस आहे. मुखमंडपावरील शिखर आकाराने गोल आहे. पहिला टप्पा साधा आहे. दुसऱ्यामध्ये नक्षीकाम आहे. तिसऱ्या टप्प्यामध्ये ते निमूळते होत गेलेले आहे. वर उलटया कमलदलावर कमळदलातून वर आलेले घुमटाकृती अमलकावर उलटया कमळकळीवर देठातून कळस वर आलेला आहे.

मंडपावरील शिखर अष्टकोनी असून तेही तीन टप्प्यामध्ये आहे. पहिला टप्पा अष्टकोनी पीठाच्या स्वरूपात आहे. त्याचे स्वरूप खूर, उपपीठ, कुंभ मोलीमे असे आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये अष्टकोनांच्या आठ कोपऱ्यावर उलटया कमलदलावर कमळदलातून वर आलेले घुमटाकृती आमलकावर उलटया कमळकळीवर देठातून कळस वर आलेला आहे. आठ पृष्ठभागावर प्रत्येकी चार नागाच्या फणी कोरलेल्या आहेत. याच्यावर अष्टकोनी गोल मोलीमे असून तिसऱ्या टप्प्यामध्ये ते निमूळते होत गेलेले आहे. सर्वात वर उलटया कमलदलावर कमळदलातून वर आलेले घुमटाकृती आमलकावर उलटया कमळकळीवर देठातून कळस वर आलेला आहे.

गर्भगृहावरील शिखर अष्टकोनी असून तेही तीन टप्प्यामध्ये आहे. पहिला टप्पा अष्टकोनी पीठाच्या स्वरूपात आहे. त्याचे स्वरूप खूर, उपपीठ, कुंभ मोलीमे असे आहे. आठ पृष्ठभागावर पंचपर्णी कमान असलेल्या प्रत्येकी तीन कमी खोलीचे देवकोष्टके आहेत. दुसऱ्या टप्प्यामध्ये अष्टकोनांच्या आठ कोपऱ्यावर उलटया कमलदलावर कमळदलातून वर आलेले घुमटाकृती अमलकावर उलटया कमळकळीवर देठातून कळस वर आलेला आहे. पृष्ठभाग उभा खाचलेला असून त्याच्यावर अष्टकोनी सपाट पट्टा आहे. तिसऱ्या टप्प्यामध्ये ते निमूळते होत

गेलेले आहे. सर्वात वर उलटया कमल दलावर कमळदलातून वर आलेले घुमटाकृती आमलकावर उलटया कमळकळीवर देठातून कळस वर आलेला आहे. अष्टकोनाच्या अग्नेय बाजूस बसलेल्या सिंहाचे शिल्प कोरलेले आहे.[४८]

#### ४.२.२.३.११ तटबंदी:

मंदिर तटबंदीने बंदिस्त आहे. प्रवेशद्वारापर्यंत पोहोचण्यासाठी २१ पायऱ्या आहेत. प्रवेशद्वारास दोन बुरूज आहेत. टोकदार कमानी असलेले प्रवेशद्वार आहे. प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस मारूतीच्या डोक्यावर गणपती बसल्याचे शिल्प आहे. दक्षिण बाजूस एक प्रवेशद्वार अस्तित्त्वात असून त्यास आतील बाजूस बहुपर्णी कमान तर बाहेरील बाजूस टोकदार कमान आहे. येथे बसण्यासाठी दगडी बाकाची सोय करण्यात आली आहे. बाकाखाली हस्त आहेत. स्क्विंचच्या साह्याने छत घुमटाकार बनविले आहे. यावर दोन मनोरे आहेत दोन मनोरे पडलेले आहेत. अस्तित्वात असलेल्या तटबंदीच्या आतील बाजूस यात्रेकरूंची सोय केलेली आहे.[४९]

### ४.२.२.४ बिल्वेश्वर मंदिर, माहुली

#### ४.२.२.४.१ मंडप:

मंदिराचा मंडप बंदिस्त आहे. मंडपाची चौकट ४.७५ फूट उंच व २.१ फूट रूंदीची असून चौकटीस मांडरिकच्या दोन्ही बाजूस दोन किर्तीमुख व वरील बाजूस गणेशपट्टी आहे. मंडपास १६ स्तंभ असून त्यातील १२ अर्धस्तंभ आहेत. स्तंभाची रचना खूर, तळखडा, अष्टकोनी, चौकोनी, अष्टकोनी, निमुळता होत गेलेला गोल, चक्र, चौकोन व हस्त अशी आहे. मंडपाच्या मध्यभागी रंगशीला असून त्यावर ३ फूट लांबी रूंदीचे कासवाचे शिल्प आहे. मंडपाच्या स्तंभावर शरभ, हत्ती यांची शिल्पे कोरलेली आहेत. मंडपाच्या भिंतीमध्ये एक फूट रूंद व दोन फूट उंचीची टोकदार कमानीची देवळी आहे. तिच्या कमानीच्या वरील बाजूस दोन पोपटांची शिल्पे कोरलेली आहेत. मंडपाच्या भिंतीवर परस्पर विरोधी उभे असलेल्या व मागे वळून पाहणाऱ्या शिल्पांवर नागाचे शिल्प कोरलेले आहे. मंडपामध्ये ९ खण असून प्रत्येक खणाचे छत तिरपे दगड ठेऊन तीन टप्प्यात चौरस बनविलेले असून त्यामध्ये सहस्त्रदल कोरलेले आहे. प्रत्येक खणाच्या छतावरील फुलांची नक्षी वेगवेगळी आहे.[५०]

#### ४.२.२.४.२ अंतराळ:

मंदिराचे अंतराळ ४.६ फूट रूंद व ५.६ फूट लांबीचे आहे. अंतराळामध्ये कोणतेही शिल्प नाही. अंतराळाचे छत तिरपे दगड ठेऊन तीन टप्प्यात चौरस बनविलेले असून त्यामध्ये सहस्त्रदल कोरलेले आहे.[५१]

**४.२.२.४.३ गर्भगृह:**

गर्भगृहाची चौकट ४.७५फूट उंच व २ फूट रूंद असून उंबऱ्यावर मांडरिकच्या दोन्ही बाजूस दोन किर्तीमुख आहेत. ललाटबिंबावर गणेशपट्‌टी असून त्याच्यावरील बाजूस गणपती व महिषासूरमर्दिनीची शिल्पे कोरलेली आहेत. चौकटीच्या दोन्ही बाजूस कोपऱ्यामध्ये दोन अर्धस्तंभ व लहान खांब कोरलेले आहेत. गर्भगृहाच्या भिंतीमध्ये १ फूट रूंद व १.६ फूट उंचीची चौकोनी आकाराची देवकोष्टके आहेत. गर्भगृह चौरसाकृती असून त्याचे माप १०.७ फूट आहे. गर्भगृहामध्ये ४ फूट लांब, तीन फूट रूंद व १.६ फूट उंचीचे शिवलिंग आहे. गर्भगृहातील स्तंभाचे कोपरे पुढे आलेले आहेत. खालील पहिला थर १ इंच बाहेर आलेला असून भिंतीच्या वरील बाजूस अंतर्गोल मोलीमेवर अष्टकोन बनवून दहा टप्प्यात प्रमाणामध्ये कमी होत गेलेले आहे. मध्यभागी सहस्त्रदल कोरलेले आहे.[५२]

**४.२.२.४.४ बाह्यबाजू:**

मंदिराचे पीठ साधे असून त्याची उंची ४ फूट आहे. पीठावर अंतर्गोल मोलीमेवर भिंत बांधलेली आहे. भिंतीची रचना पहिले तीन थर प्रत्येकी एक इंच एकापेक्षा दुसरा आत गेलेला आहे. चौथ्या थरानंतरचे तीन थर पागोळयापर्यंत पुन्हा एका इंचाने बाहेर आलेले आहेत. अंतराळाच्या बाहेरील बाजूस हत्ती व वाघाचे चित्र रेखांकित केले आहे. गर्भगृहाची बाजू तारांकृती आहे.[५३]

**४.२.२.४.५ नंदी :**

नंदीच्या पीठाची उंची ४ फूट, लांबी व रूंदी ६ फूट आहे. नंदीची लांबी ४फूट असून रूंदी २.६ फूट व ३ फूट उंची आहे. नंदीच्या गळयामध्ये घंटया व घुंगरांच्या माळा आहेत. एक मोठी घंटा असलेला पट्‌टा असून तोंडाला म्होरकी आहे. पायाजवळ शिवलिंग आहे. नंदी मंडपाचे नव्याने काम केलेले आहे. नंदीचे सर्व भाग चांगले तयार केलेले आहेत.परंतु त्याच्या डोळयाचे कोरीव काम अपूर्ण आहे.[५४]

**४.२.२.४.६ शिखर:**

पागोळयावर अंतर्गोल मोलीमेवर एका सपाट थरावर अंतर्गोल मोलीमे असलेली सभोवती भिंत बांधली आहे. मंडपावर शिखर नाही. अंतराळ व गर्भगृहावर शिखरे वेगळया प्रकारची आहेत. अंतराळवरील शिखरास पंचपर्णी कमानी असलेल्यातीन छत्र्या आहेत. गर्भगृहावरील शिखराची रचना वेगळया पद्धतीची आहे. मंदिराच्या पीठावरून निघालेले भिंतीचे कोपरे आमलकापर्यंत गेलेले आहेत. मुख्य दिशांना आमलकापर्यंत प्रमाणात कमी होत जाणाऱ्या

छत्र्या  आहेत. पहिल्या टप्प्याच्या छत्रीच्या प्रतिकृतींमध्ये देवतांची शिल्पे आहेत. उपदिशांना कुंभाच्या पायावर अष्टकोनी मिनार आहेत.छत्र्यांवर व मिनारावर कणीची ग्रीव्हा असलेल्या कमलदलातून वर आलेल्या घुमटाकृती आमलकावर उलट कमळकळीच्या देठातून कळस वर आलेला आहे. मध्यभागी मुख्य शिखरावर कणीची ग्रीव्हा असलेल्या कमलदलातून वर आलेल्या घुमटाकृती अमलकावर उलट कमळकळीच्या देठातून कळस वर आलेला आहे.[५५]

## ४.२.२.५ किन्हई येथील साखरगड निवासिनी यमाई मंदिर

सातारा शहरापासून आग्नेय दिशेला सुमारे ३० कि.मी. अंतरावर किन्हई हे गाव असून तेथील साखरगड नावाच्या टेकडीवर उत्तराभिमुख यमाई देवीचे मंदिर आहे. हे मंदिर औंध संस्थानचे भवानराव पंतप्रतिनिधी यांनी ऑक्टोबर १७२६ बांधले आहे. मुखमंडप, मंडप, सभागृह, व गर्भगृह अशी या मंदिराची विधान आहे.

### ४.२.२.५.१ मुख मंडप:

मुखमंडप हा १५ फूट लांब व ५ फूट रूंदीचा असून मंडपास दोन स्तंभ आहेत. त्याची रचना अनुक्रमे खूर, तळखडा, अष्टकोन, साखळी, अष्टकोन, चौकोन, निमूळता होत गेलेला गोल, कणी, घट, चौकोन व हस्त अशी आहे. स्तंभाच्या चौकोनावर गरूड, मारूती, विठ्ठल, प्रार्थना करीत असलेली पद्मासनातील व्यक्ती, शरभ व मानव, स्त्री पुरूष यांची उठावाची शिल्पे काही पूर्ण तर काही अपूर्ण आहेत. स्तंभाच्या हस्तावर नागाची शिल्पे आहेत. मंडपाच्या भिंतीवर नागकन्या, मारूती, शरभ, नागबंध, गोपाल व बदक यांची शिल्पे उठावात कोरलेली आहेत. भिंतीच्या बाह्यकोपऱ्यावर दोन बाजूस शरभाची दोन शरीरे व दोन्ही शरीराचे एक मुख उठावात कोरलेले आहे. हे शिल्प वैशिष्टयपूर्ण आहे. मुखमंडपाचे छत त्रिकोणी दगड तिरपे ठेऊन तीन टप्प्यामध्ये प्रमाणात कमी होत गेलेले चौरसाच्या स्वरूपात आहे.[५६]

### ४.२.२.५.२ मंडप:

मंडपाची चौकट ५.३ फूट उंच व २.६ फूट रूंदीची असून ललाटबिंबावर गणेशपट्टी व उंबऱ्यास मांडरिक आहे. मांडरिकवर पद्मासनातील प्रार्थना करीत असलेली व्यक्ती कोरलेली आहे. चौकटीच्या पायाशी दोन लहान द्वारपाल कोरलेले आहेत. चौकटीच्या दोन्ही बाजूस वेगळया स्वरूपामध्ये सहस्त्रदले व मानवी शिल्पे कोरलेली आहेत. मंडप १५ फूट लांबी रूंदीचा असून मंडपास १२ स्तंभ असून पैकी १० अर्धस्तंभ आहेत. अर्धस्तंभाची रचना साधी असून पूर्णस्तंभाची रचना अनुक्रमे खूर, तळखडा, अष्टकोन, साखळी, अष्टकोन, चौकोन, घट,

चौकोन व हस्त अशी आहे. मंडपाच्या पूर्वेकडे ३.६ फूट उंची व २.६ फूट रूंदी असलेलीचौकट आहे. गर्भगृहाच्या बाजूला भिंतीमध्ये २.६ फूट लांबी रूंदीची दोन देवकोष्टके आहेत.[५७]

**४.२.२.५.३ गर्भगृह:**

गर्भगृहाची चौकट ५.६ फूट उंच व २.६ फूट रूंद असून ललाटबिंबावर गणेशपट्टी तर उंबऱ्यावर मांडरिक असून दोन्ही बाजूस लहान सहस्त्रदले कोरलेली आहेत. चौकट त्रिशाखी असून तिच्या दोन्ही बाजूस दोन स्तंभ आहेत. दोन्ही स्तंभाची रचना वेगवेगळी आहे. स्तंभावर साधे तोरण आहे. गर्भगृह ९ फूट लांबी रूंदीचे असून गर्भगृहामध्ये २.६ फूट उंचीची देवीची मूर्ती आहे. गर्भगृहाचे छत तुळईवर अष्टकोन तयार करून दहा टप्प्यामध्ये प्रमाणात कमी होत गेलेले आहे.[५८]

**४.२.२.५.४ बाह्यबाजू:**

मंदिर साध्या पीठावर उभारलेले आहे. मंदिरास प्रदक्षिणा मार्ग आहे. मंडपाची पश्चिमेकडील बाह्यबाजू साधी व सपाट आहे. पूर्वेकडील बाजूवर अंबारीधारी हत्ती, फूल, बैल, मोर, पिपाणी घेतलेली व्यक्ती, प्राण्याने केलेली शिकार, घोडेस्वार, द्वंद्व, शरभ, हत्ती व शिकार करणारा घोडेस्वार यांची शिल्पे आहेत. पूर्व बाजूला नंतर कधीतरी एक छोटासा व्हरांडा बांधलेला आहे. याला चार टोकदार कमानी आहे.

गर्भगृहाची बाह्यबाजू प्रथम उभे दोन कोपरे आत गेलेले व नंतर दोन कोपरे बाहेर आलेले आहेत. पागोळयापर्यत हे कोपरे गेलेले आहेत.प्रत्येक आडवा थर पागोळयापर्यंत दोन इंचाने आतील बाजूस आठ थरापर्यंत कमी होत गेलेला आहे. दक्षिण व पश्चिम दिशांना दोन फूट उंचीची व रूंदीची देवकोष्टके आहेत.[५९]

**४.२.२.५.५ शिखर:**

शिखराचा पाया पीठापासून निघालेल्या कोपऱ्याप्रमाणेच आहे. शिखर तीन भूमीत आहे. प्रत्येक भूमीचे दोन भाग केले आहेत. मुख्य दिशांना पहिल्या दोन मजल्यांना दोन मोठे ठोकळे आहेत. दोन उभ्या पट्टयातील जागा लहान ठोकळयांनी भरून काढली आहे. तिसऱ्या मजल्यावर मुख्य दिशांना छत्र्या आहेत. मोठया ठोकळयामध्ये व छत्रीमध्ये देवतांची शिल्पे आहेत. इतर लहान ठोकळयांवर देवता व स्त्री पुरूषांची शिल्पे कोरलेली आहेत. दोन छत्रीमध्ये एक असे चार अष्टकोनी मनोरे आहेत. मोठया ठोकळयांवर दोन्ही टोकांवर, छत्रींवर व मनोऱ्यावर उलटया अष्टकोनी अंतर्गोल मोलीमेवर गोल ग्रीव्हेवर कमलदलातून वर आलेल्या घुमटाकृती अमलकावर उलटया कमळकलीच्या देठातून कळस वर आलेला आहे. सर्वात वर

मुख्य शिखराच्या कणीच्या ग्रीव्हेवर कमलदलातून वर आलेल्या घुमटाकृती आमलकावर उलटया कमळकलीच्या देठातून कळस वर आलेला आहे.[६०]

**४.२.२.५.६ दीपमाळा:**

मंदिराच्या पुढील बाजूस तीन दीपमाळाआहेत. त्यातील दोन दीपमाळा चौरस पीठावर आहेत. तिसरी दीपमाळ अष्टकोनी पीठावर आहे. या दीपमाळेवर श्री आदिपुरूष दीपमाळेचा जिर्णोद्धार श्रीमंत भवानराव श्रीनिवासराव कुलकर्णी किन्हई, जांब, भाडळे पंतप्रतिनिधी संस्थान औंध यांनी केला. प्रमोद नाम संवत्सरे शके १६५२ खर्च रूपये २५०० आला. असा लेख आहे.या दीपमाळेचे हस्त मोराच्या स्वरूपात आहेत. मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या दीपमाळेवर आणखी एक शिलालेख आहे.[६१]

स्वति श्री नृपशालिवाहन शके १६६४ दुदंभि नाम स्वंवत्सरे
आषाढ शुद्ध दशमी गुरूवासरे राजश्री जगज्जीवन
परशुराम कुलकर्णी मौजे किनई संमत कोरेगांव प्रांत वाई[६२]

**४.२.२.५.७ तटबंदी:**

या मंदिरास भक्कम तटबंदी असून तिला भव्य प्रवेशद्वार आहे. प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस थोडया अंतरावर एक शिलालेख आहे. अक्षरे व्यवस्थित दिसत नसल्याने तो वाचता येत नाही. प्रवेशद्वाराच्या उंबऱ्यावर किर्तीमुख आहे. दोन्ही बाजूस बसण्यासाठी जागा करण्यात आली आहे. प्रवेशद्वारावर सहस्त्रदल कोरलेली आहेत प्रवेशद्वारास द्विशाखी टोकदार कमान आहे. कमानीच्या वर दोन्ही बाजूस शरभाची शिल्पे आहेत. या शिल्पांच्यावर हस्त असलेले पागोळे असून वर नगारखाना आहे. प्रवेशद्वारात आत दोन्ही बाजूस दोन पहारेकऱ्यांसाठी खोल्या आहेत. प्रवेशद्वाराचे छत स्क्विंचच्या साह्याने अष्टकोन तयार करून अंतर्गोल मोलीमेने सहा टप्प्यामध्ये प्रमाणात कमी होत गेलेले आहेत.[६३] येथून पुढे गेल्यानंतर पायरीवर एक शिलालेख आहे. त्यामध्ये 'स्वस्ति श्री शालिवाहन शके १६४८-(का)र्तीक + + क' ही अक्षरे कोरेलेली आहेत. यावरून हे स्पष्ट होते की या मंदिराची निर्मिती ऑक्टोबर १७२६ मध्ये झाली आहे.[६४]

## ४.२.२.६ पाटखळ येथील संगमेश्वर मंदिर

सातारा शहरापासून १२ कि.मी. अंतरावर सातारा फलटण रस्त्यावरील वाढे या गावातून आतमध्ये पाटखळ हे गाव आहे. या गावाच्या वायव्य दिशेस कृष्णा व वेण्णा नदीच्या संगमाच्या काठी संगमाच्या उत्तरेस पूर्वाभिमुख संगमेश्वर मंदिर आहे. परंतु ते माहुलीहून जवळ आहे. जर संगमावर पाणी कमी असेल तर माहुलीतून जाता येते. अन्यथा पाटखळ गावातून

जावे लागते. या मंदिरास तटबंदी आहे. या मंदिराच्या शिखराचा जिर्णोद्धार चालू आहे. शिखराचा जिर्णोद्धार सुरू असला तरी जुनी शैली तशीच ठेवून त्यावर गिलावा देण्यात आला आहे. हे मंदिर अजूनही सुस्थितीमध्ये आहे. मुखमंडप, मंडप, अंतराळ, गर्भगृह असे विधान असून नंदीमंडप स्वतंत्र आहे.

**४.२.२.६.१ मुखमंडप :**

मंदिराचा मुखमंडप १९ फूट लांब व ९.३ फूट रूंद असून मुखमंडपास ६ अर्धस्तंभ व दोन स्तंभ आहेत. स्तंभाची रचना तळखडा, चौरस, गोल, कणी, चौरस, च्रक्र, चौकोन व हस्त अशी आहे. एका स्तंभाच्या हस्तावर पंचफणी नागाचे शिल्प कोरलेले आहे. मुखमंडपाचे छत सपाट आहे.[६५]

**४.२.२.६.२ मंडप** :

मंडपाची चौकट ४.१० फूट उंच व २.१ फूट रूंद असून ती त्रिशाखी आहे. चौकटीच्या उंबऱ्याच्या मध्यभागी षटकोनी मंडारिक असून त्याच्या दोन्ही बाजूस दोन किर्तीमुख आहेत. चौकटीवर फुलांची नक्षी कोरेलेली आहेत. चौकटीस वरील बाजूस गणेश पट्टी असून दोन्ही बाजूस लहान आकाराचे अर्धस्तंभ आहेत. अर्धस्तंभाची रचना तळखडा, चौकोन, अर्ध षटकोन, गोल, षटकोन, गोल, कणी, चक्र, चौकोन व हस्त अशी आहे. या स्तंभांवर पागोळयाच्या स्वरूपामध्ये तोरण आहे. याच्या वरील बाजूस एका रांगेमध्ये मध्यभागी शिवलिंग एका बाजूस उभा नंदी व हात जोडलेला घोडेस्वार आहे. तर दुसऱ्या बाजूस गणपती, व मारूतीचे श्ल्पि कोरलेले आहे. यांच्या तिन्ही बाजूने वेल व फूलांची नक्षी तर वरील बाजुस कमलकळीची रांग कोरलेली आहे. मंडप १९ फूट लांब व रूंद आहे. मंडपास १२ अर्धस्तंभ व चार पूर्ण स्तंभ असून मंडपाच्या मध्यभागी रंगशिलेवर ३ फूट लांबी रूंदीचे कासव आहे. स्तंभाची रचना तळखडा, चक्र, चौकोन व हस्त अशी आहे. मंडपाच्या दोन्ही बाजूस ३.१० फूट लांब, २.१ फूट रूंद व २.४ फूट उंचीच्या दगडी जाळीच्या खिडक्या आहेत. अंतराळच्या दोन्ही बाजूस दोन देवकोष्टकांमध्ये गणपती व देवतेची मूर्ती आहे. बाजूच्या सर्व खणांचे छत सपाट आहे तर कासवाच्या वरील छतावर सहस्त्रदल कोरलेले आहे. मंडपाची भिंतीस खालील बाजूस अंतर्गोल मोलीमे असून वरील बाजूस साधी भिंत आहे.

**४.२.२.६.३ अंतराळ** :

अंतराळ हे ७.६ फूट लांब व ६.१० फूट रूंदीचे आहे. अंतराळामध्ये चार अर्धस्तंभ असून दोन मंडपाशी संबंधित असून दोन अर्धस्तंभ गाभाऱ्याशी जोडून आहेत. स्तंभाची रचना

तळखडा, चौकोन, अष्टकोन, साखळी, चौकोन, अष्टकोन, निमूळते होत गेलेले गोल व त्यावर चक्र, चौकोन व हस्त अशी आहे. अंतराळाचे छत तिरपे दगड ठेऊन चौरस बनविलेले असून त्यामध्ये सहस्त्रदल कोरलेले आहे.[६६]

**४.२.२.६.४ गर्भगृह :**

गाभाऱ्याची चौकट ४.६ फूट उंच व २.३ फूट रूंदीची असून वरील बाजूस गणेश पट्टी तर खालील बाजूस उंबऱ्यास मध्यभागी द्विशाखी चौकानी मंडारिक असून त्याच्या दोन्ही बाजूस किर्तीमुख आहे. चौकटी चौफेर अंतर्गोल मोलीमे असून चौकटीवर वेलीची नक्षी कोरलेली आहे. चौकटीच्या दोन्ही बाजूस दोन अर्धस्तंभ असून त्याची रचना तळखडा, चौकोन, अष्टकोन, अर्धगोल मोलीमे, अष्टकोन, अर्धगोल मोलीमे, अष्टकोन, चौकोन, अष्टकोन, निमुळता होत गेलेला गोल, दोन अर्धगोल मोलीमे, कणी, पानांमध्ये हस्त अशी आहे. त्यावर उलटया कमळकळीची नक्षी असलेले तोरण विसावलेले आहे. त्याच्यावर एका दगडी पट्टयावर कमरेवर हात ठेवून उभा असलेल्या विठ्ठलाच्या दोन्ही बाजूस उभ्या असलेल्या सेविका व एका बाजूस मारूती व दुसऱ्या बाजूस गरूडाची शिल्पे कोरलेली आहेत. या शिल्पांच्या दोन्ही बाजूस फुलदाणी कोरलेली आहे. गर्भगृह १०.९ लांबी रूंदीचे असून गर्भगृहामध्ये एकही खांब नाही. गर्भगृहाच्या मध्यभागी ४ फूट लांब, ३ फूट रूंद व २ फूट उंचीचे शिवलिंग आहे. शिवलिंगाच्या साळुंख्यावर सोनेरी रेषा आहे. गर्भगृहाच्या भिंतीचा खालचा थर बाहेर आलेला असून वरील बाजूस अंतर्गोल मोलीमेवर अष्टकोन तयार करून आठ टप्प्यामध्ये लहान होत गेलेले आहे. शेवटी सहस्त्रदल कोरलेले आहे.[६७]

**४.२.२.६.५ नंदीमंडप :**

मंदिराच्यासमोर स्वतंत्र नंदीमंडप आहे. नंदीमंडपास पाठीमागून तीन पायऱ्या आहेत. नंदीमंडप हा ९.८ फूट लांबी रूंदीच्या व तीन फूट उंचीच्या पीठवर उभारलेला आहे. पीठाची रचना खूर, अंतर्गोल मोलीमे, कणी, उपपीठ, कणी व उलटे अंतर्गोल मोलीमे अशी आहे. नंदी मंडपास चार स्तंभ असून त्यांची रचना खूर, तळखडा, अष्टकोन, कणी, अष्टकोन, चौकोन, अष्टकोन, चक्र, निमूळता गोल, चौकोन व हस्त अशी रचना आहे. हस्तावर तुळई असून त्यावर पागोळे आहे. त्यावर शिखर आहे. नंदीमंडपामध्ये ३.६ फूट लांब, १.९ फूट रूंद व ३ फूट उंचीचा नंदी आहे. नंदीच्या गळयामध्ये घंटांची माळ आहे. नंदीच्या गळयाच्या खाली नागाची फणी कोरलेली असून गळयामध्ये एक घंटा बांधलेला दुसरा पट्टा आहे. मागील बाजू घुंगरूचा पट्टा कोरलेला आहे. इतर नंदीप्रमाणेच याही नंदीला म्हूर्की आहे. नंदीमंडपाचे छत तिरपे दगड

लावून चौकोन बनविलेले आहेत व सर्वात शेवटी सहस्त्रदल कोरलेले आहे. नंदीमंडपाच्या पागोळयाच्या वरती अंतर्गोल मोलीमेच्या चौरस पीठावर शिखर उभारलेले आहे. उलटे अंतर्गोल मोलीमे, कणी, कमळकळीचा चौफेर पट्टा अशी पीठाची रचना आहे. त्यावर अंतर्गोल मोलीमेवर ठोकळा बांधलेला असून त्याच्या चारी पृष्ठभागावर पंचपर्णी कमान कोरलेली आहे. यामध्ये कोणतेही शिल्प कोरलेले नाही. ठोकळयाच्या  चारी कोपऱ्यावर चार स्तंभ असून ते सायप्रस प्रकारचे आहेत. याच्या पागोळयाच्या वर पीठावर कणीची ग्रीव्हा असलेल्या उत्फल कमळदलातून वर आलेल्या घुमटाकृती अमलकावर उलटया कमळदलच्या देठातून कळस बाहेर आलेला आहे. नंदीमंडपास चौरंगाचे पाय लावून त्यास चौरंगाचे स्वरूप दिले आहे. चौरंगाच्या पायावर पानफुलांची नक्षी कोरलेली आहे. असे चौरंगाचे पाय भुईंज येथील रायाजी जाधवराव यांच्या समाधीस असलेले दिसून येतात. चौरंगाचे पाय हे या नंदीमंडपाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.[६८]

**४.२.२.६.६ बाह्यबाजू :**

हे मंदिर पीठावर उभारलेले आहे. पीठाची रचना फार साधी आहे. पीठ मातीमध्ये मुजले गेल्याने पीठाचा एक ते दीड फूट भागच दिसतो. मंदिराच्या गर्भगृहाची बाह्यबाजू तारकाकृती आहे. पीठावर मंदिराच्या भिंतीचा पहिला थर अंतर्गोल मोलीचा असून त्यावर तीन थर एकापेक्षा दुसरा एका इंचाने आत गेला आहे. चौथ्या थरानंतर तीन थर अंतर्गोल मोलीमेच्या थरापर्यंत एकापेक्षा दुसरा एका इंचाने बाहेर आलेला आहे. मंडपाच्या दोन्ही बाह्यबाजूस जिथे जाळीदार खिडकी आहे. त्याठिकाणी टोकदार त्रिपर्णी कमानीची चौकटीची नक्षी आहे. याशिवाय बाह्यभिंतीवर कोणतेही शिल्प नाही.[६९]

**४.२.२.६.७ शिखर :**

पागोळयावर अंतर्गोल मोलीमेचा थर आहे. मंडपावर तीन फूट उंचीची विटांची भिंत बांधलेली आहे. मंडपावर शिखर नाही. अंतराळ व गर्भगृहावर पागोळयावर मंडपाच्या स्तरापर्यत पायापासून ताराकाकृती रचनेमुळे तयार झालेले कोनाच्या स्वरूपात केलेले आहे. याच्या दोन टप्प्यावर कमळकळीचा आडवा पट्टा कोरलेला आहे. गर्भगृह वअंतराळावरील शिखरे एकमेकास जोडून बांधलेली आहेत. गर्भगृह व अंतराळ यांच्या पायापासून तयार झालेले कोन प्रमाणामध्ये कमी होत ग्रीव्हापर्यंत गेलेले आहे.  अंतराळावरील शिखर तीन टप्प्यामध्ये तर गर्भगृहावरील शिखर पाच टप्प्यामध्ये बांधण्यात आले आहे. अंतराळवरील शिखराचे पहिले दोन टप्प्यामध्ये प्रत्येकी तीन ठोकळयांच्या रांगा आहेत. याच्या पायावर व वरील बाजूस अंतर्गोल

व कणीचे मोलीमे असून त्यावरील थरावर कमळकळीची नक्षी कोरलेली आहे. तिसऱ्या टप्प्यावर छत्रीची प्रतिकृती असून तिच्या चारी बाजूच्या पृष्ठभागावर त्रिपर्णी कमानी कोरलेल्या आहेत. या कमानीमध्ये देवतांची शिल्पे कोरलेली आहेत. त्याच्यावर अर्धगोल ग्रीव्हावर कमलदलातून वर आलेला घुमटाकार अमलकावर उलटया कमळ फुलाच्या देठातून वर आलेला कळस आहे. गर्भगृहावरील शिखरावर अमलकापर्यंत मुख्य दिशांना अमलकापर्यंत सपाट पट्ट ा असून यावर वरील बाजूस पहिल्या दोन टप्प्यापर्यंत प्रमाणात कमी होत जाणारे छत्रीच्या प्रतिकृती आहेत. यामध्ये शिल्पे नाहीत. दुसऱ्या टप्प्यावर उपदिशांना अष्टकोनी मनोरे आहेत. मनोऱ्यावर कमळदलातून वर आलेला अमलक आहे. उपदिशांना वर अमलक आहेत. त्यावर गोल मोलीमे असलेल्या ग्रीव्हावर कमलदलातून वर आलेल्या घुमटाकृती अमलकावर उलट कमळकळीच्या देठातून कळस वर आलेला आहे.[७०]

**४.२.२.६.८ बांधकाम व साहित्य :**

या मंदिराचे पागोळयापर्यंतचे बांधकाम दगड चुन्यामध्ये तर शिखराचे बांधकाम वीट चून्यामध्ये केलेले आहे. शिखराला चुन्याचा गिलावा केलेला आहे. या बांधकामास वापरलेली वीट १० X ८ X २.६ मापाची आहे.[७१]

## ४.२.२.७ धावडशीचे भार्गवराम मंदिर

धावडशी हे सातारा शहरापासून साधारणपणे १२ कि.मी अंतरावर आहे. हे खेडेगाव असून राणी लक्ष्मीबाईचे गाव म्हणून ओळखले जाते. हे गाव ब्रम्हेन्द्रस्वामींचे गाव म्हणून ओळखले जाते. छ. संभाजीपुत्र छ. शाहू यांचे ते गुरू मानले जातात. छ. शाहूंकडून त्यांना धावडशी हे एक गाव इनाम मिळाले होते. धावडशी येथील भार्गवराम मंदिर ब्रम्हेंद्रस्वामींनी बांधले. हए मंदिर उत्तरमुखी आहे. सभामंडप, मंडप, अंतराळ व गर्भगृह असे या मंदिराचे दृश्य विधान आहे. यातील सभामंडपाचे जिर्णोद्धाराचे काम झाले आहे त्यामुळे त्याबद्दल लिहिता येत नाही. मंडप व अंतराळ यांचे बांधकाम मूळ मंदिराच्या नंतर लगेचच्या काळात झाले आहे. हे मंदिराच्या रचनेवरून स्पष्ट दिसते.

**४.२.२.७.१ मंडप :**

मंडप १९ X १९ फूट मापाचा आहे. मंडपामध्ये चारी बाजूस टोकदार कमानी आहेत. या कमानी तयार करताना त्रिशाखी दगडी खांबांचा वापर केलेला आहे हे खांब अखंड दगडाचे नाहीत. दगडावर दगड ठेऊन खांब तयार केले आहेत. प्रवेशद्वाराची चौकट ६फूट उंच व ३.३. फूट रूंदीची असून भिंतीची जाडी ४ फूट आहे. मंडपाच्या चारी भिंतीमध्ये द्विशाखी

टोकदार कमानी आहेत. मंडपाच्या प्रवेशद्वाराच्या व मंडपातून अंतराळाशी जोडून असणाऱ्या भिंतीमध्ये द्विशाखी बहुपर्णी कमानी चौरस आकाराच्या सायप्रस प्रकारच्या खांबांवर तयार केलेल्या आहेत. या कमानीवर नक्षीकाम केलेले आहे. पूर्व व पश्चिम बाजूच्या भिंतीमध्ये पंचपर्णी कमानी आहेत. चारी भिंतीमध्ये असलेल्या टोकदार द्विकेंद्री कमानीमधील अंतर स्क्विंचच्या साह्याने भरून काढलेले आहे याच्यावरील बाजूस सोळा कोनी अर्धार्ध अंतर्गोल मोलीमेवर सपाट चौकोनी भागावर नक्षीकाम केलेले आयत कोरलेले आहेत. याच्यावर सोळा कोनी अर्धार्ध अंतर्गोल मोलीमेवर सोळाकोनी गोलची मोलीमेवर घुमटाकार छत असून त्याच्या मध्यभागी लहान उत्फूल नक्षीकाम आहे. मंडपामध्ये तीन फूट लांबी रूंदीचे कासव आहे. मंडपाच्या पश्चिमेकडील भिंतीमध्ये गुप्त कप्पा असून यामध्ये देवतेचे साहित्य ठेवलेले असते. मंडपातून अंतराळामध्ये प्रवेश करताना उजव्या बाजूस तीन फूट उंचीची व तीन फूट रूंदीची गणपतीची व डाव्या बाजूस तीन फूट उंचीची व दोन फूट रूंदीची महिषासूर मर्दिनीची मूर्ती आहे.[७२]

### ४.२.२.७.२ अंतराळ :

अंतराळ हे ८ X ८ फूट मापाचे असून अंतराळाची चौकट ६ फूट उंच व ३.५फूट रूंदीची आहे. अंतराळामध्ये दोन्ही बाजूच्या भिंतीमध्ये २ X २ फूट मापाच्या खिडक्या आहेत. यामध्ये काळ, परशूराम व काम यांच्या मूर्ती आहेत. अंतराळाचे छत चौरसाकृती असून छताच्या मध्यभागी चौरसाचे चारी कोन अर्धगोलाकृतीमध्ये एकत्रित आलेले आहेत. मध्यभागी चौरसाकृती लहान उत्फूल नक्षी आहे.[७३]

### ४.२.२.७.३ गर्भगृह :

गर्भगृहाची चौकट त्रिशाखी असून तिचे मोजमाप ५ फूट उंच व २.६ फूट रूंद आहे. चौकटीच्या दोन्ही बाजूस भिंतीस लागून पायथ्याशी एक सेवकाचे शिल्प आहे. त्याच्या शेजारी स्तंभ असून त्याच्या तळखडयावर भैरवाचे शिल्प कोरलेले आहे. स्तंभाच्या वरील भागावर भौमितिक रचना व कोरीव काम केलेले आहे. स्तंभाच्या सर्व शाखांच्या पायथ्याशी सेवकांची शिल्पे कोरलेली आहेत. या दोन्ही शाखांवर नर व्याल आहेत. चौकटीच्या मुख्य शाखेवर कोरीवकाम आहे. चौकटीस गणेश पट्टी असून उंबऱ्यास मांडरिकवर कमळाचे फुल कोरलेले असून बाजूस वेलबुट्टी कोरलेली आहे. चौकटीच्या वर तोरण असून त्यावर पाच द्रविड शैलीची शिखरे कोरली आहेत. तोरणाच्या खालील बाजूस पाचा भारतोलक कोरलेले आहेत.

गर्भगृह १० फूट लांब व १० फूट रूंद आहे गर्भगृहाच्या मध्यभागी ब्रम्हेंद्रस्वामींची २ फूट उंचीची समाधी आहे. समोरच्या भिंतीमध्ये द्विशाखी बहुपर्णी कमानीमध्ये मंचकावर ३ फूट उंचीची परशुरामाची मूर्ती बसविली आहे. मंडपाप्रमाणेच गर्भगृहास टोकदार कमानी आहेत. डाव्या व उजव्या बाजूच्या भिंतीमध्ये दोन झरोखे आहेत. यातून गर्भगृहामध्ये चांगला प्रकाश येतो. चारी भिंतीमध्ये असलेल्या टोकदार द्विकेंद्री कमानीमधील अंतर स्क्विंचच्या साह्याने भरून काढलेले आहे. याच्यावरील बाजूस सोळा कोनी अर्धार्ध अंतर्गोल मोलीमेवर सपाट चोकोनी भागावर नक्षीकाम केलेले आयत कोरलेले आहेत. याच्यावर सोळा कोनी अर्धार्ध अंतर्गोल मोलीमेवर सोळाकोनी गोलची मोलीमेवर घुमटाकार छत असून त्याच्या मध्यभागी लहान उत्फूल नक्षीकाम आहे.

मंदिराच्या बाहेर अग्नेय बाजूस काही पायऱ्या उतरून गेल्यानंतर छोटेसे शिवमंदिर दिसते या शिवमंदिरामध्ये २.५ लांबी व २ फूट रूंदी व २ फूट उंचीचे शिवलिंग आहे. त्याच्या जवळच असणारा नंदी दोन फूट लांबी व १.५ फूट रूंदी व २ फूट उंचीचा आहे. परंतू हे मंदिर नंतरच्या काळामध्ये बनविले असावे. कारण बाहेरील बाजूने पाहिले असता मंदिराची एक भिंतीचे बांधकाम नंतर करून येथील वाट बंद केल्याचे स्पष्ट दिसते.[७४]

**४.२.२.७.४ बाह्यबाजू :**

गर्भगृहाची बाह्यबाजू ताराकृती आहे. हे मंदिर विष्णू अवतारास समर्पित असल्याने बाह्यबाजूस मुख्य दिशेला देवकोष्टके आहेत पैकी दोन कोष्टकामध्ये विष्णू व नृसिंहची शिल्पे आहेत तर एका देवकोष्टकामध्ये दगडी जाळी बसविली आहे.इतर कोनाडयामध्ये दशावतार, नारद, मच्छनयनवेध करणारा अर्जून, हत्तीवर वरमाला घेऊन बसलेली द्रौपदी, सेवक, पुतना मावशी, बाळकृष्ण व कृष्ण यांची शिल्पे कोरली आहेत. शिल्प थराच्या खालील चौकोनी पट्टीवर उमलत्या कळीचे कोरीवकाम आहे तर वरील पट्टीवर फुलांचे कोरीवकाम केलेले आहे. त्याच्या वरील बाजूस पागोळयाच्या खालील बाजूस गोलकावर उलटी नागाची फणी कोरलेली आहे. अंतराळास दोन्ही बाजूस दगडी जाळया आहेत.

मंडपाची बाह्यबाजू साधी आहे. मंडपाच्या पूर्व व पश्चिम बाजूस द्विशाखी त्रिपर्णी कमान चौकोनी सायप्रस खांबावर पेलली आहे. या कमानींवर कोरीव काम केलेले आहे. कमानीच्या दोन्ही बाजूस दोन लोखंडी गोल कडया आहेत. बाहेरून पाहिल्यास हे पूर्वी प्रवेशद्वारे असावीत व नंतरच्या काळामध्ये ती बंद केली असावीत हे स्पष्ट होते. मंडपाच्या बाह्यभिंतीस गोल मोलीमे आहे. मंडपाच्या बाहेरच्या बाजूस प्रवेशद्वाराच्या वरील बाजूस एक शिलालेख

कोरलेला आहे. मंडपास लागू मोठा सभामंडप आहे परंतु त्याचा जिर्णोद्धार केला असल्याने त्याबद्दल लिहिता येत नाही.[७५]

### ४.२.२.७.५ शिखरः

पागोळयाच्यावर अर्धार्ध अंतर्गोल मोलीमेवर उलट असलेल्या अर्धार्ध अंतर्गोल मोलीमेच्या पायावर कमळ कळीचा थर आहे. याच्यावर मंडप व गर्भगृहावर शिखर उभारलेले आहे. मंडपावरील शिखर तीन मजल्यामध्ये बांधलेले आहे. पहिले दोन टप्पे चौरस तर तिसरा टप्पा गोल आकाराचा आहे. पहिल्या टप्प्यामध्ये मंडपाच्या चारी कोपऱ्यावर चार तीन टप्प्यातील चौकोनी मनोरे आहेत. सर्वात वरच्या ठोकळयाच्या वर पागोळयास लहान हस्त आहेत. त्याच्यावर कणीची ग्रीव्हा असलेल्या स्तंभावर उत्फूल कमळाच्या फूलातून वर आलेले खाचलेला घुमटाकृती अमलक असून त्याच्यावर उलटे कमळाच्या फूलाच्या देठातून कळस वर आलेला आहे. या चारी बाजूंच्या मनोऱ्यांमधील अंतराच्या मधोमध पंचपर्णी कमान असलेल्या छत्रीच्या प्रतिकृती आहेत. छत्रींवर कमळाच्या फूलातून वर आलेले खाचलेला घुमटाकृती अमलक असून त्याच्यावर उलटे कमळाच्या फूलाच्या देठातून कळस वर आलेला आहे. छत्रींच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी तीन चौकोनी ठोकळे असून त्यावर कणी असलेल्या ग्रीव्हावर उत्फूल कमळाच्या फूलातून वर आलेले खाचलेला घुमटाकृती अमलक असून त्याच्यावर उलटे कमळाच्या फूलाच्या देठातून कळस वर आलेला आहे. दुसरा टप्पा पहिल्या टप्प्यासारखाच आहे फक्त छत्रीच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी दोन ठोकळे आहेत. तिसरा टप्प्यामध्ये आठ दिशांना छत्र्या आहेत. छत्रींना बहूपर्णी कमानी असून कणी असलेल्या ग्रीव्हावर उत्फूल कमळाच्या फूलातून वर आलेले खाचलेला घुमटाकृती अमलक असून त्याच्यावर उलटे कमळाच्या फूलाच्या देठातून कळस वर आलेला आहे. याच्यावर कणी असलेल्या ग्रीव्हावर उत्फूल कमळाच्या फूलातून वर आलेले खाचलेला घुमटाकृती अमलक असून त्याच्यावर उलटे कमळाच्या फूलाच्या देठातून कळस वर आलेला आहे. शिखरावरील दर्शनी बाजूच्या छत्रीमध्ये पंचपर्णी कमानीमध्ये ब्रह्मेंद्रस्वामीचे शिल्प कोरलेले आहे. याव्यतिरिक्त एकाही छत्रीमध्ये किंवा ठोकळयांवर कोणतेही शिल्प नाही.

मंडपावरील शिखरापेक्षा गर्भगृहावरील शिखर हे वेगळ्या धाटणीचे आहे हे शिखर पाच मजल्यांचे आहे. मुख्य दिशांना छत्रींच्या प्रतिकृती वरील बाजूस आकाराने प्रमाणात कमी होत गेलेल्या आहेत. या काही छत्र्यांमध्ये त्रिपर्णी तर काहींमध्ये बहूपर्णी कमानी आहेत. या छत्र्यांमध्ये गणपती, शंकर, लक्ष्मी, यासारख्या देवतांच्या मूर्त्या आहेत. या छत्र्यांच्यामधील

अंतर वरील बाजूस आकाराने प्रमाणामध्ये कमी होत जाणाऱ्या ठोकळयांनी व भरीव कोपऱ्यांनी भरून काढले आहे या प्रत्येक ठोकळयाच्या व छज्यांच्या कणी असलेल्या ग्रीव्हावर उत्फूल कमळाच्या फूलातून वर आलेले घुमटाकृती अमलक असून त्याच्यावर उलटे कमळाच्या फूलाच्या देठातून कळस वर आलेला आहे. सर्व कळस लाकडी आहेत. या ठोकळयांवर व कोनाडयांमध्ये मानवी, देवता, पशू, पक्षी, फुले व वेलींची शिल्पे कोरलेली आहेत. शिखराच्या वरती कणी असलेल्या ग्रीव्हावर उत्फूल कमळाच्या फूलातून वर आलेले घुमटाकृती अमलक असून त्याच्यावर उलटे कमळाच्या फूलाच्या देठातून कळस वर आलेला आहे.[७६]

**४.२.२.८ वाईचे महागणपती मंदिर(ढोल्या गणपती)**

महागणपती मंदिर हे गणपतराव भिकाजी रास्ते यांनी सन १७६२ मध्ये बांधले. या मंदिरासाठी १ लाख ६० हजार रूपये खर्च झाला. हे मंदिर कृष्णा नदीच्या काठावर असून पूर्वाभिमुख आहे. या मंदिराची रचना दोन भागात असून पहिला भाग हा सभामंडप व दुसरा भाग गर्भगृह आहे.

**४.२.२.८.१ गाभारा :**

गाभारा चौरसाकृती असून त्याचे माप १८ फूटाचे आहे. गर्भगृहात दोन फूट उंच चौथऱ्यावर एकसंध काळया पाषाणातील महागणपतीची बैठी मूर्ती असून त्या मूर्तीची उंची ६ फूट तर रूंदी ७ फूट आहे. या मूर्तीची सोंड डाव्या बाजूस आहे. मूर्तीच्या मागे १२ फूट उंचीची अर्धचंद्राकृती प्रभावळ आहे. गणपतीच्या हातात अनुक्रमे मोदक, परशू, पाश व दात या वस्तू असून पुढील बाजूस उंदराची प्रतिमा आहे. मूर्तीच्या डाव्या बाजूच्या भिंतीवर लक्ष्मी विष्णूचे पाय चुरत असल्याचे शिल्प आहे. विष्णूचा डौल व नागाचा फणा इत्यादी चित्र कलाकाराने काढले आहे.[५] गर्भगृहाचे छत हे चुना आणि फरशीचा समन्वय साधून त्रिकोणी आकाराचे बनविलेले आहे. सभागृह व गर्भगृह यांच्यामध्ये १५ फूट उंचीचे मुख्य महाद्वार आहे. याशिवाय गर्भगृहास दक्षिण व उत्तरेला ६फूट उंच व ३.५ फूट रूंद आकाराचे दोन दरवाजे आहेत.[७७]

**४.२.२.८.२ सभामंडप :**

गर्भगृहाच्या पुढे ५४ X २७ फूटाचा सभामंडप आहे. त्याला उत्तर व दक्षिण बाजूस अनुक्रमे पाच–पाच निमगोल प्रकारच्या कमानी आहेत. सभामंडपाचे छत समतल असून दगडी स्तंभावर आधारित आहे.[७८]

### ४.२.२.८.३ शिखर :

महागणपतीच्या पायथ्यापासून शिखराची उंची सुमारे ७२ फूट आहे. गर्भगृहाच्यावर ९ फूट उंचीचा चौथरा तयार केला असून त्या चौथऱ्यावर या मंदिराचे शिखर आहे. हे शिखर पक्क्या विटा व चुन्यात बांधलेले आहे. ते समोच्चतादर्शक रेषांनी वर गेलेले आहे. शिखराच्या पायथ्याला सोळा पाकळयाचे उत्फुल्ल कमळ आहे. चौथऱ्याच्या चारी कोपऱ्यावर मूळ शिखराच्या लहान प्रतिकृती आहेत. मूळ शिखर शंक्वाकृती असून त्यावर नलिकासारख्या पागोळ्याप्रमाणे वर निमुळत्या होत जाणाऱ्या जाड चुनेगच्चीतील रथ आहेत. या नलिकासारख्या चुनेगच्ची बांधकामावर एक भव्य उलटे कमळ आहे. त्याच्या देठातून पुन्हा उत्फुल्ल कमळ आहे. या कमळदलामध्ये खाचलेला आमलक आहे. आमलकावर कळस आहे.[७९]

### ४.२.२.८.४ बाहय बाजू :

या मंदिराची बाजू साधी असून त्याच्यावर कोणतेही कोरीव काम नाही. गाभाऱ्याच्या पाठीमागील बाजू ही त्रिकोणी असून त्याचे माप १४ फूट आहे.[८०]

### ४.२.२.९ वाई येथील काशीविश्वेश्वर मंदिर

हे मंदिर गणपतराव भिकाजी रास्ते यांनी इ.स.१७६१ साली दीड लाख रूपये खर्च करून बांधले आहे. त्यांनी या मंदिरास आपला मुलगा काशीनाथ याच्या स्मरणार्थ काशीविश्वेश्वर हे नाव दिले.

### ४.२.२.९.१ पीठ / चौथरा :

कृष्णा नदीच्या काठावर गणपती घाटाजवळ काशीविश्वेश्वराचे मंदिर आहे. हे मंदिर ३.७० फूट उंच प्रशस्त ३१३.६′ X ६०.१६′ मीटर अशा आयताकार दगडी प्राकारात चौथऱ्यावर बांधण्यात आले आहे.[८१]

### ४.२.२.९.२ विधान/विन्यास :

या मंदिराचा विन्यास(विधान) चतुरस्त्र असून यामध्ये नंदिमंडप, सभामंडप, अंतराळ व गर्भगृह अशी रचना आहे.

### ४.२.२.९.३ सभामंडप :

नंदीच्या पाठीमागे पूर्वेस प्रशस्त सभामंडप आहे. पुढे नगारखाना असून प्रकाशासाठी दोन जाळीदार गवाक्षे ठेवली आहेत. त्यातील दक्षिणेतील गवाक्षाच्या बाहेरील एक नागाचे शिल्प आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात पाच पायऱ्या उतरून गेल्यावर खोलगट जागी महादेवाची मोठी पिंड आहे. छत उघडलेल्या छत्रीप्रमाणे घुमटाकृती आकाराचे असून ते जसजसे वर जाईल तसे लहान

होता गेल्याचे दिसते. ते वर्तुळाकार छोटया पेटिकेवर आधारलेल्या अशा बांधणीचे आहे. गर्भगृहाचे द्वार अलंकृत असून द्वारशाखेत तीन कुंभ, पुष्पमाला, प्राणिशाखा(माकडे) मध्ये कुंभशाखा अशी रचना असून दोन्ही बाजूस प्रत्येकी एक द्वारपालाची मूर्ती आहे. गर्भगृहाच्या उंबरठयावर पुढे आलेली दोन कीर्तिमुखे असून गणेशपट्टीत मध्यभागी ललाटबिंबावर गणेशाची मूर्ती आहे. रंगशिलामंडपात अंधार असून डाव्या व उजव्या कोपऱ्यात अनुक्रमे गणपती व मारूतीची मूर्ती आहेत. सभागृहाच्या उंबरठयावरही कीर्तिमुख कोरले आहे.[८२]

सभागृहातील नंदीमडपात एकसंघ काळया गुळगुळीत घोटीव वालुकाश्मात घडविलेली कलाकुसरयुक्त झुल घातलेली नंदीची बांधेसूद भव्य मूर्ती आहे. हा नंदी उजव पाय दुमडून डाव्या पायाच्या खुरावर बसला आहे. त्याच्या अंगावर झूल, माळा, साखळया, घंटा व तोंडाची मोहरकी इत्यादी शिल्पाचे कोरीव काम केलेले आहे. ही मूर्ती साडेतीन फूट उंच व सात फूट लांब आहे. नंदीच्या पाठीमागे पूर्वेस प्रशस्त सभामंडप आहे. त्यातील आरसपानी स्तंभावर समतोल छत आहे मंडपाचा मध्यभागी दगडी आवरण घातलेले यज्ञकुंड आहे. या १६ स्तंभावर आधारलेल्या सभामंडपातील छताखाली हंडया, झुंबरे लावण्यासाठी छतास लोखंडी हलगे, कडया, आकडे इत्यादी लावले आहेत. मंडपापुढे पूर्वेस महाद्वारावर नगारखाना(नौबतखान) असून नगारखान्याच्या उत्तरद्क्षिण दरवाजांवर भित्तीचित्रे आहेत. ती अस्पष्ट झाली आहेत. सभागृहाच्या दोन्ही बाजूस उंच दीपमालास्तंभ आहेत. या स्तंभावर वरच्या बाजूस कमलाकृती असून त्यात कुंभाची रचना आहे. त्यांची बांधणी अष्टकोनाकृती असून त्यावर दिवे लावण्यासाठी हातखुंटया बसविलेल्या आहेत. तसेच वरच्या बाजूस टेंभा लावण्याची व्यवस्था केली आहे. काशीविश्वेश्वराचे शिखर हे वास्तुकलेतील एक रचनात्मक नमुनेदार शिल्पच असून ते विटा व चुना यात बांधले आहे. शिखराची रचना व मंदिराच्या पायाची आखणी अनेक कोनात केली आहे. सर्व कोनाच्या रेषा दगडी बांधकाम जिथे संपते. त्यापासून थेट कळसापर्यंत उभ्या गेलेल्या दिसतात. शिखराच्या छोटया प्रतिकृती(उरूशृंगे) खालून वरपर्यंत प्रमाणशी पद्धतीने बसविल्यामुळे त्यातून मोठे शिखर आकाराला आल्याचा भास होतो. गर्भगृहांचे मजल्यावर मजले असे तीन स्तर रचनात्मक शिखर व त्याची उपशिखरे यात मूर्तीसाठी कोनाडे ठेवले आहेत. उत्फुल्ल कमळातून आमलक व कळस अशी योजना आहे. रंगशिला सभामंडपावर दोन घुमटाकृती कुंभाची छत्रीसदृश्य दोन उपशिखरे असून त्यावर उत्फुल्ल उलटया कमळावर लहान कळस आहेत. त्याच्या सभोवताली उरूशृंगे आहेत. त्यातही मूर्तीसाठी देवळया आहेत. शिखर व

उपशिखरांच्या सर्व देवळयामध्ये ११० मूर्ती बसविण्यात आल्या आहेत. या प्रामुख्याने काही सरदार ऋषी–मुनी, दशावतार व देवदेवतांच्या आहेत.[८३]

काशीविश्वेश्वर मंदिरातील मूर्तीमध्ये पौराणिक कथानकाबरोबर शैव व वैष्णव पंथातील देव–देवतांच्या प्रतिमा आहेत. सरस्वती, गणपती, ब्रह्मा, शिव, विष्णू, जगदंबा, महिषासूरमर्दिनी व महाकाली इत्यादी देवतांच्या प्रतिमा आहेत. वरच्या स्तरावर विष्णूचे अवतार असून नरसिंह व कृष्णावताराच्या मूर्ती संख्येने अधिक आहेत. याशिवाय गणपती, कार्तिकेय, शेषशायी विष्णू तसेच, शिव–पार्वती, विष्णू–लक्ष्मी, कृष्ण–राधा अशी काही लक्षणीय दंपत्ती शिल्पे आहेत. ऋषीमुनींची तपश्चर्या पुत्रवल्लभा, नृत्यांगना, प्रणयी जोडपी, सरदार व सैनिक अशा प्रकारच्या काही स्वतंत्र मूर्तीही आहेत. या मंदिराच्या रंगशिला मंडपाच्यावर दक्षिणाभिमुख देवळीत राधा–कृष्णाची त्रिभंगातील सुंदर मुर्ती आहे. दोघांच्या चेहऱ्यावर स्मित हास्य आहे. या कोनाडयाच्या बाजूस आसलेल्या पूर्वाभिमुख कोनाडयात मोरावर आरूंद सरस्वतीची नाजुक मूर्ती आहे.

काशिविश्वेश्वर मंदिराच्या शिखराच्या सर्वात खालच्या स्तरात दक्षिणाभिमुख कोनाडयात उजवीकडून अनुक्रमे तीन मूर्ती विशेष लक्षणीय आहेत. पहिली मूर्ती एका वीणाधारी तरूणीची आहे. ही तरूणी उभी असून तिने दोन हातात वीणा अशा पद्धतीने धारण केला आहे की, जणू ती या तंतुवाद्यातून धुन काढीत आहे तिने अंगात घांगरा घातलेला असून कानात कर्णफुले, हातात बांगडया व गळयात एक साधा दागिना व पायात पैंजण घातले आहे. तिची वेशभूषा साधी असून तिने अंबाडा घातलेला आहे. तिच्या मुखावर स्मितहास्य असून वीणावादनाचे समाधान दिसते. दुसरी मूर्ती ही एका चौरंगावर वीणाधारी तरूणी बसलेली आहे. ही वीणा किन्नरीनामक वीणा आहे. उजव्या हातातील नखीने ती तारा छेडीत आहे असे स्पष्ट दिसते. या तरूणीने वीणेचा भोपळा मांडीवर ठेवला असून वीणेचा वरचा भाग तिच्या डाव्या खांद्यावर आहे. डाव्या हाताने ती स्वरांना नियंत्रित करीत आहे. तिचे डोळे मिटलेले दाखविले आहेत. यावरून ती वीणावादनात एकाग्र असल्याचे दिसते. तिच्या कानात कर्णफुले, हातात मोत्याची एकच बांगडी, गळयात माळ असल्याचे दिसते. तिच्या पायाच्या पुढे दोन पक्षी राघू बसलेले असून ते तिच्या सांगितिक कौशल्याने मंत्रमुग्ध झाले आहेत. तिसरी मूर्ती दोन तरूणी उभ्या असलेली एक समुहमूर्ती आहे. त्यांनी घागराप्रकारचे परिधान केले असून त्या बहुधा नृत्य करण्याच्या तयारीत आहेत. याशिवाय काशिविश्वेराच्या शिखराच्या दक्षिणाभिमुख एका कोनाडयात प्रणयात मशगूल असलेले सरदाराचे एक दांपत्य आहे. या दांपत्यातील दोघांच्या

प्रतिमा प्रमाणबद्ध व लयबद्ध आहेत. मूर्तिशिल्पातील रेषालालित्य सफाईदार आहे. एकूण काशीविश्वेराच्या चुनेगच्चीतील मूर्तीसंभारातील ही एक सुरेख व लक्षवेधक मूर्ती आहे.

काशिविश्वेर मंदिराच्या शिखरातील उत्तराभिमुख मूर्तीत काही सरदारांच्या शाही थाटात मांडी घालून बसलेल्या मर्ती आहेत. या मूर्तीत त्यांच्या कानातील भिकबाळी व डोळयावरील पगडी ही पेशवेकालीन वैशिष्टये आढळतात. या मूर्तीशिवाय एका लहान शिखराच्या उत्तर कोनाडयात राधा–कृष्ण यांची मूर्ती आहे. या मूर्तीच्या पाठीमागे उपशिखरावरील देवकोष्टकात एक हनुमानाची उड्डान करण्याच्या अविर्भावातील पश्चिमाभिमुख मूर्ती आहे. त्यात हनुमानाने डावा गुडघा टेकला असून उजव उड्डान करण्याच्या पाविञ्यात वर उचलला आहे. डाव्या खांद्यावरील लक्ष्मणास आधार दिला आहे. तसेच उजव्या खांद्यावर श्रीराम असून त्यास त्याने उजव्या हाताने घेतले आहे. हनुमानाच्या मूर्तीजवळ छोटया छत्रीत व शिखरात उत्तरेकडील कोनाडयात रामसीता यांची एक मूर्ती आहे.[८४]

## ४.२.३ तिसरा टप्पा

तिसरा टप्पा हा पहिल्या माधवराव पेशव्याच्या कारकिर्दीपासून ते पेशवेकाळाच्या अखेरीपर्यंतचा कालखंड होय. पानीपतच्या तिसऱ्या युद्धामध्ये मराठयांचा पराभव झाला. त्यामुळे मराठयांना मोठा धक्का बसला. या युद्धामध्ये मोठी हानी झाली. पेशवा माधवरावाच्या नेतृत्वाखाली मराठयांनी दहा वर्षाच्या आतच वैभवशाली कामगिरी केली. परंतु अंतर्गत विरोध, कौटुंबिक कलह आणि ब्रिटीशांकडे जाण्याच्या वृत्तीमुळे मराठयांच्या मराठयांच्या एकाधिकार–शाहीचा शेवट झाला.

पेशवा माधवरावाच्या मृत्यूनंतर नारायणराव पेशवा बनला. त्याचा चुलता राघोबादादाने नारायणरावास ठार मारले. अंतर्गत कलहानंतर नाना फडणीस व महादजी शिंदे या दोन सामर्थ्यशाली व्यक्तीमत्त्वांचा उदय झाला आणि ते मराठी राज्याचे व्यवस्थापक बनले. बाजीराव दुसरा याने पेशवाईची सूत्रे हाती घेईपर्यंत महादजी शिंदे यांनी उत्तरेचा तर नाना फडणीसांनी उर्वरित राज्याचा ताबा घेतला. तो सर्वात अकार्यक्षम पेशवा होता आणि मराठा राज्याचे दिवाळ काढून ब्रिटीशांच्या हातात सत्ता दिली. होळकर, शिंदे आणि इतर सरदार आपसात संघर्ष करीत होते. भारताच्या राजकीय पटलावर प्रबळ असणारी मराठा सत्ता लवकरच १५० वर्षानंतर लयास गेली. १८१८ मध्ये मराठी राज्याच्या अखेरीबरोबरच तिसरा टप्पा संपला.

वरील राजकीय परिस्थितीचा परिणाम अर्थिक, सांस्कृतिक व शैलीवर झाला. या राजकीय संघर्षाचा प्रतिकूल परिणाम मंदिर आश्रयदाते खंडित होण्यावर झाला. यानंतर मराठा मंदिर स्थापत्यामध्ये मोठया प्रमाणावरबदल झालेला दिसतो. पहिल्या टप्प्याच्या अखेरीस आश्रयदात्यामध्ये खंड पाडला त्यावेळेस दुसऱ्या टप्प्यात मंदिरांची पुनर्बांधणी झाली. त्यावेळी मंदिर स्थापत्यामध्ये बदल दिसतो. दुसऱ्या टप्प्याच्या अखेरीस दोन मराठा मंदिर प्रकार चांगल्या प्रकारे स्थिर झाले होते. मराठा उच्च राजकीय स्तरावर पोहोचल्याने त्यांना आर्थिक स्थैर्य आणि ते मजबूती लाभली. तिसऱ्या टप्प्यात आश्रयदात्याचे स्वरूप बदलले.

दुसऱ्या टप्प्याच्या अखेरीस मराठा सत्तेचे केंद्र सातारा येथून पुणे येथे हलले. पुणे हेच मराठा राजकारणाचे केंद्र बनल्यामुळे पुण्याचे महत्त्व वाढले. पेशव्यांनी पुणे येथे अनेक मंदिरे उभारली. त्यामुळे पुण्यातील स्थापत्य शैलीविचाराने वळण घेऊन ती शहराची चांगली बाब बनली. पेशव्यांनी उर्वरित ठिकाणी अगोदर अस्तित्वात असलेल्या स्थानिक मंदिर प्रकाराची पुण्यामध्ये स्थापना केली. दक्षिण महाराष्ट्रामध्ये आश्रयदाते माहुलीहून वाईजवळ आणि स्थानिक कुटुंबांनी मंदिर बांधलेल्या इतर ठिकाणी हालले. गणेश ही पेशव्यांची कुलदेवता होती आणि महाराष्ट्रीयन समाजामध्ये प्रसारीत झालेली होती. भगवान गणेश मंदिरांनी आश्रदात्यांना आकर्षित केले आणि आठ बाजूनी आठ देवतांच्या अवताराचे स्मरण करीत विकसित झाली. तिसऱ्या टप्प्यामध्ये नदीकाठी मंदिराबरोबरच शहरातील मंदिर स्थापत्य चालू राहीले. शहरामधील मंदिरांचा उदय हा महाराष्ट्राच्या राजकीय व सांस्कृतिक केद्रांबराबरच शहरांच्या विकासाचे वैशिष्टे आहे.

जरी पुणे आश्रयदात्यांच्या आघाडीवर असले तरी सातारा व वाई येथेही मंदिर बांधकाम सुरू होते. सातारा येथील मंदिर स्थापत्य पूर्वीचे स्थापत्यशैली व पुणे येथील कल्पनांचा सार यांचे मिश्रण होते. या शहरांमध्ये पुनरूत्थानी मंदिरे बांधली गेली नाहीत. सातारा, सांगली व वाई येथील स्थापत्यीय प्रकार सूक्ष्म होता परंतु पुण्यामध्ये विकसित नाविन्यपूर्ण परिवर्तनाकडून मिळालेला होता. तिसऱ्या टप्प्यातील मराठा मंदिरे दक्षिण भारतातील लोकप्रिय कल्पना मराठा मंदिराच्या स्थापत्यीय विस्तारामध्ये सुधारणा करून बांधली गेली. तिसऱ्या टप्प्यात दक्षिण महाराष्ट्रात यादव मंदिरावर आधारलेली अलंकृत पुनरूत्थानी मंदिर व इतर मंदिर परंपरा खंडीत झाली.

मराठा मंदिराची मूलभूत वैशिष्टये अखेरच्या काळामध्ये फारसा बदल झाला नाही. प्रादेशिक प्रभाव व विशिष्ट परिस्थितीमधील गरज यामुळे काही मोठे बदल करण्यात आले. लाकडी मंडपाच्या जोडणीखेरीज मंदिराचा सामान्य आराखडा बदलला नाही.

तिसऱ्या टप्प्यातील मंदिरे मराठा मंदिर परंपरेचा सार होती. जेव्हा मराठा सत्ता बहरामध्ये होती त्यावेळी ही मंदिरे बांधली गेली. मंदिरांमध्ये महत्त्वाकांक्षी सजावट व चैतन्य दिसते. ही मुख्य प्रवाहाच्या प्रकारापेक्षा नाविन्यपूर्ण वैशिष्टये आणि काही तरी अद्वितीय निर्माण करण्याची तीव्र इच्छा चालूच राहीली. विशेषत्त्वाकडे कल हा श्रीमंत मराठयांच्या जीवनशैलीचा पैलू होता. त्यामुळे प्रमाण, सजावट आणि स्थापत्यीय कारागीरी प्रभावित झाली. स्थापत्यामधील वाजवीपेक्षा जास्त वाढ मंदिरांसाठी उपलब्ध निधीमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाल्याने स्थापत्यामध्ये वाजवीपेक्षा जास्त वाढ झाली.

सातारा जिल्हयातील मंदिरामध्ये भिमाशंकर मंदिर बोपर्डी, माहुली येथील राधाशंकर मंदिर, ओझर्डे येथील सोनेश्वर मंदिर, धोम येथील सिद्धेश्वर मंदिर, झीनत उन्निसाची मशीद (बेगम मशीद), रहिमतपूर येथील मशीद इ.महत्त्वाच्या धार्मिक स्थळांची माहिती दिलेली आहे.

### ४.२.३.१ बोपर्डी येथील भिमाशंकर मंदिर

वाईपासून पूर्वेस ४ कि.मी. अंतरावर बोपर्डी हे छोटेसे गाव आहे. या गावामध्ये ओढयाच्या काठावर भिमाशंकर मंदिर रास्त्यांचे आश्रित श्री लक्ष्मण धोंडदेव फडणीस यांनी इ.स.१७९९ मध्ये बांधलेले आहे. हे मंदिर चारी बाजूने पायऱ्या असलेल्या तळयामध्ये बांधलेले आहे. हे त्या मंदिंराचे वैशिष्टय आहे. मंदिरामध्ये जाण्यासाठी पाच पायऱ्या आहेत. पावसाळयामध्ये या मंदिराच्या भोवती साधारणपणे २.६ फूट पाणी असते. पाणी बाहेर जाण्याचा मार्ग छोटा असल्याने पाणी जास्त काळ साठून राहते. मुखमंडप, गर्भगृह व स्वतंत्र नंदीमंडप अशी मंदिराची रचना आहे.

#### ४.२.३.१.१ मुखमंडप:

मुखमंडप हा खुला असून त्याची लांबी २० फूट व रूंदी ५ फूट आहे. या मंडपास ८ स्तंभ असून पैकी चार अर्धस्तंभ आहेत. या स्तंभांची रचना अनुक्रमे अंतर्गोल मोलीमे असलेला तळखडा, चौकोन, कणी, अंतर्गोल मोलीमे असलेला चौकोन व हस्त अशी आहे. हस्तांवर नागफणीची शिल्पे आहेत. तुळईमुळे छताचे तीन भाग झाले आहेत. छत अंतर्गोल मोलीमेवर सपाट असून मध्यभागी सहस्त्रदल आहे.[८५]

#### ४.२.३.१.२ गर्भगृह:

गर्भगृहाची चौकट चार शाखी असून तिची उंची ४.३ फूट व रूंदी २.३ फूट आहे. ललाटबिंबावर गणेशपट्टी व उंबऱ्यावर किर्तीमुख आहे. चौकटीच्या दोन्ही बाजूस २ फूट उंच व १.६ फूट रूंदीची पंचपर्णी कमान असलेली दोन देवकोष्टके आहेत. कमानीच्या दोन्ही बाजूस सहस्त्रदल कोरलेली आहेत. चौकटीच्या डाव्या बाजूस मारूती व उजव्या बाजूस गरूडाची लहान शिल्पे आहेत. गर्भगृहात तीन पायऱ्या असून ते ८.६ लांबी रूंदीचे आहे. गर्भगृहामध्ये डाव्या बाजूस १.९ फूट उंच व १.३ फूट रूंदीची जाळीदार खिडकी आहे. तिन्ही भिंतीमध्ये ३ फूट उंच व २ फूट रूंदीचे पंचपर्णी कमानीचे देवकोष्टके आहेत. गर्भगृहाच्या मध्यभागी ५ फूट लांब, ४ फूट रूंद व १ फूट उंचीचे शिवलिंग आहे. शिवलिंगाजवळ ६ इंच व्यासाची पोकळी आहे त्यामधून गर्भगृहातील पाणी बाहेर जाते तर पाण्याचा पातळी वाढल्यास बाहेरचे पाणी आतही येते. गर्भगृहाचे छत कुंभाचे मोलीमे असलेल्या चौरसाकृतीचे चारी कोपरे वक्राकृती मध्यभागी एकत्र आलेले आहेत. मध्यभागी फुल कोरलेले आहे.[८६]

**४.२.३.१.३ नंदी मंडप:**

मंदिराच्या बाहेर स्वतंत्र नंदीमंडप असून तो ५ फूट लांबी रूंदीचा व दोन फूट उंचीचा आहे. नंदीमंडपाच्या पीठाची रचना कुंभ मोलीमे, उपपीठ व कुंभ मोलीमे अशी आहे. नंदी मंडपाचे स्तंभ साधे आहेत. नंदीमंडपास चारी बाजूस पंचपर्णी कमानी असून छत सपाट आहे. पागोळ्यावर शिखराचा पाया साधा आहे. चारी कोपऱ्यावर चार लहान आमलकावर कळस आहे. मध्यभागी अष्टकोनाकृती कुंभ मोलीमेच्या पायावर आठ दिशांना आठ छत्र्या असून त्यावर पंचपर्णी कमानीमध्ये गणपतीची शिल्पे कोरलेली आहेत. दोन छत्रीमध्ये कुंभावर सुरूचे स्तंभ आहेत. छत्र्यांवर घुमटाकारावर कळस आहेत. याच्यावर कमलदलातून वर आलेल्या मोठया घुमटाकार आमलकावर कणीच्या ग्रीव्हावर कमलदलातून वर आलेल्या लहान घुमटाकार अमलकावर कणीच्या ग्रीव्हावर कळस आहे. या मंडपातील नंदी २.९ फूट लांब १.९ फूट रूंद व २.३ उंचीचा आहे.

नंदीमंडप व मंदिर यांच्यामध्ये १० फूट लांब, ५ फूट रूंद व ६.६ फूट खोलीचे छोटेसे कुंड आहे. नंदीमंडपामागे १६ फूट लांब, १० रूंदी व ७ फूट खोलीचे दुसरे कुंड आहे. मोठया कुंडामध्ये उतरण्यासाठी सात पायऱ्या आहेत.[८७]

**४.२.३.१.४ बाह्यबाजू:**

मंदिर हे पीठावर उभारलेले  असून पीठाची रचना कुंभ मोलीमे, उपपीठ व कुंभ मोलीमे अशी आहे. पीठावर कुंभाच्या मोलीमेवर भिंत उभारलेली आहे. भिंतीच्या वरील बाजूस कुंभाच्या मोलीमेवर पागोळे आहे.

मंदिराचा परिसर फरसबंद असून मंदिर खोलगट भागात असल्याने या भागामध्ये साठलेले पाणी जवळील ओढयामध्ये सोडलेले आहे.[८८]

### ४.२.३.१.५ शिखर:

पागोळयावर एक थर दगडी बांधकामाचा आहे. त्यावरील कणीच्या मोलीमेवर पंचपर्णी कमान असलेल्या रिकाम्या देवकोष्टकांची चौफेर रांगेवरील कणीच्या मोलीमेवर साधा थर असून गर्भगृहावरील चार व मुखमंडपाच्या दोन कोपऱ्यावर बहूपर्णी कमानीमध्ये मानवी शिल्पे असलेल्या छत्र्या आहेत. गर्भगृहावर मध्यभागी अष्टकोनाकृती कुंभ मोलीमेच्या पायावर दोन भूमीमध्ये अष्टकोनी शिखर उभारलेले आहे. पहिल्या भूमीवर आठ दिशांना बहूपर्णी कमानीमध्ये मानवी शिल्पे असलेले चौकोनी ठोकळे आहेत. दोन ठोकळयांमध्ये कुंभांची उतरंड आहे. ठोकळयावर चौकोनी छोटया छज्जाचा पाया आहे. दुसऱ्या भूमीवर छत्र्यामध्ये देवतांच्या प्रतिकृती आहेत. दोन छत्र्यांमध्ये कुंभावर सुरूचे खांब आहेत. मध्यभागी आहे. शिखराच्या सर्व ठोकळयांवर, कुंभांची उतरंडीवर, छत्र्यांवर, सुरूच्या खांबावर व मुख्य शिखरावर, गोल मणीची ग्रीव्हा असलेल्या कमलदलातून वर आलेल्या घुमटाकृती आमलकावर उलटया कमलकळीच्या देठातून वर कळस आलेला आहे.[८९]

### ४.२.३.१.६ दीपमाळा:

मंदिरासमोर दोन्ही बाजूस पायऱ्यांपासून थोडया अंतरावर तीन फूट उंची असलेल्या अष्टकोनी पायावर २० फूट उंचीच्या दीपमाळा आहेत. दोन्ही दीपमाळांवर गोल मणीची ग्रीव्हा असलेल्या कमलदलातून वर आलेल्या घुमटाकृती आमलकावर उलटया कमलकळीच्या देठातून वर कळस आलेला आहे.[९०]

## ४.२.३.२ माहुली येथील राधाशंकर मंदिर

क्षेत्र माहुलीमध्ये कृष्णा नदीच्या काठी राधाशंकर हे बापू गोविंद भट यांनी इ.स.१७८० मध्ये उभारले. त्यामध्ये भोरचे पंतसचिव यांच्या पत्नी राधाबाई ताईसाहेब यांनी आपाले पती शंकरराव रघुनाथराव पंतसचिव यांच्या स्मरणार्थ मिती फाल्गून शुद्ध ५ शके १६८४, इ.स. १७६३ (इ.स.१८२५) मध्ये भर घातली . हे मंदिर छोटे असून या मंदिराची मुखमंडप व गर्भगृह

अशी रचना आहे. या मंदिराच्या शिखराचा जिर्णोद्धार झालेला असला तरी शिखराचे मूळ रचना तशीच ठेवलेली आहे.

### ४.२.३.२.१ मुखमंडप :

मुखमंडपाची लांबी १३ फूट असून त्याची रूंदी ७.६ फूट आहे. मंदिरास सायप्रस प्रकारचे स्तंभ असून यापैकी दोन अर्धस्तंभ व दोन पूर्ण स्तंभ आहेत. या स्तंभावर तीन कमानी विसावलेल्या असून पैकी मधली मान पंचपर्णी तर बाजूच्या दोन कमानी बहुपर्णी आहेत. मधल्या कमानीमध्ये २ फूट लांबीचा १.६ रूंदीचा व २ फूट उंचीचा नंदी आहे. नंदीच्या गळयामध्ये घंटीच्या व घुंगरूच्या माळा व म्हुर्की आहे. मुखमंडपामध्ये भिंतीच्या वरील बाजूस अंतर्गोल मोलीमे असून छत सपाट आहे. चौकटीच्या दोन्ही बाजूस दोन देवळया आहेत. त्यापैकी एका देवळीमध्ये गणपतीची तर दुसऱ्या देवळीमध्ये देवतेच्या मुर्त्या आहेत.[९१]

### ४.२.३.२.२ गर्भगृह:

गर्भगृहाची चौकट ४.१० फूट उंच व २.३ फूट रूंद आहे. चौकटीस वरील बाजूस गणेश पट्टी तर उंबऱ्यावर किर्तीमुख आहे. गणेश पट्टीच्या वरील बाजूस कणीच्या मोलीमे वर पानांचे नक्षीकाम केलेले आहे. त्याच्यावर राधाबाई ताईसाहेब यांच्या नावाचा शिलालेख आहे. चौकटीच्या दोन्ही बाजूस सहस्त्रदल कोरलेली आहेत. गर्भगृहामध्ये तीन पायऱ्या उतरून जावे लागते. गर्भगृह ८.९ फूट लांबी रूंदीचे आहे. समोरील भिंतीमध्ये २ फूट लांबी रूंदीचे देवकोष्टक असून त्यामध्ये पार्वतीची मुर्ती आहे. गर्भगृहामध्ये ३ फूट लांब, २ फूट रूंद व २.३ फूट उंचीचे शिवलिंग आहे. गर्भगृहाच्या भिंती अर्धगोल मोलीमेच्या वरील बाजूस चारी बाजू अंडाकृती वक्राकारामध्ये मध्यभागी एकत्र आलेल्या आहेत. मध्यभागी सहस्त्रदल कोरलेले आहे.[९२]

### ४.२.३.२.३ बाह्यबाजू:

हे मंदिर पीठावर उभारलेले असून पीठाची रचना साधी आहे. मंदिराची बाह्यबाजूस कोणतेही शिल्प नाही. मंदिराच्या भिंतीच्या वरील बाजूस अंतर्गोल मोलीमेवर पागोळे स्थिरावलेले आहे.[९३]

### ४.२.३.२.४ शिखर :

पागोळयावर एक थर दगडाचा असून त्यावर कणी प्रकाराचे मोलीमेवर शिखराचा पाया तयार केला आहे. मुखमंडपाच्या दोन्ही बाजूस छत्रीच्या प्रतिकृती आहेत. त्यावर कोणतेही शिल्पे नाहीत. मुखमंडपावरील शिखराचे स्वरूप कमळदलातून वर आलेले अमलक आहे. गर्भगृहावरील शिखर दोन टप्प्यात बांधलेले आहे. मुखमंडपाप्रमाणे शिखराच्या चारी कोपऱ्याव

छत्रीच्या प्रतिकृती आहेत. पहिल्या टप्प्यामध्ये दहा ठोकळयामध्ये देवळया कोरलेल्या आहेत. दुसऱ्या टप्प्यामध्ये दहा छत्रीच्या प्रतिकृती आहेत. शिखरावर कोणतेही शिल्प नाही. त्याच्यावर कणीची ग्रीव्हावर उत्फल कमलदलातून वर आलेल्या घुमटाकार अमलकावर उलटे कमळकळी आहे.

हे मंदिर भिंतींनी संरक्षित केलेले आहे. दोन्ही बाजूस बुरूज असून मंदिरास सहा पायऱ्यांचा घाट आहे. मंदिरासमोर दोन्ही बाजूस ३.६ फूट उंचीच्या अष्टकोनी पीठावर १२ फूट उंचीच्या दोन दिपमाळा आहेत. मंदिराजवळच २ .६ फूट उंचीच्या गोल खांबावर मानवी चेहरा कोरलेला आहे. कदाचित तो शंकरराव रघूनाथराव पंतसचिव यांचा असावा. [९४]

## ४.२.३.३ ओझर्डे येथील सोनेश्वर मंदिर

वाई तालुक्यातील ओझर्डे हे गाव नॅशनल हायवे क्र.४ पासून पश्चिमेस ३ कि.मी. तर वाई शहरापासून अग्नेयेस ८ कि.मी. अंतरावर आहे. ओझर्डे गावापासून २ कि.मी. पश्चिमेस कृष्णा नदीच्या पात्रामध्ये पूर्वाभिमुख असलेले सोनेश्वर मंदिर उभारले आहे. मुखमंडप व गर्भगृहा असे मंदिराचे विधान आहे.

### ४.२.३.३.१ गाभारा ः

गाभाऱ्याची चौकट ४' X २'आकाराची आहे. या चौकटीच्या ललाटबिंबावर गणेशपट्टी व उंबऱ्यावर किर्तीमुख आहे. चौकटीच्या दोन्ही बाजूस दोन देवकोष्टके आहेत. गाभाऱ्यामध्ये १ ु ०.६ फूटाच्या पाच पायऱ्या आहेत. मंदिराचा गाभारा ९ X ९ फूट लांबीचा आहे. गाभाऱ्यात ४ फूट लांब ३ फूट रूंद व १ फूट उंचीचे शिवलिंग आहे. गाभाऱ्यात २ X १.५ फूटाची तीन देवकोष्टके आहेत. समोरच्या भिंतीमधील देवकोष्ठकामध्ये पार्वती देवीची मूर्ती आहे. शिवलिंगाच्या स्तरावर डाव्या बाजूच्या भिंतीला ९'' X ९'' मोकळी जागा ठेवलेली आहे. नदीला पूर आला असता नदीचे पाणी यामधून गाभाऱ्यात येते. गाभाऱ्याचे छत चौरसाकृती असून ते प्रमाणात सात टप्प्यात कमी होत गेले आहे. छताच्या मध्यभागी सहस्त्रदल आहे. [९५]

### ४.२.३.३.२ मुखमंडप –

मुखमंडपाचा आकार हा ११.९ X ६.५ फूट आहे. या मंदिरातील मुखमंडपाचे खांब १'.२'' X १'.२''आहेत. या खांबाचा आकार चौरसाककृती आहे. मुखमंडपास तीन टोकदार पंचपर्णी कमानी आहेत. मुखमंडपात २ X २ फूट आकाराचे कासव आहे. मुखमंडपास चार खांब

असून त्यातील दोन अर्धस्तंभ आहेत. हे खांब आकाराने लंबाकृती असून ५ फूट उंचीचे आहेत. मुखमंडपाचे छत आयताकृती असून ते सात टप्प्यामध्ये प्रमाणात कमी होत गेलेले आहे. छत वरील बाजूस सपाट आहे.[९६]

**४.२.३.३.३ नंदी–**

या मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या बाहेर नंदी असून त्याचा आकार २' X १'.९'' X १'.५''आहे. नंदी बसलेल्या स्थितीत असून त्याठिकाणी असलेल जोते ४ फूट चौरसाकृती असून त्याची उंची ३.९ फूट आहे.[९७]

**४.२.३.३.४ बाहय बाजू**

**अ) पीठ किंवा जोते–**

या मंदिराच्या पीठाची उंची ३.९ फूट आहे. पीठाची रचना खूर, कुंभ, उपपीठ व उलटया कुंभाची आहे. मंदिराच्या भिंतीपासून जोते १ फूट बाहेर आहे.[९८]

**ब) बाहय भिंत :–**

मंदिराच्या दर्शनी भिंतीवर दोन्ही बाजूस दगडात दोन फुलांची शिल्पे कोरलेली असून त्यातील डाव्या बाजूचे शिल्प हे कमलदलाचे आहे. तर उजव्या बाजूचे शिल्प हे सहस्त्रदलाचे आहे. या प्रवेशद्वारावरील कमानीच्या वरील बाजूस लहान रोपाचे शिल्प कोरलेले आहे. मंदिराची बाहय भिंत साधी आहे.[९९]

**क) शिखर :**

गाभाऱ्यावर दोन भूमीमध्ये शिखर आहे. शिखराच्या चारही बाजूस छत्र्या आहेत. यावर रिकामी देवकोष्टके आहेत. शिखराचा पाया अष्टकोनी खूर असून त्याच्यावर कणी व नंतर कुंभाचे एकस्याही आहेत. त्याच्यावर अष्ट दिशेला चौकोनी ठोकळयावर पंचपर्णी कमानी आहेत. त्याच्यामध्ये सुरूचे खांब आहेत. दुसऱ्या भूमीवर अष्टकोनी कणीच्या पायावर आठ दिशेला छत्र्या आहेत. छत्र्यांना पंचपर्णी कमान असलेले रिकामे देवकोष्टके आहेत. दोन छत्र्यामध्ये सुरूचे खांब आहेत. ठोकळे, छत्री व सुरूच्या खांबावर कमळाच्या पाकळयातून वर येणारा कमलदलामध्ये घुमटाकार खाचलेले आमलक असून त्याच्यावर उलटे कमळाच्या देठातून मधोमध वर कळस आलेला आहे. कणीच्या ग्रीव्हेवर कमळाच्या पाकळयातून वर येणारा कमलदलामध्ये घुमटाकार

खाचलेले आमलक असून त्याच्यावर उलटे कमळाच्या देठातून मधोमध वर कळस आलेला आहे.[१००]

### ४.२.३.४ धोम येथील सिद्धेश्वर मंदिर

वाईपासून ८ कि.मी. अंतरावर धोम गाव आहे. येथे धोम धरणही आहे. या धरणाच्या पायथ्याशी कृष्णा नदीच्या तीरावर पूर्वाभिमुखी सिद्धेश्वर मंदिर आहे. हे मंदिर दुसरा बाजीराव पेशव्याने इ.स. १७८० मध्ये बांधले. छ.शाहू यांनी लहान मंदिर बांधले. पुण्याचे सावकार महादेव शिवराम व नारायण वैद्य यांनी यामध्ये थोडी भर घातली. हा मंदिर समुह तटबंदीने संरक्षित केलेला आहे. तटबंदीला पुढील बाजूस बुरूज आहे. तटबंदीस भव्य दरवाजा असून या दरवाजावर नगारखाना आहे. तटबंदीच्या दरवाजाच्या उंबऱ्यावरील किर्तीमुख वैशिष्टयपूर्ण आहे. या मंदिराचे स्वरूप पंचायतन प्रकारचे आहे. मुख्य मंदिर शिवाचे असून त्यास सिद्धेश्वर म्हणून ओळखले जाते. सभोवतालची इतर मंदिरे फारच लहान आहेत. सिद्धेश्वर मंदिराची रचना नंदीमंडप, मुखमंडप व गर्भगृह अशी आहे.

#### ४.२.३.४.१ मुखमंडप :

मुखमंडप हा १७ फूट लांब व ७ फूट रूंद आहे. मंडपास दोन पूर्ण व दोन अर्धस्तंभ असून ते कोरीव व सायप्रस पद्धतीचे मंडपास तीन टोकदार गोल मोलीमे असलेली बहुपर्णी केळफूल असलेल्या कमानी आहेत. कमानीच्या बाजूने पानांची नक्षीकाम कोरलेले आहेत. मंडपामध्ये दोन्ही बाजूच्या भिंतीमध्ये केळफूल असलेल्या गोल मोलीमे असलेल्या त्रिपर्णी कमानी कोरलेल्या आहेत. कमानीभोवती पानांचे कोरीव काम केलेले आहे. या भिंतींमध्ये व प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस पंचपर्णी कमान असलेल्या ३ फूट उंच व २ फूट रूंदीच्या देवकोष्टके आहेत. कमानीच्या वरती व छताच्या खालील बाजूस पानाफुलांचे कोरीव काम केलेला चौफेर पट्टा आहे. यावर अंतरगोल मोलीमेवर सपाट छत आहे. चौकोनी छताच्या चारी बाजूस फुलांची नक्षी कोरलेला पट्टी आहे. या छताच्या चारी कोपऱ्यामध्ये फुलांची नक्षी कोरलेली आहे. छताच्या मध्यभागी सहस्त्रदल कोरलेले आहे.[१०१]

#### ४.२.३.४.२ गर्भगृह :

मंदिराची चौकट तीन शाखी असून ६ फूट उंच व तीन फूट रूंद आहे. चौकटीच्या उंबऱ्याच्या मंडरकावर किर्तीमुख व ललाटावर गणेश पट्टी आहे. चौकटीभोवती कोरीवकाम केलेले आहे. गर्भगृहामध्ये उतरताना एक महिरप आहे. गर्भगृहामध्ये पाच पायऱ्या उतरून जावे लागते. गर्भगृह ९ फूट लांबी रूंदीचे असून त्यामध्ये चार फूट लांब, ३ फूट रूंद व २.६ फूट

उंचीचे शिवलिंग आहे. गृर्भगृहामध्ये प्रकाश येण्यासाठी झरोखे आहेत. गर्भगृहाचे छत अष्टकोनावर घुमटाकार असून त्यावर आतून लांब पाकळयांचे कमळ कोरलेले आहे. मध्यभागी सहस्त्रदल कोरलेले आहे. गर्भगृहाच्या चारी भिंतीवर बहूपर्णी कमान असलेली चौकट कोरलेली असून त्यामध्ये ३ फूट उंचीची व २ फूट रूंदीचे महिरप असलेले देवकोष्टके आहेत. समोरील देवकोष्टकामध्ये पार्वतीची मूर्ती आहे.[१०२]

**४.२.३.४.३ नंदीमंडप :**

मंदिराच्या बाहेर १५ फूट व्यासाच्या दगडामध्ये दगडामध्ये तयार केलेल्या कमळाकृती कुंडामध्ये १० फूट व्यासाच्या कासवाच्या पाठीवर ६ फूट लांबीचा पंचकोनाकृती आठ स्तंभ असलेला अष्टकोनी नंदी मंडप आहे. स्तंभाच्या पायाशी कोरीवकाम केलेले असून सर्व स्तंभ गोल मोलीमे असलेल्या व केळफूल असलेल्या टोकदार पंचपर्णी कमानींनी जोडलेले आहेत. नंदीमंडपाचा छत घुमटाकार आहे. यामध्ये ४ फूट लांबी, २.६ फूट रूंदी व ३.६ फूट उंचीचा नंदी आहे. नंदीच्या गळयामध्ये मणी असलेल्या माळेमध्ये मोठी घंटा आहे. दुसऱ्या माळेमध्ये लहान घंटा व घूंगरू आहेत. एक साखळी कोरलेली आहे. त्यावर दोरीमध्ये घंटा कोरली आहे. याशिवाय लहान घुंगरू असलेली दोरी कोरलेली आहे. तोंडाला म्होरकी व येसन कोरलेली आहे. नंदीवर झुल कोरलेली आहे. नंदीमंडप अत्यंत आकर्षक आहे.[१०३]

**४.२.३.४.४ बाह्यबाजू :**

**अ) पीठः**

मंदिराचे पीठ ३ फूट उंचीचे असून पीठाच्या पायऱ्याखाली धौम्य ऋषीची समाधी आहे.[१०४]

**ब) बाह्यभिंतीः**

मंदिराची बाह्यबाजू साधी आहे मंदिराच्या मागील बाजूस पाच फणी असलेल्या नागाचे शिल्प आहे. मंदिराच्या समोरील बाजूस दोन्ही बाजूच्या भिंतीच्या दर्शनी बाजूस पानाफूलांची कोरीव नक्षीकाम केलेले आहे. पागोळयाच्या खालील बाजूस व भिंतीच्या वरील बाजूस मंदिराच्या सभोवती एक लहान कमळकळीचा पट्टा कोरलेला आहे. या पट्टयास लागून वरील बाजूस मोलीमे आहेत व त्यावर पागोळे आहे.[१०५]

**क) शिखर :**

नंदीमंडप व मंदिरावरील शिखर देशी प्रकारचे आहे. नंदीमंडपावरील शिखर अष्टकोनी पागोळयाच्या वरती अष्टकोनी पायावर उभारले आहे. हे शिखर एका मजल्याचे आहे. या

मजल्यावर आठ दिशेला आठ छत्रीच्या प्रतिकृती आहेत. दोन छत्रींच्यामध्ये एकावर एक कुंभ बनविले आहेत. छत्रींमध्ये टोकदार पंचपर्णी कमानी असून त्यामध्ये जाळीचे कोरीव काम केले आहे. छत्रीच्या प्रतिकृतींवर एकावर एक आमलक असून त्यावर कळस आहे.

मुखमंडपाचे छप्पर सपाट आहे परंतु मुखमंडपाच्या चारही कोपाऱ्यावर एकावर एक असे दोन अमलकांची योजना केलेली आहे. गर्भगृहावरील शिखर हे सोळा कोनी कमलदलच्या अंतर्गोल मोलीमेवर डमरूच्या लहान प्रतिकृतींच्या मोलीमेवर उलट कमलदलाकृती अंतर्गोल मोलीमेच्या पायावर तीन मजल्यामध्ये उभारले आहे. प्रत्येक मजल्यावर छत्रीच्या प्रतिकृती असून दोन छत्रींच्या प्रतिकृतीमध्ये कणीची ग्रीव्हा असलेल्या छोटे अमलक आहेत. प्रत्येक मजल्याचा पाया सोळा कोनी अंतर्गोल मोलीमेवर कणी मोलीमे त्याच्यावर उलट अंतर्गोल मोलीमेचा आहे. प्रत्येक मजला प्रमाणामध्ये कमी होत गेलेला आहे. छत्रीच्या प्रतीकृतीना पंचपर्णी कमानी असून त्यामध्ये जाळीदार कोरीवकाम केलेले आहे. छत्रींवर गोल ग्रीव्हा असलेल्या कुंभाकृती अमलकावर छोटे अलंकृत अमलक असून त्यावर उत्फल कमलदलातून अलंकृत अमलकावर उलटया कमलदलाच्या देठातून कळस वर आलेले आहेत. तीन मजल्यानंतर गोल मोलीमच्या ग्रीव्हावर कुंभाच्या आकाराचा अलंकृत केलेला मोठा अमलक आहे. त्याच्यावर उत्फल कमलदलातून अलंकृत अमलकावर उलटया कमलदलाच्या देठातून कळस वर आलेला आहे.[१०६]

### ड) बांधकाम साहित्य

मंदिराचे पागोळयापर्यंतचे बांधकाम दगड चुन्यामध्ये केले आहे तर शिखराचे बांधकाम वीट चुन्यामध्ये केले आहे शिखरास चुन्याचा गिलावा केलेला आहे. उपशिखरांचे कळस लाकडी आहेत. मंदाराच्या पागोळयाच्या खाली ठराविक अंतरावर गोल लोखंडी कडयांचा वापर केलेला आहे. मंदिरची तटबंदी दगड वीट चुन्यामध्ये बांधलेली आहे.

## ४.२.३.५ सातारा जिल्हयातील मुस्लिम स्थापत्य

### ४.२.३.५.१ झीनत उन्निसाची मशीद (बेगम मशीद)

औरंगजेबाची कन्या झीनत उन्नीसा ही येसूबाई व शाहूराजे बादशाही कैदेत होते, त्या वेळी त्यांच्याबरोबर ती पण होती. ती सन १७२१ मध्ये वारली. हे समजल्यावर शाहू महाराजांनी तिच्या स्मरणार्थ एक मशीद बांधली. तिला बेगम मशीद असे म्हणतात. या मशिदीच्या जुन्या जोत्यावर नवीन मशीद उभी केली आहे. या मशीदीला ‘खतिबा मशीद’ असे म्हणतात. मोहरममध्ये येथून डोला काढण्याची पद्धत शाहू राजांनी सुरू केली. अजूनही

सातारचा राजघराणे ही प्रथा चालवीत आहे. राजघराण्यात ताबूत मिरवणूकीत अग्रभागी असतो. ही मशीद अदालतवाडयापासून जवळ आहे.[१०७]

### ४.२.३.५.२ रहिमतपूर येथील मशीद

रहिमतपूर ता. कोरेगाव.,१८°,३५′ उ. ७४°,१७′ पूर्व. सातारा तासगाव मार्गावर साताऱ्याच्या आग्नेयेस २७ कि.मी.व कोरेगाव दक्षिणेस ११ कि.मी.वर आहे. आदिलशाही राज्यात वाई परगण्यातील हे महत्त्वाचे ठाणे होते. सन १८८५ मध्ये हे माण उपविभागातील व्यापारी केंद्र होते. येथून कोकणात मोठया प्रमाणात व्यापार चालत असे. येथे एक मशीद व दर्गा आहे. मशीद व दर्गा एकाच मोठया दगडी चौथऱ्यावर असू दोहामध्ये अंदाजे ८ X ८ मीटर आकाराचा हौद आहे. त्यात  दगडी कारंजा आहे. दर्गा व मशीदीवर चारी कोपऱ्यावर मनोरे आहेत. मशीद १२.१९ मीटर लांब व ७ मीटर रूंद असून तू पूर्वाभिमुख आहे. मशिदीच्या आतील छताचा भाग सहा भागात विभागात पश्चिम आहेत. कमानीवर व भिंतीवर शिल्पकाम आहे. कमानींना खांबाचा आधार दिलेला असून ते चौकनाकृती आहेत. छत सपाट असून वरील भिंतीस पागोळया आहेत. पूर्व बाजूस ४.१८ X ४.१८ मीटरचा ९० से.मी. उंचीचा दगडी चौथरा असून त्याच्या सभोवती मोकळी जागा आहे. चौथऱ्याच्या मध्यभागी कारंजा आहे. त्याच्या पूर्वेला घुमट असलेली २.७८ X २.७८ मीटर आकाराची एक कबर आहे. यास दर्गा म्हणतात असून ती जमिनीपासून १२.१९ मीटर उंच आहे. याच्या चारही बाजूस  १.५ X ०.६ मी.आकाराचे दरवाजे आहेत. ही कबर रणदुल्लाखानाच्या स्मृतिप्रित्यर्थ बांधलेली आहे. तो विजापूचा सातवा बादशहा महमद १६२६–१६५६ च्या कारकिर्दीत रहिमतपूरचा ठाणेदार होता. येथे तो १६५० मध्ये त्याचे निधन झाले मशिदीच्या चारी भिंतीवर चार फारसी भाषेतील शिलालेख आहेत.त्याचे १८८५ च्या सातारा गॅझेटीअर मध्ये इंग्रजीत भाषांतर दिले आहे. मशिदीच्या आग्नेयेस ९१.४४ मीटरवर रस्त्याच्या दक्षिणेला १५.२४ मीटर उंचीचा मनोरा असून तो पश्चिमेला जमिनीकडे झुकलेला आहे. त्यावर हत्तीच्या मोटेची व्यवस्था होती व त्याद्वारा मशिदीतील कारंज्यांना पाणी पुरविले जाते असे. सध्या कारंजे बंद आहेत.

या दर्ग्यापासून पश्चिमेस एक कि.मी. वर रणदुल्लाखानाची पत्नी व मुलगी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ बांधलेला दर्गा आहे. रहिमतपूरच्या नैऋत्येस पाच कि.मी. वर कृष्णेच्या काठी ब्रम्हपुरी येथे जुने विठोबा मंदिर असून येथे मार्गशीष महिन्यात मोठी यात्रा भरत असे. सध्या यात्रेचे स्वरूप लहान झालेले आहे. येथे कृष्णा नदीवर सुंदर घाट आहे.

रहिमतपूर बरीच वर्षे विजापूर सरकारच्या अधिपत्याखाली होते. शिवाजी महाराजांना पकडण्यासाठी सप्टेंबर १६५९ अफझलखान रहिमतपूरमार्गे वाईला जाताना त्याचा मुक्काम येथे होता. सन १६६२ मध्ये शिवाजी महाराजांच्या बंदोबस्तासाठी शायिस्ताखानाने येथे फौजची एक तुकडी ठेवली होती. दिनांक १० जानेवारी १६९९ मध्ये धनाजी जाधव, हैबतराव निंबाळकर व राणाजी घोरपडे यांची व औरंगजेबाचा सरदार झुल्फिकारखान यांची रहिमतपूरजवळ मोठी लढाई होवून त्यात झुल्फिकारखानांचा पराभव झाला होता. सन. १७११ मध्ये हैबतराव निंबाळकराने सेनापती चंद्रसेन जाधवाचा देऊर येथे पराभव केला त्यावेळी तो पळून रहिमतपूरला आला होता. सन.१७७७ मध्ये महादजी शिंदे कोल्हापूर वर स्वारी करण्यासाठी जाताना त्याचा बरेच दिवस येथे मुक्काम होता. दुसऱ्या बाजीरावाचा पाठलाग करत इंग्रज सेनापती जनरल स्मिथ ६ फेब्रुवारी १८१८ ला येथे आला होता. शाहू महाराजांची रखेली विरूबाई रहिमतपूरमधील कासुर्डे घराण्यातील होती. पेशव्यांच्या कारकीर्दीत त्यांची एक टाकसळ रहिमतपूरला होती. येथे मोहरा, रूपये, चांदीची नाणी व पैसे पाडीत.[१०८]

### ४.२.३.६ घाट व धर्मशाला

घाट हा उंच व रूंद पायऱ्या असणारा, नदी व मंदिर यांना जोडणारा दुवा असतो. नदीच्या पवित्र पाण्यामध्ये स्नान करणे व धार्मिक विधी करणे हे घाट बांधण्याचे प्रमुख हेतू आहेत.दैनंदिन अंघोळ करणे व पिण्यासाठी पाणी भरणे यासाठीही घाटांचा उपयोग होतो. मराठा काळामध्ये अनेक सरकारी अधिकारी व मराठा सरदारांनी आपले पुण्यकर्म म्हणून घाट बांधले. इतर कोणत्याही बाबी पेक्षा हे कमी खर्चाचे व बांधकामास सोपे होते. नदीच्या पात्रामध्ये घाट बांधल्याने घाटांना धार्मिक दृष्टीने महत्त्व मिळाले. महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी घाट बांधले गेले. सातारा जिल्ह्यामध्ये धोम, मेणवली, वाई, वाकेश्वर, आसले, पाचवड, विरमाडे, मर्ढे, वडूथ, बोरखळ, माहुली, कोडोली, अंगापूर, कराड या ठिकाणी घाट आहेत. हे सर्व घाट कृष्णा नदीवर आहेत. नेर येथे काशिविश्वेश्वर मंदिराच्या पाठीमागे ओढयावर घाट आहे. सामन्यपणे लोकांचा आपल्या गावी घाट बांधण्याचा कल असे. घाटाच्या पायऱ्यांची उंची एक फूट व रूंदी दोन फूट असे. घाटांना बुरूज बांधत असत. तीर्थस्थानी जास्त लोक येत असतील तर घाट बांधणे सोईचे असे.

#### ४.२.३.६.१ बांधकाम:

नदीमध्ये बांधलेल्या घाटाला पाण्याचा शक्तीला सामोरे जावे लागते.पावसाळयात पुराच्या पाण्याच्या ताकदीने तो कामजोर होतो. त्यामुळे घाट मजबुत व टिकाऊ पायावर

बांधण्याची आवश्यकता होती. यासाठी कठीण व मजबूत साहित्याचा वापर केला जात असे. यासाठी दगडाशिवाय दुसरा पार्याय नव्हता. नेहमी खोल पाया घेताला जात असे. बांधकामात चुन्याचा वापर केला जाते असे. पुराच्या पाण्यासाठी दगडांमध्ये लोखंडी पट्ट यांचा वापर केला जात असे. साधारणपणे घाटाच्या पायऱ्या रूंद असत. जर पायरीची जाडी एक फूट असेल तर पायऱ्या चढण्यास सहज शक्य होण्यासाठी पत्येक सहा पायऱ्यानंतर चार फूटाचे सपाट भाग असतो.

बहुतांश घाटावर ठराविक अंतरावर पुढे आलेले दगड बसविलेले आहेत. प्रवाहाचा वेग थांबविण्यासाठी त्यांचा उपायोग होतो. घाटाच्या दोन्ही टोकाला बांधलेले बुरूज बांधणी हे मराठा घाटाचे  वैशिष्टय होते. घाटापेक्षा बुरूज पुढे बांधले गेल्याने पुराच्या पाण्याचा वेग कमी झाला. घाट बांधणाऱ्या आश्रयदात्याची अर्थिक परिस्थिती, नदीचा प्रवाह व तीर्थस्थानाचे महत्त्व यावर घाटाचा आकार ठरलेला असे. नदीचा प्रवाह सरळ जात असेल तर मोठा घाट बांधता येत असे.

तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी यात्रेकरूंच्या राहण्याची सोय करण्यासाठी बांधलेल्या जागांना धर्मशाळा म्हणतात. विविध ठिकाणाहून धार्मिक विधीसाठी आलेले यात्रेकरू येथे रहात असत. याचे बांधकाम अत्यंत साधे असे. दगड, विटा व चुन्याचा बांधकामासाठी वापर केला जात असे. मंदिरांच्या भोवती याचे बांधकाम केलेले असे. अशा प्रकारच्या धर्मशाळा, माहूली येथील काशिविश्वेश्वर, रामेश्वर, पाल येथील खंडोबा, अंगापूर येथील महादेव मंदिर, गणेश मंदिर व नेर येथील काशिविश्वेश्वर मंदिर येथे आहेत.[१०९]

### ४.२.३.६.२ सातारा जिल्ह्यामधील महत्त्वाचे घाट

**अ) कराड:**

करा़ड येथील कृष्णा कोयना नदीवरील घाट रयतेच्या वर्गणीतून व पंत प्रतिनिधींनी बांधलेला आहे.

**ब) वाई:**

वाई येथे अनेक घाट आहेत. परंतु यापैकी १७८९ मध्ये २०० फूट लांबीचा रास्ते घाट, ७६ फूट लांबी असलेला जोशी घाट व ८० फूट लांबीचा पेशवे घाट प्रमुख आहेत. याशिवाय इतरही लहान घाट आहेत.

**क)माहुली:**

माहुली येथे प्रतिनिधी, पेशवा बाजीराव दुसरा, अनगळ यांनी घाट बांधले. अंगापूर येथील देशमुख यांनी १७३८ मध्ये एक घाट बांधलेला आहे.

याशिवाय सातारा जिल्ह्यामध्ये धोम, मेणवली, वाकेश्वर, आसले, पाचवड, विरमाडे, मर्ढे, वडूथ, बोरखळ, माहुली, कोडोली, अंगापूर, या ठिकाणी घाट आहेत. हे सर्व घाट कृष्णा नदीवर आहेत. नेर येथे काशिविश्वेश्वर मंदिराच्या पाठीमागे ओढयावर लहान पण आकर्षक घाट बांधलेला आहे.[११०]

**४.२.३.६.३ छत्र्या व समाध्या**

एखादी व्यक्तीचे निधन झाल्यानंतर त्या व्यक्तीच्या आठवणीसाठी मृत्यूच्या ठिकाणी बांधलेल्या वास्तूला समाधी किंवा छत्री म्हणतात. वास्तूशिल्पाच्या दृष्टीने समाधी व छत्रीमध्ये फारसा फरक नसतो. समाधी व छत्रीच्या मध्यभागी शिवलींग असते. सातारा जिल्ह्यामध्ये भुईंज, औंध, नांदोशी, बोरबन, बोरगाव, गिरवी, जांब, कण्हेरखेड, कोपर्डे, निगडी व राजापूर येथे समाधी आहेत. साधू संतांच्या समाधी मंदिरांच्या स्वरूपात असतात.

**४.२.३.६.३.१ औंध येथील रूपपुरी समाधी:**

औध येथे तळयाच्या काठी रूपपुरी यांची समाधी आहे. गोसावी समाजातील हे साधू होते. त्यांची ही समाधी वास्तू कलेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. ही समाधी मंदिर विविध शिल्पांनी अलंकृत केलेले आहे. समाधी मंदिराच्या पायऱ्यांवर कमलदले, मोर, हत्ती, घोडेस्वार, शरभ, नंदी, वाघ व द्वंद्व खेळणाऱ्या मल्लांची शिल्पे कोरलेली आहेत.[१११]

पीठाचा पहिला थर अंतर्गोल मोलीमेचा आहे. त्याच्यावर कणीचे मोलीमे आहे. यानंतर असलेल्या उपपीठाच्या पृष्ठभागावर सभोवती टोकाची कमान व सुरूचे षटकोनी स्तंभ असलेले देवकोष्टके कोरलेली असून एका देवकोष्टकामध्ये गणेश व इतर सर्व देवकोष्टकांमध्ये शिवलिंग कोरलेली आहेत.उपपीठाच्या थरावर पुन्हा कणीचा थर आहे. यानंतर उलट अंतर्गोल मोलीमेचा थर आहे. या थरावर उलटया फुलांची नक्षी आहे.[११२]

समाधी मंदिराची चौकट ४ फूट उंच व २ फूट रूंद असून उंबऱ्यावर मध्ये किर्तीमुख व दोन्ही बाजूस फुले कोरलेली आहेत. ललाटबिंबावर मध्यभागी गणेश असून दोन्ही बाजूस फुले कोरलेली आहेत. चौकटीच्या दोन्ही बाजूस खांब असून खांबांवर तोरण आहे.[११३]

मंदिराची बाह्यभिंतीवर अंतर्गोल, कणी, डमरू यांचे अनेक मोलीमे असून चारी बाजूस फुले कोरलेली आहेत. अंतर्गोल मोलीमेवर उलटया फुलांची नक्षी आहे.[११४]

शिखराचा पाया चौकानी असून त्यावर सभोवती चुन्याच्या गिलव्यामध्ये कमळकळीची रांग कोरलेली आहे. पायाच्या चारी कोपऱ्यावर चार छत्रया असून त्यातील एक छत्री बऱ्याच अंशी पडलेली आहे. पंचपर्णी कमानी असलेल्या छत्रयांमध्ये देवतांची शिल्पे आहेत. अष्टकोनी पायावर अष्टदिशांना पंचपर्णी कमान असलेल्या आठ छत्रया असून त्यामध्ये देवतांची शिल्पे कोरलेली आहेत सध्या त्यांची पडझड झालेली आहे. दोन छत्रयांमध्ये अष्टकोनी मिनार असून त्याव फुलांची व जाळीची नक्षी कोरलेली आहे. त्याच्यावर मोठा घुमटाकार अमलक असून त्यावर कळस होता आता तो नाही.

समाधी मंदिरामधील गाभारा ८ फूट चौरस असून चारी कोपऱ्यांमध्ये चार खांब थोडेसे बाहेर आलेले असून त्यावर अष्टकोन तयार करून सात टप्प्यामध्ये अर्धगोल मोलीमेमध्ये प्रमाणात कमी होत गेलेले आहे. शिखराचे बांधकाम विट चुन्यामध्ये केले आहे तर शिखरापर्यंतचे बांधकाम दगड चुन्यामध्ये केले आहे.[११५]

### ४.२.३.६.३.२ भुईंज येथील रायाजी जाधव यांची समाधी

भुईंज गावामध्ये राष्ट्रीय महामार्गापासून पश्चिमेस काही अंतरावर ही समाधी आहे. सातारा जिल्ह्यातील सर्वात जास्त शिल्पांकृत व देखणी समाधी आहे. जाधव घराण्यातील रायाजी जाधव हे २५ फेब्रुवारी १७२८ रोजी पालखेडच्या लढाईत मारले गेले. त्यांची समाधी आहे.[११६] या समाधील स्थानिक लोक घुमट म्हणतात.

**अ) पीठ:**

समाधी ११ फूट चौरस पीठावर उभारलेली आहे पीठाची उंची तीन फूट असून त्याचे खूर,पाया, उपपीठ व उलट  अंतर्गोल मोलीमे अशी रचना आहे. खूरावर चारी कोपऱ्यावर चार चौरंगाचे पाय स्वतंत्रपणे कोरलेले असून त्याची वरील बाजू उपपीठाच्या वरील बाजूस जोडलेली आहे. चौरंगाच्या पायाची खालील बाजू चौरसाकृती असून त्यावर कमळकळीची व उलटया फुलाची नक्षी कोरलेली आहे. पीठाच्या पायाचा खालच्या थरावर उभट टोक असलेले पंचकोन चौफेर कोरलेले आहेत. त्याच्यावरील थर अंतर्गोल मोलीमेचा आहे. या थरावर फुलांची नक्षी कोरलेली आहे. उपपीठावर चारी बाजूस  हत्ती, शरभ, गंडभेरूड, मोर, मारूती, सहस्त्रदल यांची शिल्पे आहेत. शरभाची आठ शिल्पे असून पैकी एका शिल्पाच्या चारी पायामध्ये चार, शेपटामध्ये व तोंडामध्ये प्रत्येकी एक हत्ती कोरलेला आहे. उर्ववरीत पाच शरभ शिल्पे साधी आहेत. आठ हत्तींची शिल्पे कोरलेली असून पैकी दोन हत्ती साखळदंडामध्ये बांधलेल्या अवस्थेत आहेत.दोन हत्ती अंबारीधारी असून एका हत्तीवरील अंबारी रिकामी आहे तर दुसऱ्या

हत्तीवर अंबरी असून अंबारीमध्ये एक स्त्री व एक पुरूष, अंबारीच्या मागे एक व्यक्ती व माहूत कोरलेला आहे. हत्ती अलंकृत आहे. एका अंबारी विरहीत हत्तीच्या पाठीवर एक व्यक्ती बसलेली आहे. मोराच्या चोचीमध्ये मोत्याची माळ आहे. गंडभरूडाच्या दोन पायामध्ये दोन व दोन चोचीमध्ये दोन हत्ती कोरलेले आहेत. उपपीठावर विविध प्रकारची सहस्त्रदले कोरलेली आहेत. उपपीठावर उलटया अंतर्गोल मोलीमेचा थर असून त्यावर उलटया फुलांची नक्षी कोरलेली आहे.[११७]

**ब) बाह्यभिंत:**

पीठावर भिंती उभारण्यात आल्या आहेत. भिंतीचा पहिला थर फुलांचा आहे. या थरावर अंतर्गोल मोलीमेचा थर असुन त्याच्यावर फुलांची नक्षी कोरली आहे. बाह्यभिंतीच्या चारी कोपऱ्यावर चार अष्टकोनी मिनार आहेत. हे मिनार पागोळयापर्यंत चार टप्प्यात आहेत. मिनारावर कणी व अष्टकोनी चौकानी मोलीमे आहेत. मिनाऱ्यांवर अनेक विविध फुले कोरलेली आहेत. एका ठिकाणी तीन माशांचे एक तोंड असलेले शिल्प कोरलेले आहे. याशिवाय मोर, नागांच्या फण्या, कोरलेल्या आहेत.

मुख्य भिंतीला चारी बाजूस द्विशाखी टोकदार कळीच्या कमानी आहेत. दरवाजाची बाजू सोडल्यास तीन बाजूच्या कमानीमध्ये १.६ फूट उंच व १ फूट रूंदीच्या दगडी जाळया आहेत. चारी कमानींच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी दोन उभरती फुले कोरलेली आहेत. त्याच्या वरील बाजूस प्रत्येकी दोन शरभ शिल्पे कोरलेली आहेत. या शिल्पांच्या वरील बाजूस डमरूंची चौफेर मोलीमेची रांग आहे. या थराच्या वरील बाजूस अंतर्गाल मोलीमेचा थर असून या थराला उलटया फुलांच्या पाकळयांची नक्षी कोरलेली आहे. याच्यावर कंदाकृती लोलक शिल्पे असलेले आकर्षक हस्त आहेत. यापैकी एका हस्तावर नागाच्या फणीवर बसलेल्या गरूडाचे शिल्प आहे.कमानीच्या दोन्ही बाजूच्या वरील मुख्य हस्ताला हत्तीच्या सोंडेचा आकार देऊन त्यावर नागाची शिल्पे कोरलेली आहेत. या प्रमुख हस्तांच्या खाली असलेल्या कंद लोलकास वेटोळे घातलेल्या नागाचे शिल्प कोरलेले आहे. हस्तांमध्ये टोकाची कमान असलेल्या लहान देवळयांची रांग आहे. हस्तांवर पागोळे असून पागोळे असून पागोळयावर फुलांची नक्षी कोरलेली आहे. याच्यावर पिंपळाच्या पानाच्या आकाराचे दगड चौफेर बसविलेले असून त्यावर फुलाची नक्षी कोरलेली आहे. या एका दगडाची लांबी २ फूट व रूंदी १.६ फूट आहे.[११८]

**क) अंतर्भाग:**

समाधीच्या त्रिशाखी चौकटीची उंची ३.४ फूट व रूंदी २ फूट असून उंबऱ्यावर मांडरिकवर किर्तीमुख व दोन्ही बाजूस दोन हात जोडलेल्या पुरूषांची शिल्पे कोरलेली आहेत. ललाटबिंबावर गणेशपट्टी असून बाजूस पिंपळाच्या पानाची रांग आहे. चौकटीच्या दोन्ही बाजूस दोन कोरीव काम केलेले खांब असून त्यावर तोरण आहे. तोरणावर दोन्ही बाजूस दोन अष्टकोनी व कमलदलामधील घुमट असलेले दोन मिनार असून या दोन मिनारांमध्ये तीन पिंपळाच्या पानाची शिल्पे आहेत. त्याच्यावर मधोमध गणेशाचे शिल्प आहे. चौकटीच्या डाव्या बाजूस राधाकृष्णाचे शिल्प आहे. आत २ फूट लांबी व १.६ फूट रूंदीचे शिवलिंग आहे. तिन्ही भिंतींमध्ये ५.४ फूट उंचीच्या टोकाच्या कमानी आहेत. चारी कोपऱ्यामध्ये चार स्क्विंझ तयार करून्न त्याच्यावर अष्टकोन तयार करून छत घुमटाकार बनविलेले आहे. मध्यभागी लहान सहस्त्रदल आहे. येथून वर जाण्यासाठी २ फूट रूंदीचा २० पायऱ्या असलेला जिना आहे.पागोळयावर चारी कोपऱ्यावर मनोरे असून त्याच्यावर कणीची ग्रीव्हा असलेला कमळदलातून वर आलेला घुमट आहे. मध्यभागी कणीची ग्रीव्हा असलेला कमळदलातून वर आलेला ६ फूट व्यासाचा घुमट आहे. घुमटासाठी १२ X ८ X २.५ मापाची विट वापरली आहे.[११९]

### ४.२.३.६.३.३ बोरगाव येथील भाऊसिंग जाधवराव यांची समाधी

राष्ट्रीय महामार्गावरील भरतगावच्या पुढे व नागठाणे च्या अलीकडे बोरगाव हे गाव आहे. या गावामध्ये जाधवराव घराण्यातील भाऊसिंग जाधवराव यांची समाधी माधवसिंग यांनी बांधलीआहे.

**अ) बाह्यभाग:**

ही समाधी ३.६ फूट उंचीच्या चौथऱ्यावर उभारलेली आहे. चौथरा ११.३ फूट लांबी रूंदीचा चौरसाकृती असून साधा आहे अंतर्गोल मोलीमेवर उपपीठ व उपपीठावर उलटे अंतर्गोल मोलीमेवर समाधी मंदिराच्या भिंती उभारल्या आहेत. अंतर्गोल मोलीमेला फुलांची नक्षी कोरलेली आहे. भिंतीचा पाया फुलांची नक्षी असलेला अंतर्गोल मोलीमेचा थर आहे. भिंती साध्या आहेत. भिंतीचा वरील थर उलटया अंतर्गोल मोलीमेचा असून त्यावर लहान सह सहाने आहेत. सहानेवरील थर हस्ताचा आहे. हस्तांना कंदाकृती लोलक आहेत. हस्तांनी पागोळयास आधार दिलेला आहे. पागोळयावरील चौथऱ्यावर चार कोपऱ्यावर चार दगडी मिनार होते.या मिनारांचा काही भाग शिल्लक आहे. दोन मिनारांमध्ये असलेल्या पिंपळ पानाकृती दगड चौफेर आहेत. त्यातील काही दगड पडलेले आहेत. या दगडावर शरभ, पिंपळ पान व मोर यांची शिल्पे

कोरलेली आहेत. एका शरभाच्या तोंडामध्ये व पायामध्ये हत्ती पकडलेला आहे. एका मोराने चोचीमध्ये नाग पकडलेला आहे. मध्यभागी कणीची ग्रीव्हा असलेला कमळदलातून वर आलेला ६ फूट व्यासाचा घुमट आहे. घुमटासाठी ११ X ६.५ X २ मापाची विट वापरली आहे.[१२०]

**ब) अंतर्भाग:**

समाधीच्या चौकट २.१० फूट उंची व २ फूट रूंदीची आहे. चौकटीवर टोकाची कमान असून कमानीमध्ये नागबंध आहे.कमानीवर पिंपळ पानाच्या आकार असलेल्या सात शिल्पांची रांग आहे. गर्भगृह ८ फूट लांब रूंद आहे. गर्भगृहाच्या चारी कोपऱ्यामध्ये चार स्क्विंझ तयार करून्न त्याच्यावर अष्टकोन तयार करून छत घुमटाकार बनविलेले आहे. गर्भगृहामधील शिवलिंग अस्तित्वात नाही.[१२१]

**४.२.३.६.३.४ गिरवी येथील अज्ञात समाधी:**

फलटण शहाराच्या अग्नेय दिशेला ८ कि.मी. अंतरावर गिरवी हे छोटे गाव आहे. या गावामध्ये प्रवेश केल्यानंतर चौकामध्ये लगेच छत्री दिसते. या छत्रीबद्दल स्थानिकांना महिती नाही. १० फूट लांबी रूंदीच्या व ४ फूट उंचीच्या पीठावर छत्री उभारली आहे. खूरावर अंतर्गोल मोलीमेचा थर आहे. या थराच्या चारी कोपऱ्यावर फुलाची नक्षी आहे. या थरावर कणीचे चौफेर मोलीमे आहे. कणीच्या पीठ थरावर उपपीठ असून त्यावर पुन्हा कणीचा थर आहे. सर्वात वर उलटया अंतार्गोल मोलीमे आहे. या पीठावर अष्टकोनाकृती छत्रीचा पाया आहे.अंतर्गोल मोलीमे, कणीव उलट अंतर्गोल मोलीमे अशी पायाची रचना आहे. या पायावरील छत्रीला आठ दिशांना आठ टोकाच्या त्रिपर्णी कमानी आहेत. या कमानींवर उलट अंतर्गोल मोलीमेवर हस्ताचा आधार असलेले पागोळे आहे.पागेळयास उलटे कंद आहेत.पागोळयावर अष्टकोनाकृती कणीच्या मोलीमेवर अष्टकोनी पाया आहे. पायावर अष्टकोनी कणीचा थर आहे. आठ बाजू कोनामध्ये मध्यभागी एकत्र आलेल्या आहेत. छत्रीच्या आतील बाजूस घुमटाकार छत आहे.[१२२]

**४.२.३.६.३.५ जांब येथील पतंगराव जाधवरावांची समाधी:**

पुणे सातारा राष्ट्रीय महामार्गावरील पाचवड गावापासून पूर्वेकडे ६ कि.मी. अंतरावर जांब हे गाव आहे. या गावाच्या बाहेर लगेच पतंगराव जाधवराव यांची समाधी आहे. पतंगराव हे मराठा सेनापती धनाजी जाधव यांचे मोठे पुत्र होते. चंदन-वंदन किल्ल्याच्या पायथ्यास मोगल सरदार हमीदउद्दीनखान व संताजी घोरपडे यांच्यात ९ सप्टेबर १६९५ रोजी चकमक होऊन त्यामध्ये पतंगराव जाधवराव मारले गेले.[१२३]

ही समाधी चौथऱ्याच्या स्वरूपामध्ये आहे. या चौथऱ्याची रचना खूर, अंतर्गोल मोलीमे, उपपीठ व उलट अंतर्गोल मोलीमे अशी आहे. अंतर्गोल मोलीमेवर फुलची नक्षी आहे. उपपीठावर मोर, हत्ती व शरभ यांची शिल्पे आहेत. चौथऱ्यावर शिवलिंग आहे.[१२४]

**४.२.३.६.३.६ कण्हेरखेड येथील बायजाबाई यांची समाधी:**

रहिमतपूरपासून पूर्वेस ८ कि.मी. अंतरावर कण्हेरखेड हे महादजी शिंदे यांचे मूळ गाव आहे. या गावामध्ये दौलतराव शिंदे यांची पत्नी बायजाबाई यांची समाधी आहे.[१२५] हे समाधीमंदिर १२ फूट लांबी रूंदी असलेल्या व ३ फूट उंची असलेल्या चौथऱ्यावर उभारले आहे. अंतर्गोल मोलीमेच्या थरावर फुले कोरलेली असून यावर असलेल्या उपपीठावर तीन्ही बाजूस वेगवेगळया प्रकारची कमळे कोरलेली आहेत. उपपीठच्या वर उलटया अंतर्गोल मोलीमेच्या थरावर फुलांची शिल्पे कोरलेली आहेत. पीठावरील समाधीमंदिराच्या भिंतीच्या पायाच्या थरावर फुलांची चौफेर रांग कोरलेली आहे. त्यावर अंतर्गोल मोलीमेचा थर असून्न त्यावर फुलांची शिल्पे कोरलेली आहेत. यावर समाधीमंदिराची भिंत उभारलेली आहे. भिंतीवर चारी बाजूस कळीच्या कमानी कोरलेल्या आहेत. चारी बाजूच्या भिंतीवर कमानींच्या वरील बाजूस हत्ती पकडलेले दोन शरभ, साधे चार शरभ, तोंडामध्ये साप धरलेला शरभ व तीन माशांचे एक तोंड कोरलेले आहेत. तपश्चर्या करणारे स्त्री पुरूष कोरलेले आहेत. या शिल्पांच्या वरील बाजूस हस्त आहेत हस्तावर पागोळे आधारलेले आहे. पागोळयावर विटांचा चौथरा बांधलेला असून चौथऱ्याच्या चारी कोपऱ्यांवर चार अष्टकोनी मनोरे उभारलेले आहेत. मनोऱ्यावर फुलांची व बदामाची रेघी साखळी कोरलेली आहे. प्रत्येक दोन मनोऱ्याच्या मध्यभागी देवकोष्टके बांधलेली आहेत. यांची पडझड झालेली असल्याने त्यातील शिल्पांबाबत सांगता येत नाही. चौथऱ्या मध्यभागी कणीची ग्रीव्हा असलेला कमळदलातून वर आलेला घुमटाकार अमलक आहे.[१२६] समाधी मंदिराची चौकट ३.६ फूट उंची असून त्याची रूंदी २ फूट आहे. चौकट द्विशाखी कळीच्या कमानीमध्ये आहे. गर्भगृह ७ फूट लांबी रूंदी असलेला चौरस असून स्क्विंझच्या साह्याने घुमटाकार छत केलेला आहे. गर्भगृहामध्ये छोटे शिवलिंग कोरलेले आहे.[१२७]

**४.२.३.६.३.७ जनकोजी शिंदे व सोळा अज्ञातांच्या समाध्या :**

बायजाबाईच्या समाधी शेजारीच सोळा खांबी समाधी आहे.[१२८] ही समाधी चौथऱ्यावरील खांबांच्या स्वरूपात आहे. या समाधीचा चौथरा १५.९ फूट लांबी व रूंदीचा आहे. खूर, अंतर्गोल मोलीमे, उपपीठ, उलटे अंतर्गोल मोलीमे अशी चौथऱ्याची रचना आहे. अंतर्गोल

मोलीमेवर फुलांची नक्षी आहे. उपपीठावर प्रत्येक बाजूवर दोन्ही टोकावर दोन फुलांची शिल्पे आहेत. चौथऱ्यावर सोळा खांब आहेत. तळखडा, चौकोन, अष्टकोन, चौकोन, अष्टकोन, चक्र, चौकोन व हस्त अशी खांबाची रचना आहे. चौथऱ्याच्या मध्यभागी शिवलिंग आहे. स्थानिक लोक शिवलिंग हे जनकोजीचे व सोळा खांब जनकोजी बरोबर पानिपतच्या युद्धात मारले गेलेल्या सरदारांच्या समाधीचे प्रतिक मानतात.[१२९]

### ४.२.३.६.३.८ राजापूर येथील अंबोजी घाटगे यांची समाधी:

पुसेगावपासून उत्तरेस ७ कि.मी. अंतरावर राजापूर हे गाव आहे. या गावातील घाटगे घराणे हे मध्ययुगामध्ये घराणे होते. या घराण्यातील अंबोजी घाटगे यांची राजापूर येथे समाधी आहे.[१३०] ही समाधी १२ फूट लांबी रूंदीच्या चौरस पीठावर उभारलेली आहे. पीठाची उंची ३.६ फूट आहे. पीठाची रचना खूर, जाडया कुंभ, उपपीठ, व उलटा जाडया कुंभ अशी आहे. जाडयाकुंभच्या थरावर दोन्ही थरावर फुले कोरलेली आहेत. उपपीठावर सहस्त्रदले कोरलेली आहेत. पीठावर जाडयाकुंभच्या थरावर समाधीच्या भिंती उभारल्या आहेत. पीठावर चारी कोपऱ्यावर सुरूचे खांब असून खांबावर टोकाची झुकावाची राजस्थानी शैलीची कमानी आहेत. समाधीचे शिखर पेटाऱ्यासारखे असून त्यावर कळस आहे. समाधीची चौकट ४ फूट उंच व २ फूट रूंद आहे. ललाटबिंबावर गणेश असून त्याच्या वरील बाजूस कमळकळीची रांग कोरलेली आहे. उंबऱ्यावर किर्तीमुख असून दोन्ही बाजूस फुले आहेत. चौकटीच्या दोन्ही बाजूस द्वारपाल आहेत. समाधीचे गर्भगृह ८ फूट लांब रूंद आहे. भिंतीमध्ये उतरत्या कापाची जाळीदार खिडकी आहे. मध्यभागी शिवलिंग आहे. याचे छत चौरस सात थरामध्ये प्रमाणात कमी होत गेलेले आहे. मध्यभागी कमलदल कोरलेले आहे.[१३१]

### ४.२.३.६.३.९ मर्ढे येथील ब्रहमेंद्र स्वामीची समाधी :

राष्ट्रीय महामार्गावर अनेवाडी गाव आहे येथून पूर्वेकडे एक कि.मी. अंतरावर कृष्णा नदीच्या काठावर ब्रम्हेंद्र स्वामीची समाधी आहे.[१३२] ही समाधी चौथऱ्याच्या स्वरूपामध्ये असून चौथरा १४.३ लांबी रूंदीचा आहे. खूर, अंतर्गोल मोलीमे, उपपीठ, उलटे अंतर्गोल मोलीमे अशी रचना आहे. या मोलीमेवर फुलाची नक्षी आहे. चौथऱ्याच्या मधोमध दोन टप्प्यामध्ये तुळशी वृंदावन आहे.[१३३]

### ४.२.३.६.३.१० मांडवे येथील संताजी जाधव यांची समाधी

पुणे बंगलोर या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या नागठाणे या गावापासून पश्चिमकडे साधारण १० कि.मी. अंतरावर मांडवे हे गाव आहे. या गावामध्ये संताजी जाधव यांची समाधी

आहे.[१३४] समाधी ११ फूट चौरस असलेल्या व तीन फूट उंची असलेल्या पीठावर उभारलेली आहे. पीठाचे खूर, अंतर्गोल मोलीमे, उपपीठ, उलट अंतर्गोल मोलीमे अशी रचना आहे. उपपीठावर चारी बाजूस सहस्त्रदल कोरलेली आहेत. पीठाचे दोन बाजूच्या कोपऱ्यावरील दगड पडलेले आहेत परंतु उर्वरीत दोन दगडावर चौरंगाचे पाय अर्धवट कोरलेले दिसतात. वरील अंतर्गोल मोलीमेवर कमळफूले कोरलेली आहेत. या पीठावर उभारलेल्या समाधीच्या बाहेरील चारी बाजूस ४ फूट उंच व ३.६ इंच रूंद मापाची कमान आहे. समाधीच्या चौकटीची उंची ३ फूट असून रूंदी १.फूट १० इंच आहे. चौकटीच्या वरील बाजूस दोन शरभाची शिल्पे आहेत. समाधीचा गाभारा ४.६ फूट चौरसाकृती आहे. गाभाऱ्यामध्ये शिवलिंग होते, आता ते नाही. गाभाऱ्याचे छत स्क्विंचच्या साह्याने घुमटाकार बांधलेले आहे. घुमटाचे शिखर चौथऱ्या मध्यभागी कणीची ग्रीव्हा असलेला कमळदलातून वर आलेला घुमटाकार अमलक आहे.

## संदर्भ


१) सातारा जिल्हा गॅझेटियर, १८८५, पृ. ५३१

२) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९६३, पृ.८५६

३) Gazetter Of  Satara District, 1885, P.531

४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.७९७

५) https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand10/index

६) ताडफळे, म.वि. प्रतापगड परिचय़ मिरज, १९३९,

७) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

८) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

९) पहा प्लेट नं १, a

१०) दै.ऐक्य, १३ एप्रिल २००८, पृ.४

११) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, पृ.८८५, ८८६

१२) पहा प्लेट नं. १, b

१३) पहा प्लेट नं. १, c

१४) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

१५) पहा प्लेट नं. १, d

१६) पहा प्लेट नं.१, e

१७) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

१८) पहा प्लेट नं. १, f

१९) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

२०) पहा प्लेट नं. २, b & f

२१) पहा प्लेट नं. २, b

२२) पहा प्लेट नं. ३, a

२३) पहा प्लेट नं. २, a

२४) पहा प्लेट नं. २, c, e & f

२५) पहा प्लेट नं. २, d

२६) पहा प्लेट नं. ३, a

२७) पहा प्लेट नं. ३, b

२८) पहा प्लेट नं. ३, d

२९) पहा प्लेट नं. ३, d

३०) पहा प्लेट नं. ३, f

३१) पहा प्लेट नं. ४, a

३२) पहा प्लेट नं. ४, b

३३) पहा प्लेट नं. ४, c

३४) पहा प्लेट नं. ४, d

३५) पहा प्लेट नं. ४, e

३६) पहा प्लेट नं. ४, f

३७) पहा प्लेट नं. ५, a

३८) पहा प्लेट नं. ५, b

३९) पहा प्लेट नं. ५, c

४०) पहा प्लेट नं. ५, d

४१) तांबे जगन्नाथ दिनकर, परमहंस ब्रम्हेंद्र स्वामी महाराज, श्री देव भार्गवराम देवस्थान कमिटी धावडशी, १८ एप्रिल १९९९, पृ.४८

४२) पहा प्लेट नं. ५, f

४३) पहा प्लेट नं. ५, e

४४) पहा प्लेट नं. ६, a

४५) पहा प्लेट नं. ६, b

४६) पहा प्लेट नं. ६, c

४७) पहा प्लेट नं. ६, d

४८) पहा प्लेट नं. ६, e

४९) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

५०) पहा प्लेट नं. ७, a

५१) पहा प्लेट नं. ७, b

५२) पहा प्लेट नं. ७, c

५३) पहा प्लेट नं. ७, d

५४) पहा प्लेट नं. ७, e

५५) पहा प्लेट नं. ७, f

५६) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

५७) पहा प्लेट नं. ८, b

५८) पहा प्लेट नं. ८, c

५९) पहा प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

६०) पहा प्लेट नं. ८, d & e

६१) पहा प्लेट नं. ८, f

६२) पहा प्लेट नं. ९, a

६३) दीक्षित मोरेश्वर गंगाधर(संपा.), मराठे शाहीतील शिलालेख, नागपूर, १९६२, पृ.१४

६४) पहा प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

६५) पहा प्लेट नं. ९, b

६६) पहा प्लेट नं. ९, c

६७) पहा प्लेट नं. ९, d

६८) पहा प्लेट नं. ९, e

६९) पहा प्लेट नं. ९, f

७०) पहा प्लेट नं. १०, a

७१) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

७२) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

७३) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

७४) पहा प्लेट नं. १०, d

७५) पहा प्लेट नं. १०, e

७६) पहा प्लेट नं. १०, f

७७) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.८७३

७८) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

७९) पहा प्लेट नं. ११, a

८०) पहा प्लेट नं. ११, b

८१) पहा प्लेट नं. ११, c

८२) पहा प्लेट नं. ११, d

८३) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

८४) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

८५) पहा प्लेट नं. ११, e

८६) पहा प्लेट नं. ११, f

८७) पहा प्लेट नं. १२, a

८८) पहा प्लेट नं १२, b

८९) पहा प्लेट नं. १२, c

९०) पहा प्लेट नं. १२, d

९१) पहा प्लेट नं. १२, e

९२) पहा प्लेट न. १२, f

९३) पहा प्लेट नं. १३, a

९४) पहा प्लेट नं. १३, b

९५) पहा प्लेट नं. १३ c

९६) पहा प्लेट नं. १३, d

९७) पहा प्लेट नं. १३, e

९८) पहा प्लेट नं. १३, f

९९) पहा प्लेट नं. १४, a

१००) पहा प्लेट नं. १४, b

१०१) पहा प्लेट नं. १४, c

१०२) पहा प्लेट नं. १४, d

१०३) पहा प्लेट नं. १४, e

१०४) पहा प्लेट नं. १४, f

१०५) पहा प्लेट नं. १५, a

१०६) पहा प्लेट नं. १५, b

१०७) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, पृ. १४३

१०८) कित्ता, पृ.१४४

१०९) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

११०) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

१११) पहा प्लेट नं. १५, c

११२) पहा प्लेट नं. १५, d

११३) पहा प्लेट नं. १५, e

११४) पहा प्लेट नं. १५, f

११५) पहा प्लेट नं. १६, a

११६) शिवदे सदाशिव, महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे– खंड १, स्नेहल प्रकाशन पुणे, २०१३, पृ.२४

११७) पहा प्लेट नं. १६, b

११८) पहा प्लेट नं. १६, c

११९) पहा प्लेट नं. १६, d

१२०) पहा प्लेट नं. १६, e

१२१) पहा प्लेट नं. १६, f

१२२) पहा प्लेट नं. १७, a

१२३) लोकमत न्यूज दि.३० जून २०१८

१२४) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

१२५) पहा प्लेट नं. १७, c

१२६) शिवदे सदाशिव, महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे– खंड २, स्नेहल प्रकाशन पुणे, २०१५, पृ.१५२

१२७) शिवदे सदाशिव, महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे– खंड २, स्नेहल प्रकाशन पुणे, २०१५, पृ.१५३

१२८) पहा प्लेट नं. १७, c

१२९) पहा प्लेट नं. १७, d

१३०) प्रत्यक्ष सर्वेक्षणातून

१३१) गारडे अशोक, राजापूर दर्शन, श्रेयस ऑफसेट, बुध, २००४, पृ. १०

१३२) तांबे जगन्नाथ दिनकर, परमहंस, श्रीदेव भार्गवराम विश्वस्त देवस्थान कमिटी, धावडशी, नॅशनल ऑफसेट सातारा, २०१८, पृ.७१

१३३) पहा प्लेट नं. १७, e

१३४) सदाशिव शिवदे, महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे, खंड दुसरा, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१५, पृ. १७१

**प्लेट नं. १**



a



b





c d






e f

प्लेट नं. २






a b



c



d



e



f

**प्लेट नं. ३**



a



b



c



d



e



f

**प्लेट नं. ४**



a



b



c



d





e



f

**प्लेट नं. ५**





a

b






c

d




e

f

**प्लेट नं. ६**





a

b





c

d





e

f

**प्लेट नं. ७**




a b




c d




e f

**प्लेट नं. ८**





a b





c d





e f

**प्लेट नं. ९**





a b





c d





e f

**प्लेट नं. १०**



a



b



c



d



e



f

**प्लेट नं. ११**





a b






c d





e f

**प्लेट नं. १२**



a




b



c



d



e



f

**प्लेट नं. १३**



a



b



c



d



e




f

**प्लेट नं. १४**





a b





c d





e f


**प्लेट नं.१५**



a



b



c



d




e



f

**प्लेट नं.१६**



a



b



c



d



e




f

**प्लेट नं. १७**





a

b




c

d



e

## ४.३ सातारा जिल्ह्यातील मराठेकालीन निवासी वास्तू

मराठी सत्तेचा इतिहास दोन विभागामध्ये अभ्यासला जातो. पहिल्या विभागामध्ये छ.शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीपासून शाहू महाराजांच्या पहिल्या दशकापर्यंतचा काल समाविष्ट होतो. दुसरा विभाग पेशवाईचा कालखंड म्हणून अभ्यासला जातो.छ.शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीमध्ये समाजातील प्रत्येक घटक स्वराज्यासाठी झगडत होता. याकाळात मोठया प्रमाणावर धामधूम असल्याने वाडे व घरांची सतत लूटालूट व जाळपोळ होत असे. मराठयांच्या स्वातंत्र्य युद्धाच्या काळामध्ये प्रदेश लूटून जाळणे, पिकांची नासाडी करणे, घरे, वाडे लुटणे, पेटविणे या दैनंदिन बाबी झाल्या. अशा परिस्थितीमध्ये घरे व वाडयांची डागडूजी करणे अशक्य होते. अशा परिस्थितीमध्ये जी काही बांधकामे झाली त्यामध्ये स्थापत्य अत्यंत साधे आहे. शिवकाळात रायगड, प्रतापगड, शिवनेरी व पन्हाळा किल्ल्यावर बांधलेली घरे व वाडयाचे बांधकाम विजापूरी शैलीशी मिळते जुळते आहे. या काळामध्ये किल्ल्यांना स्वराज्याचा आत्मा मानले गेल्याने छ. शिवाजी महाराजांच्या काळात अनेक नवीन किल्ले बांधण्यात आले, जुन्यांची डागडुजी करण्यात आली.

मराठा बांधकामामध्ये लाकडाचा मोठया प्रमाणावर वापर केलेला होता. सर्व प्रकारच्या इमारतींच्या बांधकामामध्ये चांगल्या प्रकारच्या लाकडाचा वापर केलेला होता. पाणी व वाऱ्यापासून लाकडांचे संवर्धन करण्यासाठी त्यास जवसाचे तेल लावले जात असे. मराठी साम्राज्याच्या ऱ्हासामुळे व गरीबीमुळे मराठयांच्या नेतृत्वात कमी आली. अनेक वाडे उजाड झाले. वाडयाचा फार मोठा भाग वापराविना पडून राहिला. नदीच्याकाठी असलेल्या वाडयांचे नदीच्या पूरामुळे मोठे नुकसान झाले. हळुहळू संपूर्ण ढाचा पडेपर्यंत लाकडे कुजत राहिली. या सर्व बाबींमुळे वाडे नष्ट झाले.

मराठी सत्तेचा ऱ्हास झाल्यानंतर एकोणीसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत अनेक वाडे आगीच्या भक्षस्थानी पडले. मराठयांचे चौथे छत्रपती शाहू यांनी बांधलेला रंगमहाल इ.स.१८७४ मध्ये जळाला. यामुळे तत्कालामध्ये मराठा सरदारांनी व श्रीमंतांनी बांधलेल्या मराठयांच्या सर्वोकृष्ठ संरचनेमधील वाडे नष्ट झाले. त्यामुळे अजूनही उभ्या असलेल्या संरचना व तत्कालीन साहित्याच्या साह्याने मराठा काळातील घरांची माहिती मिळते.

शिवकाळामध्ये सध्याच्या सातारा जिल्ह्यामध्ये फलटणचे निंबाळकर, म्हसवडचे माने, बुध, मलवडी, राजापूर, मोळचे घाटगे घराणे, खटावचे खटावकर, करंजखोपचे धुमाळ, सोळशीचे यादव, भाडळयाचे घोरपडे, मांडवेचे जाधव, तारळेचे महाडीक, पाटणचे पाटणकर,

तळबीडचे मोहिते, भोसरे येथील गुजर व भुईंजचे जाधवराव यांनी तत्कालीन राजकारणामध्ये आपला ठसा उमटविला होता. निंबाळकर, घाटगे, खटावकर व घोरपडे यांना अदिलशाही दरबारामध्ये चांगले स्थान होते. महाडीक, मोहिते व गुजर हे छ. शिवाजी महाराजांचे नातेवाईक होते. जाधव, घोरपडे यांनी आपल्या पराक्रमाने आपले स्थान निर्माण केले. यांनी आपल्या मूळ गावी वाडे बांधले.

वरीलपैकी अनेक घराण्यांचे वाडे नेस्तनाबूत झालेले आहेत. काही वाडयांच्या फक्त भिंतीच उभ्या आहेत. काहींची देखभाल न झाल्याने पडझड झालेली आहे. काही वाडे वारस नसल्याने दुसऱ्या कोणी तरी विकत घेतलेले आहेत. आधुनिकीकरणाने वाडयामध्ये आधुनिक पद्धतीने बदल झालेले आहेत. अशा परिस्थितीमध्ये अस्तित्वात असलेल्या अवशेषावरून वाडयाचा अभ्यास करावा लागतो. या काळातील वाडे पांढऱ्या माती व दगडांमध्ये बांधलेले दिसतात. यामध्ये टोकदार कमानी, घुमटाकार छत, खापरी नळ, अवजड दगडी हस्त, पूर्ण दगडी बांधकाम हे घटक १६ व्या शतकातील दक्षिणेतील मुस्लीम स्थापत्य विशेषत: विजापुरी प्रकार दर्शवितात. नंतरच्या मराठा कामामध्ये संपूर्ण दगडी बांधकाम दिसत नाही. या काळातील वाडयांमध्ये चौक, सोफा, तुळई व हस्त ही वैशिष्टये दिसतात. शिवकाळातील बांधकामामध्ये चौक व तुळई व हस्तासाठी लाकूड वापरले आहे. सातारा जिल्ह्यामध्ये शिवकाळातील सुस्थितीमध्ये असलेले वाडयांचे बांधकाम नाही.[१]

छ. शाहू महाराजांनी सातारा ही राजधानी केल्यानंतर सातारा येथे अदालत वाडा बांधला. पेशव्यांचा उदय झाल्यानंतर सातारा प्रदेशामध्ये अनेक नवीन घराणी उदयास आली. पुणे येथे पहिले बाजीराव पेशव्यांनी शनिवारवाडा बांधल्यानंतर दुसरे पेशवे बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्या काळात व नंतर अनेक मराठा सरदार मराठी साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी पुढे आले. उत्तरेमध्ये सैनिक, राजनैतिक अधिकारी व प्रशासक यांची संख्या सतत वाढत राहिली. पेशव्यांनी त्यांच्याशी निष्ठा असणारे सरदार निर्माण केले व त्यांना मदत केली. या सरदारांनी आपल्या प्रदेशातून मोठया प्रमाणावर संपत्ती गोळा केली. या सरदारांनी आपल्या मूळ गावामध्ये आणि सातारा व पुणे येथे मोठे वाडे उभारले. उपनगरामध्ये राहण्यासाठी आपल्या समर्थकांना जागा दिल्या व महसूलामध्ये सवलती दिल्या. त्यांनी अनेक भव्य वाडे उभारले, विविध वस्तूंनी वाडे सजविले. यातील काही वाडे अद्यापही सुस्थितीमध्ये आहेत.[२]

### ४.३.१ भुईंज येथील जाधवराव यांचा वाडा

साताराफ्पुणे महामार्गावर कृष्णा नदीच्या काठावर भुईंज हे गाव वसलेले आहे. हे जाधवराव घराणे स्वत:ला निजामशाहीच्या दरबारातील लखुजी जाधव यांचे पुत्र अचलोजीचे वंशज समजतात. यातील खंडोजीराव हे भुईंज येथे राहण्यास आले.

भुईंज येथे जाधवरावांचे दोन वाडे आहेत. पैकी एक वाडा पडलेला असून दुसरा वाडा चांगल्या स्थितीत आहे. परंतु याचे काळानुरूप गरजेनुसार बांधकाम झालेले दिसते. आज तेथे एकच बुरूज अस्तित्वात असून त्याच्या बांधकामामध्ये दगड विट व मातीचा वापर केलेला आहे. या बुरूजाला जंग्या नाहीत.[३]

वाडा ६ फूट उंचीच्या जोत्यावर बांधलेला आहे. वाडयात जाताना ११ पायऱ्या चढाव्या लागतात. वाडयाची चौकट १२ फूट उंच व ६ फूट रूंद आहे. ही चौकट साधी आहे.

आत गेल्यानंतर दुसरी चौकट आहे. ही चौकट ६ फूट ऊंच व तीन फूट रूंद असून आतील बाजूस दोन प्रशस्त ढेलजा आहेत. हा वाडा दोन चौकी आहे. पहीला चौक ३५ फूट लांब व ३५ फूट रूंद आहे. हा वाडा दुमजली आहे. आतील भाग तीन फूट उंचीच्या जोत्यावर बांधलेला आहे.[४]

या वाडयाचे खांब साधे असून खांबांना दगडी तळखडे आहेत. तुळईचे हस्त साधे आहेत. दिवाणखान्याची चौकट मोठी आहे. या चौकटीला बहुपर्णी टोकदार मराठा शैलीतील केळफूल असलेली कमान आहे. चौकटीवर फूल कोरलेले आहे. चौकटीच्या बाजूस भागामध्ये काचा बसविलेल्या आहेत. तळमजल्यावरील खिडक्या आकाराने मोठया आहेत. वरील मजल्यावरील खिडक्या अरूंद व कमी उंचीच्या आहेत.[५]

या वाडयातील एक चौकट अतिशय कोरीवकाम केलेली आहे. ही चौकट तीन शाखी असून फुलांची व लहान चौकोनी वडयांची नक्षी कोरलेली आहे. चौकटीच्या दोन्ही बाजूस दोन कोरीव काम केलेले खांब आहेत.चौकटीच्या ललाटबिंबावर गणेश असून चौकटीस तोरण आहे. तोरणावर तीन अश्वमुखे आहेत.[६]

आतील बाजूस भिंतीमध्ये पंचपर्णी टोकदार कमानीची देवकोष्टके आहेत. काही देवकोष्टकाची कमान शाहूकालीन दिसते. भिंतीवर उंच फूलदानीची शिल्पे कोरलेली आहेत.या शिल्पाच्या भोवती असणाऱ्या कमानीच्या वरील दोन्ही बाजूस पोपट कोरलेले आहेत. देव्हारा हा सागवानी असून देव्हाऱ्याच्या खांबावरून तो उत्तर पेशवाईतील असल्याचे दिसते. देव्हाऱ्यामध्ये

राम लक्ष्मण सीतेच्या मुर्ती आहेत. ही मुर्ती रामदास स्वामींकडून मिळाल्याचे जाधवराव घराण्यातील लोक सांगतात.[७]

वाडयाच्या आतील चौकटीच्या बाहेर चार फूट व्यासाची विहीर आहे. सांडपाणी वाहून जाण्याची चांगली सोय केलेली आहे. या वाडयास बांधकाम करण्यास १३ इंच लांब, ८ इंच रूंद व ३ इंच मापाची विट वापरलेली आहे. या वाडयाचे बांधकाम दगड माती, विट चुन्यामध्ये केलेले आहे.[८]

**४.३.२ अनपटवाडी येथील अनपट यांचा वाडा:**

बावधनपासून पश्चिमेस सुमारे ६ कि.मी. अंतरावर अनपटवाडी हे छोटेसे गाव आहे. या गावामध्ये अनपटांचे दोन वाडे आहेत. दोन्ही वाडे दोन चौकी आहेत. हे सर्व चौक २५ फूट लांबी रूंदीचे आहेत. मुख्य दरवाजाचे वरील मजल्याचे काही काम नव्याने केलेले आहे. दोन्ही वाडयामध्ये कुटुंबे रहात असल्याने वाडयाच्या रचनेमध्ये त्यांच्या सोयीनुसार बदल केलेला आहे तरीही काही घटक अद्याप शिल्लक आहेत.

वाडयाच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस पंचपर्णी कमानीच्या दोन छोटया कमानी आहेत. वाडयाची चौकट साधी असून तिच्यावर अंतर्गोल मोलीमेशिवाय कोणतेही नक्षीकाम नाही. चौकटीच्यावरील बाजूवरील दगडी बांधकाम झुकावाच्या कमानीचे आहे. वाडयामध्ये प्रवेश केल्यानंतर दोन्ही बाजू दोन ढेलजा होत्या, आता तिथे भिंती बांधून खोल्या केलेल्या आहेत. आत गेल्यानंतर पहिला चौक २५ फूट लांबी रूंदीचा आहे. चौकाच्या चारी कोपऱ्यामध्ये चार त्रिकोणी दगड चौथऱ्याला मजबूती देण्यासाठी बसविलेले आहेत. चौकातून पावसाचे पाणी बाजूच्या छोटया नाल्यातून बाहेर जाते. वाडयाचे खांब, तुळई व हस्त साधे आहेत. खांबाच्या खालील बाजूस एक फूट चौरस आकाराचा दगडी तळखडा आहे तर तुळई १ फूट लांबी जाडी असलेल्या चौरस आकाराची आहे. पहिल्या चौकातील दर्शनी बाजूचे पहिल्या मजल्याचे बांधकाम बऱ्याच अंशी पडलेले आहे. या मजल्या वरील खिडक्यांची चौकट चार फूट उंच व दोन फूट रूंदीच्या आहेत. खिडकी व खांबामधील जागेमध्ये लहान सागाच्या पट्टयांनी छोटे समलंब चौकोन करून त्यामध्ये पांढऱ्या मातीच्या विटांचे तुकडे भरून मातीचा गिलावा केलेला आहे. इथून आत गेल्यानंतर आतील दाराच्या मागील बाजूस भिंतीमध्ये पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी जिना आहे. जिन्याच्या पायऱ्या २ फूट रूंदीच्या आहेत. पहिल्या मजल्यावरील जमीन लाकडी फळयांवर मातीची केलेली आहे. वाडयाचे छप्पर बदलले आहे.[९]

वाडयाच्या मागील बाजूस दुसरा चौक असून या चौकाच्या एका बाजूस चार फूट बाजूस असलेली चौकेनी एक बावडी आहे.बावडीचे बांधकाम विटांनी केलेले आहे. विहीरीवर पूर्वी रहाट असल्याच्या खूणा आहेत. वाडयाचे बांधकाम दगड, माती व विटांनी केलेले आहे. भिंतीचे बांधकाम करताना दर्शनी बाजूस विटा उभ्या, तिरक्या बसवून सजावट करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. अनेक वेळा वाडयाची दुरूस्ती केल्याने विटांची मापेही वेगवेगळी दिसतात. बांधकामामध्ये १३ X ९ X ३, ९ X ६ X २.५, ८ X ६ X २ या मापाच्या विटांचा वापर केलेला दिसतो.[१०]

### ४.३.३ बावधन येथील गायकवाडांचा वाडा:

बावधन येथे दोन वाडे आहेत. एका वाडयास सुमारे ३० फूट उंचीची असून चारी कोपऱ्यावर चार कमी व्यासाचे बुरूज आहेत. या वाडयाची चौकट मजबूत आहे. चौकट १२ फूट उंच व ६ फूट रूंद आहे. चौकट द्विशाखी असून चौकटीचा दरवाजा लोखंडी पट्टी ठोकून मजबूत केलेला आहे. दरवाजास २.५ फूट उंच व २ फूट रूंदीचा दिंडी दरवाजा आहे. चौकटीच्या ललाटबिंबावर गणेश कोरलेला असून दोन्ही बाजू फुले व पाने कोरलेली आहेत. चौकटीवर चार उलट कमळ कोरलेले तोरण आहे.[११]

या वाडयाशेजारी दुसरा वाडा आहे. हा वाडा मूळचा कुलकर्णी यांचा होता. गांधी हत्येनंतर हा वाडा ८०० रूपयांना गायकवाड यांनी विकत घेतला. या वाडयामध्ये गायकवाड कुटुंबीय राहतात. देखभाल व्यवस्थित न झाल्याने या वाडयाची बरीच पडझड झालेली आहे. तरीही या वाडयाची खांब, हस्त, जिना व बाल्कनी चांगल्या स्थितीमध्ये आहे. हा वाडा उंचावर आहे. सात पायऱ्या चढून गेल्यानंतर पडलेले प्रवेद्वार लागते. पुढे गेल्यानंतर तीस फूट लांबी रूंदीची मोकळी जागा आहे. पुढे तीस फूट लांबीची दोन फूट उंचीच्या चौथऱ्यावर दुमजली इमारत दिसते. विभक्त कुटुंबे राहिल्याने खणामध्ये भिंती घातलेल्या आहेत. या खांबाला एक फूट मापाचा चौरस तळखडा आहे. वरील बाजूस कणीच्या मोलीमेवर कमळकळी व पिंपळाच्या पाने कोरलेली आहे. याच्यावर कणी असून दोन्ही बाजूस पिंपळाची पाने व मध्यभागी कडीपत्त्याच्या पानाची नक्षी कोरलेली आहे. यावर एक मोलीमे कोरलेले आहे. सर्वात वरील बाजूस उभी कमळदले कोरलेली आहेत. याच्यावर हस्त आहेत. देठ असलेले साखळीसह दुहेरी कमळ असलेली टोके व पाने कोरलेली आहेत. बाजूला दुहेरी कमळ व कमळकळी कोरलेले हस्त आहेत. तुळईची दर्शनी बाजू साधी आहे. वाडयातील मुख्य चौकट त्रिशाखी असून

ललाटबिंबावर सुंदर गणेशपट्टी असून त्यावर तीन उलटया कमळांचे तोरण आहे. छत कडीपाटाचे आहे. या इमारतीच्या अग्नेय बाजूस २.६ फूट व्यासाचा आड आहे.[१२]

पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी भिंतीमधून जिना आहे. जिन्याच्या पायऱ्या २ फूट मापाच्या आहेत. दर्शनी बाजूस असलेल्या बाल्कनीचे खांब कमळफुलातून वर आलेले अष्टकोनी सुरूचे असून वरील बाजूस एकामध्ये एक अशी चार कमळे कोरलेली आहेत. त्यावर तळमजल्या प्रमाणेच कमळ व पाने कोरलेली आहेत. बाल्कनीमध्ये त्रिपर्णी कमानी आहेत. बाल्कनीच्या आतील खांब साधे आहेत परंतु त्याच्या वरील बाजूस चौकोनी ठोकळयावर कमळ फुले व बदक कोरलेले आहेत.[१३]

आतील भिंतीमध्ये धान्य ठेवण्यासाठी पेव तयार केलेले आहेत. आतील चौकटीवर गणेशपट्टी असून भौमितिक नक्षी कोरलेली आहे. छप्पर बदलले आहे. या वाडयाचे बांधकाम दगड, वीट व मातीमध्ये केलेले आहे. यासाठी ९ X ७ X २ मापाची विट वापरलेली आहे.[१४]

### ४.३.४ फत्त्यापूर येथील शाळुंकर वाडा

सातारा तालुक्यामध्ये नांदगावपासून ६ कि.मी. अंतरावर फत्त्यापूर हे गाव आहे. या गावामध्ये शाळुंकर यांचा वाडा आहे.

वाडयाचे प्रवेशद्वार साधे आहे. दर्शनी बाजूस वाडा दुमजली आहे. वाडयाची चौकट द्विशाखी आहे. दरवाजा साधा असून लोखंडी पट्टया मारून तो मजबूत केलेला आहे. चौकटीच्या दोन्ही बाजूस ओटे आहेत. वाडयाचा दरवाजा एका बाजूस आहे. आत गेल्यानंतर दोन्ही बाजूस दोन ढेलजा आहेत. पुढे गेल्यानंतर बाजुच्या भिंतीमध्ये ४ फूट उंच व ३ फूट रूंद एक चौकट आहे. यातून आत गेल्यानंतर एका बाजूस २० X ३ फूट व दुसऱ्या बाजूस १५ X ३ फूट मापाच्या दोन अंधाऱ्या खोल्या आहेत. या खोल्यांचे छत अर्धगोल आहे.[१५]

या भिंतीच्या समोर एक साधा दरवाजा आहे. यातून आत गेल्यानंतर ३५′ X ३५′ मापाचा चौक आहे. दोन चौक असणाऱ्या वाडयामध्ये हा चौक चौसोफी आहे. ढेलजच्या मागच्या बाजूने वरील मजल्यावर जाण्यासाठी भिंतीतून दोन फूट रूंदीचा जिना आहे. पहिल्या मजल्यावर ३५ फूट लांब व ७ फूट रूंदीची खोली आहे. याची जमीन मातीची आहे. वरील छप्पर बदलले आहे. येथून बाजूच्या भिंतीवर जाता येते.[१६]

खालील चौकातून मागील चौकामध्ये जाता येते. पाठीमागील बाजूस पूर्वेकडे न्हानीघर असून त्यामध्ये २′ X २′ मापाचा एक दगडी चौरंग आहे. इथेच जवळ तुळसी वृंदावन आहे. पुढील भिंतीमध्ये शौचालय आहे. हे शौचालय पाटीचे आहे. मागील बाजूस एका छोटेसे दार

आहे. मागील बाजूकडून परत येताना उजव्या बाजूस स्वयंपाक खोली आहे. येथून धूर बाहेर जाण्यासाठी सोय कारण्यात आली आहे.[१७]

बैठक खोलीमध्ये जाताना मध्येच देवघर आहे. देवघर फार मोठे नाही परंतु लहान टप्पे असलेल्या देवघरामध्ये छत्रीच्या आकाराची प्रतिकृती आहे. हा वाडा फारसा वापरामध्ये नसल्याने देवघर रिकामे आहे. देवघरास लाकडी जाळीचे दारे आहेत. देवघरावर लाकडी कपाट असून त्यास गुप्त कप्पा आहे.[१८]

बैठक खोलीमध्ये प्रवेश करताना असलेल्या चौकटीवर एक गुप्त कप्पा आहे. बैठकीच्या खोलीमध्ये सुंदर चित्रे काढलेली आहेत. जरी ही चित्रे काळी पडलेली असली तरी ती अद्यापही लक्षवेधक आहेत. भिंतींवर चौफेर कमळकळीची रांग त्यामध्ये वरच्या तीन फूटामध्ये पुन्हा कमळकळीची आडवा आयत तयार करून त्यामध्ये फुलदाणी, अत्तरदाणी, फुलांच्या झाडाची चित्रे काढलेली आहेत. या आयतावर द्राक्षवेल कमळफुलासह चित्रित केलेली आहे. भिंतींमध्ये बहपर्णी कमान असलेल्या देवळया असून देवळयांच्या दोन्ही बाजूस कुंडीत लावलेल्या फुलझाडाचे चित्र काढलेले आहे.[१९]

बैठक खोलीला असणाऱ्या खिडक्यांना टोकदार बहुपर्णी दोन्ही बाजूस केळफूल असलेली कमान असलेली चौकट आहे. कमनीच्च्या टोकावर कमळकळी आहे. भिंतींना लोखंडी हूक आहेत. या वाडयाची मागील बाजूची बरीच पडझड झालेली आहे.[२०]

वाडयाचे बांधकाम करण्यासाठी दगड, चुना, विट व मातीचा उपयोग केला आहे. बांधकामासाठी ११ X ८ X २ मापाच्या विटा वापरलेल्या आहेत.[२१]

### ४.३.५ साप येथील कदमांचा वाडा

सातारा जिल्ह्यातील रहिमतपूरपासून पूर्वेकडे ६ कि.मी. अंतरावर साप हे गाव आहे. या गावात कदम यांचा वाडा आहे. छत्रपती शाहू महाराज यांच्या काळामध्ये इंद्रोजी कदम हा मराठा सरदार साप येथे रहात होता. त्याचा हा वाडा आहे. सापचा राजवाडा मध्ययुगीन कालखंडात साप या गावात इंद्रोजीराव राजवाडा एक ऐतिहासिक वास्तू म्हणून प्रसिद्ध आहे. इंद्रोजीराव कदम हे मराठयांच्या इतिहासातील एक शूर सरदार म्हणून त्यांनी आपला ठसा उमटविला आहे.

## अ) वाडयाचे वर्णन

तीन एकर भूभागावर हा राजवाडा बांधलेला आहे. राजवाडयाला बाहेरून पूर्ण तटबंदी केलेली आहे. राजवाडयाचे प्रवेशद्वार हे खूप मोठे व प्रशस्त स्वरूपाचे आहे. हे प्रवेशद्वार संपूर्ण सागवानी लाकडाचे आहे. त्यावर कोरीव असे नक्षीकाम केलेले दिसून येते. वाडयास चार बुरूज असून सभोवती दगड विटांची ३० फूट उंचीची तटबंदी आहे. तटबंदीचा वरील पाच फूटाचा भाग विट बांधकामाचा आहे.तटबंदी व बुरूजाला जंग्या आहेत. टेहळणीसाठी लहान चौकोनी सहाने आहेत. वाडयाचे प्रवेद्वार भव्य असून त्यास टोकाची बहूपर्णी कमान आहे. दरवाजालाही त्याच प्रकारची कमान असून दरवाजाला लोखंडी पट्ट या ठोकून दरवाजा मजबुत केलेला आहे. दरवाजाच्या पॅनलचा असून पट्ट यांवर व सभोवती पितळी धातूचे मोठे अणूकूची दार उलटे खिळे ठोकलेले आहेत. दरवजाच्या दोन्ही बाजूच्या भिंतीना जंग्या आहेत. दरावाजास दिंडी दरवाजा आहे. दरवाज्याच्या दोन्ही बाजूस तीन फूट उंची व २५ फूट लांबीचे जोते आहे. खूर, जाडयाकुंभ मोलीमे उपपीठ व उलटे जाडयाकुंभ मोलीमे अशी जोत्याची रचना आहे. दरवाज्याच्या वरील बाजूस तुळईला साधे मोलीमे आहेत. दरवाजाच्या वर ३५ फूट लांबीची खोली आहे. खोलीला ४ फूट उंच व दोन फूट रूंदीच्या खिडक्या आहेत. खिडक्यांची दारे मजबूत आहेत. खोली छप्पर बदलले आहे. प्रवेशद्वारच्या आत दोन्ही बाजूस तीन फूट उंचीच्या जोत्यावर दोन ढेलजा असून त्यास एक फूट रूंदीच्या चार पायऱ्या आहेत. दोन्ही बाजूच्या भिंती बांधलेल्या आहेत. दोन्ही ढेलजातून वरील खोलीमध्ये जाण्यासाठी जिना आहे.[२२]

राजवाडयाच्या आतमध्ये दोन चौक आहेत. एक दरबारसुद्धा आहे. या हॉलमधील सागवानावर नक्षीचे कोरीवकाम केलेले आहे. राजवाडयात पाण्यासाठी विहीर आहे. या विहीरीतील पाणी बहुतांशी पिण्यासाठी वापरण्यात येत असावे. वाडयाच्या बाहेरील बाजूससुद्धा विहीर आहे. तेथील पाण्यावर वाडयाच्या परिसरातील नारळाची बाग व शेती पिकवली जात होती. वाडयात दोन तळघरे आहेत. त्यात तांब्याचे हंडे जुने शेतीची औजारे ठेवलेली आहेत.[२३]

संपूर्ण वाडा हा मराठा शैलीत बांधलेला आहे. वाडयाचे बांधकाम हे दगड विटा, चुना, राख, डिंक, भुसा, कोंडा यामध्ये केल्याचे दिसून येते. वाडयाची तटबंदी प्रथम दगडी बांधकामाने व त्यानंतर त्यावर विटांचे १० ते १५ लावून बांधकाम केले आहे. छतासाठी सध्या त्यावर पत्रा आहे. वाडयात प्रकाश येण्यासाठी सुद्धा सोय केलेली आहे. बांधकामासाठी ज्या लाकडाचा वापर केला आहे. ते सर्व सागवानाचे आहे. वरील खोलीतून दोन्ही बाजूला तटबंदीवर जाण्यासाठी दोन छोटे दरवाजे आहेत. तटबंदीला आतील बाजूला तुळई असल्याच्या खुणा

आहेत. दक्षिण बाजूच्या तटबंदीमध्ये एक शौचालय आहे. प्रवेद्वारानंतर मोकळे पटांगण आहे. पटांगणामध्ये उजव्या बाजूस दगड व मातीच्या विटांनी बांधलेली ३५ फुट लांबीची पडकी खोलीची भिंत आहे. डाव्या बाजुस २५ फूट लांबी रूंदी असलेले व सहा फूट खोलीचे छोटेसे तळे आहे याच्यामये दहा फूट लांबी रूंदीचा व सात फूट उंचीचा चौथरा आहे. चौथऱ्याच्या चारी कोपऱ्यावर खांबाच्या खुणा आहेत. या वरून ती समाधी किंवा हे आंघोळीसाठी तयार केलेले असावे. याच्या जवळच २० फूट व्यासाची साधारणपणे ४० फूट खोलीची सात टप्प्यामध्ये दगडी बांधकाम केलेली विहीर आहे. या पटांगणाच्या मध्यभागी वाडा बांधलेला आहे वाडयाचे बांधकाम दगड चुना व विटांमध्ये केलेले आहे.

वाडयाचे प्रवेशद्वाराची चौकट मजूबत व भव्य आहे. १४० फूट लांब व ७० फूट रूंदी असलेला हा वाडा आहे. या वाडयास चार फूट उंचीचे जोते आहे. खूर, जाडयकुंभ मोलीमे, उपपीठ व उलटे जाडयाकुंभ मोलीमे अशी जोत्याची रचना आहे. चौकटीच्या दोन्ही बाजूस जोत्यावरील तीन खण रिकामे आहेत. दोन्ही कडेचे तीन खणामध्ये खोल्या बांधलेल्या आहेत. दोन्ही खोल्यांना दर्शनी बाजूस व एका बाजूस ४ फूट उंच व २ फूट रूंदीची खिडकी आहे. जोत्यावरील खांब मजबूत असून त्यास १.६ फूट चौरस तळखडा आहे. जोत्याच्या कोपऱ्यावर कमळकळी कोरलेली आहे. खांबांच्या्या वरील बाजूस कणीचे मोलीमे असून खांबांवरील तुळईंना हस्त आहेत. हस्तांवर दर्शनी बाजूस पिसारा फुलविलेल्या मोराचे काष्ठशिल्पे आहेत. मोराच्या दोन्ही बाजूस पोपटाची शिल्पे आहेत. तुळईच्या दोन्ही बाजूच्या हस्तावर पोपटाची शिल्पे आहेत. हस्तांवर उलटया जाडयाकुंभाचे मोलीमे असून त्याच्यावरती ७० फूट लांबीची खोली बांधलेली असून मध्यल्या नऊ खणांना ४ फूट उंची व २ फूट रूंदीची खिडक्या आहेत. खिडक्यांभोवती केळफुल असलेल्या बहूपर्णी कमानी आहेत. वरील खोलीचे छत पत्रयाचे असून तुळई साध्या आहेत.

चार पायऱ्या चढून गेल्यानंतर वाडयाची चार शाखी भव्य चौकट आहे. पहिले तीन शाखांवर वेगवेगळया स्वरूपामध्ये कमळफुले कोरलेली आहेत. चौथ्या शाखेच्या पायथ्याच्या एक तृतीयांश भागावर मोर फुले व वेली कोरलेला आहेत. वरील बाजूस मोर, फुले व पाने कोरलेली आहे. ललाटबिंबावर जाड मिशा असलेले तोंड कोरले आहे. दरवाजा पॅनलचा असून वरील दोन पट्ट यांवर पितळी अणुकूचीदार उलटे खिळे ठोकलेले आहेत. चौकटीच्या दोन्ही बाजूस भिंतीमध्ये त्रिपर्णी कमानीच्या देवळया आहेत.

चौकटीच्या आत दोन्ही बाजूस ढेलजा आहेत. ढेलजामध्ये जाण्यासाठी एक फूट रूंदी व एक फूट उंचीच्या चार पायऱ्या आहेत. आतील जोत्याची रचना साधी आहे. आत ४० फूट लांबी रूंदीचा चौक आहे. जोत्याच्या कडेने पावसाचे पाणी जाण्यासाठी गटाराची व्यवस्था केलेली आहे. चौकाच्या चारी कोपऱ्यामध्ये चार तिरके दगड बसविलेले आहेत. चौकातील तळमजल्याचे चारी सोपे रिकामे आहेत समोरील सोप्याच्या दोन्ही कडेच्या खणामध्ये खोल्या बांधलेल्या आहेत. खोल्यांच्या बाहेर चार फूट उंचीचे लोखंडी जाड पत्रयाचे रांजण ठेवलेले आहेत. त्यांच्या शेजारी लाकडी रंगविलेल्या पेटया आहेत. सोप्याचे खांब साधे असून त्यांना एक फूट लांबी रूंदीचा तळखडा आहे. वरील बाजूस तुळईच्या हस्तावर दर्शनी बाजूस नागाच्या फणीवर पिसारा फुलविलेला मोर असून मोराच्या दोन्ही बाजूस पोपट आहेत. बाजूच्या हस्तांवर नागाची फणी कोरलेली आहे. तुळईच्या हस्तांवर उलटया कमळफुलांची रांग आहे. या रांगेच्या वर जाडयाकुंभ मोलीमेवर पहिला मजला आहे.

समोरच्या सोप्यामध्ये दोन चौकटी असून एका चौकटीचे दार बंद आहे. दोन्ही चौकटीची दारे पॅनलची असून लोखंडी पट्टया ठोकून ती मजबूत केलेली आहेत. दोन्ही चौकटी चार शाखी असून चौकटीवर कोरीव काम केलेले आहे. ललाटबिंबावर गणेश पट्टी आहे. भिंतीमध्ये चौकोनी खिडक्या व बहूपर्णी देवळया आहेत. याच्या आत खोली असून तिच्या बाजूस स्वयंपाकाची खोली आहे. या खोलीमध्ये तंदूर आहे. याच्या पासून थोडया अंतरावर भिंतीमध्ये बाथरूम व दोन शौचालये आहे. एक जुनेच असून दुसरे आधुनिक केले आहे. मागील बाजूस एक चौक आहे. पहिल्या मजल्याचे छत कडीपाटाचे आहे.

येथून बाहेरील उजव्या सोप्या कोपऱ्यातील खोलीतून पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी जिना आहे. पहिल्या मजल्यावर दिवाणखाना आहे. याचे माप ५० फूट लांब व ४० फूट रूंद आहे. या दिवाणखान्यामध्ये सुरूचे १८ खांब असून त्यांना टोकाची केळफूल असलेली बहूपर्णी कमान आहे. दोन खांबांच्या रांगांना जोडणारी मोठी कमान आहे. या हॉलला दोन्ही भिंतींना ४ फूट उंच व दोन फूट उंचीच्या खिडक्यांना टोकदार बहूपर्णी महिरप आहे. खिडक्यांच्या आडकाठींना छोटे सुरूचे खांब आहेत. या मजल्यावरील सर्व खोल्या रिकाम्या आहेत. याच मजल्यातून खाली येण्यासाठी जिना आहे.[२४] या वाडयाची बांधकाम शैली वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे दिसून येते.

**ब) शिलालेख**

या राजवाडयाबाहेर जी विहीर आहे. त्या विहीरीमध्ये आत उतरण्यासाठी ज्या पायऱ्या आहेत. त्यातील आठ पायऱ्या उतरल्यानंतर एक शिलालेख आहे व दुसऱ्या दगडावर महादेवाची पिंड आहे. तो शिलालेख उर्दू व अर्धमागधी भाषेत लिहीला आहे. त्यावरून असे दिसून येते की, हा लेख शके १७७३ मध्ये लिहून ठेवलेला आहे. त्या विहीरीस मोट व्यवस्था असल्याचे दिसून येते.[२५]

सरदार इंद्रोजीराव कदम यांच्या बहिणीचा विवाह महादजी शिंदे यांचा लहान भाऊ राणोजी शिंदे यांच्या मुलाशी झालेला होता. त्यामुळे मराठयांच्या इतिहासात महादजी शिंदे यांच्याबरोबर सहभाग झाला. त्याचबरोबर इंद्रोजीराव कदम यांची संपत्तीही अफाट होती हे वाडयातील सुखसोयीवरून दिसून येते.[२६]

सापचा राजवाडा हा एक ऐतिहासिक वास्तू म्हणून प्रकाशात येत आहे. या वाडयात सध्या कोणीही राहत नसले तरी या तीन एकरच्या प्रशस्त वाडयात चित्रपट मालिकांचे चित्रिकरण होत असते. त्यात असणाऱ्या खोल्या, त्या वाडयाची तटबंदी, भिंती त्यासाठी वापरलेले दगड, लाकडे यांच्यावरून त्यावेळची सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते. वाडयाच्या केलेल्या बांधकामावरून आपल्याला तत्कालीक तंत्रज्ञाची व बुद्धीकौशल्याची जाणीव होते. लाकडावर कोरलेल्या नक्षीवरून त्यावेळच्या कलेचे सुद्धा दर्शन होते.

या वास्तूमुळे प्रेरणा, स्फूर्ती व आत्मसन्मान वाढीस मदत होते. ऐतिहासिक परंपरेची जाणीव होते व त्यांचीही वाढ होण्यास मदत होते.

**४.३.६ तारळे येथील महाडीक यांचा वाडा :**

पुणे बंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील नागठाणे या गावाच्या पश्चिमेस २० कि.मी अंतरावर तारळी व कालगंगा नदीच्या संगमावर तारळे हे गाव आहे. या गावामध्ये महाडीक यांचा वाडा आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांची कन्या अंबिकाबाई हीचा विवाह महाडीक घराण्यातील हरजी राजे यांच्याशी झाला होता. यांच्या वंशाचा तारळे येथे वाडा आहे. येथे महाडीक घराण्यांचे आठ वाडे आहेत. सर्व वाडयांची रचनेमध्ये साम्य आहे. या वाडयांना तटबंदी होती परंतु आता तिचे अवशेष दिसतात. सध्या सुस्थितीमध्ये असलेल्या वाडयाची माहिती घेण्यात आलेली आहे.[२७]

साधारणपणे ९० फूट लांब व ६० फूट रूंदी असणाऱ्या या वाडयामध्ये तीन पायऱ्या चढून जावे लागते. वाडयांचे प्रवेशद्वार इतर वाडयांच्या तुलनेत लहान आहे. वाडयाची त्रिशाखी चौकट साधी पण मजबूत आहे. चौकटीच्या ललाटबिंबावर फुले कोरलेली आहेत. चौकटीच्या दोन्ही बाजूस छोटया देवळया आहेत. तुळईंना साध्या हस्ताने आधार दिलेला आहे. छप्पर बदलेले आहे. दरवाजाच्या आत गेल्यानंतर दोन्ही बाजूस सोपे आहेत.[२८]

दरवाजाच्या आत छोटासा चौक आहे. हा चौक ओलंडल्यानंतर पुढे एक ४.६ फूट उंची व ३० फूट लांबी व ५फूट रूंदीचे जोते आहे. जोत्याची रचना साधी आहे. जोत्यावरील खांब साधे असून त्यांना एक फूट लांबी रूंदीचे तळखडे आहेत. खांबाच्या वरील बाजूस कणीच्या मोलीमेवर साधे मोलीमे आहेत. खांबावरील तुळईचे हस्त साध्या मोलीमेचे आहेत. तुळईवर उलटया जाडयाकुंभाच्या मोलीमेवर पहिला मजला आहे. या मजल्यावरील खांब साधे आहेत.[२९] येथे प्रत्येक खणामध्ये चार फूट उंच, दोन फूट रूंदीची साध्या चौकटीची खिडकी आहे. दोन फूट रूंदीचा सज्जा आहे. छत कडीपाटाचे आहे. खालच्या मजल्याच्या सोप्याच्या भिंतीमध्ये गोल कमानीच्या देवळया आहेत. सोप्याचे छत कडीपाटाचे आहे. पाच पायऱ्या चढल्यानंतर दुसरी चौकट आहे.[३०]

दुसरी चौकट द्विशाखी असून ती साधी आहे. याचा दरवाजा पॅनलचा असून लोखंडी पट्टयांनी मजबूत केलेला आहे. चौकटीमधून आत गेल्यानंतर दरवाजाच्या दोन्ही बाजूस ढेलजा आहेत. दाराला आतून आडणा लावण्याची सोय आहे. येथे १५ फूट लांबी रूंदीचा चौक आहे. पावसाचे पाणी बाहेर वाहून जाण्यासाठी जोत्याच्या कडेने गटाराची सोय केलेली आहे. जोत्याच्या चारी कोपऱ्यामध्ये वरील बाजूस तिरका दगड लावलेला आहे. जोत्याची उंची तीन फूट असून रचना साधी आहे. उजव्या बाजूच्या सोप्यामध्ये खोल्या बांधलेल्या आहेत. हे बांधकाम दगड मातीमध्ये आहे. जोत्यावरील खांब साधे आहेत. त्यांना एक फूट लांबी रूंदीचा दगडी तळखडा आहे. तुळईचे हस्त साधे आहेत.हस्तावर उलटया जाडयाकुंभाच्या मोलीमेवर पहिला मजला आहे. वरच्या मजल्यावर प्रत्येक खाणमध्ये ४ फूट उंच व २ फूट रूंदीच्या खिडक्या आहेत. खिडक्यांच्या आडकाठीला सरूचे छोटे खांब आहेत. खांबमधून छताला आधार देणारे हस्त साधे आहेत.[३१]

खालच्या मजल्यातील डावीकडील सोप्यामध्ये देवघर आहे. देवघराची चौकट द्विशाखी असून साधी आहे तिची उंची ६ फूट असून रूंदी २.६ फूट आहे. चौकटीला टोकाची बहुपर्णी महिरप आहे. देवघराची दारे पॅनलची असून पट्टयांवर कोरीव काम केलेले आहे. चौकटीच्या

बाजूस बार लावलेल्या खिडक्या आहेत. देवघर प्रशस्त असले तरी देव्हारा छोटा आहे. देवघराजवळच मेणा व पालखी ठेवलेली आहे. देवघरावरील बाल्कनी रिकामी आहे. येथील खांब साधे आहेत येथील आडकाठीला सुरूचे छोटे खांब आहेत. छत कडी पाटाचे आहे.[३२]

समोरील सोप्यामधील द्विशाखी चौकट मजबूत असून बाहेरच्या शाखेवर फुलांचे कोरीव काम केलेले आहे.चौकटीच्या ललाटबिंबावर गणेशपट्टी असून दोन्ही बाजूस कोरीवकाम केलेले आहे. चौकटीची दारे पॅनलची आहेत. चौकटीच्या मागील भिंतीतून वरच्या मजल्यावर जाण्यासाठी भिंतीतून जिना आहे. या चौकटीच्या आत हॉल असून येथे बर्चा, दांडपट्टा, तलवार, बंदूक इ. शस्त्रे ठेवलेली आहेत. येथून मागे गेल्यानंतर १५ फूट लांबी रूंदीचा चौक आहे. येथील खांब अत्यंत साधे असून त्यांना एक फूट लांबी रूंदीचे तळखडे आहेत. या चौकामध्ये साधे तुळशी वृंदावन आहे. इथे बर्चे ठेवलेले आहेत.[३३] येथे बांबूच्या लहान काठयांचा पडदा दरवाजास लावलेला आहे. यावरून अजून गोषा पद्धत रूढ असल्याचे दिसते. या वाडयाच्या बांधकामास १३ X ७ X ३ मापाची विट वापरलेली आहे.[३४]

### ४.३.७ नाना फडणिसांचा येथील वाडा(मेणवली)

सातारचे छत्रपती रामराजा यांचे सरदार भगवंतराव त्र्यंबक पंतप्रतिनिधी यांना इ.स.१७६८ मध्ये वाईच्या पश्चिमेकडील काही भाग इनाम म्हणून दिला होता. त्या भागात नाना फडणीस यांनी मेणवली हे गाव वसविले या गावाच्या कडेने वाहणाऱ्या कृष्णा नदीकाठी इ.स.१७७० मध्ये भव्य वाडा बांधला.[३५] हा वाडा दुमजली असून त्यास पोटमाळा आहे. या वाडयाच्याभोवती दगडी भक्कम तटभिंत बांधली आहे. या तटभिंतीत पूर्वेकडील बाजूस मोठे प्रवेशद्वार आहे त्यावर नगारखाना आहेत. तर पश्चिमेकडील म्हणजेच वाडयाच्या मागील बाजूस कृष्णा नदीत उतरण्यासाठी पायऱ्यांचा घाट आहे.

वाडयात प्रवेश केल्यानंतर प्रथमच उघडा चौक लागतो या चौकात कारंजे असून त्यांच्या उजव्या बाजूस मोठी विहीर आहे. या चौकाच्या चारी बाजूस देवडया आहेत. वाडयाच्या भिंतीचे माप हे सव्वा ते दीड मीटर रूंद आहे. या वाडयात सहाखणी दिवाणखाना आहे. त्याच्या कमानी लाकडी असून त्यावर नक्षीदार व कलाकुसरयुक्त समांतर समभुज चौकोनी आकाराच्या छटा आहेत. यामध्ये झुंबरे व हंडया अडकविण्यासाठी आकडे ठेवले आहेत. या दिवाणखान्यास लागून नाना फडणीसाचे शयनगृह होते. आज या शयन गृहात पलंग आहे.[३६]

या वाडयाचे बांधकाम मराठा वास्तूशैलीत असून त्यात धूळ जाऊ नये यासाठी उंच तटबंदी बांधली आहे. त्यात खिडक्या नाहीत तसेच या वाडयात वायुविजन व पुरेशा

प्रकाशाचीही तंरतूद कमी आहे. या वाडयात जमीनीपेक्षा थोडे उंच असे सहा चौक आहेत. या प्रत्येक चौकाच्या मध्यभागी एक मीटर खोलगट कुंड आहे. या कुंडात पावसाचे पाणी जमा होवून ते बंदिस्त गटाराद्वारे बाहेर काढलेले आहे.

हा वाडा मराठा वास्तुशैलीत बांधला असून उंच तटबंदीने धुळविरहित केला आहे. त्यास मोकळे वायुविजन व परेशा प्रकाशाचीही तरतूद केली आहे. वाडयात जमीनीपेक्षा उंच असे सहा चौक असून प्रत्येक चौकाच्या मध्यभागी एक मीटर खोल कुंड आहेत. कुंडामध्ये जमा होणारे पावसाचे पाणी बंदिस्त नहराद्वारे बाहेर काढले आहे. वाडयाच्या बाहय तटभिंतीस खिडक्या नाहीत. हा वाडा ऐतिहासिक आहे.[३७]

या वाडयातील एक खोली नानाफडणीसांची शेवटची पत्नी जिजाऊ खोली म्हणून ओळखली जाते. या खोलीच्या भिंती तळाकडील बाजूस १–२ मीटर उंचीवर हिरवा रंग दिलेला आहे त्यांच्या छताला लाल रंग दिलेला आहे. छत हे लाकडाचे असून त्यात वेलबुट्‌टींची नक्षी काढलेली आहे. या खोलीत अनेक भित्तीचित्रे आहेत.[३८]

नाना फडणीस यांच्या असणाऱ्या मौल्यवाल वस्तू व महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित राहावीत यासाठी ती या वाडयात आणून ठेवली होती. त्याचा सांभाळ जिजाबाईंनी केला. आज ही कागदपत्रे पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये ठेवली आहेत. नाना फडणीस, बाजीराव पेशवा यांने नाना फडणीसांना बडतर्फ केल्यानंतर केल्यानंतर काही दिवस या वाडयात मुक्कामी होते. १७६१–७३ मध्ये ते काळ सपत्नी ते मुक्कामी होते.[३९]

अशाप्रकारे मध्ययुगीन काळात वाडा हा निवासस्थान कार्यालय आणि अन्य दैनंदिन व्यवहारासाठी वापरला जाई. या वाडयाचा दर्शनी भाग गढीसारखा व संरक्षणाच्या दृष्टिने भक्कम असे. त्यामुळे वाडयाच्या सभोवती भक्कम दगडी संरक्षक भिंत बांधण्यात येई. वाडयाचे दरवाजे मोठे होते. त्यावर गणेशपट्‌टी असत. वाडयाच्या दरवाजा शक्यतो पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख असे. प्रत्येक वाडयाला देवडी असे व नंतर पहिला चौक, चौकात कारंजी वा हौद, नंतर मुख्य वाडयाचे जोते असे त्यापुढे ओसरी, माजघर, स्वयंपाकघर ही इतर दालने क्रमाने येत असता. दिवाणखाना पहिल्या मजल्यावर असे. दिवाणखान्यात स्त्रियांची स्वतंत्र उठण्याबसण्याची स्वतंत्र व्यवस्था केली असे. त्याच्यासाठी जिनेही वेगळे असत. हे जिने भिंतीत असत. एखाद्या खोलीत भिंतीची रूंदी पाहून त्यात जडजवाहिर ठेवण्याच्या दृष्टिने सोय केलेली असे. दिवाणखाना, महालातील भिंतीवर, ओसरीवर, मुख्य भिंतीवर, चौकात इत्यादी ठिकाणी सुशोभनासाठी पौराणिक प्रसंगावरील चरित्रे काढण्याची पद्धती होती. वाडयाचे छत हे

वक्ररेषांकित समातळ छत असे. यावर नक्षी लाखेने चिकटवलेली असे. दिवाणखान्यात हंडया व झुंबरे अडकविलेली असत. तावादानाच्या काचा रंगीत असत.

मेघडंबरी हा त्या काळातील वास्तुशिल्पाचा उत्तम नमुना व वैशिष्टये होय. भिंतीच्या बांधकामासाठी मातीत चुना, गवत, भूळ, राळ, साबुदाणा, डिंक व सरस वगैरेचा वापर केल्याने भेगा पडत नसत. शिशाचा उपयोग वास्तुच्या पायात करीत असत. दगडाच्या भिंती बांधतांनाही त्यातील सांधे घट्ट होण्यासाठी सांधण्यासाठी शिशाचा रस ओतीत असत.[४०]

### ४.३.७.१ भित्तिचित्रकला

नाना फडणिसांनी बांधलेल्या वाडयांतील भित्तिचित्रे ही मराठा शैलीची असून ती चांगल्याप्रकारे रेखाटली आहेत. येथे मोठया भित्तिचित्रांची रचना भिंतीच्या मध्यभागी केलेली आहे. त्यावर असलेल्या लहान चित्रांची मांडणी क्षितीजसमांतर असून चित्रातील कथानकानुग्म डावीकडून उजवीकडे वाढलेली आहेत. दशावतार तसेच युद्धावर निघालेल्या मराठा सेण्याच्या भित्तिचित्रामध्ये आढळून येते. मजबूत बांध्याचे खेडवळ गौळण युवतीचे तारूण्य तिचे पुष्ट नितंब व भरदार वक्षाच्या गोलाईतून दाखविले आहे. कृष्ण व अष्टनायिकांचे भित्तिचित्र शेवाळया रंगाने रंगविले आहे. या चित्रातील नायक कृष्ण असल्याने तो मोठा दाखविला असून अष्टनायिका लहान दाखविल्या आहेत. अष्टनायिकांच्या साडया विविध रंगात आहेत. कृष्ण व अष्टनायिक मंडपात एका मंचकावर बसलेल्या आहेत. दत्तात्रेयांचे भित्तिचित्र मराठा शैलीतील असून ते बांध्याने मजबूत व आकर्षक दाखविले आहे. याठिकाणी दत्तात्रय, विष्णू व महेश यांचे रूप दाखविले आहे.

वाडयात प्रवेश केल्यावर ओवरीस लागून असलेल्या चौकातील भिंतीवर देवदेवतांची भित्तिचित्रे आहेत. भिंती साध्या हरमुजी रंगाने रंगविल्या आहेत. छताच्या वास्यांना लागून असलेल्या खालचा भाग पर्णफुलांच्या नक्षीतील क्षितिजसमांतर भित्तिचित्रणाने सुशोभित केला आहे. भिंतीतील कोनाडयाभोवती काटकोन व चौकोनी आकारातील रंगीत कमानी आहेत. कोनाडयामध्ये वासरी वाजविणारा कृष्ण, गणेश, राम, महिषासुरमर्दिनी आणि शिवपार्वतीची भित्तिचित्रे आहेत. दोन कोनाडयामधील मोकळया जागी सुरूच्या झाडांची चित्रे काढलेली आहेत. त्यात निळा, पिवळा व लाल रंग वापरला आहे.

वाडयाच्या दक्षिण टोकाकडील चौकातील भिंतीवर मंदिराभोवतालचे जय व विजय हे द्वारपाल रेखाटले आहेत. येथे जिवती देवीचेही चित्र आहे. यासमोरील भिंतीवर रासक्रीडेत मग्न

कृष्ण, मुरलीधर कृष्ण, दुग्ध प्राशन करणारा कृष्ण, गौळणीच्या खोडया काढणारा कृष्ण आणि बाजारात दुध नेणाऱ्या गोपिका इत्यादी कृष्णलीलांची चित्रे आहेत. भिंतीच्या किनारी पानेफुले, मोर व पोपटाच्या नक्षिकामाने सुशोभित केल्या आहेत. या भिंत्तीचित्रांमधील रासक्रीडेचे चित्र विशेष उल्लेखनीय आहे. आता य चित्राचा काही भाग शिल्लक असला तरी तेवढयावरून कलाकृतीची उच्चता दिसून येते. कृष्ण व गोपिकांचे वेश व आभूषणे अतिशय सुंदर रेखाटली चित्रीत केल्या आहेत. या भित्तिचित्राच्या मध्यभागी एका वर्तुळात अर्धवट फिकट झालेले शिवपार्वतीचे चित्र आहे. रासक्रीडेच्या चिबरीं कृष्ण व गोपिकांनी मराठा पद्धतीचे पोशाख केलेले आहेत.[४१]

वाडयातील नाना फडणिसांच्या शेवटच्या पत्नी जिऊबाई यांच्या खोलीच्या पश्चिमेकडील भिंतीवर कोनाडयात डमरूच्या आकाराच्या सिंहासनावर बसलेल्या गणेशाचे चित्र आहे. त्यात उद्यान खेडवळ गवळण युवतीचे भित्तिचित्रही रेखाटले आहे. गणेशाच्या उत्तर दिशेस कमळावर उभ्या विष्णूचे भिंत्तिचित्र आहे. त्या चित्राभोवती पानाफुलांच्या नक्षीची कमान आहे. याशिवाय विष्णूच्या दोन्ही बाजूस गुलदस्ते, व विरूद्ध बाजूस शिवपंचायताचे ळलरब अरहे.

वाडयाच्या उत्तरेकडील चौकात पहिल्या मजल्यावर एक खोली आहे. या खोलीतील भिंतीवरील चित्रामध्ये महाकाव्य व पुराण यावर आधारित चित्रे रेखाटली आहेत. यामध्ये महिषासूरमर्दिनी, स्नान करणारी महिला, अष्टनायिकासह कृष्ण, रामपंचायतन, शिवपंचायतन, गणेश व दत्तात्रयांची चरित्रे उल्लेखनीय आहेत. याशिवाय या खोलीत दशावतार, सात घोडयांच्या रथावरील सुर्य, शेषशायी विष्णू व ही लघुचित्रे आहेत. याशिवाय या भिंतीच्या कोनाडयामध्ये गरूड व हनुमानाचे चरित्र आहे. भिंतीतील खिडकीच्या दोन्ही बाजूस दोन गुलदस्ते आहेत.

खोलीतील दक्षिणेकडील भिंतीवर अष्टनायकांसह कृष्ण व रामपंचायतन ही दोन भित्तिचित्रे रेखाटली आहेत. त्यावर रथारूढ व सुर्याचे भित्तिचित्र आहे. खोलीच्या पश्चिमेकडील भिंतीवर शिवपंचायतन व गणेश आहे. त्यावर शेषशायी विष्णू आहे. खिडकीच्या दोन्ही बाजूस असलेल्या नक्षीपात्रात मोठे वृक्ष दाखविले आहेत. उत्तेरकडील भिंतीवर युद्धास निघालेले सैन्य, दत्तात्रेय व महिषासुरमर्दिनी ही भित्तिचित्रे आहेत. या खोलीच्या बाह्यभिंतीवर फुलझाडांचे चित्र रेखाटले आहे. या झाडावर उंच जागी पोपट व मोर बसलेले दाखविले आहेत.[४२]

भित्तिचित्रांची निर्मिती ही प्रामुख्याने वास्तूच्या भिंती आणि छत अलंकृत करण्यासाठी केली आहे. वास्तूच्या भिन्न भागातील चित्रकामाची योजना करताना चित्रतलाची उपलब्धता, त्या जागेचे महत्त्व आणि रंगकामाचा परिणाम यांचा विचार केलेला आहे. त्यामुळे या ळलरत्रांचा आकार, त्यांची व्याप्ती ही संबंधित भिंत आणि वारचे छत यांच्याशी नेहमी सुबद्ध असेल अशा प्रकारे निश्चित केलेला आहे. हे चित्रण वास्तूच्या आतील भिंतीवर त्याचप्रमाणे बाहेरील बाजूसही केले जात असे.

चित्रकामासाठी विटात बांधलेल्या भिंतीवर माती आणि गवत यांच्या मिश्रणाचा गिलावा दिला जात असे. हा गिलावा घोटून गुळगुळीत आरसपानी झाल्यानंतर त्यावर चुन्याचा पातळ थर किंवा कावेचा लाल रंग दिला जाई. हा रंग धुऊन किंवा पुसून जाऊ नये म्हणून त्यात डिंक किंवा सरस यासारखे चिकट पदार्थ मिसळत असत. गिलावा ओलसर असतानाच पांढऱ्या किंवा लालसर रंगाच्या पार्श्वभूमीवर इतर रंगाच्या साह्याने रंगकाम केले जाई. त्यामुळे चुना वाळल्यावर ते रंग घट्ट चिकटून बसत. या सर्व चित्रामध्ये रंगसंगती, रंगयोजना आणि रेषांचे लालित्य हे चित्रांच्या विषयाला अनुरूप असे आढळते. क्वचित काही चित्रे ही पांढऱ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर रंगविलेली दिसतात. प्रथम संपूर्ण भिंत आबाशाई रंगाने रंगवून घेत आणि हया पार्श्वभूमीवर वन्स्पतिजन्य, खनिज तसेच कधीकधी कृत्रिम रंगाचा वापर केला जाई. मात्र बाह्यरेषा काळया रंगातच काढत असत. चित्रकलेत स्थानिक व लोककलेचा काही अंश आढळतो.[४३]

वाईतील या भित्तिचित्राववरून मध्ययुगीन काळातील मराठी राज्याची सुबत्ता, धार्मिक परंपरा, समजुती, वेशभूषा आणि तत्कालिन जीवनशैलीची व समाजजीवनाची माहिती मिळते.

### ४.३.८ अदालतवाडा–

छ.शाहू महाराजांनी किल्ल्याच्या पायथ्याशी सन १७२० मध्ये डोंगर उतारावर अदालतवाडा बांधला. या वाडयाचे जोते १० फूट उंच असून संपूर्ण इमारतीची लांबी व रूंदी २२५ फूट व १६० फूट आहे. या वाडयातील आरसे महाल नगारखाना व भव्य दरवाजा आहे. या वाडयात मराठी राज्याचे मुख्य न्यायालय होते. छ.शाहू महाराज, पंरप्रधान पेशवे व मुख्य न्यायाधीश नियमितपणे रयतेची गाऱ्हाणी ऐकून घेण्यासाठी या वाडयात बसत असत. खटल्याची पूर्ण चौकशी करून निकाल देत असत. अदालतवाडयाच्या पश्चिमेस फत्तेसिंग भोसले यांना वाडा बांधून देण्यात आला होता.[४४]

वाडयाचे प्रवेशद्वार भव्य असून रस्त्यावरून प्रवेशद्वारापर्यंत जाण्यास आयताकृती पायऱ्या आहेत. प्रवेशद्वारावर पाच खिडक्या असलेला सज्जा असून , दोहो बाजूस घडीव दगडाच्या भिंती आहेत. दरवाजा भक्कम आहे त्याचे स्वरूप आजही नव्यासारखे दिसते. वाडयाच्या आत गेल्यावर भव्य चौक असून दुमजली चार सोपे उत्तम स्थितीत उभे आहेत.

अदालतवाडयास पूर्वी 'जुनी अदालत ' असे म्हणत असत. इंग्रजांनी सन १८४९५० मध्ये त्यावेळचे राजे श्रीमंत आबासाहेब छत्रपती असताना सर्व दौलत ताब्यात घेऊन लिलाव केला. तो छत्रपतींनी घेतला. म्हणून आज हा अदालत वाडा आपण पाहात आहोत. षा अदालतवाडयास मराठी साम्राज्याचे हायकोर्ट मानले जाई. स्वतः छापती, पेशवे , सरन्याधीश मिळून सर्व खटल्यांचा निकाल करावयाचे. एकीकडे साबरमतीकाठचे तर एकीकडे तुंगभद्राकाठचे कानडी लोक येथे दाव्यांचा निकाल करण्यास यायचे.[४५]

### ४.३.९ रंगमहाल–

रंगमहाल ही वास्तू अदालतवाडयाच्या पूर्वेस सुमारे २०० मी. अंतरावर आहे. मूळ इमारत ३० मी.लांब व १५ मी. रूंदीची असून नवीन इमारत जोडून बांधली आहे. मूळ इमारत तीन मजली हेती. शाहूच्या राण्यांचा राणीवसा येथे होता म्हणून या इमारतीस रंगमहाल असे नाव देण्यात आले आहे. छ.शाहू महाराजांचे या वाडयातच निधन झाले. इमारतीसमोर सेनापतीचा वाडा होता. रंगमहालाच्या उत्तरेस दोन शाखा असलेली आयताकृती इमारत आहे. त्यातील एका इमारतीचा वापर राजांचे हत्ती बांधण्यासाठी केला जात असे. सन १८५७ च्या उठावात शिर्क्यांवर आरोप ठेवून ती इमारत सरकारजमा करण्यात आली.[४६]

अदालतवाडयापासून २००–२५० मीटर अंतरावर रंगमहाल ही शाहू महाराजांची इमारत बांधली होती. ३० मीटरलांब व १५ मीटर रूंद अशी ही तीनमजली इमारत होती. शाहूमहाराजांच्या राण्यांना 'राणीवसा' येथे असल्यामुळे या इमरतीस 'रंगमहाल' असे नाव देण्यात आले. इ.स. १८७४ मध्ये ही इमारत आगीत भस्मसात झाली. नंतर ती दुरूस्त करून तिला जोडून ४५ मीटर रूंदीची नवी इमारत बांधली. सध्या या इमारतीच्या बरोबर समोर सेनापती बापटांचा वाडा होता. त्याचे अवशेष आज दिसत नाहीत. रंगमहालाच्या जवळ उत्तर दिशेस एक आयताकृती इमारत आहे. त्यात राजाचा पिलखाना (हत्ती बांधण्याची जागा) होता.[४७]

### ४.३.१० तख्ताचा वाडा

हल्लीच्या गुरूवार पेठेतील शाहू उद्यानाच्या ठिकाणी छापती शाहूराजांनी वाडा बंधला होता. तेथे शाहूराजांचे तख्त होते. त्या ठिकाणी महाराजांचा दरबार भरत असे.या वाडयास ‘तख्ताचा वाडा ’ असे म्हटले जात असे.सध्या या वाडयाच्या एका भिंतीचे अवशेष शाहू उद्यानात पाहावयास मिळतात. टसेच घडीव दगडाची एक उत्तम विहीरही चांगल्या स्थितीत दिसते. वाडयास पाणीपुरवठयासाठी ही विहीर असल्यामुळे तिला ‘तख्ताची विहीर’ असे म्हटले जाते. दुर्दैवाने हा वाडा आगीत भस्मसात झाल्यामुळे शाहूमहाराजांचे राजवैभव पाहता येत नाही. तरीसुद्धा या वाडयाच्या अनेक आठवणी अजूनही ताज्या वाटतात. या वाडयास ‘डौलाचा वाडा’ असेही म्हणत. या वाडयात ‘डौली शिक्क्याचा’ कारभार होता म्हणून त्यास असे म्हणत असत. यासंबंधी इंग्रजांच्या कागदप्रातील एक उल्लेख पुढीलप्रमाणे आढळतो.

श्रीमंत सगुणाबाईसाहेब यांनी आपल्या अर्जामध्ये डौलाच्या वाडयाविषयीचे काढलेले उद्गार वरील उताऱ्यात आहेत. या अर्जात दुसऱ्या एका वाडयाला गुरूवार पेठेतील आमचा डौलाचा वाडा असे म्हटले आहे. तेथे आमचे सिंहासन होते व दरबार भरत असत, अस खुलासा दिला आहे.

याच वाडयात प्रतापसिंह उर्फ भाऊसाहेब महाराज यांच्या राणीसाहेबांनी श्रीमंत शाहू महाराज भोसले यांना दत्तक घेतले. या दत्तकविधीच्या वेळी थवेच्या थवे उपस्थित होते. चाफळ मठाचे मठाधिपती श्री. गंगाधरस्वामी यांनी श्री. शिवाजी महाराजांच्या वंशातल्या सात वर्षांच्या शाहू यांना मांडीवर घेऊन दत्तकविधान केले. कोल्हापूरचे राजाराम महाराज यांच्यातर्फे त्यांचे सरदार उपस्थित होते. परशुरामपंत प्रतिनिधींचे वंशज बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी राणीसाहेबांना संदेश वाचून दाखविला’

आमच्या घराण्यातील साम्राज्याची आठवण ऐकूण कोणाच्या मनात स्वाभिमानी वृत्ती जागृत करणारी, हृदयाला आंदोलन देणारी, औदार्याला भर घालणारी व परंपरेने मनुष्याच्या अंगाच्या सर्व दैवी वृत्तीचा उद्भव करणारी ही स्मृती, आपल्या पूर्वजांची अशी स्मृती आपणास देणारा व आपलाच असलेला हा जो तत्कालीन इतिहास आहे, त्याचे आपण केवढे ऋणी आहोत’[४८]

### ४.३.११ मोतीबाग

वाई शहराच्या दीड कि.मी.अंतरावर मोतीबाग हा वाडा आहे. इ.स.१७८७ मध्ये आनंदराव भिकाजी रास्ते यांनी ही वास्तू बांधली. ही इमारत पूर्वाभिमुख असून दुमजली आहे. या हवेलीच्या बागेभोवती विटांची भक्कम भिंत आहे. ही हवेली अजूनही सुस्थितीत आहे. या वास्तुच्या प्रवेशद्वाराजवळ दोन खोल्या आहेत. प्रवेशद्वारातून आत गेल्यावर दुसरे द्वार लागते. त्याच्यासमोर असलेल्या हवेलीच्या भिंतीवर सर्वत्र भित्तिचित्रे आहेत. सर्व दालनातील समताल छते नक्षीदार व लाखकाम केलेल्या बेलबुट्ट यांनी सुशोभित आहेत. सुरूच्या लाकडाचे स्तंभ व कमानी लक्षवेधक आहेत. या हवेलीतील छत व स्तंभातील जागा राजस्थानी शैलीतील भित्तीचित्रांनी रेखाटली आहे.

या हवेलीच्या दुसऱ्या मजल्यावरील दिवाणखान्यात छताखाली चारी बाजूस पौराणिक विषयाची व लौकिक जीवनाची लघुचित्रे आहेत. भिंतीवर रामायण व हरिविजय यातील कथानकाची ळलरबे आहेत. याशिवाय युद्धभूमीवरील व शिकारीचीही चित्रे रेखाटली आहेत. या हवेलीत दोनशे भित्तिचित्रे आहेत. त्यावरील रंगसंगती आकर्षक आहे. या हवेलीच्या पुढे कारंजाचे अवशेष दिसून येतात. याशिवाय बागेमध्ये आयताकृती तळयात अनेक कारंजी सोडलेली आहेत. या हवेलीच्या वायव्य दिशेच्या कोपऱ्यात एक मोठा आड असून त्यावर रहाट बांधलेला आहे. त्यातून पाणी बाहेर काढून बागेला पुरविण्यासाठी पर्शियन व्हीलची संकल्पना केलेली दिसून येते. आनंदराव रास्ते यांनी मोतीबागेमध्ये हा प्रयोग प्रथमच केलेला दिसून येतो. पाणी वरच्या उंच टाकीत सोडून त्यातील पाणी सायफन पद्धतीने खापराच्या नळाद्वारे बागेत व वास्तुत फिरविलेले दिसून येते. तेथील पाणी वाई शहरातील काही मंदिरातही आणले होते.[४९]

#### ४.३.११.१ भित्तिचित्रकला

सरदार आनंदराव रास्ते यांनी मोतीबागेतील हवेली ही एक सुंदर इमारत १७८७ मध्ये बांधली. ही हवेली भित्तिचित्रासाठी प्रसिद्ध आहे. ही वास्तू सध्या भग्नावस्थेत असलेल्या उद्यानाच्या मध्यभागी आहे. या वास्तूचे छत आणि स्तंभामधील जागा राजस्थानी शैलीतील सुंदर भित्तिचित्रांनी चित्रांकित केली आहे. या महालाच्या भिंतीसुद्धा सभागृहदृश्य, घरगुती जीवन, युद्धावर निघालेले सैन्य व पुराणातील कथांनी चित्रांकित केल्या आहेत. या भित्तिचित्रांसाठी दिपवून टाकणारे रंग वापरले आहेत. पहिल्या मजल्यावरील सभागृहातील काही भित्तिचित्रे निस्तेज झालेली आहेत. या सभागृहाच्या चारही कोपऱ्यावर लैलामजनूची चार चित्रे

आहेत. मजनूच्या केसाचा पेंड कलात्मकतेने रेखिव केला आहे. या चार चित्रामुळे थोडी समरूपता आली असली तरी बाकीची चित्रे कुठेही कशीही चितारली आहेत. चित्रांचा सर्वसाधारण आकार १०X७.५ असा आहे.

### ४.३.११.२ मोतीबाग वास्तूमधील कलात्मकदृष्ट्या महत्वाची भित्तीचित्रे –

टाळ व मृदंग वाजविणाऱ्या महिला, वीणा व डफ गाजविणाऱ्या महिला, दंड, अब्दागिर व चौरीधारी परिचर, ब्राह्मण सरदार, मंदिरगामिनी, मोराचेल व चौरीधारी महिला, गणेश, चौरी व अब्दागिरधारी महिला, मयुरारूढ सरस्वतीदेवी, नर्तकी, चौरीधारी महिला व सारंगीवादक पुरूष, रागिणी हमविरा (राजस्थानी प्रकारची फुगडी खेळणारी महिलांची जोडी) व ब्राह्मण सरदार, तोत्रपाठक ब्राह्मण, गजेंद्र मोक्ष, गुजगोष्टी करणारे दांपत्य, शृंगारिक दांपत्य आणि नौकाविहार करणारा श्रीकृष्ण, भिंतीवर हुक्का ओढणारी महिला, बालगणेश व पार्वती, गोवर्धनधारी श्रीकृष्ण, लैला–मजनू आणि प्रेमविरहिणी, राणी रूपमती बाजबहादूर व बाजीराव–मस्तानी ही प्रणयी युगुले इत्यादी आहेत. हे चरित्र पुरूषांच्या डोळयावरील अब्दागिरी तसेच महिलेच्या मुस्लिम पोषाख यावरून ते बाजीराव–मस्तानीचे चित्र आहे.[५०]

पूर्वेकडील छताखाली शिर्षपादावर ओळीने दशवतारांतील विष्णूची मत्स्य, कूर्म, वराह, परशुराम, राम, कृष्ण इत्यादी रूपे पौराणिक क्रमानुसार दर्शविली असून शेवटी कल्की व बुद्ध यांच्या अवतारप्रतिमा चितारल्या आहेत. त्यानंतरच्या एका दृश्यात श्रीकृष्ण एका लहान होडीतून गोपीसह जलविहार करीत आहे. पाण्याचा रंग निळसर दाखविला असून त्यात खेकडे व मासे रेखाटले आहेत. यानंतर पंचमुखी शिव नंदीवर आरूढ असलेले एक व्यक्तीचित्र आहे. त्यानंतर गजेंद्रमोक्ष दृश्य दाखविले आहे. त्याच्यापुढे प्रणयी जोडपे दाखविले असून प्रियकर आपल्या प्रेयसीला वृक्षावरील पक्ष्यांचे समागमदृश्य दाखवित आहे. या चित्ररांगेत मयुरारूढ सरस्वतीचे एक चित्र आहे. त्या मोराच्या पुढे भगवा ध्वज घेऊन श्रीकृष्ण चालण्याच्या ढंगात दाखविला आहे. मोराच्या पाठीमागे ही एक व्यक्ती चालताना दाखविली आहे. या भित्तिचित्रातील सरस्वतीचा पेहराव मोगल सजपूत चित्रशैलीचा प्रभाव दर्शवितो.

दक्षिणेकडील छताखाली शिर्षपादापासून भिंतीवर सर्वत्र भित्तिचित्रे आढळतात. यातील एका चरित्रात लोकनृत्यात तल्लीन झालेल्या दोन सुंदर युवतींचे चित्र अरहे. त्या दोघीनी एकमेकींच्या हातात हात घातला असून त्यांच्या नजरा एकमेकींसमोर परस्परांच्या देहावर खिळल्या आहेत. या चरित्राचे गतिमानता हे वैशिष्ट्य होय. या लोकनृत्यात जोश वाटत असून

या युवतीच्या मुद्रा लाल रंग, पेहराव लक्षणीय आहेत. या चित्रावरील राजस्थानी प्रभाव रंगछटात व पेहरावात प्रकर्षाने दिसून येतो. या चित्राच्या बाजूला एक बाल गजाननाचे चित्र आहे. आपली माता चित्रात पार्वतीने निळसर साडी नेसली असून साडीच्या निऱ्या बैठकीवर लोळत आहेत. यावरून पार्वती ही रांगडी स्त्री वाटते.

शिर्षपादाखाली आणि दाराच्या दोन्ही बाजूच्या चौकटीत व प्रत्यक्ष भिंतीवर चार मध्यम आकाराची भित्तिचित्रे आहेत. त्यातील एका चित्रात एक सरदार आणि त्याची सहचारिणी स्वतंत्र घोडयावर बसून लवाजम्यासह त्या विहिरीकडे येत आहे. त्यांच्यासमवेत एक कुत्रा चालताना दाखविला आहे. विहीरीजवळ एक स्त्री एका सजनिकाच्या ओंजळीत पाणी ओतीत आहे, असे दाखविले आहे. या चित्रातील रंगसंगती व रेखाटन कौशल्यपूर्ण केले आहे. या चित्राच्या बाजूला श्रावणबाळ असून त्याच्या टोपल्यात अंध व वृद्ध आईवडील बसले आहेत. दुसऱ्या एका एका चित्रात वाघाच्या शिकारीचे दृश्य दाखविले आहे.

पश्चिमेकडील शीर्षपादावर गणपती, सरस्वती, छत्रपती शाहू महाराज इत्यादीची व्यक्तीचित्रे आढळतात. छत्रपती शाहू महाराजांचे भारत इतिहास संशोधक मंडळातील चित्राशी साम्य दर्शविणारे व्यक्तीचित्र आहे. या चित्रात शाहू महाराज उभे असून त्यांच्या हातात ससाणा हा पक्षी आहे. तसेच निसर्गसौंदर्य दाखविले आहे. वरील चित्राव्यतिरिक्त सरदार, मंत्रपठण करणारा ब्राह्मण, हितगुज करण्यात मग्न असलेले जोडपे, फळे देणारा सेवक, गौळण, भिन्न प्रकारची व्यक्तिचित्रे काढली आहेत.[५१]

### ४.३.१२ जयराम स्वामी वाडा

सातारा जिल्हयातील खटाव तालुक्यातील औंध या पंतप्रतिनिधींच्या राजधानीजवळ वडगाव या गावी संतश्रेष्ठ श्री जयराम स्वामी यांचा मठ आणि समाधी मंदिर तसेच निवासस्थान (वाडा) महाराष्ट्राच्या इतिहासाचा फार मोठा ठेवा आहे. जयराम स्वामी व त्यांचे उत्तराधिकारी मठाधिपती आजही ज्या वाडयात राहात आहेत, ती वास्तू आपणास जुन्या–नव्या स्थितीत पाहावयास मिळते. वडगाव या गावाच्या साधारणपणे मध्यभागी हा वाडा आहे. वाडयाचा दरवाजा सागवानी लाकडांचा आठफुटी असून त्याची साडेचार इंच जाडीची दारे अजूनही सुस्थितीत आहेत. त्याच्यावरील नगारखाना ही मुळ स्वरूपातील आहे. त्यावर हनुमंताची प्रतिमा कोरली आहे.

दरवाजातून आत प्रवेश केल्यास दोन्ही बाजूला ओसऱ्या आहेतच, त्या सुस्थितीत असून त्याची जोती व समोरच चहू बाजूस चौसोप्याची साडेचार फूट उंचीची जोती आहेत. पाच पायऱ्या चढून आपण बाजूच्या सोप्यात प्रवेश केल्यावर समोर संतश्रेष्ठ जयराम स्वामींची गादी ठेवलेली आहे. तीन मोठे सोपे आहेत. एका सोप्यावर जुना दुसरा मजला, एक सोपा पडीक पूर्वावस्थेत, तसाच ४० फुटाचा चौरसाकृती आकाराचा चौक आहे.[५२]

सर्व सोपे दुघई असून ते तळखडयावरील मजबूत खांबावर उभे आहेत. सध्या त्याचे नुतनीकरण केले असले तरी याचे पूर्वीचे स्वरूप तसेच टिकून आहे. चौदाखणी दुघई दुमजली या वाडयात श्री जयराम स्वामींचे १४ वे उत्तराधिकारी प.पू. विठ्ठलबुवा गुरुगोपाळबुवा गोसावी इनामदार हे वास्तव्य करतात आणि पूर्वपरंपरा सांभाळत आहेत.

वाडयाच्या आतील दालनात ३० X ५० फूट या आकाराचे देवघराचे स्वत्रं दालन असून त्यात अष्टकोनी सुरेख देवघर आहे. या देवघरात पंचधातूंच्या तेहतीस प्रकारच्या देवतांच्या मूर्ती आहेत. वाडयात जुने मोठया आकाराचे घंगाळ आणि दळणाचे जाते पाहावयास मिळते. वाडयात ३ द ४ फूट अशी चार भित्तिच्रिो होती. त्यामध्ये महाभारतातील प्रसंग, जयराम स्वामी व त्यांचा शिष्यपरिवार, संत रामदास तसेच जयराम स्वामी राजसन्मानासमवेत इ. होत. महाभारतातील जांबुवंत, व्यास, बळीराजा, कृपाचार्य, पराशर, अंबरीश, शुक, शौनिक, भीष्म, वसिष्ठमुनी या व्यक्ती रेखाटल्या आहेत. मराठा च्रिाशैलीतील सर्वांत जुनी (१७ व्या शतकातील) भित्तिचित्रे आहेत. ही सर्व भित्तिचित्रे सुरक्षित राहावीत म्हणून सातारा येथील श्री छत्रपती शिवाजी वस्तुसंग्रहालयामध्ये हलवण्यात आली. वाडयाचा विस्तार, तेथील स्वच्छता, टापटीपपणा त्याचे वैभव आणि पाव्रिय अखंड राखण्यात कारणीभूत आहे.[५३]

### ४.३.१३ ऐतिहासिक वास्तू किन्हईचा वाडा

सातारा जिल्हयात किन्हई हे ठिकाण तेथील वाडयामुळे नदीवरील छोटी मोठी देवळे नैसर्गिक सौंदर्य यामुळे प्रसिद्ध आहे. कोरेगावच्या उत्तरेला ११ कि.मी. वर वसना नदीच्या उपनदी काठी वसलेले आहे. या ठिकाणी श्रीमंत परशुराम प्रतिनिधी पंत यांनी राजवाडा बांधला. ते या पंचक्रोशीतील कुलकर्णी होते. त्यांनी हा वाडा १७३३ साली बांधला. हा वाडा पेशवाईच्या काळातील आहे.[५४]

कोरेगाव पासून ११ कि.मी अंतरावर वसना नदीची उपनदी वांगना नदीकाठी किन्हई हे गाव आहे. श्रीमंत परशुराम प्रतिनिधी उर्फ फोटे पंत यांनी या ठिकाणी बांधलेल्या वाडयामध्ये भरपूर चित्रे आहेत. ती सुस्पष्ट असून गोलाकार वक्राकार प्रभावी व सुक्ष्म हावभाव दाखविणारी

नग्न अवस्थेतील चित्रे आहेत. त्यांची मांडणी मराठी शैलीतील आहे. वाडयाची लांबी साधारणतः १८० फूट व रूंदी ९० फूट असी आहे. वाडयातील ओसरी शेजारील चौकोनातील भिंतीवर देवदेवतांची चित्रे आहेत. ती पुसट झाली आहेत. भिंतीच्या खालच्या बाजुला तोडीचे भक्कम असे बांधकाम आहे. त्याच्यावर विटांचे बांधकाम आहे. वाडयाभोवती तटभिंत असून ती मजबूत आहे. वाडयाच्या वरच्या बाजूला जुन्या काल्या कौलाचे छप्पर आहे ते आता पहिल्या इतके मजबूत राहिले नाही.

वाडयाच्या कोनाडयात राम, सीता, अंबाबाई अशी देवदेवतांची भित्तिचित्रे दिसून येतात. वाडयातील स्वागत कक्ष भव्य अंडाकृती प्रकारचा आहे. वाडा तीन मजली असून खाली ९ त्याच्यावर ८ व त्याच्यावर ७ असा कोल्या आहेत. वाडयाला संपूर्ण सागवानी लाकडाचा वापर करण्यात आलेला आहे. वाडयाच्या आतमध्ये पाण्यासाठी छोटासा आड आहे. वाडयात तीन जीने देखील आहेत. वाडयात दोन भुयारे आहेत.[५५]

वांगणा नदीच्या काठावर असलेल्या श्रीमंत परशुराम पंत प्रतिनिधीच्या वाडा पश्चिमाभिमुख असून त्याच्या पश्चिमेकडे ओढयाच्या उजव्या तीरावर महादेवाचे मंदिर आहे. तसेच ओढयाच्या पात्रापर्यंत पायऱ्या आहेत. मंदिरास सर्व बाजुंनी खुला मंडप आहे. तयस गाभारा व शिखर आहे. वाडयाच्या समोरील बाजूस मारूतीचे मंदिर आहे. वाडयाच्या पाठीमागील बाजूस एकवीरा देवीचे पुराण मंदिर आहे. वाडयापासून ४०० मीटर अंतरावर मोठे मंदिर आहे. वाडयाच्या समोरील बाजुस ८० ते ७० फुट मैदान आहे व वाडयाच्या साईटला ५० ते ४० फुट मैदान आहे.

श्रीमंत परशुराम प्रतिनिधी यांनी किन्हई येथे बांधलेल्या वाडा पाहिला की, त्यांच्या कला रसिकतेची दाद घ्यावीशी वाटते. महाराष्ट्रात बहुतेक वाडे हे सरळ रेषेत बांधलेले आढळतात. वाडयामध्ये राजा व राणीचे निवासस्थान आहे. राणीसाठी सात खोल्यांचा महाल आहे. वाडयामध्ये भुयारी मार्ग आहेत.

किन्हई या नदीवर देवळे खूप वर्षापूर्वीची असल्याची आढळतात. तसेच वाडयाचे बांधकामाच्या शैलीची माहिती होते. एवढया कालखंडानंतरही हे वाडे आजही वैशिष्टयपूर्ण असल्याचे जाणीव होते. वाडयांची बांधणी करताना जमिनीपासूनची उंची भिंतीना वापरलेले दगड, चुना, विटा यांचा वैशिष्टयपूर्ण उपयोग केल्याचे दिसते. भिंती छत खांब यावरील नक्षीकाम मन आकर्षित करून घेतात. वायुविजनासाठी विशिष्ट तंत्रज्ञानाचा वापर केलेला दिसतो.[५६]

किन्हई येथील वाडा एक ऐतिहसिक वास्तू म्हणून प्रसिद्ध आहे. वाडयातील चित्रकला, रंगसंगती आजही मानवी मनावर आपला ठसा उमटवतात या चित्रावरून तत्कालिन रंगसंगतीच्या कल्पनेची माहिती मिळते. वाडयाची बांधकाम पद्धती नद्यावरील देवदेवतांची मंदिरे यामुळे तत्कालिन बांधकामाच्या तंत्रज्ञानाची व बुद्धीकौशल्याची जाणीव होते. वाडयातील भिंती त्याची उंची वायूविजनाची सोय बांधकामासाठी वापरलेला दगड भिंतीवरील देवदेवतांची चित्रे यावरून तात्कालिन सामाजिक, धार्मिक जीवनाची माहिती मिळते. षा वास्तूमुळे ऐक्य प्रेरण स्फूर्ती व आत्मसन्मान वाढीस मदत होते. ऐतिहासिक परंपराची जाणीव होते अशा वास्तूना पुन्हा दुरूस्त करण्याचे काम केले जावे म्हणजे अशा वास्तू इतिहासाची माहिती देतात हे येथून लक्षात येईल.

या वाडयांशिवाय खंडाळा तालुक्यातील शिरवळ येथील देशमुख, वडगाव येथील पोतनीस, कोपर्डे व सालपे येथील शिंदे, हिंगणगाव येथील भोईटे, खामकरवाडी येधील लेंढे, फलटण तालुक्यातील वाठार निंबाळकर येथील निंबाळकर, गिरवी येथील कदम, माण तालुक्यातील कुळकजाई येथील घाटगे, खटाव तालुक्यातील राजापूर व बुध येथील घाटगे, खटाव येथील खटावकर, सिद्धेश्वर कुरोली व औंध येथील पंतप्रतिनिधी, राजाचे कुर्ले येथील भोसले, कराड येथील पंतप्रतिनिधीचा भुईकोट, पाटण तालुक्यातील तारळे येथील महाडीक, सातारा तालुक्यातील मांडवे येथील जाधव व देशमुख, पसरणी येथील शेख मीर व जावळी येथील मोरे यांचे वाडे मराठाकालाचे अस्तित्त्व दाखवून देतात. या वाडयांची दुरावस्था झालेली आहे. यातील काही वाडयांच्या फक्त चौकटीच उभ्या आहेत. तर काही वाडयांच्या दगडी व विटांच्या भव्य कमानी शिल्लक आहेत. काहींचे तर फक्त अस्तित्व दाखविते. काही वाडयांच्या फक्त संरक्षण भिंतीच उभ्या आहेत. काही वाडयांचे अस्तित्वच नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. काही वाडयांचे आधुनिकीकरणाने स्वरूपच पालटून गेले आहे. त्यामुळे या वाडयांबाबत तत्कालीन वास्तशैलीची माहिती देता येत नाही.

## संदर्भ


१. प्रत्यक्ष सर्व्हेक्षणातून

२. प्रत्यक्ष सर्व्हेक्षणातून

३. प्रत्यक्ष सर्व्हेक्षणातून

४. पहा प्लेट नं. १८, a

५. पहा प्लेट नं. १८, b

६. पहा प्लेट नं. १८, c

७. पहा प्लेट नं. १८, d

८. पहा प्लेट नं. १८, e

९. पहा प्लेट नं. १८, f

१०. पहा प्लेट नं. १९, a

११. पहा प्लेट नं. १९, b

१२. पहा प्लेट नं. १९, c

१३. पहा प्लेट नं. १९, d

१४. पहा प्लेट नं. १९, e

१५. पहा प्लेट नं. २०, f

१६. पहा प्लेट नं. २०, a

१७. पहा प्लेट नं. २०, b

१८. पहा प्लेट नं. २०, c

१९. पहा प्लेट नं. २०, d

२०. पहा प्लेट नं. २०, e

२१. पहा प्लेट नं. २०, f

२२. पहा प्लेट नं. २१, a

२३. देशपांडे महेश, साताऱ्याच्या परिसरात, २००८, पृ.१३४

२४. कित्ता

२५. पहा प्लेट नं. २१, b

२६. पुरंदरे बाबासाहेब, पुरंदरच्या बुरूजावरून, १९९८, पृ.२५

२७. शिवदे सदाशिव, महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे– खंड २, स्नेहल प्रकाशन पुणे, २०१५, पृ १२३

२८. पहा प्लेट नं. २१, d

२९. पहा प्लेट नं. २१, c

३०. प्रत्यक्ष सर्व्हेक्षणातून

३१. पहा प्लेट नं. २१, f

३२. पहा प्लेट नं. २२, a

३३. प्रत्यक्ष सर्व्हेक्षणातून

३४. पहा प्लेट नं. २२, c

३५. आपटे बी.के. मराठा वाल पेंटिग्ज, पृ.३२

३६. प्रत्यक्ष सर्व्हेक्षणातून

३७. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री(संपा.), मराठी विश्वकोश खंड १२, पृ.५१४

३८. सातारा जिल्हा गॅझटियर, १९९९, पृ.८५४

३९. देशपांडे सु.र., वाई: कला आणि संस्कृती, २०११, पृ.९७, ९८

४०. कित्ता, पृ.८८, ८९

४१. प्रत्यक्ष सर्व्हेक्षणातून

४२. प्रत्यक्ष सर्व्हेक्षणातून

४३. देशपांडे सु.र., वाई: कला आणि संस्कृती, २०११, पृ.१२८, १२९

४४. पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८५९

४५. दै.पुढारी, सातारा आवृत्ती, ७६ वा वर्धापनदिन विशेषांक पुरवणी अंक, १३ जानेवारी २०१५, पृ.२

४६. लांजेकर रू. ज., सातारा जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळे, १९९३, पृ.१०

४७. पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.९०३

४८. कित्ता, पृ. ८७७

४९. देशपांडे सु.र., वाई: कला आणि संस्कृती, २०११, पृ.१४९

५०. आपटे बी.के.,उपरोक्त, पृ.११९

५१. देशपांडे सु.र., वाई: कला आणि संस्कृती, २०११,पृ.१०८

५२. प्रत्यक्ष सर्व्हेक्षणातून

५३. प्रत्यक्ष सर्व्हेक्षणातून

५४. पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.५४

५५. मुलाखत – सागर भोसले– ७/२/२०१८, वेळ दुपारी ३.०० वाजता

५६. प्रत्यक्ष सर्व्हेक्षणातून


प्लेट नं.१८



a



b



c



d




e




f

## प्लेट नं.१९



a



b




c



d




e



f

## प्लेट नं.२०




a



b




c



d




e



f

प्लेट नं.२१





a

b





c

d






e

f

प्लेट नं.२२



a



b



c

## ४.४ सातारा जिल्ह्यातील मराठाकालीन संरक्षण वास्तू

संरक्षण हे मानवी जीवनाचे महत्त्वाचे अंग आहे. निसर्गत: मानवाचा तो हक्क आहे. मानव आपले संरक्षण करण्यासाठी अनेक उपाय योजना करत आलेला आहे. प्रारंभी वैयक्तीक सुरक्षा, कुटुंबव्यवस्था निर्माण झाल्यानंतर कुटुंबाचे संरक्षण, टोळीच्या स्वरूपात राहण्याच्या अवस्थेत टोळीचे संरक्षण, स्थैर्य प्राप्त झाल्यानंतर वस्तीचे संरक्षण, संपत्ती मिळविल्यानंतर संपत्तीचे संरक्षण यातून समाज, राज्य यांचे संरक्षण अशी काळानुरूप व परिस्थितीनुरूप संरक्षणाची व्याप्ती वाढत गेली. प्रारंभी नैसर्गिक आपत्ती नंतर हिंस्त्र प्राणी नंतर मानव प्राणी असे संकटाचे स्वरूपही बदलत गेले. संकटाच्या स्वरूपाबरोबर संरक्षणाचेही स्वरूप बदलत गेले. प्रारंभीच्या काळातील जंगल, जंगलतील झाडे, गुहा, भूमीगत घरे अशी संरक्षणाच्या व्यवस्थेत बदल होत गेले. यातूनच कोट, किल्ला, गढी अशी संरक्षणव्यवस्थेचे प्रकार निर्माण झाले. ऋग्वेदामध्येही किल्ल्याचा उल्लेख आहे. स्मृती ग्रंथ व आर्य चाणक्य लिखित अर्थशास्त्र ग्रंथामध्ये प्राचीन काळातील संकटच्या स्वरूपानुसार संरक्षणाच्या दृष्टीने सविस्तर चर्चा केली आहे. सोमेश्वरदेव लिखित अभिलाषीतार्थ चिंतामणी, बसवराज लिखित शिवतत्त्व रत्नाकर, आकाशभैरवकल्प या ग्रंथामध्ये किल्ल्यांच्या स्वरूपाबद्दल व त्यांच्या प्रकाराबाबत चर्चा केलेली आहे.

महाराष्ट्रामध्ये प्राचीन काळामध्ये शिलाहार घराण्यातील राज भोज याने किल्ल्यांचे महत्त्व ओळखून अनेक किल्ले बांधले. या किल्ल्यांपैकी अनेक किल्ले सध्याच्या सातारा जिल्ह्यामध्ये आहेत. यादव घराण्यातील सिंधण याने देवगिरी हा किल्ला बांधला. पुढील काळामध्ये इस्लामी राज्यकर्त्यांनी त्यामध्ये गरजेनुसार भर टाकली. इस्लामी राज्यकर्त्यांनी काही किल्ले बांधले.

मराठाकाळामध्ये विशेषत: शिवकाळामध्ये डोंगरी किल्ले, भुईकोट, व जलदुर्ग या प्रकारच्या किल्ल्यांना अत्यंत महत्त्व मिळाले. छ. शिवाजी महाराजांनी किल्ल्यांचे महत्त्व ओळखून अनेक किल्ले नव्याने बांधले, जुने किल्ले दुरूस्त केले. आपल्या महसूलाचा फार मोठा भाग किल्ले बांधणे, दुरूस्त करणे व किल्ल्यांवर सुविधा करणे यावर खर्च केला. मराठयांची प्रशासकीय कार्यालये किल्ल्यावर होती. मराठयांनी किल्ल्यांच्या साह्याने स्वराज्याचे अनेक संकटातून रक्षण केले. रामचंद्रपंत अमात्य यांनी आज्ञापत्र या ग्रंथामध्ये किल्ल्यांचे महत्त्व सांगितले आहे. पेशवेकाळामध्ये मराठी सत्तेचा विस्तार झाला. मराठयांनी आक्रमक धोरण

स्वीकारल्याने मराठयांचे किल्ल्यांकडे फारसे लक्ष राहीले नाही. पेशवाईच्या अस्तानंतर ब्रिटीशांनी किल्ले पाडून टाकले.

मराठयांच्या स्वातंत्र्ययुद्धामध्ये सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांनी मराठयांना संरक्षण देण्याबरोबरच मोगलांचे कंबरडे मोडले. मराठा कालखंडातील दुसऱ्या कालखंडामध्ये सातारा हे मराठयांची राजधानी राहीली. छ. शाहू महाराजांच्या मृत्यूपर्यंत राज्यकारभाराची सूत्रे सातारा येथूनच हालत असत.

सातारा जिल्हा भौगोलीकदृष्टया कोणत्याही सागराशी जोडल्या नसल्याने सातारा जिल्ह्यामध्ये जलदुर्ग नाहीत. सातारा जिल्हा हा सह्याद्रीच्या रांगामध्ये आहे. महादेव डोंगर रांगा आहेत. त्यामुळे सातारा जिल्ह्यात डोंगरी किल्ले आहेत. एक भुईकोट आहे परंतु त्याचे अस्तित्त्व एका बुरूजापुरतेच राहीले आहे. प्रस्तूत भागामध्ये सातारा जिल्ह्यातील किल्यांच्या संरक्षक घटकांची चर्चा केलेली आहे.

### ४.४.१ संरक्षक वास्तूंचे प्रकार

संरक्षण ही मानवाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याने कालपरत्त्वे संरक्षण व्यवस्था केली. आपल्या प्रदेशातील संरक्षण व प्रशासन व्यवस्थेसाठी उभारलेली वास्तू म्हणजे किल्ले. इंग्रजीमध्ये कॅसल, फोर्ट, बर्ग असे म्हटले जाते. मराठा कालखंडामध्ये तीन प्रकारची संरक्षण व्यवस्था असल्याचे दिसते. यामध्ये गढी, कोट (नागरी संरक्षण) व किल्ले यांचा समावेश होतो.

#### ४.४.१.१ गढी

अनेक राजसत्तांच्या काळामध्ये त्यांची संस्कृती आणि धार्मिक अधिष्ठान असलेल्या अनेक वास्तू तयार झाल्या त्यामध्ये विविधतेबरोबर कलात्मकता आहे. यामध्ये अभेद्य तटबंदीच्या अनेक गडकोटांचा हिस्सा फार मोठा आहे. गडकोट हे तत्कालीन संरक्षण व्यवस्थेचा कणा होता. पण या सत्तांच्या नियंत्रणाखाली असलेल्या स्थानिक प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी गढी निर्माण झाल्या. गढी म्हणजे आक्रमणापासून बचाव व्हावा म्हणून किल्ल्यासारखे घर किंवा राजवाडा होय. सरदार किंवा श्रीमंत लोक या वास्तूचा उपयोग राहण्यासाठी करत. शक्यतो उंच जागेवर किंवा टेकडीवर, आक्रमण करण्यास आण्नि पोहोचण्यास अवघड अशा ठिकाणी या वास्तूंचे बांधकाम केले जात असे. आक्रमणापासून वाचण्यासाठी किंवा आक्रमण झाल्यास अनेक साधने व युक्त्या योजलेल्या असत. गढी म्हणजे स्थानिक प्रशासन व्यवस्था संभाळणारे सत्ताकेंद्र असे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाची ही प्राथमिक

अवस्थाच होती. येथून मुलकी महसूल जमा करण्याच्या व्यवस्थेबरोबरच संरक्षणाची जबाबदारी सांभाळणाऱ्या देशमुख, इनामदार, पाटील, जहागीरदार यांच्या नावाने गढी ओळखली जाते.

गढीचे बांधकाम करताना परिसरातील उपलब्ध दगड, विटा, माती व चुना या साहित्याचा वापर केला गेला. गढीची तटबंदी चार ते पाच फूट रूंदीची असे. गढीला शक्यतो एकच प्रवेशद्वार असे. काही गढींना अनेक प्रवेशद्वारे आहेत. संकटाच्या काळी अन्नधान्याचा पुरवठा होण्यासाठी गढीमध्ये मोठे धान्याचे मोठे कोठार असे. युद्ध, दुष्काळ या परिस्थितीमध्ये याचा उपयोग होत असे. पाणी पुरवठा होण्यासाठी विहीरी असत. विहीरी बरोबरच मोठे देवघर, मोठे देवघर, माजघर, मुदपाकखाना, व्हरांडा, तुळशी वृंदावन यांची व्यवस्था दिसून येते.

सातारा जिल्ह्यामध्ये गढी नाही काही वाडयांना तटबंदी आहे, त्याबाबत निवासी वास्तू या भागामध्ये चर्चा केलेली आहे.

### ४.४.१.२ कोट

अति प्राचीन काळापासून मानव कोठेही गेला तरी श्त्रूला सुरक्षित अंतरावर ठेऊन त्याचा प्रतिकार करण्याची मानवाची सवय आहे. समोरा समोरच्या लढाईमध्ये मृत्यूची शक्यता असते म्हणून शत्रूला जास्तीत जास्त दूर ठेवणे हा एकमेव उपाय व खरी समस्या होती. मजबूत अडथळयामागे स्वत:वर बंधने आणणे हा त्यास पर्याय होता. प्रारंभी लाकडी किंवा बांबूची जाळीचा उपयोग केला गेला. हळूहळू पाण्याचा साठा असलेल्या जागेभोवती प्रंचड दगडी, विस्तृत बुरूज असलेल्या तटबंदीचा आश्रय घेण्यास सुरूवात केली.

प्राचीन काळी नगरांना भक्कम तटबंदी असल्याचे उल्लेख मिळतात. मोहेंजेदडो व हडप्पा या नगरांना तटबंदी होती. मथूरा व पाटलीपूत्र या प्राचीन नगरांना संरक्षक भिंत होती. सर्वच खेडे व नगरांना संरक्षक भिंती होत्या.

मध्ययुगीन कालखंडामध्येही नगर व खेडयांना तटबंदी बांधणाची परंपरा चालून राहीली. त्यामुळे समाजाला संरक्षण मिळाले. औरंगाबाद, विजापूर, सोलापूर व विजापूरला तटबंदी होती. प्राचीन कालीन तटबंदीपेक्षा मध्ययुगीन तटबंदी मजबूत होती. युद्धातील तोफांच्या वापरामुळे तिच्या उंची व रूंदीमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाली. राजकिय अस्थिरतेच्या कालखंडामध्ये शत्रूबरोबरच चोर दरोडेखोर यांच्यापासून संरक्षण होण्यासाठी या तटबंदीचा उपयोग झाला. तत्कालीन साधनांमधून सत्ताधीश व लोकांच्या दृष्टीने संरक्षक भिंतीचे महत्त्व दिसून येते. बहुतांशी गावांच्या व नगरांच्या संरक्षक भिंती कोरडया दगडांच्या किंवा भाजलेल्या

विटा व चिखलाचा वापर करून बांधलेल्या आहेत. संरक्षक भिंत बांधण्यासाठी भाजलेल्या विटांचा वापर केला जात असे. रास्ते यांनी संपूर्ण भोवती नवी तटबंदी बांधली.[१]

सातारा जिल्ह्यामध्ये पाचवड, सोळशी, राजाचे कुर्ले व कराड या गावांना तटबंदी असल्याचे दिसते. आजच्या काळामध्ये बहूतांशी संरक्षक भिंती पूर्ण नष्ट झाल्याने मराठाकालीन की मराठपूर्वकालीन काम आहे हे काल ठरविणे अवघड आहे.

### ४.४.१.३ प्रवेशद्वारे

मध्ययुगामध्ये इस्लामी सत्ताधीशांनी अनेक महत्त्वाच्या बाहेर जाणाऱ्या रस्त्यांवर भव्य प्रवेशद्वारे उभारली. जरी प्रवेशद्वारे संपूर्ण नगरांना सामावून घेत नसली तरी त्यांनी नगरातील महत्त्वाच्या भागाकडे जाणारे प्रवेश बंद केले. प्रवेशद्वार कमानीच्या स्वरूपामध्ये असे. ज्यावेळी प्रवेशद्वार बंद केले जात असे त्यावेळी शत्रूला प्रवेश करणे दुरापास्त होत असे कारण प्रवेशद्वारास दोन द्वारे असत. दोन द्वारांच्यामध्ये पहारेकऱ्यांच्या खोल्या असत. त्याच्या छप्प्रावर पॅरापिट असे. सातारा जिल्ह्यामध्ये वाई, बावधन येथे प्रवेशद्वारे आहेत. ही दोन्ही प्रवेशद्वारे मराठा कालखंडातील आहेत.

### ४.४.१.४ खंदक

खंदक हा संरक्षण स्थापत्यातील महत्त्वाचा घटक होता. भुईकोट किल्ल्याच्या सभोवती व शहाराभोवती खंदक खणला जात असे. खंदक खोल व रूंद असे. युद्धाच्या वेळी खंदकामध्ये पाणी सोडले जाई. पाण्यामध्ये मगरी असत. ये जा करण्यासाठी लाकडी पूल असे. सातारा जिल्ह्यामध्ये कोणत्याही नगराला खंदक नव्हता.

### ४.४.१.५ किल्ले

मराठी सत्तेच्या काळात किल्ल्यांना सर्वात जास्त महत्त्व मिळाले. मध्ययुगीन युद्धपद्धतीमध्ये किल्ला हा सर्वात महत्त्वाचा घटक होता. छत्रपती राजाराम यांचे विश्वासू प्रधान रामचंद्रपंत आमात्य यांनी कोल्हापुरचे राजपूत्र संभाजी यांच्या मार्गदर्शनासाठी आज्ञापत्र हा ग्रंथ लिहीला. या ग्रंथामध्ये किल्ला दुरूस्ती व किल्ल्याचे महत्त्व यावर एक स्वतंत्र प्रकरण आहे. कौटिल्याने अर्थशास्त्र ग्रंथामध्ये किल्ल्यांची चर्चा केली आहे. मानसराकृत शिल्पशास्त्र या ग्रंथामध्ये किल्ल्याची रचना, प्रकार व किल्ल्याच्च्या देखभालीबाबत चर्चा केली आहे.अनेक पुराणे व नितीमध्ये या विषयाबाबत माहिति मिळते.

सातारा जिल्ह्यामध्ये डोंगरी किल्ले आहेत. यामधील अजिंक्यतारा, चंदन वंदन वैराटगड इ.स. ११७८, हे किल्ले शिवपूर्वकाळामध्ये शिलाहार घराण्यातील राज भोज दुसरा

याने बांधले. छत्रपती शिवाजी महाराजांनी भूषणगड १६७६ मध्ये मच्छिंद्रगड १६६७ मध्ये, मकरंदगड १६६५ मध्ये, महिमानगड १६५६ मध्ये, प्रतापगड १६५६ मध्ये, वर्धनगड व वारूगड १६७४ मध्ये, वसंतगड १६५३ मध्ये बांधला.[२] यातील चंदन वंदन हे जोडकिल्ला आहे.

शत्रूच्या हल्ल्यापासून संरक्षण करण्यास सुलभ जावे आणि आसपासच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवता यावे म्हणून बांधलेल्या वास्तूला किल्ले म्हणून संबोधले जाते. या किल्ल्याच बांधकाम व उपयोग फार प्राचीन काळापासून सर्व जगभर होत आला आहे. प्राचीन काळात सिंधू नदीच्या खोऱ्यात हडप्पा या शहरास तटबंदी होती आणि शहराच्या मध्यभागी बालेकिल्ला बांधला होता. असे तेथील अवशेषावरून दिसून येते. यावरून हे स्पष्ट होते की किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारीही घेतली गेली होती. कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथातील माहितीवरून किल्ले स्थापत्याची माहिति मिळते. किल्ल्याची बांधणी एका विशिष्ट पद्धतीने करण्यात येई. वाकाटक, गुप्त, राष्ट्रकूट या सत्ताधीशांच्या काळात किल्ल्यास फारसे म्हत्व आलेले नसले, तरी त्यांचे राजवाडे व शहरे तटबंदीने युक्त असत. मुसलमान पूर्व काळात चालुक्य, शिलाहार, यादव या वंशाच्या वेळी किल्ल्याचे महत्व असाधारण वाढले होते. तशीच परिस्थिती मध्ययुगीन काळात किल्ले सरंक्षण व्यवस्था केलेली दिसून येते. हे किल्ले बांधत असताना ते नैसर्गिकदृष्टया सुरक्षित कसे राहतील यादृष्टिने व्यवस्था पाहिली जात होती. तसेच त्या किल्ल्यावर बारमाही पाणीपुरवठा व्हावा यादृष्टिनेही व्यवस्था केली जात होती. तेव्हा या प्रकरणात किल्ले संरक्षण व्यवस्थेची सविस्तर माहिती पाहणार आहोत.

### ४.४.१.६ किल्ले संरक्षण व्यवस्था :–

महाराष्ट्राच्या डोंगरी प्रदेशात किल्ल्यांचे महत्व असाधारण होते. किल्ल्यांचे संरक्षण व्हावे यासाठी दोन गोष्टीकडे लक्ष पुरविले जात होते. त्या म्हणजे अ) किल्ल्यास निसर्गतः लाभणारी अभेद्यता, ब) किल्ल्यावरील प्रशासकीय अधिकारी व सैनिक हे होत. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे

### अ) किल्ल्यास निसर्गतः लाभणारी अभेद्यता :–

छ.शिवाजी महाराजांनी ज्या ठिकाणी अवघड जागा, विपुल पाणी, विस्तृत पठार इ. अनुकूल जागा पाहून मगच किल्ले बांधले. हे किल्ले संरक्षणाच्या दृष्टिने भक्कम व्हावेत यासाठी किल्ले बांधणाऱ्या कारागिरांना व कामगारांना छ.शिवाजी महाराज हे चांगले वेतन देत असत. किल्ले बांधणीसाठी देशी व विदेशी तंत्रज्ञांची ते मदत घेत असत. किल्ला बांधत असताना स्थळसंशोधन, जलसंचय, देखरेख, दरवाजा याकडेही लक्ष दिलेले दिसते. सहयाद्रीच्या उंच

सखल भागावर ज्याठिकाणी घाटनदाट अरण्य, विपुल पाणीपुरवठा व मोक्याची जागा किल्ला बांधणीसाठी निवडली जात होती. विशेषतः गिरीदुर्ग बांधताना ही काळजी घेतली जात होती. ही निसर्गतः लाभणारी अभेद्यता निर्माण करण्यासाठी किल्ला बांधताना ती काळजी घेतली जात होती. विशेषतः गिरीदुर्ग बांधताना ज्या ठिकाणी नैसर्गिक कडा असेल आणि तोही तुटून अलग झाला असेल तर अशा जागी तटबंदी बांधली जात नव्हती. कारण त्या भिंतवजा सरळसोट कडयावरून शत्रू गडावर येण्याची शक्यता जवळजवळ नव्हतीच.[३]

गिरीदुर्ग ज्या डोंगरमाथ्यावर बांधला जायचा. त्याच्या आसपास घनदाट जंगल असायचे. त्या डोंगर उतारावरचा किंवा जंगलाचा किंवा झाडाझुडपाचा उपयोग कसा करावा हे आज्ञापत्रात नमूद केलेले आहे. ते असे, ‘‘गडाची राखण म्हणजे कमरग्याची झाडी, ते झाडी प्रयत्ने वाढवावी, त्यामध्ये एक काठीही तोडू न द्यावी, बलकुलबीस त्या झाडीमध्ये हसमबंदुके (बंदुकधारी सैनिक) घालावे.’’[४] शवाजी महाराजांच्या सैन्याने मुघल सरदार कारतलबखानाची उंबरखिंडीत उडविलेली दाणादाण व प्रतापगडाच्या पायथ्याशी अफझलखानाच्या वधानंतर आदिलशाही सैन्याची झालेली वाताहत ही दोन उदाहरणे मराठयांच्या गनिमी काव्याबद्दल प्रसिद्ध आहेत.[५]

किल्ल्याचे संरक्षणासाठी तटबंदी, बुरूज, चिलखत(बुरूजामागील संरक्षक फळी–भिंत) पडकोट(बाहेरील भिंत) पहारे व मेट यावर प्रामुख्याने लक्ष दिले जात असे. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे –

**ब) तटबंदी–**

डोंगरमाथ्यावर पक्की दगडी तटबंदी बांधून व त्यात आवश्यकतेनुसार माऱ्याच्या जागा साधणारे बुरूज बांधून सर्व बाजू अभेद्य करीत असत. हया तटबंदीची लांबी–रूंदी कधीही कुठेही सारखी नसे. तटबंदी कधी डोंगरमाथ्यावरून दोन–दोन किंवा तीन–तीन माणसे जोडीने सहज चालत जाऊ शकतील इतकी रूंद, तर कधी एखादा माणूस कसाबसा चालू शकेल इतकी अरूंद व मुंढारणी केलेली असे. काही ठिकाणी तटबंदीच्या आत साहयक तट बांधला जात असे. अशावेळी बाहेरच्या तटबंदीस चिलखत म्हणत.

तटबंदी माऱ्याच्या जागा साधण्यासाठी बुरूज बांधलेले असत. हे बुरूज साधारणपणे बांधत आणि प्रसंगी ते चौकोनी, षटकोनी, अष्टकोनी किंवा बहुकोनीसुद्धा बांधत. हे बुरूज

सामान्यतः ज्यावर तोफा सहज बसविता येतील आणि तोफांचा मारा करताना त्यावर गोलंदाजासह सुमारे पाच–दहा माणसे सहज उभी राहू शकतील इतके विस्तृत असत.

तट बुरूजावरून युक्त असलेल्या संरक्षक भिंतीवरून गडातील सैनिकांना फिरता यावे व शत्रूचा खालून होणारा मारा चुकवून वरून त्यांच्यावर बाण व बंदुकीच्या गोळयांचा मारा करता यावा म्हणून तटबंदीत बाहेरच्या बाजूंनी उतरत गेलेली उभी किंवा आडवी अशी आरपार छिद्रे ठेवीत. तो कधी एकेरी, कधी दुहेरी तर कधी तिहेरी देखील असत. त्यांना जंग्या असे म्हणत.[६]

**क) माची :–**

गड ज्या डोंगरावर बांधलेला असतो. त्याच्या उतरणीवर साधारण मध्यभागी असलेल्या सपाट जागेला तट–बुरूजांनी युक्त असलेली संरक्षक भिंत बांधून बळकटी आणतात. त्या जागेला माची असे म्हणतात. गडाचा कमी उंचीचा आणि सपाटीवरचा, परंतु गडाशी प्रत्यक्ष संबंध असलेला हा भाग दुर्गशास्त्राच्या दृष्टीने फार महत्वाचा मानला जातो. यात विशेष म्हणजे माची ही फक्त गिरीदुर्गामध्येच असू शकते, पण प्रत्येक गिरिदुर्गाला माची असतेच असे नाही.

गिरिदुर्गाच्या सपाटीवर किंवा माचीवर मध्येच जर एखादा उंचवटा किंवा टेकडी असेल तर त्याचा डोंगरमाथा तट–बुरूजांच्या संरक्षक भिंतीने बांधून बळकट केलेला असतो. त्या भागाला बालेकिल्ला असे म्हणतात. माचीप्रमाणेच प्रत्येक गिरिदुर्गाला बालेकिल्ला असतोच असे नाही. बालेकिल्ला हा गिरिदुर्गाबरोबरच जलदुर्ग व भुईकोट किल्ल्याला ही असतो.[७]

**ड) गडाचे दरवाजे–**

गिरीदुर्गावरील तट–बुरूजमिश्रीत संरक्षक भिंतीतून आत प्रवेश करण्यासाठी दरवाजे होते. आज त्यांपैकी काही ढासळले आहेत. शिवकाळात गड म्हणजे महत्वाचे लष्करी ठाणे होते. त्यामुळे गडावर जाण्यासाठी परवाना घ्यावा लागत होता. किल्ल्याच्या दरवाजावरील पहारेकरी हे विनापरवाना किल्ल्यावर प्रवेश करणाऱ्यांना तुरूंगात टाकत असत. किल्ल्याचा दरवाजा सूर्योदयाच्यावेळी उघडला जात असे व सुर्यास्तावेळी बंद केला जात असे. गडाच्या दरवाजातून किंवा तटबंदीवरून आत प्रवेश करणे जितके कठीण तितकेच ते पायवाटेवरून जातानाही कठीणच असे. दरवाजाजवळची वाट ही जितकी अरूंद करता येईल तितकी करीत. कारण अरूंद वाटेमुळे गडाच्या दरवाजाबाहेर शत्रूसैन्य गर्दी करू शकणार नाही. तसेच जे शत्रुसैन्य जमेल ते गडाचा लाकडी दरवाजा फोडू शकणार नाही. त्यामुळे शिवकाळात तरी शत्रुसैन्याने स्वराज्यातील एखादा गड दरवाजा फोडून जिंकला असे एकही उदाहरण नाही.[८]

स्वराज्यातील गडाच्या दरवाजाची रचना व व्यवस्था कशी असावी याचे वर्णन करताना रामचंद्रपंत अमात्य आज्ञापत्रात लिहितात की, "दरवाजे बांधावे, ते खालील मार चुकवून, पुढे बुरूज देऊन, येती जाती(येणारा–जाणारा) मार्ग बुरूजाचे आहारी पडोन (माऱ्याखाली येऊन) दरवाजे बांधावेत." याशिवाय गडाला किती दरवाजे असावेत. याचे उत्तर देताना रामचंद्रपंत अमात्य लिहितात की, "किल्ल्यास एक दरवाजा थोर आयब आहे. याकरिता गड पाहून एक, दोन व तीन दरवाजे तश्याच चोरदिंडया करून ठेवाव्यात त्यामध्ये हमेशा राबत्या पाहिजेतितक्या ठेवून वरकड दरवाजे व दिंडया चिणून टाकाव्यात."[९] गडाच्या संरक्षण भिंती दरवाजांबरोबरच चोरदिंडया असत. गडाला शत्रुसैन्याला वेढा पडला असता आतील अन्नधान्य संपले, उन्हाळयात पाण्याची टंचाई जाणवू लागली किंवा साथीचा एक रोग पसरला तर शत्रु सैन्याशी वाटाघाटी न करता गडातील सैनिकांना जर गड सोडायचा असेल तर मुख्य दरवाजाचा वापर करणे सर्वथा धोक्याचे असे. अशा आणीबाणीच्या प्रसंगी गडाच्या दुर्गम भागातील एखाद्या छोटयाश्या दरवाजाने गड सोडून निघून जात. त्या छोटया दरवाजाला दिंडी म्हणत आणि त्या दरवाजातून ज्या अवघड वाटेने ते गड सोडीत त्या फारसा राबता नसलेल्या पायवाटेला चोरवाट म्हणत. तेव्हा चोरवाटेकडे उघडणाऱ्या दिंडी दरवाजाच्यामागे 'चोर' हे विशेषण लागले. आणि दिंडी दरवाजाचे लघुरूप चोरदिंडी असे झाले. मुघलाकडील साधनामधून याचा उल्लेख खिडकी असा येतो.[१०]

### इ) खंदक –

शिवकाळात एखाद्या गिरीदुर्गाभोवती खंदक खणल्याची कोठे नोंद नाही. पण रामचंद्रपंत मात्र आज्ञापत्रात याविषयी लिहितात की, "कित्येक किल्ले प्रत्येक पर्वतच आहेत. कित्येक पर्वत थोर थोर त्याचा एखादा कोन उपराची जागा पाहून बांधावा लागतो. त्यास दरवाजापुढे किंवा तटाखाली मैदान भूमी लागते. म्हणजे तो गड भुईकोटात दाखल झाला. आला गनिम त्यांनी दरवाजास अथवा तटास लागावे असे होते. ही गोष्ट बरी नव्हे. याकरिता या जातीचा किल्ला असेल त्यास आधी सर्व प्रयत्न दरवाजापुढे तटाखाली जितके मैदान असेल तितका खंदक खोल आणि रूंद खणून तटाचे पायी दुसऱ्या पडकोट मजबूत बांधून त्यावर भांडी (तोफा), जंबुरे(लहान तोफा) ठेवून खंदकाचे कडेस एकाएकी परकी फौज येऊन न पावे असे करावे." या प्रकारच्या दुर्ग बांधणीचे उदाहरण अनेक किल्ल्यास लागू पडते.[११]

## ई) मेट –

गडाच्या आजूबाजूच्या परिसरास गडाचा घेरा म्हणत. गडाच्या घेऱ्यात पायथ्याच्या अनेक लहान–मोठया वाडया व गावांचा समावेश होत असे. गिरीदुर्गावर जाण्यासाठी त्याकाळी देखील अनेक पायवाटा, चोरवाटा, ढोरवाटा होत्या. त्या वाटांवरून परका माणूस किंवा शत्रूचा हेर गडावर येऊ नये म्हणून त्यांना हटकण्यासाठी अशा वाटांवर कायमस्वरूपी पहारे व पहारेकऱ्यांची घरे बांधत. त्यांना मेट असे म्हणत. गडाचा माथा व पायथा यांच्या दरम्यान डोंगराच्या सोंडा खाली उतरत जातात. त्या सोंडाच्या साधारण मध्यावर शत्रूंच्या हेराच्या प्रतिकारार्थ ज्या चौक्या उभारलेल्या असत. त्यांनाही मेटे असे म्हटले जाई. वासोटा उर्फ व्याघ्रगडाच्या मेट इंदवलीचे सध्या एका गावात रूपांतर झाले आहे.[१२] अशा संरक्षण चौक्या किंवा मेटांबद्दल रामचंद्र पंत लिहितात की, “गडासभोवताली नेहमी मेटे असावीत. घेरियाची गस्ती करीत जावी. गस्तीचा जाब मेटकरी यांनी देत जावा.”[१३]

एखादा गिरिदुर्ग नव्याने बांधायचा झाला, तर गडावर राहणाऱ्या सैनिकांना व त्याच्या बरोबरच्या बिनलढाऊ लोकांना भरपूर कसे उपलब्ध होवू शकेल याची काळजी घ्यावी लागेल. गड डोंगर माथ्यावर बांधणार तेव्हा तिथे पावसाचे पाणी साठणार इतरत्र पडलेले पाणी वाहून येण्याची शक्यता नाही. म्हणून खडकात टाकी खोदत, तलाव बांधत आणि त्यात पावसाचे पाणी कसे साठेल याची व्यवस्था करीत.[१४] रामचंद्रपंत अमात्य शिवकालीन दुर्गावरची जलव्यवस्था कशी असावी याबद्दल लिहितात की, “गडावर आधी उदक पाहून किल्ला बांधावा. पाणी नाही आणि ते स्थळ तो आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी आधी खडक फोडून तळी, टाकी पर्जन्यकाळपर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरेल अशी मजबूत बांधावी गडावर झराही आहे, जसे तसे पाणी पुरते म्हणून तितकीयावर निश्चिंती न मानावी. किंनिमित्य की, झुंजामध्ये(लढाईत) भांडियाचे आवाजाखाली(तोफांच्या आवाजाने)झरे स्वल्प होतात. आणि पाणियाचा खर्च विशेष लागतो. तेव्हा संकट पडते. याकरिता तसे जागी जखिरियाचे (साठवणीचे) पाणी म्हणून दोन–चार तळी टाकी बांधावी. त्यातील पाणी खर्च होवू न द्यावे. गडाचे पाणी बहुत जतन राखावे.”[१५]

## ४.५ किल्ल्यावरील जलव्यवस्थापन :–

पाणी हा आतापर्यंत विकसित झालेल्या संस्कृतीचा महत्वाचा घटक आहे. कृषी तथा नागरी संस्कृती ही मानवाच्या यशस्वी जलसंवर्धन तंत्रावर आधारलेली संरचना आहे. सुरूवातीच्या काळात नद्यांच्या काठी मानवाने वसाहती करण्याचा प्रयत्न केला. तथापि

पाण्याच्या उपलब्धतेनुसार व संरक्षणाच्या दृष्टिकोनातून त्यांना सातत्याने स्थित्यंतरे करावी लागली. म्हणून वाहते पाणी अडविणे व कायम स्वरूपी वसाहती निर्माण करणे हे त्यांच्यासमोर एक मोठे आव्हान होते. त्यावर त्यांनी अथक प्रयत्नांनी मात करून कायम स्वरूपी वसाहती निर्माण केल्या. त्याचे काळाच्या ओघात संस्कृतीमध्ये परिवर्तन झाले. उदा. सिंधू, इजिप्त, वगैरे. जलसंवर्धन तथा जलव्यवस्थापन या मधील लोकसहभाग व संतुलन जोपर्यत त्यांना कायम राखता आले तोपर्यत या संस्कृती अस्तित्वात राहिल्या, तथापि त्यामध्ये बिघाड होताच त्यांचा यथाक्रम ऱ्हास झाला. यास मानवाची अतृप्त उत्पादन लालसा कारणीभूत ठरली होती. [१६]

### ४.५.१ शिवकालीन किल्ल्यावरील जलव्यवस्थापन

किल्ल्यावरील सैनिकांना व लोकांना पाणी बारमाही उपलब्ध व्हावे याकडे छ.शिवाजी महाराजांनी लक्ष दिलेले दिसून येते. पावसाळयातील वाहून जाणारे पाणी किल्ल्यावर तळी बांधून, नाले बांधून, चर खोदून अडविले. जलसंधारण व जलसंवर्धनाला प्राधान्य दिले.

किल्ल्यावरील दुर्गस्थापत्याचे जलव्यवस्था हे एक वैशिष्ट्य होय. पाणीपुरवठयाच्या बाबतीत बाराही महिने दुर्ग स्वयंपूर्ण राहील याकदे दुर्गस्थापत्य विशारदांनी लक्ष दिलेले आढळते. किल्ला बांधण्यापूर्वी संबंधित स्थळी पाणी उपलब्ध होईल का हे पाहिले जात असे. किल्ल्याच्या तटबंदी वा अन्य वास्तूच्या बांधकामासाठी लागणारा दगड मिळविण्यासाठी किल्ल्याच्या विशिष्ट जागी खाणी खोदल्याचे दिसते. या खाणीतून बांधकामासाठी दगड तर उपलब्ध होतोच. शिवाय पावसाच्या पाण्याचा संचय करण्याची व्यवस्था देखील होत असे. आजदेखील अनेक किल्ल्यावर बाराही महिने पिण्यायोग्य भरपूर पाणी उपलब्ध असलेले दिसून येते. [१७]

किल्ल्यावर पाण्याच्या प्राप्तीसाठी खडकात टाकी खोदली गेली. टाक्यांमध्ये दोन प्रकार होते. १) उघडयावर हौद, २) गुहेतील कपारीतील टाके याशिवाय गोल अथवा पायऱ्यांच्या विहिरी, बांध घातलेली तळी असेही पाणी साठविले जात होते. [१८]

किल्ल्यावरील टाक्यामध्ये पाणी पुढीलप्रमाणे साठविले जात असे. महाराष्ट्रातील भूरचनेमध्ये जलसमृद्ध आणि जलाभेद्य अशा दोन तऱ्हेची खडकांची रचना आढळते. सरळ तुटलेले कडे आणि तिरकस उताराचे भाग असे हे दोन थर ओळखता येतात. जलभेद्य थराच्या वरच्या भागात आणि जलसमृद्ध भागाच्या तळाशी टाकी खोदली तर त्यात पुरेसे पाणी बराच काळ उपलब्ध होते. हे पाणी त्या खडकातून पाझरत येत असल्यामुळे जमिनीतील क्षार त्यात

विरघळतात. तसेच ते थंडही असते. म्हणून महाराष्ट्रातील किल्ल्यांवर असणाऱ्या टाक्यांमधील पाणी थंडगार व चविष्ट असते. [१९]

पाण्याशिवाय प्राणिमात्रांचे जीवन अशक्य आहे. छ.शिवाजी महाराजांनी आपल्या किल्ल्यावर पाण्याची व्यवस्था करण्याची पुरेशी काळजी घेतली होती. साधारणपणे दगड कापून बनविलेल्या तलांवाची पाणी साठविण्यासाठी व पाणी पुरवठयासाठी उपयोग केला जात असे. आजसुद्धा अनेक किल्ल्यावर असे अनेक तलाव आपणास आढळतात. काही वेळा किल्ल्यावर पाण्याचे हौद बांधले जात होते. [२०]

छ. शिवाजी महाराजांच्या जलसंवर्धन हे रामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्रात ज्याप्रमाणे लिहिले आहे त्याप्रमाणे होते, असे दिसून येते.

“दुर्गावरील पाणी बहुत जतन करावे । दुर्गावरील अश्वीउदक पावून दुर्ग बांधावा । पाणी नाही, उदक नाही ते स्थळी तो बांधने आवश्यक झाले, तरी अश्वीखडक फोडून तळी, टाकी पर्जन्यकाळापर्यत संपुर्ण दुर्गास पाणी पुरेल ऐसी मजबूत बांधावी । दुर्गावरील झराही आहे जैसे तैसे पाणीही पुरते म्हणून तितक्यावरच निश्चिती न मानता उद्योग करावा की, निमित्य जुंझामध्ये (लढाई) भांडीयाचे (तोफांचे) आवाजाखाले झरे स्वल्प होतात । आणि पाणीयाचा विशेष खर्च लागतो तेव्हा संकट पडते । याच करिता तैसे जागा जिकिरीयाचे (दुर्गोपयोगी) पाणी म्हणून दोन–चार तळी, टाकी बांधून त्यातील पाणी खर्च होऊ न द्यावे । दुर्गाचे पाणी बहुत जतन राखावे ।”[२१]

या धोरणाचा प्रत्यय आपणास छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनेक किल्ल्यावर अस्तित्वात असणाऱ्या पाण्याच्या टाक्यावरून, तळयावरून येतो. दुर्ग निर्मितीसाठी आवश्यक असणारा पाषाण दुर्गावरचा खोदला जात असे. त्या ओबडधोबड खदाणी किल्ल्याच्या नैसर्गिक सौंदर्याला मारक ठरतात. म्हणून त्याचे सुरेख जलाशयात रूपांतर केले. असे महाराजांनी धोरण आखून पाण्याची व्यवस्था केली. दुर्गावर ज्या ठिकाणी पर्जन्यजल साठविण्यास उपयुक्त जागा उपलब्ध झाली. त्या ठिकाणी अशा प्रकारचे जलाशय निर्माण केल्याचे दिसते. असे अनेक जलाशय किल्ल्यावर दिसून येतात.[२२]

अशाप्रकारे जलसंवर्धनासाठी पूर्वजांनी वापरात आणलेल्या कौशल्यपूर्ण रचनांच्या अवशेषावरून आपणास त्यांच्या अभियांत्रिकी उंचीची कल्पना करता येऊ शकते. यामध्ये काही प्रकल्प असे आहेत की ज्यांचा आजही आपण अगदी अल्प गुंतवणुकीत लाभ घेऊ शकतो.

गतकालात जलसंवर्धनासाठी जनसमुहांनी जे प्रयत्न निर्माण केल्या, त्या देशभर सारख्याच प्रकारच्या होत्या असे गृहित धरता येणार नाही. कारण भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये ठायी–ठायी बदलणारा निसर्ग आहे. तसेच भौगोलिक वैचित्र्य आहे. भूगर्भात तफावत आहे. हे सर्व विचारात घेऊन त्या, त्या जनसमूहाने आपल्या परिसराला मानवेल अशा रचना निर्माण केल्या.

पाणी आपली समपातळी कायमस्वरूपी टिकवून ठेवते. उंच पातळीवरून कमी उंचीकडे प्रवाहित होते. या गुरूत्वाकर्षणाच्या सिद्धांताचा वापर करून भारतभर उपलब्ध भौगोलिक परिस्थितीवर आधारित अशा शेकडो जलसंधारण व्यवस्था अस्तित्वात आल्या. त्या सर्व भारतभर विखुरल्या गेल्या आहेत. त्या प्रामुख्याने नैसर्गिक परिस्थितीशी मिळत्या असून केवळ पर्जन्य स्त्रोतावर आधारित आहेत. त्यासाठी त्यांनी कोणत्याच प्रकारे पर्यावरणाची हानी होवू दिली नाही. उलट पर्यावरणाचा विकास कसा होईल याचीच त्यांनी काळजी घेतली. यातील काही आजही कार्यरत आहेत. हे महत्वाचे आहे.

**४.५.२ सांराश :–**

मध्ययुगीन काळात हे किल्ला हे एक लष्करी ठाणे होते. त्यामुळे त्याचे संरक्षण होणे हे अत्यंत गरजेचे होते. या किल्ल्यांच्या जोरावरच छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली होती. एवढेच नव्हेतर या स्वराज्यावर आलेली संकटे किल्ल्यांमुळेच टाळता आली होती. या सर्व गोष्टीमुळे किल्ल्यांचे महत्व वाढतच होते. या किल्ल्यांना नैसर्गिकरित्या संरक्षण लाभले होते. विशेषतः यामध्ये गिरीदुर्गाचा समावेश होता. तर काही किल्ल्यांना तटबंदी बांधून संरक्षण केलेले होते. हे किल्ले सुरक्षित राहावेत यासाठी किल्ले बांधताना तशा प्रकारची व्यवस्था केली जात होती. ही व्यवस्था करताना किल्ल्याच्या पायथ्यापासून ते बालेकिल्ल्यापर्यंत सर्व व्यवस्था बारकाईने केली जात होती. त्यासाठी बहिर्गत संरक्षण व्यवस्था व अंतर्गत संरक्षण व्यवस्था केलेली होती. बाहिर्गत संरक्षण व्यवस्थेमध्ये छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील अगदी शूद्र समजल्या जाणाऱ्या जातीतील लोकांपासून ते उच्च वर्गीयापर्यंतच्या लोकांना सामावून घेतले होते. त्यामुळे किल्ले संरक्षणामध्ये या लोकांचा चांगलाच उपयोग झालेला दिसून येतो. रामोशी, मांग, बेरड, भिल्ल महार यासारख्या काटक जातींना किल्ल्याच्या बाहेरील बाजूने अगदी किल्ल्याच्या पायथ्यापासून ते तटापर्यंत वस्ती करावयास लावून शत्रूचे होणारे आक्रमण थोपविण्यास लावले होते. कारण या लोकांना डोंगरातील दऱ्या–खोऱ्यात हिंडणे फिरणे यात

आवड होती. तसेच ते काटक व शूर होते. त्याचाच उपयोग त्यांनी या कामी करून घेतलेला दिसून येतो.

किल्ल्यावरील अंतर्गत संरक्षण व्यवस्थेत तीन समान दर्जाचे अधिकारी ठेवून ते एकमेकास जबाबदार राहतील याकडे लक्ष दिले होते. तसेच सर्वांना आपापल्या जातीनुसार कामाची विभागणी केलेली होती. या प्रमुख अधिकाऱ्यांच्या हाताखाली पुन्हा दुय्यम दर्जाचे अधिकारी स्वतः छत्रपती शिवाजी महाराज नियुक्त करत असत. याशिवाय किल्ल्यावर सैनिकांची वस्ती केली जात होती. त्यांच्याद्वारेही किल्ल्याचे संरक्षण होत असे. अशाप्रकारे किल्ल्याचे संरक्षण कसे होईल याकडे लक्ष पुरविले जात होते.

किल्ल्यावरील जलसंवर्धन हे टाके, तलाव, विहीरी याद्वारे केले जात होते. विशेष म्हणजे ही टाकी बनविताना पावसाचे पाणी त्यामध्ये कसे साठून राहिल याकडे लक्ष पुरविले जात होते. त्यासाठी जमिनीत पाणी मुरून जावू नये म्हणून मोठा दगड कापून त्यात पाणी साठविले जात होते. तसेच मोठया खडकाचा छेद घेऊन हे पाणी साठविले जात असे. विशेषतः तलावांना अंगचेही पाणी लागत असे. त्यामुळे वर्षभर पाणीपुरवठा व्हावा यादृष्टिने तयारी केली जात होती.

भौगोलिकदृष्टया पाहता सातारा जिल्हयातील किल्ल्यांचे पर्जन्यमानानुसार दोन प्रकारामध्ये विभाजन करता येईल. पहिला प्रकार म्हणजे पर्जन्यदृष्टया अतिवृष्टीचा प्रदेश व दुष्काळी प्रदेश किंवा अल्प पर्जन्यमानाचा प्रदेश होय. अतिवृष्टीच्या प्रदेशामध्ये प्रतापगड, वैराटगड, केंजळगड, मकरंदगड, भैरवगड, वासोटा, अंजिक्यतारा, सज्जनगड, वसंतगड, किल्ले सुभानमंगळ, दातेगड, गुणवंतगड, कमळगड, मच्छिंद्रगड, पांडवगड, सदाशिवगड इ. किल्यांचा समावेश होतो. तर अल्प पर्जन्यमानाच्या प्रदेशामध्ये येणारे किल्ले म्हणजे चंदन–वंदन, कल्याणगड, वारूगड, वर्धनगड, महिमानगड, ताथवडा उर्फ संतोषगड इ.चा समावेश होतो. जलव्यवस्थापनाच्या दृष्टीने पाहिल्यास अतिवृष्टी प्रदेशातील किल्ल्यांवर प्रामुख्याने तळी व विहीरी यामधून पाण्याचा साठा केला जात होता. प्रामुख्याने तत्कालिन पाण्याचा साठा पर्जन्यमानावरच अवलंबून होता. हे पाणी वर्षभर पुरेल यादृष्टीने पावसाळयात पाण्याचा साठा करण्याचे नियोजन केलेले दिसते.

अल्प पर्जन्यवृष्टीच्या प्रदेशामधील किल्ल्यांवरील जलव्यवस्थापन हे तळी, विहीरी याबरोबरच खडकात खोदून टाके बनविलेली दिसून येते. या टाक्यांमुळे पाण्याचे बाष्पीभवन अत्यंत कमी प्रमाणात होते. पाणी ही स्वच्छ राहण्यास मदत होते. यामध्येही कोरेगाव

तालुक्यातील कल्याणगड वगळता बहुतांश किल्ल्यावरील टाके ही तटबंदीच्या बाहेर खोदलेले दिसतात. कल्याणगडवरील पाण्याचे टाके फार मोठे असून ते त्याला तटबंदीने संरक्षित केलेले आहे. यामुळे किल्ल्यावरील शिबंदी इतर किल्ल्यांच्या मानाने जास्त असल्याने त्यांना पाणी वर्षभर पुरण्यासाठी ही व्यवस्था केलेली दिसते. या टाक्यांमध्ये पार्श्वनाथ व दत्तमूर्ती व देवीची मूर्तीची प्रतिष्ठापना केलेली आहे. पावसाळ्यामध्ये येथे तीन ते साडेतीन फूट पाणी असते. त्यामुळे पावसाळ्यात या टाक्यात प्रवेश करता येत नाही. महिमानगड, भूषणगड, संतोषगड व वारूगड याठिकाणी पाण्याचे टाके तटबंदीच्या बाहेर आहे. किल्ल्यावरील मध्ययुगीन काळातील पडझड झालेल्या वास्तूंचे अवशेष पाहता येथे किल्ल्यावरील शिबंदी कल्याणगडाच्या तुलनेत कमी असल्याचे दिसून येते. वर्धनगड व चंदन–वंदन या किल्ल्यावर मोठी तळी आहेत. ही तळी पावसाळ्यात तुडुंब भरलेली असतात. मात्र उन्हाळ्यात यात पाणी नसते. याचे कारण सध्या या तळ्यात गाळ साचलेला आहे.

### ए) किल्ल्यावरील संरक्षण वास्तूंचे बांधकाम –

स्वराज्यातील एखाद्या गिरीदुर्गावर पाण्याची साठवणुक करण्यासाठी खडकात खोदकाम सुरू झाले की, त्यातून निघालेला दगड गडावरच्या इमारतीच्या बांधणीसाठी एखाद्या वास्तूच्या डागडुजीसाठी किंवा तट–बुरजांच्या बांधणीसाठी सर्रास वापरीत. अशा प्रकारच्या दगडाच्या आयताकृती शिळा आजही काही किल्ल्यावर पाहावयास मिळतात. स्वराज्यातील गडावर राहणाऱ्या लढाउ व बिनलढाऊ लोकांना राहण्यासाठी घरे, गडाच्या कारभारासाठी अधिकाऱ्यांना कचेऱ्या आणि पहारेकऱ्यांना विश्रांतीसाठी खोल्या यांना अलंगा म्हणत. यांची आवश्यकता असे. त्यामुळे गडाचा आकार पाहून सैनिकांच्या अलंगा, अधिकाऱ्यांची घरे, कचेऱ्या, चौकी, पहारे, पागा इ.वास्तूंची निर्मिती केली जाई.[२३]

### ऐ) पहारेकरी–

गडावर राहणाऱ्या सैनिकांमधून पहारेकरी लोकांची निवड केली जाई. या पहाऱ्यात चल पहारा व स्थिर पहारा असे दोन प्रकार असत. गडाचे दरवाजे व बुरूज यांच्यावर स्थिर पहारे व तटबंदीवरून गस्त घालत गडाच्या घेऱ्याची टेहळणी करण्यासाठी चल पहारे असे अनेक पहारे असत. त्यांपैकी काही पहाऱ्यांच्या जागी पहारेकऱ्यांना विश्रांती घेण्यासाठी व ऊन, वारा व पाऊस यांच्यापासून रक्षण करण्यासाठी झोपडयावजा घरे बांधली जात. रात्री तटबंदीवरून गस्ती घालताना चुडयांचा वापर करीत. पहारे तट बुरूजांवर असले तरी गडाच्या आत देखील ठिकठिकाणी बंदोबस्त ठेवावा लागे. गडातील अशा बंदोबस्तांच्या जागांना चौक्या म्हणत.[२४]

**ओ) किल्ल्यावरील दारूकोठाराच्या संरक्षणाबाबतची दक्षता :–**

स्वराज्यातील गड, कोट व दुर्ग नामक लष्करी ठाण्यातील अत्यावश्यक अटळ वास्तू म्हणजे दारूकोठार किंवा दारूखाना तोफा–बंदुका उडविण्यासाठी लागणारी साधनसामग्री या वास्तूत साठविली जात असे. हे कोठार संरक्षणासाठी व्यवस्थित ठिकाणी असावे. त्याबद्दल नियम घालून दिले जात होते. त्यानुसार ही दारूची कोठारे ही घराजवळ नसावीत. गडावरील लोकवस्तीपासून दूर असावा. तसेच संरक्षित ठिकाणी अशी दारूची कोठारे असावीत. यातील शस्त्रागारावर हवालदाराने स्वतः येवून त्याची निगराणी करावी. तोफा व बंदुका हा स्वतंत्र विभाग होता. त्यास तोफखाना म्हटले जात असे. या तोफा बुरूजामध्ये तोफा व बंदुकांच्या माऱ्याच्या जागा मात्र प्रत्येक गडावर दिसतात.[२५]

**क) किल्ल्यावरील संरक्षण व्यवस्था :–**

शिवकाळात किल्ला प्रशासनव्यवस्थेत प्रमुख दोन विभाग होते. ते म्हणजे अ) बहिर्गत प्रशासन व्यवस्था व अंतर्गत प्रशासनव्यवस्था हे होत.

**ख) बहिर्गत संरक्षण व्यवस्था :–**

किल्ले संरक्षण व्यवस्थेत किल्ल्याचे महत्व ओळखून छ.शिवाजी महाराजांनी किल्ल्याची बहिर्गत प्रशासन व्यवस्था निर्माण केली होती. शिवकाळातील समाज व राज्यकर्ते स्मृतीकारानी घालून दिलेल्या तत्वानुसार वागत होते. अस्पृश्यांना समाजात कनिष्ठ दर्जा होता. धर्मशास्त्रानुसार फक्त क्षत्रियांनाच हातात शस्त्र घेता येत असे. मात्र शिवाजी महाराजांनी ही प्रथा मोडून टाकली.त्यांनी ओळखले होते की, किल्ल्यांचे सामर्थ्य हे परिसरातल रयतेच्या राजनिष्ठेवर अवलंबून असते. त्यासाठी त्यांनी सर्व जाती जमातीचा लोकांना संतुष्ठ करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी शुद्र जाती जमातीला स्वराज्याची सेवा करण्यास संधी दिली. या जातीजमातीत रामोशी, पठाण, बेरड, भंडारी, धनगर, कोळी, बेलदार, भिल्ल, न्हावी, ब्राम्हण, मराठा, महार, मांग या लोकांनासुद्धा सामावून घेतले. अशाप्रकारे त्यांच्या सैन्यात ब्राम्हणांच्याबरोबरीने महार सुद्धा होते. ते ब्राम्हणांच्या खांद्याला खांदा लावून लढले होते.[२६]

छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्याचे बहिर्गत संरक्षण व्यवस्था करीत असताना योग्य काळजी घेतलेली दिसून येते. त्यांनी प्रत्येक डोंगरी किल्ल्याच्या तटापर्यंत जिथे सपाट जागा असे तेथे शत्रूने लपतछपत किल्ल्याच्या तटापर्यंत पोहचू नये म्हणून पहारा देण्याकरिता कायम वस्ती केली होती. त्याला मेटे म्हणत असत. या मेटयामध्ये संरक्षण चौक्यादेखील असत.

महार, कोळी, रामोशी, बेरड, ठाकूर या जमातीला कर्तबगार, प्रामाणिक लोकांच्या मेटेनाईक म्हणून नेमणूका केल्या जात होत्या.[२७]

मेटेनाईक पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्याला रात्रंदिवस जागता पहारा ठेवावा लागे. त्यांनी शत्रूच्या हालचाली तात्काळ किल्ल्यावर पोहोचवाव्यात अशी ताकीद असे.[२८]

किल्ल्याच्या घेऱ्याखाली काही गावे व शेतजमीन येत असे. अशा गावांना पेठा म्हणत. या पेठातील लोक किल्ल्याच्या उतरणीवरील जमीन कसत व शत्रूच्या हालचालीवर लक्ष ठेवीत असत. शत्रू चालून आल्यास सर्वप्रथम या ठिकाणचे लोक शत्रूला रोखून धरत. त्यामध्ये शत्रू वरचढ ठरल्यास शत्रूला किल्ल्यावर चाल करता येई.[२९]

अशाप्रकारे छ.शिवाजी महाराजांनी किल्ल्यांच्या बहिर्गत संरक्षणाची व्यवस्था केली होती. याशिवाय किल्ल्याचे बाहेरील बाजूने संरक्षण व्हावे यासाठी किल्ल्याच्या पायथ्यापासून ते मेटयापर्यत वृक्षांची लागवड केली जात होती. याचे कारण घनदाट अरण्य असल्याने शत्रूला तेथे शिरकाव करता येत नसे. तसेच तेथे हिंस्त्र श्वापदे या घनदाट अरण्यात राहत असत. त्यांच्यामुळे शत्रूसैन्य या जंगलातून किल्ल्यावर हल्ला करण्यास धाडस करत नसे. किल्ल्याच्या बाहेरच्या भागांच्या संरक्षणाची व्यवस्था रामोशी महार यासारख्या जातीकडे सोपविलेली असे. अगदी लहान किल्ला म्हणजे गढी होय. या गढीच्या बंदोबस्तासाठी शिबंदी म्हणून दहा माणसेही पुरत तर मोठया किल्ल्यावर गडकोटावर युद्धकाळात दोन हजार माणसांची शिबंदी म्हणून काम करत असत.या सर्व गोष्टीमुळे किल्ला बाहेरील बाजूने सुरक्षित राहण्यास मदत होत असे.

### ४.४.१.७ किल्ल्यावरील अंतर्गत संरक्षण व्यवस्था

याठिकाणीही छ.शिवाजी महाराजांनी किल्ल्याच्या अंतर्गत संरक्षण करण्यासाठी वेगवेगळया जातीतील लोकांना सामावून घेतले होते. त्यामध्ये समान दर्जाचे परंतु विविध जातीतील तीन अधिकारी नेमले होते. हे एकमेकांच्या सल्ल्याने काम पाहत असत. एक जात दुसऱ्या जातीला श्रेष्ठ किंवा हिन समजत असल्याने कोणी अधिकाऱ्याने जर फंदाफितुरी केली तर छत्रपतीपर्यंत लगेच बातमी पोहचत असे. छत्रपती त्यावर लगेचच उपाययोजना करत असत. ते अधिकारी पुढीलप्रमाणे होते.

#### ४.४.१.७.१ हवालदार :–

हवालदार हा मराठा जातीचा असे. हवालदार या अधिकाऱ्याकडे किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी असे. त्याच्याकडे किल्ल्याच्या दरवाज्याच्या किल्ल्या असत. तो

किल्ल्यावरील सैनिकांचा प्रमुख असे. तो स्वतः किल्ल्याचे दरवाजे संध्याकाळी बंद करत होते व सकाळी उघडत असे. तो विश्वासू, उद्योगी, स्वामीनिष्ठ व अनिद्रिस्त असे.

### ४.४.१.७.२ सबनीस :-

हा ब्राम्हण जातीचा असे. याच्याकडे किल्ल्यावरील लोकांची हजेरी ठेवणे, किल्ल्याच्या बांधकामाची वेळोवेळी पाहणी करणे, किल्ल्याच्या जमाखर्चाचा हिशेब ठेवणे, पत्रव्यवहार करणे, किल्ल्यावरील प्रदेशातून महसूल गोळा करणे ही कामे करत असे. प्रसंगी हवालदार व कारखानीस यांच्या गैरहजेरीत गडावरचा कारभार पाहण्याचे काम सबनीसास करावे लागत होते.

### ४.४.१.७.३ कारखानीस :-

हा प्रभू जातीचा असे. हा किल्ल्यावरील तिसरा महत्वाचा अधिकारी होय. किल्ल्यावर गरज भासेल तेव्हा अन्नधान्य व दारूगोळा यांचा पुरवठा करण्याची जबाबदारी कारखानीसची असे. किल्ल्यावर येणाऱ्या लोकांच्या सबनिसाने केलेल्या नोंदी तपासणे तसेच सबनिसाचे आर्थिक व्यवहार तपासण्याचे अधिकार कारखानीसला असत. युद्धात शत्रूकडून मिळालेल्या हत्ती, घोडे, उंट वगैरे जिवीत मालमत्तेचा सांभाळ करणे ही कामे कारखानीसाला करावी लागत होती. किल्ल्यावर होणाऱ्या बांधकामावर देखरेख ठेवणे.

अशाप्रकारे छ.शिवाजी महाराजांनी किल्ल्याचे संरक्षण व्यवस्था व प्रशासन व्यवस्था ही कोणत्याही एका अधिकाऱ्याकडे न ठेवता त्यासाठी समान दर्जाचे तीन अधिकारी नेमले जात होते. हे तीन अधिकारी संयुक्तिकपणे काम पाहत असत. संबंधित किल्ल्याच्या संदर्भात कोणताही निर्णय घेताना तीनही अधिकाऱ्यांच्या संमतीदर्शक मुद्रा घेतल्या जात असत. या अधिकाऱ्यांच्या वारंवार बदल्या केल्या जात असत.[३०]

किल्ल्ल्याच्या संरक्षणासाठी प्रत्येक किल्ल्यावर त्याच्या विस्तारानुसार शिबंदी असे. साधारणपणे किल्ल्यावरील सैनिकांची संख्या सुमारे ४०० ते ५०० इतकी असे. नऊ सैनिकावर एक नाईक असे. तीन नाईकावर एक जमादार असे आणि हे सर्व जमादार हवालदाराच्या हाताखाली असत. हवालदाराशिवाय किल्ल्यावर तटसरनौबत, पाईक, इटेकरी, बंदुकी, तिरंदाज, आड इत्यादी हुजुरात म्हणून काम पाहणारे सरकारी कर्मचारी असत. त्यांच्याकडे किल्ल्याच्या वेगवेगळया विभागांच्या संरक्षणाची कामगिरी सोपविलेली असे.[३१]

अशाप्रकारे समाजातील विविध जातीच्या लोकांना गडाची राखण करण्याची जबाबदारी सोपविलेली होती. तसेच किल्ल्याचा आकार व विस्तार विचारात घेऊन गडाची राखण व निगा राखणेकरिता शिबंदी कमी जास्त संख्येने ठेवली जात असे. शिबंदीमध्ये नेमणूक करताना

जातीधर्माचा विचार न करता किंबहुना किल्ल्याच्या रक्षणाकामी फंदफितुरी होवू नये म्हणून भिन्न जातीच्या स्वामीनिष्ठ, प्रामाणिक व गुणवान व्यक्तीला प्राधान्य दिले जात असे. किल्ल्याची सर्व जबाबदारी ही हवालदाराकडे न सोपविता त्याच्या समान दर्जाच्या सबनीस व कारखानीस हे अधिकारी नेमले होते. त्यामुळे गडाची राखण व निगा या संदर्भात सर्वच जण संयुक्तरित्या जबाबदार असत.

## संदर्भ


१. भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. ४३

२. माटे म.श्री. मराठा आर्किटेक्चर १९५९ पीएच.डी. प्रबंध पान. नं.६२६४

३. तापकीर संदीप, खंडाळे गणेश(संपा.), दुर्गांच्या देशातून, गरूडझेप प्रकाशन, पुणे, दिवाळी अंक, २०१२, पृ. ३ व ४

४. अमात्य रामचंद्रपंत, रामचंद्रपंत अमात्य प्रणीत स्वराज्यनिती आज्ञापत्र, ढेरे रा. चि.(संपा.), पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २१ जुलै, २०१४, पृ. १००

५. तेंडुलकर महेश, शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था, स्नेहल प्रकाशन, पुणे, १४ ऑगस्ट २००९, पृ. २१

६. कित्ता, पृ. १९

७. कित्ता, पृ.२०

८. तापकीर संदीप, खंडाळे गणेश(संपा.), उपरोक्त, पृ.४

९. अमात्य रामचंद्रपंत, आज्ञापत्र, ढेरे रा.चि.(संपा.), उपरोक्त, पृ. १०१

१०. तापकीर संदीप, खंडाळे गणेश(संपा.), उपरोक्त, पृ. ४

११. तेंडुलकर महेश, उपरोक्त, पृ. २४

१२. कित्ता, पृ. २५

१३. अमात्य रामचंद्रपंत, आज्ञापत्र, ढेरे रा.चि.(संपा.), उपरोक्त, पृ. १०१

१४. तेंडुलकर महेश, उपरोक्त, पृ. २५

१५. अमात्य रामचंद्रपंत, आज्ञापत्र, ढेरे रा.चि.(संपा.), उपरोक्त, पृ. १०२

१६. डॉ.मोरवंचीकर रा.श्री., मराठी अनुवाद भलगे प्रदीप, मध्ययुगीन जलसंधारण–जलव्यवस्थापन देवगिरीद–दौलताबाद, सुमेरू प्रकाशन, डोबिंवली, पृ.९

१७. डॉ.माने ग.का., डॉ.महाडीक एस.जी., शिवकालीन किल्ल्याचा समग्र अभ्यास, पृ. १२२

१८. पाळंदे आनंद, डोंगरयात्रेत दिसलेल्या दुर्गवास्तू, प्रफुल्लता प्रकाशन, पुणे १५ एप्रिल २०१४, पृ.११

१९. घाणेकर प्र.के., अथातो दुर्गजिज्ञासा, स्नेहल प्रकाशन, पुणे, ९ एप्रिल २००५, पृ.१५६

२०. प्राचार्य गायकवाड आर.डी. व इतर, शिवाजी महाराजांचे सहा किल्ले, प्रकाशक, प्रा.डॉ.सौ.हेमलता रामचंद्र गायकवाड, सातारा, फेब्रुवारी २००९, पृ. १५१, १५२

२१. अमात्य रामचंद्रपंत, आज्ञापत्र, संपा खरे ग.ह. व भिडे स.रा., पुणे, १९६०, पृ. ६७

२२. डॉ.मोरवंचीकर रा.श्री., भारतीय जलसंस्कृती स्वरूप आणि व्याप्ती, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, ११ जुलै २००६, पृ. ९८
२३. तेंडुलकर महेश, उपरोक्त, पृ. २६
२४. तापकीर संदीप, खंडाळे गणेश(संपा.), उपरोक्त, पृ. ४
२५. कित्ता, पृ.२६
२६. ओमव्हेट गेल, कल्चरल रीव्हल्ट इन कॉलॉनिल सोसायटी, १९७६, पृ.५९
२७. सेन एस.एन., मिलीटरी सिस्टीम ऑफ दी मराठा, १९५८, पृ.१७–१८
२८. साने का.ना.(संपा.), मल्हार रामराव चिटणीस विरचित शककर्ते श्री शिवछत्रपती महाराज हयांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, १९२४, पृ. १७४, १७५
२९. देशपांडे प्र.न.(संपा.), मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड चौथा, २००३, पृ.३९७
३०. डॉ.माने ग.का., डॉ.महाडीक जी.एस., शिवकालीन किल्ल्यांचा समग्र अभ्यास, शिवनेरी पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्युटर्स, अमरावती, ३ एप्रिल २००९, पृ. १६० ते १६६
३१. सेन एस.एन., शिवछत्रपती, १९२०, पृ.२९

### ४.५.३ मराठेकालीन जलवास्तू

चांगले पिण्याचे पाणी ही मानवाची मूलभूत गरज असल्यामुळे प्राचीन काळापासून मानवाने नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत असणाऱ्या नदीजवळ वस्ती केली. आजही नदी हाच पाण्याचा मुख्य स्त्रोत आहे. नंतरच्या काळामध्ये मानवाला वाटले की या स्त्रोतावर नेहमी अवलंबून राहता येणार नाही आणि तो पुरेसा नाही. तळे हा दुसरा नैसर्गिक स्त्रोत होता. वर्षभर पडणाऱ्या पावसाचे पाणी उतरत्या जागेतून तळयामध्ये साठते. नदयांपेक्षा हे स्त्रोतांवरही फार विसंबून राहता येणार नव्हते. काळाच्या ओघात तळे तयार करणे हे अधिक उपयुक्त आणि भरोसेमंद झाले. हे दोन्ही स्त्रोत कमी जास्त प्रमाणात पावसावर अवलंबून होते. त्यामुळे मानवाला दुसरा मार्ग शोधावा लागला. त्यास विहीर हा नवीन पर्याय मिळाला. पाणी साठविण्यासाठी टाके हा दुसरा पर्याय होता.

प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीमध्ये पाण्याचे महत्त्व राहिलेले आहे. पाण्याचा उपयोग पिण्याबरोबरच सौंदर्य निर्माण करण्याचे ज्ञान भारतीयांना होते हे महाभारतातील मयसभेतील तळयाच्या उल्लेखामुळे समजते. मोहेंजोदडो येथे महास्नानगृह असल्याचे दिसून आले आहे. या काळामध्ये प्रत्येक घरामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी छोटी विहीर असल्याचेही आढळून आले आहे. मौर्य सम्राट अशोकाने सुदर्शन तलाव बांधल्याचा उल्लेख मिळतो. पुढील काळामध्ये या तलावाची दुरूस्ती केल्याचा उल्लेख मिळतो. पुढील काळामध्ये महाराष्ट्रामध्ये अनेक बारव दिसून येतात. सातारा जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी अद्यापही त्यांचे अस्तित्व टिकून आहे. त्यामुळे पाणी अडविणे, पाणी साठविणे या बाबी भारतीयांना व महाराष्ट्रीयांना नाविण्यपूर्ण नव्हत्या. परंतु मुस्लीम सत्तांनी त्यामध्ये त्यांच्याकडे असलेले तंत्र वापरून पाण्याचा खुबीने वापर केला.

पंधराव्या शतकातील या भागामधील मुस्लीम अधिकाऱ्यांनी पाणीपुरवठा वाढीसाठी प्रयत्न केले. मुस्लीमांना पाण्याच्या अस्तित्वाची चांगली जाण असल्याने ते जिथे राहिले तिथे त्यांनी पाणी पुरवठयाची सोय केली. धरणे, तळी आणि विहीरीतून नाल्याच्या व नळाच्या साह्याने बागा, घरे व तळयांपर्यंत पाणी पोहोचविले. ही पद्धत मराठयांनी स्वीकारली. त्यांनी पायऱ्यांसह विहीरी खोदल्या, टाके, धरणे बांधली व मैलांवर दूर असलेल्या ठिकाणी पाणी नेले. अद्यापही अनेक कामे अस्तित्त्वात दिसतात. [१]

मुस्लीम सत्ताधिशांनी शहरामध्ये पाणी पुरवठयासाठी हौदाचा उपयोग केला. हे हौद सार्वजनिक असल्याने नागरिकांना मोफत पाणी मिळत असे. पेशव्यांनी ही पद्धत स्वीकारली.

प्राचीन काळापासून गावाजवळ तलाव बांधत. यामुळे घराघरामध्ये खणलेल्या आडांना पाण्याचा जिव्हाळा लागत असे. त्यामुळे सर्वांना पुरेसे पाणी मिळत असे. यामुळे गावांना व शेतीमध्ये खणलेल्या विहीरींना जिव्हाळा लागत असे. मराठयांनी अशी तळी मद्रास व म्हैसुर प्रांतामध्ये मराठयांनी पाहिलेली होती. मराठयांनी ठिकठिकाणी तळी बांधली.[२] सातारा जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागामध्ये अनेक ठिकाणी अशा विहीरी तळी आहेत. याची माहिती या प्रकरणामध्ये दिलेली आहे.

### ४.५.३.१ विहीर:–

खेडयातील व शहरातीन प्रतिष्ठित लोकांनी अनेक नवीन विहीरी बांधल्या. यामध्ये प्रशासनाने कोणत्याही स्वरूपाची मदत केली नाही. परंतु जर त्या विहीरीचा सार्वजनिक उपयोग होणारा असेल तर सरकार त्यास अर्थिक किंवा जमिनीचा लहान तुकडा देत असे.

खाजगी विहीरी विना पायऱ्या व गोल असत. पण पाणी काढण्यासाठी त्यांना पर्शियन चाक असे. त्या दागड किंवा विटांनी बांधलेल्या असत. महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी अशा विहीरी वापरात आहेत यांचा व्यास साधारणपणे ५ किंवा ६ फूट असतो.[३]

### ४.५.३.२ तळी /टाकी :–

तळी व टाक्यामध्ये फारसा फरक नाही. लहान असेल तर टाके व मोठे असेल तर तळे म्हणले जाते. यामध्ये टाक्यामध्ये पावसाचे पाणी साठविले जाते किंवा दुसरीकडून आणले जाते किंवा तिथे मूळचे असते. भवानराव प्रतिनिधीनी सातारा येथे मंगळवार पेठेमध्ये मंगळवार तळे व औंध येथे तळे बांधले. चौरसाकृती असलेले हे तळे दगड चुन्यामध्ये बांधलेले आहे.

समाजातील उदार व परोपकारी लोक स्वतःच्या खर्चाने तलाव विहीरी बांधत किंवा गाव किंवा गावातील प्रमुख लोक स्वतःच्या जबाबदारीवर गावची सोय करीत. त्यासाठी लागणारा खर्च मागणी केल्यास शासन देत असे. लोकोपयोगाकरीता तलाव व विहीरी बांधणारे धर्मात्मे अने असत. छत्रपती शाहू व पेशव्यांचे गुरू ब्रम्हेंद्रस्वामी यांनी अनेक ठिकाणी विहीरी, बारवा व बांधल्या. सातारा जिल्ह्यामध्ये फलटण तालुक्यातील वारूगडाखाली एक तळे खणले.[४]

ही सर्व तळी एक सारखी असल्याने स्थापत्य विकासाच्या दृष्टीने त्यामध्ये नवीन काही नाही. दुष्काळी भागामध्ये मोठे तलाव बांधले होते. लहान टाक्या व तळयांप्रमाणेच त्यांचा उपयोग सार्वजनिक होत असे. सभोवतालच्या पाणलोट भागातील पावसाचे पाणी यामध्ये साठविले जात असे. छ. शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी भोसले यांनी शिखर शिंगणापूर येथे तलाव बांधला.[५]

ब्रम्हेंद्रस्वामींनी धावडशी येथे तीन भागामध्ये आयताकृती तळे बांधले आहे. एक भाग पिण्याच्या पाण्यासाठी दुसरा अंघोळीसाठी व तिसरा कपडे धुण्यासारख्या इतर कामासाठी दुसऱ्या व तिसऱ्या भागाला पायऱ्या आहेत. पहिल्या भागास पाणी वर आणण्यासाठी पायऱ्या उतरून गोलाच्या कमानीतून जावे लागते. कमानीस दरवाजाची व्यवस्था असल्याचे दिसते. पाण्याची शुद्धता टिकविण्यासाठी दरवाजा बंद केला जात असण्याची शक्यता आहे.[६]

हे तळे ज्याने कोणी बनविले असेल तो त्या कलेमध्ये पारंगत होता. त्याने सर्वात जास्त उपयोगी पाणलोट क्षेत्राची निवड केली. तळे बांधण्याचे उद्दिष्टये साध्य करण्यासाठी सर्व रचनात्मक साधनांचा वापर केला.

**४.५.३.३ लिंब येथील बारा मोटेची विहीर:**

पुणे बंगलोर राष्ट्रीय महामार्गावर नागेवाडी हे गाव आहे. या गावापासून पूर्वेला सुमारे ४ कि.मी. अंतरावर लिंब–शेरी गाव आहे. या गावामध्ये बारा मोटेची विहीर आहे. ही विहीर शके १६४१ ते १६४६ (इ.स. १७१९ ते १७२४) या कालवधीमध्ये श्रीमंत सौ. वीरूबाई भोसले यांनी बांधली. छत्रपती शाहू महाराजांनी इथे विविध जातीच्या आंब्याची झाडे लावली होती. या अमराईला पाणी पुरवठा करण्यासाठी ही विहीर बांधली आहे. छ. शाहू महाराजांची पेशवे बाळाजी विश्वनाथ यांच्याशी या ठिकाणी खलबते होत असत. [७]

या विहीरीचा आकार अष्टकोनी असून तिचा व्यास ५० फूट व खोली ११० फूट आहे. एकूण २६ गुंठे जागेमध्ये ही विहीर आहे. विहीरीमध्ये उतरताना प्रथम १६.६ फूट लांबीच्या २८ पायऱ्या उतरल्यानंतर एक तीन फूट रूंदीची पायरी लागते व दुसरा टप्पा सुरू होतो हा टप्पा उतरताना ७ पायऱ्या उतराव्या लागतात. रूंद पायरीवरून थोडेसे समोर वरील बाजूस साधारण ८ फूट लांबीच्या दगडावर शिलालेख आढळतो.[८]

दुसरा टप्पा उतरल्यानंतर टोकाची कमान आहे. इथून पुढे एक ११ फूट लांब व ६.६ फूट लांबीचा दगडी पूल आहे. या पुलाच्या खाली उतरण्यासाठी दोन्ही बाजूने ८ पायऱ्या आहेत. या पुलाखाली चार फूट रूंदीच्या दोन गोल कमानी आहेत. विहीरीतील या पुलामुळे या भागाचे दोन भाग झाले आहेत. पुलावरून कमानीच्या वरील बाजूस पाहिल्यास दोन्ही बाजूस दोन शरभाची शिल्पे आहेत. पुलाच्या वरील बाजूस दोन्ही बाजूस दोन बगाड आहेत.[९]

पुलाच्या दुसऱ्या बाजूस आणखी ६.६ रूंदीची एक कमान आहे. या कमानीचे छत स्क्वींचच्या मदतीने घुमटाकार आहे. घुमटाच्या मध्यभागी टोकदार लोलक आहे. कमानीतून वरच्या हॉलमध्ये जाण्यासाठी दोन्ही बाजूकडून दोन फूट रूंदीचे टोकदार कमानीचे दरवाजे

आहेत. कमानीच्या उलटी कमळकळी कोरलेली असून तिच्यावर त्रिशूळाकृती कोरून तिन्ही टोकांवर सहस्त्रदले कोरलेली आहेत. येथून वर हॉलमध्ये जाण्यासाठी दोन फूट रूंद व १ फूट उंचीच्या पायऱ्यांचा जिना आहे. जिन्यावरून न जाता पुढे गेले तर विहीरीचा मुख्य भाग आहे.[१०]

विहीरीचे बांधकाम पूर्णपणे षटकोनी आकारामध्ये केले असले तरी या बांधकामाच्या खालच्या स्तरावर गोल आकारामध्ये बांधकाम केले आहे. षटकोनी बांधकामाच्या खाली जाताना एक एक दगडाची अंतर ठेवून पायरी केलेली आहे. विहीरीमध्ये टोकदार कमान असलेली दोन फूट रूंदी व तीन फूट उंचीचे देवकोष्टक आहे. विहीरीच्या अष्टकोनी बांधकामामध्ये खालून समान अंतरावर सभोवती दोन चौकोनी व एक अंतर्गोल मोलीमे आहेत. पहिल्या मोलीमेवर प्रत्येक कोनामध्ये कमळकळी कोरलेली आहेत. उर्वरीत दोन मोलीमेवर ९ इंच उंचीची वेटोळे घातलेल्या नागांची शिल्पे कोरलेली आहेत. विहीरीवरती पश्चिम, दक्षिण व उत्तर दिशेला प्रत्येकी चार मोटांची सोय असणारी बगाडे आहेत. बगाडांना हस्त आहेत. विहीरीच्या अग्नेय, वायव्य, ईशान्य व नैऋत्य दिशांना शरभांची शिल्पे आहेत. यापैकी अग्नेय व नैऋत्य दिशांचे शरभ झेप घेण्याच्या पवित्रयात आहेत, तर वायव्य व ईशान्य दिशांच्या शरभांच्या चारी पाया खाली चार हत्ती आहेत.[११]

विहीरीतून कमानीच्या दरवाजातून वर आल्यानंतर २० फूट लांब व ११ फूट रूंदीचा हॉल आहे. या हॉलमध्ये यादवशैलीतील दोन स्तंभांची ओळ आहे. त्यांची रचना खूर, तळखडा, अष्टकोन, साखळी, अष्टकोन, चौरस, अष्टकोन, दंडगोल, कणी, चौकोन व हस्त अशी आहे. स्तंभाच्या तळखडयावर ध्वजधारी हत्ती, नागबंध, घोडेस्वार, मोत्याची माळ चोचीमध्ये असणारे मोर, फुलांची शिल्पे कोरलेली आहेत. चौकोनावर मोर, गणेश, फुल, यांची शिल्पे कोरलेली आहेत. हस्ताच्या सर्वच बाजूंवर शिल्पे नाहीत. काही बाजूवर लज्जागौरीचे शिल्प आहे, तर इतर बाजूंवर गुंडाळी मोलीमे आहेत. स्तंभाच्या दोन्ही बाजूस तीन कमानी आहेत. कमानींच्या बाहेरील बाजूस टोकाच्या बहूपर्णी कमानी कोरलेल्या आहेत. आतील बाजूस टोकदार कमान आहे. याचे स्तंभ मुघल शैलीतील आहेत. कमानीवर आतील बाजूस मोर, कमल फूल, हातातील सुदर्शन चक्र, गुंडाळी मोलीमेवर नागाची फणी, दोन्ही बाजूस गोल, कोरलेले आहेत. कमानीच्या स्तंभाच्या बाहेरील बाजूस पायथ्याला राधाकृष्ण, विठ्ठल, द्वंद्व यांची शिल्पे कोरलेली आहेत. या हॉलला दोन्ही बाजूस २.६ फूट रूंदीची सज्जा आहे. त्याचे स्तंभ सुरूचे परंतु अष्टकोनी आहेत. या स्तंभाचे हस्त साधे आहेत. सज्जावर उतरते पागोळे आहे. सज्जाला हस्त आहेत.[१२]

या हॉलमधून वरती येण्यासाठी २ फूट रूंदीचा जिना आहे. विहीरीतून मोटेच्या साह्याने उपसलेले पाणी चार दिशेने पाटाने शेतीपर्यंत नेले जाते. पाटाला गोमुख बसविलेले आहे. हॉलच्या छप्परावरील पॅरापीटवर कमळकळीची रांग कोरलेली आहे. सपाट असलेल्या छप्परावर तीन पायऱ्या आहेत. त्यानंतर ९ फूट लांब व २.६ फूट रूंदीची बैठक आहे. या विहीरीचे संपूर्ण बांधकाम दगड चुन्यामध्ये करण्यात आलेले आहे. छत्रपती येथे बसून ग्रामस्थांशी संवाद साधत असत.[१३]

### ४.५.३.४ भुईंज येथील जाधवरावांची विहीर

पुणे बंगलोर राष्ट्रीय महामार्गावर भुईंज हे गाव आहे. या गावामध्ये राष्ट्रीय महामार्गाच्या पूर्वेला १०० मीटर अंतरावर १५ फूट व्यास व ६० फूट खोल असणारी एक विहीर आहे. या विहीरीचे बांधकाम कोणी व केव्हा केले याबाबत ठोस पुरावा नाही. परंतु विहीरी रचना व शिल्पे यावरून ही विहीर मराठाकालीन असल्याचे दिसते.

या विहीरीस ९ फूट रूंदीच्या ३६ पायऱ्या आहे. पायऱ्याच्या पहिला टप्पा २५ पायऱ्यावर आहे. ३६ पायऱ्या उतरल्यानंतर ७ फूट रूंदीची टोकाची कळीच्या दगडाची कमान आहे. कमानीच्या टोकावर किर्तीमुख व त्याच्या दोन्ही बाजूस दोन सहस्त्रदले कोरलेली आहेत. त्याच्यावर दोन्ही कडेला झेप घेणाऱ्या दोन शरभांची शिल्पे आहेत. शरभ शिल्पांच्या वरील बाजूस पागोळे आहे. पागोळयास कमळकळीचे लोलकांची रांग आहे. पागोळयास व शरभ शिल्पे हस्तांवर आधारलेले आहेत. हस्तांवर उलटया कमळकळीचे लोलक आहेत. द्रिशाखी कमळकाळीची रांग आहे. प्रत्येक कमळकळीमध्ये नागाची फणी कोरलेली आहे. या रांगेच्या दोन्ही बाजूस दोन मिनार आहेत. कमानीच्या आतमध्ये दुसरी टोकाची कमान आहे. या दोन्ही कमानीमध्ये थोडे अंतर उजवीकडे सरकून गोलाची कमान आहे. विहीरीला दोन बगाड असून त्यावर सहा मोटा चालण्याची सोय केलेली आहे. बगाडाला हस्त आहेत. या विहीरीचे संपूर्ण बांधकाम दगड चुन्यामध्ये केलेले आहे. विहीरीचे अद्यापही पाणी वापरले जाते.[१४]

### ४.५.३.५ चाहूर येथील बारामोटेची विहीर

राष्ट्रीय महामार्गापासून पूर्वेस भुईंजपासून १ कि.मी. अंतरावर जवळ चाहूर हे गाव आहे. या गावामध्ये किसन वीर सहकारी साखर कारखाना रस्त्याच्या कडेला ही विहीर आहे. या विहीरीचे संपूर्णबांधकाम दगड चुन्यामध्ये केलेले आहे. या विहीरीचे बांधकाम कोणी व केव्हा केले याबाबत निश्चित पुरावा नाही. परंतु ही विहीर मराठाकालीन असल्याचे शिल्पांवरून दिसते.

या विहीरीची रचना जाधवरावंच्या विहिरी सारखीच आहे, फक्त त्या विहीरीपेक्षा ही आकाराने मोठी आहे. या विहीरीमध्ये १० फूट ३ इंच रूंदीच्या २९ पायऱ्या आहेत. पायऱ्या उतरल्यानंतर गोलाची कळीच्या दगडाची कमान आहे. या कमानीवर शिल्पे नाहीत येथून पुढे गेल्यानंतर दुसरी गोलाची कळीच्या दगडाची कमान आहे. या कमानीच्या वरील बाजूस किर्तीमुख असून त्याच्या दोन्ही बाजूस कमलदल कोरलेली आहेत. त्याच्या वरील बाजूस दोन्ही बाजूस दोन झेप घेणारे शरभ आहेत. दोन्ही शरभ शिल्पे फोडलेली आहेत. शरभशिल्पाच्या वरील बाजूस कमळकळीचे लोलक असलेल्या हस्तावर पागोळे आहे. पागोळयावर ७ कमळकळीवर प्रत्येकी एक चक्र आहे. या कमानीच्या दुसऱ्या बाजूस किर्तीमुख, मासा व मोत्याची माळ चोचीमध्ये पकडलेली दोन मोराची शिल्पे आहेत. ही विहीर ५० फूट आहे. या विहीरीस तीन बगाड असून प्रत्येकी चार मोट चालतील अशी व्यवस्था केलेली आहे. जरी ही विहीर थोडया प्रमाणावर शिल्पांकृत असली तरी लिंब शेरीच्या विहीरी एवढी आकर्षक नाही.[१५]

### ४.५.३.६ चाहूर येथील राजा राणीची विहीर

राष्ट्रीय महामार्गापासून पूर्वेस भुईंजपासून १ कि.मी. अंतरावर जवळ चाहूर हे गाव आहे. या गावामध्ये किसन वीर सहकारी साखर कारखाना रस्त्याच्या कडेला ही विहीर आहे. या विहीरीचे संपूर्ण बांधकाम वीट चुन्यामध्ये केलेले आहे.

छोटया ओढयाकाठी ही विहीर बांधलेली असून या विहीरीला पायऱ्या नाहीत. जरी विहीर खोदली असली तरी विहीरीचे बांधकाम जमीनी स्तरापेक्षा फार उंच बांधलेले आहे. ओढयाच्या बाजूने विहीरीला प्रवेशद्वार आहे. हे प्रवेशद्वार रस्त्याच्या बाजूला असून प्रवेशद्वारास बहूपर्णी कमान आहे. या कमानीची उंची ७ फूट ८ इंच असून रूंदी ५ फूट ३ इंच आहे. ही कमान आज दुभंगली आहे. विहीर ही बाराकोनी असून विहीरीच्या भिंतींना आतील बाजूस टोकाची कमान, त्रिपर्णी व बहुपर्णी कमानी बांधलेल्या आहेत. समोरासमोरच्या कमानी एकसारख्या आहेत. या कमानीमध्ये २ फूट लांबी रूंदीचे चौरस आहेत. विहीरीचे बांधकाम करताना ठराविक अंतरावर जास्त भाजून काळया झालेल्या विटांचा थर बांधलेला आहे. त्यामुळे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे.  आवश्यक तिथे विटा तासून व तिरकी रचना करून आकर्षित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. टोकाच्या कमानीच्या दोन्ही बाजूस दोन फुले काळया विटांमध्ये कोरलेली आहेत. या विहीरीसाठी १.६ फूट लांब, १ फूट रूंद व ३ इंच जाडीची विट वापरलेली आहे.[१६]

### ४.५.३.७ बावधन येथील गोखले यांची विहीर

पाचवड वाई रस्त्यावर बावधन फाटयापासून १.५ कि.मी अंतरावर शेतामध्ये एक विहीर आहे. चाहूर येथील राजाराणीच्या विहीरीप्रमाणे ही विहीरीचे बहुतांश बांधकाम विट व चुन्यामध्ये केलेले आहे. विहीरीच्या पायऱ्या, बांधकामाचा सर्वात वरचे दोन थर व बगाडांचे बांधकाम दगड चुन्यामध्ये केलेले आहे. ही विहीर रास्ते यांनी बांधली. कालांतराने रास्तेंनी ती गोखल्यांकडे हस्तांतरीत झाली. केदार गोखले यांच्या मते वाईचे गणपती मंदिराच्या बांधकामातून राहिलेल्या साहित्यातून रास्ते यांनी ही विहीर बांधली.

या विहीरीमध्ये सहा फूट लांबी व दोन फूट रूंदीच्या अकरा पायऱ्या उतरल्यानंतर दोन्ही बाजूस तीन फूट उंचीची व  दोन फूट रूंदीचे देवकोष्टके आहेत. इथून सात पायऱ्या उतरल्यानंतर उंचावर भिंतीतून बाहेर पाच फूट रूंदीची त्रिपर्णी कमान बांधलेली आहे. ही कमान लहान आहे. आणखी सात पायऱ्या उतरल्या नंतर एका कमानीवर दुसरी कमान बांधलेली आहे. खालची कमान झुकावाची आहे याची उंची कमी आहे. परंतु वरच्या त्रिपर्णी कमानीची उंची फार आहे.

विहीरीचे बांधकाम करताना पायामध्ये दगड चुन्यामध्ध्ये केलेले आहे. बाकी सर्व बांधकाम वीट चुन्यामध्ये केलेले आहे. प्रत्येक तीन आडव्या विटांच्या बांधकामानंतर उभ्या वीटांच्या थराचे बांधकाम केल्याने सांधमोड होऊन बांधकामास मजबुती आलेली आहे. प्रत्येक पाच फूटाच्या बांधकामानंतर एक थर जास्त भाजून काळया पडलेल्या वीटांचा एक थर बांधल्याने बांधकामास आकर्षकता आलेली आहे. कमानीचे बांधकाम करताना आवश्यक तिथे विटा तासून वापरलेल्या आहेत.

केदार गोखले यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार विहीरीच्या तळाशी पिंपळाच्या लाकडाचे कडे आहे. इ.स. १९७२ मध्ये विहीरीतील पाणी कमी झाल्यानंतर ते निदर्शनास आहे. इतकी वर्षे पाण्यात राहूनही लाकडी कडे सुरक्षित व मजबूत होते.

विहीरीला जवळजवळ बांधलेली तीन बगाड असून सहा मोटा चालण्याची सोय करण्यात आलेली आहे. या विहीरीचे पाटाचे बांधकाम अद्यापही सुस्थितीमध्ये आहे. ही विहीर अद्याप वापरामध्ये आहे.[१७]

### ४.५.३.८ बावधन येथील थोरली विहीर

वाई येथून दक्षिणेस चार कि.मी. अंतरावर बावधन हे गाव आहे. या गावाच्या पश्चिम दिशेला गावाच्या वेशीच्या बाहेर थोरली विहीर आहे. प्रत्यक्षात ही बारव आहे.हीचे सर्व बांधकाम दगड चुन्यामध्ये केलेले आहे.

या बारवेचे माप ४२.४ X ४२.४ फूट आहे. बारव उतरताना सुरूवातीस किर्तीमुख आहे. नंतर नऊ पायऱ्या नंतर एक रूंद पायरी आहे त्यानंतर चार पायऱ्या नंतर पुन्हा रूंद पायरी आहे. त्यानंतर बारवचे टप्पे आहेत. या टप्प्यावर उजव्या बाजूला तुटलेल्या एका दगडावर तीन ओळीचा लेख आहे. हा दगड वेगळा आहे. या लेखातील पहील्या ओळीतील हा र कै.ती.आ तर दुसऱ्या ओळीतील श्री गणेश अण्णाजी जोशी यां तर तिसऱ्या ओळीमध्ये शके १६२२ असे लिहिले आहे. तुटलेल्या दगडाचा भाग नाही. या लेखावरून ही बारव शके १६२२ मध्ये (इ.स. १७००) मध्ये बांधली असावी.

या बारवेला तिन्ही बाजूने उंच भिंत बांधून बंदिस्त केलेले आहे. नऊ पायऱ्या उतरून पाण्यापर्यंत पोहोचता येते. समोरच्या व बाजूच्या भिंतीमध्ये ५.७ फूट उंच व २.६ फूट रूंद बहूपर्णी कमान असणारी देवकोष्टक आहे. कमानीच्या दोन्ही बाजूस दोन सहस्त्र दले कोरलेली आहेत. या बारवेचे बांधकाम पूर्ण दगड चुन्यामध्ये आहे.[१८]

### ४.५.३.९ कोरेगाव येथील कमानीची विहीर

सातारा शहरापासून पूर्वेस १८ कि.मी. अंतरावर कोरेगाव हे तालुक्याचे गाव आहे. येथील सरस्वती विद्यालयापासून कोरेगाव पंढरपूर रस्त्यापासून उत्तरेस १०० मीटर अंतरावर ही विहीर आहे. या विहीरीतील लेखावरून ही विहीर शके १६०० (इ.स. १६७८) बांधली आहे असे दिसते. विहीरीचा व्यास ३० फूट असून खोली ४० फूट आहे. या विहीरीस फार पायऱ्या नाहीत. विहीरीमध्ये उतरताना प्रथम कासवाचे शिल्प आहे. नऊ पायऱ्या उतरल्यानंतर दोन्ही बाजूस २ फूट उंच १ फूट रूंदीची टोकाची कमान असलेली देवकोष्टके आहेत. तिथून सहा पायऱ्या उतरल्यानंतर दोन्ही बाजूस ६ फूट उंच व २.६ फूट रूंदीच्या टोकाची पंचपर्णी कमान आहेत. तिथून ४ पायऱ्या उतरल्यानंतर मोठी पंचपर्णी कमान आहे. या विहीरीमध्ये हत्ती, शरभ, कमळ फुले, एक शिलालेख, हनुमान व दोन हत्तींची झुंज यांची शिल्पे आहेत. विहीरीला दोन बगाड आहेत. बगाडांना साधे हस्त आहेत. विहीरीच्या एका बगाडावर एक नागाचे शिल्प आहे. बगाडावर दोन मोटा चालण्याची व्यवस्था केलेली आहे. या विहीरीचे संपूर्ण बांधकाम दगड चुन्यामध्ये केलेले आहे.[१९]

### ४.५.३.१० नागेवाडी येथील विहीर

पुणे बंगलोर राष्ट्रीय महामार्गावर नागेवाडी हे गाव आहे. या गावाच्या बाहेर राष्ट्रीय महामार्गाच्या पश्चिमेस शाकंबरी देवीचे मंदिर आहे. या मंदिरापुढे एक विहीर आहे. या विहीरीमध्ये ११ पायऱ्या उतरल्या नंतर दोन्ही वाजूस १.६ फूट उंच व १ फूट रूंद टोकाची कमान असलेली दोन देवकोष्टके आहेत. येथून ७ पायऱ्या उतराव्या लागतात २५ फूट व्यास असलेल्या या विहीरी खोली ही ३० फूट आहे. या विहीरीच्या बांधकामाच्या तळाशी पिंपळाच्या लाकडाची अष्टकोनी कडे आहे. विहीरीच्या बगाडास हस्त असून हस्तावर नाागाचे शिल्प व कमळकळीची शिल्पे कोरलेली आहेत. या विहीरीचे संपूर्ण बांधकाम दगड चुन्यामध्ये झाले आहे.[२०]

### ४.५.३.११ सोळशी येथील महाजन यांची विहीर

कोरेगाव तालुक्याच्या उत्तर भागामध्ये सोळशी हे गाव आहे. या गावाच्या पूर्व बाजूस एक लहान विहीर आहे. पूर्वीच्या बारवेचे हे अर्धे रूप आहे. ही विहीर चौकोनी असून तिला दोन्ही बाजूने पाच फूट लांबीच्या २३ पायऱ्या आहेत. ही विहीर आयताकृती असून त्याची १० फूट लांबी रूंदी आहे. या विहीरीच्या भिंतीची उंची १० फूट आहे. या विहीरीमध्ये दोन शिलालेख असून दोन्ही वर एकच मजकूर लिहीलेला आहे. या मजकूरावरून ही विहीर मोहाळशेट उगले शेटे महाजन यांनी शके १६१८ चैत्र शद्ध १ मध्ये बांधली व त्यास रू. ४१०० खर्च आला. असे समजते. या विहीरीचे संपूर्ण बाधंकाम दगड चुन्यामध्ये केले आहे.[२१]

### ४.५.३.१२ सातारा येथील बाजीराव पेशवे यांची विहीर

सातारा शहरातील शुक्रवार पेठेमध्ये बाजीरावाची विहीर आहे. दुसरा पेशवा बाजीराव बल्लाळ यान्ने ही विहीर बांधली असे सांगितले जाते. याबाबत निश्चित पुरावा नाही. या विहीरीच्या पायऱ्यांचा जीना इंग्रजी एल अक्षराच्या आकारासारखा आहे. या विहीरीला पाण्यापर्यंत ६० पायऱ्या उतरल्यानंतर एक टोकाची कळीच्या दगडाची कमान आहे. या कमानीला जोडूनच पुढील बाजूस लहान टोकदार कमान आहे. मोठया कमानीच्या टोकाच्या वरील बाजूस बसलेल्या पुरूष व त्याच्या बाजूस हात जोडून उभ्या असलेल्या सेवकाचे शिल्प आहे. या शिल्पाच्या दोन्ही बाजूस सहस्त्रदल व शरभांची शिल्पे कोरलेली आहे. या शिल्पांच्या वरील बाजूस हस्तावर पेललेल्या तुळईवर पागोळे आहे. पागोळयावर टोकाची कळीच्या दगडाची कमान असलेली खोली आहे. कमानीच्या टोकावर लहान सहस्त्रदल कोरलेले आहे. खोलीच्या वरील बाजूस हस्तावर पागोळे असून त्याच्या वरील बाजूस बसण्यासाठी जागा आहे. ही विहीर

वर्तुळाकार असून तिचा व्यास ४० फूट असून ८० फूट खोल आहे. विहीरीच्या भिंतीवरील आडव्या खाचीमुळे भिंतीचे दोन  भाग झाले आहेत. विहीरीच्या बगाडाचे हस्त साध्या मोलीमेचे असून बगाडावर चार मोटांची व्यवस्था केलेली आहे.[२२]

### ४.५.३.१३ कराड येथील नकटया रावळाची विहीर

कराडच्या कोटाच्या पश्चिम भागामध्ये नदीच्या पात्राच्या स्तरापर्यंत खोदली आहे. नदीचे पात्र पाईपने विहीराला जोडलेले आहे. ही विहीर आयताकृती असून कमानीच्या बांधकामामुळे विहीरीचे दोन भाग झाले आहेत. पूर्वेकडील भाग १३६ फूट व पश्चिमेकडील भाग ३६ फूट आहे. विहीरीचा मुख्यभाग ३६ फूट लांबी रूंदीचा आहे. आग्नेय कोपऱ्यामध्ये पाणी उपसण्यासाठी अर्धगोल बांधकाम केलेले आहे. ही विहीर तीन टप्प्यामध्ये बांधलेली आहे. पहिल्या टप्प्यामध्ये २१ पायऱ्या आहेत. यानंतरची पायरी पाच फूट रूंद असून या पायरीची बाजूचा भाग विहीरीमध्ये सभोवती जात असल्याने या पायरीवरून कमानीवरून अर्धगोल टप्प्यावरून सभोवती जाता येते. दुसरा टप्पामध्ये ३१ पायऱ्या आहेत. पहिल्या टप्प्या प्रमाणेच दुसऱ्या टप्प्याच्या अखेरच्या पायरीवरून दोन्ही बाजूने लहान कमानीतून मोठया कमानीमध्ये जाता येते. दोन्ही लहान कमानी कळीच्या दगडाच्या आहेत. या कमानीतून वळून मोठया कमानीमध्ये येता येते. मोठी कमान टोकाच्या कळीच्या दगडाची असून त्याची लांबी १५ फूट व रूंदी १२ फूट आहे. कमानीचे छत अष्टकोनामध्ये घुमटाकार आहे. तिसरा टप्पा ३१पायऱ्यांचा आहे. या पायऱ्या खालील टोकाच्या कळीच्या दगडाची कमान असलेल्या पाण्यापर्यंत जातात. या कमानीच्या आत आणखी एक टोकाची कळीच्या दगडाची कमान आहे. विहीर बांधली असल्याने वरून खाली निमूळते चांगले दगडी बांधकाम केलेले आहे. विहीरीच्या सर्व पायऱ्या उंच व खडया आहेत. या विहीरीला बगाड नाही. विहीरीच्या भिंतीवर आठ ते दहा फूट अंतरावर आडव्या खाचा मारलेल्या आहेत. या खाचांमध्ये दहा फूट अंतरावर ६ इंचाचे चौरस घरे खोदलेली आहेत यामध्ये लाकडाचे अवशेष आहेत.[२३]

### ४.५.४ बारव स्थापत्य

पाणी ही मानवाची मूलभूत गरज आहे. मानवी वस्ती प्रामुख्याने नदी काठी झाली. नगरे नदीकाठी वसली. सिंधूसंस्कृतीच्या वेळी प्रत्येक प्रतिष्ठित घरात, अंगणात कूप खोदलेले असत. नदीवरून पाणी आणण्यापेक्षा आपल्या घरी किंवा नगरात विहिर खोदून जल प्राप्त करणे ही जलपुरवठा व्यवस्थापनातील अत्यंत महत्त्वाची प्रगती मानली जाते.

महाराष्ट्रात विशेषतः मराठवाडयातील रूढ शब्दांचे अर्थ समजावून घेत असताना मोट असणे–नसणे, देवकुलिका व त्याची संख्या इत्यादी येथे अभ्यासाच्या सोयीसाठी म्हणून रूढ प्रकार आणि मुख्य म्हणजे त्यांचे स्थापत्यशास्त्रीय वैशिष्टये, विधान व प्रवेश यांना प्राधान्य देण्यात आले आहे.

### ४.५.५ कुंड :

कुंड म्हणजे तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी स्थानासाठी बांधलेले मोठया आकाराचे पण उथळ हौद. अप्रत्यक्ष पाहाणी करताना असे आढळते की, जास्तीत जास्त दोन व अडीच मीटर आणि साधारणपणे दहा मीटर रूंदीचे चौरस बांधकाम असते. याला बारवेसारख्या पायऱ्या असतात. ही खालील ठिकाणी आढळून येतात. तेर, (प्राचीन 'तगर'), जिल्हा उस्मानाबाद येथे सर्व्हे नं. १४२ (सन १९८८) येथे उत्खनन केले आसताना महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन कुंड मिळाले. तेरणा नदीच्या काठी विटांनी बांधलेले हे कुंड असून ते तीन टप्प्यांत पूर्ण झालेले आहे.८.३० X ८.३० मी. आकाराच्या या कुडांची तळापासूनची उंची २.७०मी. आहे. ९० सें.मी.उंचीचा, एकके टप्पा अशा तीन टप्पात हे बांधकाम पूर्ण केले याला दोन बाजूनी, पूर्व व दक्षिण भागात उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. कुंडाचे स्थापत्यशास्त्रीय वैशिष्टये म्हणजे चांगल्या भाजलेल्या विटांचा वापर.विटाचा आकार ५२ X ५२ X ५ से.मी.आणि ४२ X १९ X ६ से.मी.आहे. सभोवतालची काळी जमीन आणि पाणी यांच्या दबावातून निर्माण होणाऱ्या सर्व प्रकारच्या बल – प्रतिबलांना टाळण्यासाठी असलेल्या पायऱ्यांच्यामध्ये विशिष्ट अंतरानंतर ठेवण्यात आलेल्या आगमन निर्गमन मार्गी (मोरी) मुळे  पाण्याचा योग्य निचरा होऊन हे बांधकाम टिकाऊ ठरले आहे. राज्य पुरातत्व विभागाने केलेल्या उत्खननात या कुडांच्या उत्तर भागात अश्वनालाकृती मंदिराचे अवशेष मिळाले. स्तरीय संदर्भाच्या आधारे याचा काळ इ.स. चे पहिले शतक ठरावा. सातवाहन कालखंडात निर्माण झालेले हे कुंड आहे व विदर्भातही मांढळ येथील कुंड विटांतील असून ते ४ थ्या शतकातील आहे.

मांढळ, (जि.नागपूर) या ठिकाणी भोंढी हुडकी तसेच भोला हुडकी आणि वऱ्हाडी तलाव या नावाने ओळखल्या  जाणाऱ्या स्थानावर केलेल्या उत्खननात वाकाटककालीन अवशेष सापडले. भोंडी हुडकी या स्थानावर मंदिराच्या विटांतील अवशेषाबारोबर एका पुरूषभर (२.२५ मी ) खोलीचे एक कुंड मिळाले.[२४]

### ४.५.६ बारव :-

बारवेच्या रचनेत आढळणारे विशेष तंत्र म्हणजे पहिला दगडी थर असतो. त्यावरील दगड समांतर पातळीवर येणाऱ्या जमिनीच्या दाबामुळे पुढे सरकू नये म्हणून साधारणपणे दोन सेंटीमीटरने  मागे बसवतात. येथे खालील दगड तेवढाच वर आलेला असतो. हा प्रक्षेप खाच पुढे सरकणाऱ्या दगडास अटकाव करते. या पद्धतीचा उटंगळ, अटकाव-जोड  असे म्हणतात. तर याशिवाय तेथे अन्य पद्धतीचा पण उपयोग केलेला असतो. वरील दगडास असलेले टोक खालील दगडाच्या खाचेत बसवलेले असते. या पद्धतीच्या उपयोगात दोन समांतर दगडांस खाच करून त्यावर शिसे किंवा तांबे वितळवून ओततात.  या पद्धतीच्या जोडामुळे कुठल्याही दाबाने सरकणाऱ्या निखळणाऱ्या दगडास अटकाव केला जातो. कोपऱ्यावर असलेला दगड सांधू वा पडु नये म्हणून काटकोनात घडवलेला असतो. यामुळे दोन दगडांना सांधणारी अन्य वस्तू, माती चुना लागत नसे. ऑफसेट जॉईंट पद्धतीमुळे बारवेच्या प्रवेशाची रूंदी ही तिच्या तळाच्या पायरीच्या रूंदीपेक्षा जास्त असते. तर बारवेतील दोन सोपांनामधील उंची एक ते दिड मीटरपेक्षा जास्त असत नाही आणि यासारख्या तंत्रामुळे बारवा शतकानुशतके टिकून आहेत. याशिवाय स्थानपरत्वे ही काही वैशिष्ठये आढळतात.

बारवेला जमीन पातळीवर एक संरक्षक भिंत असते. या भिंतीला आतून देवकोष्ठ, मंडप, ठेवलेले असतात. तसेच बाहय बाजूला एक सुरक्षापथ ठेवीत. तो एक ते दीड मीटर रूंदीचा असतो. उत्खननात मिळालेल्या कुंडात सभोवतालच्या माती व पाणी यांच्या समांतर दाबापासून रक्षण व्हावे म्हणून विशिष्ट अंतरावर लहान छिद्रे ठेवली गेली, तर तळणी येथील विटाच्या विहिरीस प्रवेशासाठी दगडी पायऱ्या ठेवल्या आहेत. बहादुरपुरा येथील अष्टकोनी आड तंत्रदृष्टया उत्कृष्ट आहे. जागजी, करखेली, होट्ट ल येथील बारवांत सर्वात खालील टप्प्यात जाणीवपूर्वक पाण्याचा एक आगम मार्ग ठेवलेला आहे तर वेल्हे, इडोळी, मुखेड, मंचर येथे मुख्य सोपान कायम खुला राहावा म्हणून एक निर्गमन ठेवला आहे. तंत्रदृष्टया पिंगळी, लोणार येथील बारवा श्रेष्ठ प्रतीच्या आहेत.  बारवस्थापत्यासाठी उपयोगात आणलेले दगड बऱ्याचदा पाच बाजूंनी घडवावे लागत. भारवेच्या विकासाबरोबर वापीचा प्रकार, आकार यात वाढ होत गेली. त्यात मंदिराप्रमाणे सर्व अंगोपागांचा विचार करण्यात आला. या स्थापत्याच्या विकासात एक क्रम आढळतो. वाढत्या विकासाबरोबर बारवा तंत्रदृष्टीने परिपक्व  होत गेल्या.[२५]

बारवाच्या निर्मीतीमध्ये भूस्तर रचनेचा अभ्यास आणि त्या अनुषंगाने करावयाचे बांधकाम याला विशेष महत्व होते. तसेच परिसराचा अभ्यास करून बारवेच्या बारमाही

जलसाठयांच्या पुनर्भरणाचा विचारही करण्यात आला होता. एकूणच भारताच्या भूस्तर रचनेचा विचारसुद्धा स्थापत्याच्या विकासात महत्त्वाचा ठरतो.

**साहित्यिक संदर्भ व देवदेवतांचे स्थान :**

मयमतसार ग्रंथात जलव्यवस्थेचे स्थान आणि त्या अनुषंगाने होणाऱ्या वसाहतींचा विचार केलेला दिसून येतो. कोणत्याही नगरात वास्तु व जलाशय यांचे स्थान यादृष्टीने काही नियम सांगितलेले आहेत.

नगराच्या प्रकारान्तर्गत स्थानांविषयी येथे असे सांगितलेले आहे की, कोणत्याही जाणत्या माणसाने जलाशय किंवा कुंडाच्या ईशान्येस धार्मिक चर्चांसाठीचा मंडप उभारावा, हा जलाशय अगदी वासराच्या खुराइतकी लहान असला तरी हे कार्य जरूर करावे.

सौम्याया तु प्रकर्तव्यं धर्मश्रवणमंडपम् ।
ईत्रो वापी च कूपं स्यादापवत्सपदाश्रितम्।।[२६]

त्याचप्रमाणे असेही वर्णिलेले आहे की मठ, बाजार तसेच उपहारगृहे अथवा अन्नछत्रे ही नेहमी विहिरी, वापी किंवा आयताकृती जलाशयांजवळ आणि बागांजवळ असावीत.[२७]

**४.५.७ बारव**

कुंड हा मुळात या वास्तुप्रकाराचा आधारभुत घटक ठरतो. या कुंडाच्या वर विशिष्ट पायऱ्या ठेऊन एक पटांगण सोपान (टप्पा) ठेवतात. त्यानंतर दुसरा व तिसरा सोपान ठेऊन झालेला विस्तार बारव स्थापत्यात पहावयास मिळतो. थोडक्यात एकात एक लहान होत जाणारे कुंड असे याचे स्वरूप असते. बारवेत विविध देवतांची स्थापना केली जाते. त्यासाठी असणारी दवेकोष्ठे सर्वात वरच्या सोपानावर स्वतंत्र अशी किंवा अगदी संरक्षक भिंतीत आणि प्रवेश मार्गाच्या दोन्ही बाजूंना ठेवतात. बारवेत प्रामुख्याने चौरस आकार आढळतो. आयत व क्व चित अष्टकोनी आकार पहावयास मिळतात. बारवेत एक ते चार मुख प्रवेश असतात. एक प्रवेश व चौरस आकार असलेल्या एरगी येथील बारवेत तीन टप्पे आहेत. आयत आकाराची बारव मुखेड (जिल्हा नांदेड) येथे असून १६ x १०.५० मी. आाकाराची ही एक वैशिष्टयपूर्ण बारव आहे. बारवेच्या प्रवेशावर असलेला सज्जा आज अस्तित्वात नाही . विविध सोपांनावरून खाली उतरण्यासाठी असलेल्या पायऱ्या व एकूण रचना पाहता कर्नाटकातील हंपी जिल्हा वेल्लारी येथील उत्खननात मिळालेल्या बारवेशी हिचे साम्य आढळते. या परिसरातील शिलालेख व अन्य वास्तू पाहता ही बारव चालुक्यकालीन असून ती बाराव्या शतकातील आहे असे म्हणता येते. एक प्रवेश असलेली व अष्टकोनी आकाराची बारव मरळक जिल्हा नांदेड येथे असून या

बारवेलगत दगडी हौद आहे. बारवेतील पाणी रहाटाद्वारे उपसून ते प्रणाली द्वारे हौदात जमा केले जाई. मोटेची व्यवस्था असलेली उत्कृष्ट अशी चौरसाकार बारव येवती तालुका बिलोली जिल्हा नांदेड येथे आहे. मंचर जिल्हा येथे शिलालेख असलेली चौरसाकार बारव आहे. तर दोन प्रवेश द्वार असलेल्या बारवेमध्ये सिल्लोड(जिल्हा औरंगाबाद), गुरसाळे जिल्हा सातारा, पुरंदर जिल्हा पुणे येथील बारवा उल्लेखनीय असून या प्रकारातील सर्वात चांगली बारव जागजी जिल्हा उस्मानाबाद येथे आहे. २४ चौ.मी. आकाराची ही बारव एकूंण पाच टप्प्यात पूर्ण केलेली आहे. प्रथम सोपान आहे त्याच ठिकाणी भिंतीलगत चारही बाजूस मिळून एकुण २४ देवकोष्ठांची निर्मीती करण्यात आली आहे. यात विष्णूमूर्ती असून देवकोष्ठांचे शिखर द्राविड व भूमीज शैलीतील आहे.[२८]

**तीन प्रवेशयुक्त बारव :**

बारव या स्थापत्य प्रकारामध्ये चार प्रवेश हा सर्वसामान्य प्रकार आढळतो. पण काही वेळा उपलब्ध क्षेत्र व स्थानिक काही कारणांमुळे तसेच पाण्याच्या कमी अधिक उंची वरील उपलब्धतेमुळे मूळ आराखडयात काह बदल केल्याचे दिसतात व त्यातूनच तीन प्रवेशयुक्त बारवांची निर्मीती झाली असावी. अशा बारवा एरगी जिल्हा नांदेड, एरंडेश्वर जिल्हा परभणी, जालना, तोडांपूर जिल्हा जळगाव , कातरखटाव जिल्हा सातारा, मानूर जिल्हा बीड, वेळापूर जिल्हा सोलापूर येथे आहेत.[२९]

**चारप्रवेश युक्त बारव :**

बारव स्थापत्यात सर्वत्र रूढ असलेला हा प्रकार असून माहूर जिल्हा नांदेड, अंबड जिल्हा जालना, वालूर व गौर जिल्हा परभणी येथे अशा बारवा आहेत. या स्थापत्य प्रकारातील चांगला बारव पिंगळी जिल्हा परभणी येथे असून २५.६० चौ.मी. आकाराची ही चौरस बारव आहे.सहा पायऱ्यानंतर सोपान लागतो. यात एकूण पाच सोपान असून प्रथम सोपान ९५ से.मी. रूंद आहे. दुसरा व तिसरा सोपान ८८से.मी.रूंदीचा आहे. बारवेस असलेल्या संरक्षक भिंती नंतर सुरू होणाऱ्या प्रथम सोपानवर प्रत्येक बाजूस दोन असे एकूण आठ देवकोष्ठ बांधलेले आहेत. बारवेलगत त्रिदल पद्धतीचे मंदिर असून या बारवेच्या निर्मीतीस नाथपंथीय तंत्रसाधकांचे प्रोत्साहन असावे असे येथील शिल्पपट व मकरध्वज जोगी ७००० या लेखावरून वाटते. शाक्त पंथीयांच्या पंचमकार साधनेत मैथुनाचीही नोंद आहे. जलकेणी जलक्रिडा यासाठीसुद्धा कदाचित बारवेचा उपयोग होत असावा. तंत्रदृष्टया ही बारव अतिशय प्रमाणबद्ध व रेखीव आहे. याचप्रकारातील सिंदखेडराजा जिल्हा बुलढाणा येथील बारव उल्लेखनिय आहे. बारवेवरील

विपुल शिल्पांकनामुळे ही 'पुतळा बारव' या नावानेही ओळखली जाते. अलंकरणाच्या दृष्टीने पाहता महाराष्ट्रातील बारवेची ही स्वामीनी ठरते . १५.७० चौ.मी. आकारातील ही बारव एकूण सात टप्प्यात पूर्ण केली आहे. मधोमध असलेले कुंड, मुख्य सोपानानंतर असलेली संरक्षक भिंत व चारही बाजूंनी असलेला प्रवेश अशी यांची रचना आहे. संरक्षक भिंत उभारताना एक सलग गजथर उभारून त्यावर विविध देवदेवतासाठी स्वतंत्र अशी २४ देवकोष्ठे निर्माण केली आहेत या शिवाय विविध देवता, देवागंणा, देवानुचर, देवता, परिवार व असुर यांचे शिल्पांकण येथे आहे. विविध प्रकारची भौमितीक नक्षी, अश्वारूढ योद्धे, त्यांच्या कवायती, याशिवाय हंसथर व नृत्यागंना येथे पहावयास मिळतात. बारवेची एक बाजू निखळलेली आहे. देवकोष्ठ उभारताना विकसित मंदिराची लहान प्रतिकृतीच साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. ही तंत्रदृष्टया एक परिपूर्ण बारव असून, बारवेच्या रचनेत भद्र, प्रतिभद्र, सुभद्र, यांचा उपयोग केला आहे. या बारवेची निर्मीती साधारणपणे बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात झाली असावी.

ईडोळी तालुका परतूर जिल्हा जालना येथील बारव ३१ चौ.मी. आकाराची आहे. चार प्रवेश व पाच सोपान असलेली ही बारव असून मुख्य सोपानावर असलेली संरक्षक भिंत २.५०मी. उंचीची आहे. या भिंतीमध्ये अनेक देवळयांची निर्मीती केली आहे. देवतांसाठी बांधलेली ही लहान मंदिरे असून गर्भगृह १.३०चौ.मी. व त्यापुढे मुखमंडप १.५० चौ.मी. आहे. या मंदिराच्या समोर प्रशस्त सोपान (पटांगण) आहे. एकूण १६ मंदिरे व १० देवकाष्ठे या बारवेत आहेत. बारवेतील मंदिराच्यावर विटात बांधलेले शिखर होते हे विशेष. बारवेच्या एकूण बांधकामाची उंची नऊ मीटर आहे. बारव स्थापत्येच्या दृष्टीने बारवेची रचना उत्कृष्ट आहे , तथापि काही स्थानिक अडचणींमुळे सगळयात शेवटच्या टप्पातील कुंड तंत्रदृष्टया परिपूर्ण वाटत नाही. या कुंडाची रचना करताना दगडी दटटे, तोडशिळा तसेच गळबंध याचा पुरेसा उपयोग जागी न केल्यामुळे येथील काही भाग निखळला आहे.[३०]

**मंडपयुक्त बारव जलमांडवी :**

बारव स्थापत्यामध्ये विविध आकार व प्रकार आढळतात. तसेच बारवेत कूट किंवा मंडप पण दिसतात. लोकभाषेत अशा बारवांना 'माड' म्हणतात. बारवेची पुढील अवस्था म्हणजे कूट, भिटट, सज्जायुक्त मंडप होय. हे चौरस आकारातील असतात. बारवेत जसे एक ते चार प्रवेश आढळतात तसेच एका बाजूपासून सर्व बाजूने विकसित झालेला मंडप आढळतो. महानुभाव साहित्यात अशा बारवांना जलमांडवी म्हटले आहे. सामान्य बारवेच्या बांधकामापेक्षा

हे काम जास्त खर्चिक असते. बारव निर्मितीची हौस व या स्थापत्याची उपयुक्तताच यातून स्पष्ट होते.

**एकमंडपयुक्त बारव :**

अशा बारवा म़हाकाळा (जिल्हा जालना), मुदखेड (जिल्हा नांदेड), उपळा (जिल्हा उस्मानाबाद)या ठिकाणी आहेत. लोणी भापकर (तालुका बारामती, जिल्हा पुणे) येथे या प्रकारातील एक चांगली बारव आहे. या बारवेत एक मंडप असून २८ देवकोष्ठ आहेत. मंडपाच्या स्तंभावरील व चौथऱ्यावरील अलंकरण लक्षणीय आहे.

**दोन मंडपयुक्त बारव :**

या प्रकारातील उल्लेखनीय बारव अंबड (जिल्हा जालना) येथे आहे ती कावंदी या नावाने ओळखली जाते बारवेचा आकार पूर्व–पश्चिम २३.४० मी. व उत्तर–दक्षिण १९.८० मी.आहे. या बारवेस तीन टप्पे आहेत. उत्तर–दक्षिण बाजूस दोन स्वतंत्र मंडप बांधलेले असून बारवेच्या उत्तर बाजूस असलेला मंडप हा खालील मुख्य कुंडापर्यत पुढे आलेला आहे. दक्षिण भिंतीतील मंडप आयताकार आहे. या रचनेचे मुख्य वैशिष्ट म्हणजे दोन्ही मंडपाच्या पातळीमध्ये ८० से.मी.चा फरक असून बारवेत वेगवेगळया पातळीवर पाणी असताना त्याचा उपयोग करणे शक्य होई. तसेच उत्तर बाजूकडील मंडपातील अगदी शेवटच्या कुंडात असलेले पाणी उपसून घेणे शक्य होई. या बारवेचे जतनविषयक काम स्थानिक स्वराज्य संस्थेने केले आहे. या प्रकारातील वास्तू भोकरदन (जिल्हा जालना), टाकळी(जिल्हा अहमदनगरा), बिडकीन(जिल्हा ओरंगाबाद) या ठिकाणी पहावयास मिळतात.

**तीन मंडपयुक्त बारव :**

तीन मंडपयुक्त बारवेचे आदर्श उदाहरण त्र्यंबकेश्वर (जिल्हा नाशिक) येथे 'कुशावत' च्या स्वरूपात पहावयास मिळते. मुळात यादवकालीन अष्टकोनी कुंडाची संपूर्ण पुर्नबांधणी होळकरांनी अठराव्या शतकात केली. चार मंडपयुक्त बारवेमध्ये चारठाणा(तालुका जिंतूर, जिल्हा परभणी) या बारवेची नोंद करावी लागते. गोकुळेश्वर मंदिराच्या ईशान्य बाजूस ही बारव आहे. प्रवेशाच्या दृष्टीने तीन मुखे व मुखाच्या दोन्ही बाजूस कूट असलेली ही जलमांडवी 'भद्र' या प्रकारात मोडते. २३ चौ.मीटर आकाराची ही बारव असून संरक्षक भिंतीस लागून मंडपाची निर्मिती करण्यात आली आहे. या बारवेत एकूण २७ देवकोष्ठे असून पूर्व–पश्चिम भागास दोन मोठी गर्भगृहे ठेवली आहेत. एकात एक अशा सहा टप्प्यात पूर्ण झालेली ही बारव मंडपासाठी

महत्त्वाची ठरते. या बारवेसाठी एकूण २४ पूर्ण स्तंभ व ४४ अर्धस्तंभांची निर्मिती करण्यात आली आहे लोणार (जिल्हा बुलढाणा) या ठिकाणी लिंबी बारव ही एक महत्त्वपूर्ण बारव असून गावात अन्य कुंडही असत. केंद्रीय पुरातत्व विभागाने संरक्षित केलेली ही वास्तू २६ चौ.मी. आकाराची असून एकूण पाच टप्प्यात पूर्ण करण्यात आली आहे. बारवेत सर्वात शेवटी असलेल्या कुंडानंतर पाच पायऱ्या ठेऊन त्यावर एक सोपान ठेवला आहे. हा २५सें.मी.रूंदीचा आहे. या टप्प्यावरील पायऱ्यांना कोठेही पुढे आलेला दटटा अथवा तोंडशिळा दिसत नाही. यावरील दुसरा सोपान पाच पायऱ्यानंतर असून तो ७० सें.मी.रूंदीचा आहे.त्यानंतरचा सोपान ७३ सें.मी. रूंदीचा आहे. यावरील सोपान सर्वात रूंद असून तो २.१० मी.आहे.या सोपानावर सर्व बाजूंनी मंडप बांधलेला होता. मुळात असलेला हा मंडप आज अस्तित्वात नसून केंद्रीय पुरातत्व विभागाने केलेल्या जतनविषयक कामानंतरसुद्धा येथे दिसणाऱ्या अवशेषावरून या मंडपाची कल्पना स्पष्ट होते. मंडपातून बाहेर पडणारे प्रवेश मार्ग हे उत्तर–दक्षिण व पश्चिम बाजूस आहेत. हे तीन मुख्य प्रवेशमुख १.९० मी. रूंदीचे असून त्यात प्रत्येकी दहा पायऱ्या आहेत. येथे योग्य जागी सोपान ठेवलेला आहे. मंडपाची उंची २.५० मीटर होती. सभोवताली असलेल्या संरक्षक भिंतीशी संलग्न असे हे मंडप असून बारवेच्या एकूण बांधकामाची उंची तळापासून १० मी.आहे. प्रत्येक दहा पायऱ्या आहेत. येथे योग्य जागी सोपान ठेवलेला आहे. मंडपाची उंची २.५० मी. आहे. सभोवताली असलेल्या संरक्षक भिंतींशी संलग्न असे हे मंडप असुन बारवेच्या एकूण बांधकामाची उंची तळापासून १० मी.आहे. प्रत्येक पायरी २५ से.मी .उंच व रूंद आहे. या बारवेस मंडप उभारताना एकूण ७६ अर्धस्तंभ व ५४ पूर्णस्तंभ असे १३० स्तंभ मूलतः बसविलेले असावेत. बारवेच्या पूर्व भागास प्रवेश नाही. या बाजूस असलेल्या मंडपाच्या केंद्रभागी एक गाभारा (२१०X२१० चौ.मी.) ठेवलेला आहे. गाभाऱ्याची विभागणी गर्भगृह व अंतराळ अशी करून मंडपाच्या पुढील भागात निर्माण केलेला अर्धमंडप दिसतो. चार स्तंभावर उभा असलेला हा अर्धमंडप कक्षासनयुक्त आहे. यावर लहान स्तंभ व कूट शिखर तसेच भौमितीक नक्षीचे अलंकरण आहे. बारवीच्या मंडपात गर्भागृहास अन्य तीस देवकोष्टे आहेत. या वस्तूचे अन्य एक विशेष म्हणजे मंडपाच्या पुढे दर २.३० मी. अंतरावर म्हणजेच मुळात मंडपास असलेल्या पूर्ण स्तंभाच्या पुढे मुद्दाम बसविलेल्या दगडी चौरंग (८२.६८ से.मी.आकार) आहे. येथे बसून काही विशिष्ट धार्मिक विधी पूर्ण करता येत असावेत. तसेच दिपोत्सवासारख्या उत्सवाची शोभा अवलोकन करता येईल. प्रमाणबद्धता व सुनियोजित परिपूर्ण रचना यासाठी ही बारव श्रेष्ठ ठरते. स्थल माहात्म्यामध्ये 'वायुतीर्थ'असा या स्थानाचा उल्लेख

आहे. चित्रसेन राजाची कन्या नंदा हिचा या ठिकाणी सुर्यनारायण प्रसन्न होऊन गतजन्मीच्या पापापासून मुक्ति मिळाली यासारखे कथानक सांगितले जाते. बारवेच्या पूर्व बाजूस असलेले भद्र व त्यातील गर्भगृहात मुख्य मूर्तीची अधिष्ठान शिळा असून (७२ X १३६ X ४० से.मी.) त्यावर गणेशासह अष्टदिक्पाल दर्शविले आहेत. यावर कदाचित शेषशाही विष्णूची मूर्ती असावी. आज हे स्थान व अन्य देवकोष्ठे रिक्त आहेत. येथील शिल्प व स्थापत्याचा विचार करता या बारवेची निर्मीती बाराव्या शतकात झाली असावी.[३१]

**पोखरणीः**

पोखरणी हा शब्द यादव काळात पुष्करणी यासाठी रूढ होता. पोखरणी हे पुष्करणीचे प्राकृत रूप होय. लीळाचरित्रातूनही ही संज्ञा येते. बारवेपेक्षा विस्तीर्ण जलाशय म्हणजे पोखरणी. याचे स्थापत्य शास्त्रीय वैशिष्ट्य म्हणजे कमी खोलीवर विस्तीर्ण असा भाग तळाशी ठेऊन बांधकाम करतात. स्वाभाविकपणे यात टप्पे असत नाहीत. बारवेच्या तुलनेत कमी रूंदीचे बांधकाम असते. पोखरणीचे ठळक वैशिष्ठय म्हणजे समतल भाग जास्तीत जास्त मोठे ठेऊन कमीतकमी टप्प्यात पूर्ण केलेले बांधकाम होय. अशा वास्तूचे वर्णन करताना कमलवेलीनी युक्त असलेला जलाशय म्हणजे पुष्करणी असेही म्हटले जाते. याच्या मध्यभागी काही वेळा मंडप उभारतात. विशेषतः दक्षिण भारतात अशा वास्तू आढळतात. शातारा जिल्हयामध्ये गुरसाळे ता.खटाव येथे अशी पोखरणी पाहावयास मिळते. या पोखरणीमध्ये बऱ्याचदा पाणी उपसण्यासाठी मोटेची व्यवस्था असते (याला बगाड म्हणतात). त्याठिकाणी तळाशी चौरस किंवा आयत खड्डा (कुंड) खोदलेला असतो.[३२]

**तडाग :**

पोखरणी पेक्षा मोठया जलाशयाला तडाग तळे किंवा तलाव म्हणतात. निसर्गतः उपलब्ध पाणलोट क्षेत्राची निवड करून योग्य ठिकाणी बंधारा बांधून निर्माण केलेले जलाशय म्हणजे तडाग होय. याची नोंद यापूर्वी केलेली आहे.

महाराष्ट्राच्या संदर्भामध्ये तेर किंवा मांढळ येथील विटातील कुंडानंतर आढळणाऱ्या बारवा या प्रामुख्याने आठव्या-नवव्या शतकापासूनच्या आहेत. मोठया प्रमाणात या वास्तूंची निर्मीती अकराव्या ते तेराव्या शतकात झाली. अभिलेखीय नोंद उपलब्ध असलेल्या बहुतांश बारवा या बाराव्या शतकातील आहेत. उदा. गणेशवाडी येथील विक्रमादित्य सहावा याच्या काळातील लेख, होट्टल येथील चालुक्यकालीन शिलालेख, लातूर येथील भूतनाथ मंदिरातील लेख किंवा धर्मापुरी येथील शिलालेख. आज अस्तित्वात असलेल्या बारवांचा विचार करता त्या

तंत्रदृष्ट्या उत्कृष्ट होत्या असे म्हणता येईल. तसेच त्या त्या स्थपतीने बारव निर्मीतीसाठी निवडलेले क्षेत्र व शोधलेले जलस्त्रोत हे अचूकपणे शोधले होते. त्यामुळे आजही अशा वास्तू कमी अधिक प्रमाणात उपयोगात आणल्या जातात. जेथे बारव, जलमांडवी, पोखरणी आहेत त्याठिकाणी उपलब्ध शिलालेखांचा अभ्यास करताना हे स्पष्ट होते की, अशा वास्तूंची निर्मीती होत असताना केवळ कुठल्या एका विशिष्ट राजवंशाची सत्ता नव्हती. किंबहुना राष्ट्रकूट, कल्याणचे चालुक्य, शिलाहार, कलचुरी, यादव या राजवंशाची सत्ता असताना त्या त्या स्थानावरील महत्वाकांक्षी सेनानी, सामंत, श्रेष्ठी व क्वचित जागी सामान्य गणिकांनीही स्वतंत्रपणे याची निर्मीती केली आहे. स्वाभाविकपणे रूढ आराखडयांना स्वीकारून ही निर्मीती झाली असली तरी काही स्थानिक वैशिष्टयेही त्यातून व्यक्त झाली आहेत.[३३]

उत्तर काळात साधारणतः चौदाव्या शतकानंतर यादव शैलीतील मंदिरांची निर्मिती कमी झाली तसेच अशा प्रकारच्या बारवांची निर्मीतीही थांबली. यानंतर विहिरीत चौरस व वर्तृळाकार आणि एका बाजूने प्रवेश असलेल्या विहिरी निर्माण झाल्या. प्रामुख्याने ज्या राजवटीत प्रार्थना मंदिरावर गोलघुमट बांधण्यात आले त्या काळात कटोरा बावडी हा प्रकार लोकप्रिय झाला. मोठया आकाराचे अनेक मजले व दालने असलेल्या विहिरींचीही निर्मीती झाली. यांना कुपागार म्हणणे योग्य ठरते. उत्तर काळातसुद्धा शाश्वतमुल्य असलेल्या बारवांची जपणूक झाली.

## संदर्भ

१. माटे एम. एस., मराठा आर्किटेक्चर पी.एच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, पृ.४०

२. कित्ता, पृ. ४२

३. भावे वा.कृ. , पेशवेकालीन महाराष्ट्र,आवृत्ती ३, वरद प्रकाशन, २०१०, पुणे पा.नं. ५५

४. सरदेसाई गो.स., मराठी रियासत, शहाजी, पा.नं. २१

५. प्रत्यक्ष सर्वेक्षण व निरीक्षण दि.६.२.२०१८ वेळ सकाळी ९.०० वाजता.

६. प्रत्यक्ष सर्वेक्षण व निरीक्षण दि.७.२.२०१८ वेळ सकाळी १०.०० वाजता.

७. प्रत्यक्ष सर्वेक्षण

८. पहा प्लेट नं. २२, b

९. पहा प्लेट नं. २२, c

१०. पहा प्लेट नं. २२, d

११. पहा प्लेट नं. २२, e

१२. पहा प्लेट नं. २२, f

१३. पहा प्लेट नं. २३, a

१४. पहा प्लेट नं. २३, b

१५. पहा प्लेट नं. २३, c

१६. पहा प्लेट नं. २३, d

१७. पहा प्लेट नं. २३, e

१८. पहा प्लेट नं. २३, f

१९. पहा प्लेट नं. २४, a

२०. पहा प्लेट नं. २४, b

२१. पहा प्लेट नं. २४, c

२२. पहा प्लेट नं. २४, d

२२. प्रत्यक्ष सर्वेक्षण व निरीक्षण दि.८.१२.२०१९ वेळ सकाळी ९.०० वाजता.

२३. प्रत्यक्ष सर्वेक्षण व निरीक्षण दि.२८.१२.२०१९ वेळ सकाळी १०.०० वाजता.

२४. पाठक अ.शं.(संपा.)महाराष्ट्र : इतिहास – प्राचीन काळ (खंड १ , भाग –२) स्थापत्य व कला(प्रारंभिक ऐतिहासिक काळ ते यादव काळ), दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, २००२,

२५. मयमत ग्रंथ, श्लोक xxiii/८४

२६. मयमत ग्रंथ, श्लोक xxiii/ ९६

२७. पाठक अ.शं., बारवस्थापत्य : एक आढावा, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९८, पृ. ४०१

२८. पाठक अ.शं.(संपा.)महाराष्ट्र : इतिहास – प्राचीन काळ (खंड १ , भाग –२) स्थापत्य व कला(प्रारंभिक ऐतिहासिक काळ ते यादव काळ), दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, २००२, पृ. २७५

२९. कित्ता, पृ. २७५

३०. कित्ता, पृ. २७७

३१. कित्ता, पृ. २७८, २७९

३२. कित्ता, पृ. २७९

३३. कित्ता, पृ. २७९

# प्लेट नं.२२




a



b



C



d



**e**



**f**

प्लेट नं.२३



a



b



c



d




e



f

**प्लेट नं.२४**



a



b



c



d

# प्रकरण पाचवे

# उपसंहार

कोणताही समाज हा विकसित होण्यासाठी भौगोलिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा विचार महत्त्वाचा असतो. . त्याचप्रमाणे मराठा संस्कृतीच्या विकासही यातूनच झालेला पाहावयास मिळतो. मराठा संस्कृतीवर येथील भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव मोठया प्रमाणावर जाणवतो. यातूनच मराठा समाजाची जडणघडण झालेली पाहावयास मिळते. समाजाची संस्कृती घडविण्यासाठी त्या समाजातील परंपरेने चालत आलेल्या रूढी व परंपराचा यांचाही प्रभाव कारणीभूत ठरतो. ही गोष्ट मराठाकाळात तर मोठया प्रमाणावर प्रकर्षाने जाणवते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. त्यातूनच मराठा संस्कृतीचा मोठया प्रमाणावर विकास होत गेला. मराठयांना स्वतंत्र राज्य मिळाल्याने त्यांची सर्वांगीण प्रगती होण्यास मदत झाली. ही प्रगती टिकविण्यासाठी आर्थिकतेची आवश्यकता असते ती गरज व्यापार, शेती व उद्योगधंदे यातून पूर्ण केलेली आढळते. मराठा संस्कृतीचा विकास होण्यास महत्त्वाचे म्हणजे समाजात शांतता निर्माण झाली होती. त्यातूनच संस्कृतीच्या विकासास चालना मिळत गेली. त्यामुळे मराठाकालीन संस्कृतीची माहिती घेणे गरजेचे होते.

संस्कृती या शब्दाचा अर्थ मानव हा आपल्या अवतीभोवतीच्या निसर्गामध्ये आपल्याला हवे तसे बदल करून त्यावर चांगले संस्कार करून आपले जीवन कार्य चालवत असतो. मानव हा आपले जीवन सुखी होण्यासाठी निसर्गावर आणि स्वतःच्या बुद्धीवर विजय मिळविण्यासाठी एकटा किंवा समुदायाने संघर्ष करत असतो. यातूनच मानवास भौतिक वस्तुरूप आणि मानसिक सृष्टी निर्माण होण्यास मदत होते. यालाच संस्कृती म्हणतात.

सातारा जिल्हा सन १८४८ पूर्वी अकरा शासकीय विभागात विभागलेला होता. स्वातंत्र्यानंतर त्याचे दोन विभाग झाले. १९६० मध्ये याचे पुन्हा दोन जिल्हे पाडण्यात आले होते. ते म्हणजे सातारा व सांगली होत. तेव्हापासून सातारा जिल्हयात एकूण अकरा तालुके आहेत. सातारा जिल्हयाचे क्षेत्रफळ हे १०,७८० चौ. कि.मी.आहे. लोकसंख्या २८,०८,९९४ ही आहे. हा जिल्हा **हा** दक्षिण महाराष्ट्राच्या दक्षिणेस मध्यभागी आहे. सातारा जिल्हयाचे किमान तापमान हिवाळयात ११.६$^{\circ}$ सें व उन्हाळयातील कमाल तापमान ३७.५$^{\circ}$ सें. इतके असते.

साताऱ्याचे हवामान उष्ण व कोरडे असून ते तीन ऋतुत विभागलेले आहे. सातारा जिल्हयात वेदशाळा महाबळेश्वर येथे आहे.

सातारा जिल्हयात प्रामुख्याने कृष्णा, नीरा, माणगंगा व येरळा नदी खोरे इत्यादी चार नद्यांची खोरी आहेत. या नद्यांवर असणाऱ्या धरणांनी सातारा जिल्हयातील जमिन सुजलाम सुफलाम केलेली आहे. याशिवाय येथील उपनद्या या कुडाळी, वेण्णा, उरमोडी, तारळी, वसना व कोयना इ. नद्या आहेत. कोयना नदीवर देशमुखवाडी जवळ कोयना जलविद्युत प्रकल्प १९६० साली उभारलेला आहे.

साताऱ्याला प्रागैतिहासिक काळापासूनचा इतिहास आहे. सातारा जिल्हयाचा प्राचीन अश्मयुगीन इतिहास समजण्यासाठी आसगांव, मर्ढे, माहुली, लिंब, सोनगांव, उंब्रज, कराड, कोपर्डे, गोवरे, चिंचणेर, टेंभू, तारगांव, धामणेर, माहुली, लिंब व वेणेगांव इत्यादी ठिकाणी सापडलेली हत्यारे व अवशेषांचा उपयोग होतो. सातारा जिल्हयावर प्राचीन काळात प्रथमतः सातवाहन, राष्ट्रकुट, वाकाटक, बदामीचे चालुक्य, शिलाहार घराणे, सिंधण यादव इ. घराण्यांनी प्राचीन काळात राज्य केले होते. सातारा व सातारा परिसराच्या इतिहासाचा आढावा घेतल्यास या परिसरात झालेल्या राजकीय घडामोडी, सत्तास्पर्धा, लढाया, धार्मिक श्रद्धा, देवालये व तलावासारखी लोकोपयोगी कामे विद्यार्जनासाठी केलेल्या सोयी आणि विद्वान महर्षी यांची माहिती मिळते.

मध्ययुगीन काळात यादव सत्तेच्या ऱ्हासानंतर दक्षिण भारतातील लहान मोठी हिंदू राज्ये मुस्लिम आक्रमणास बळी पडली. परंतु कोणत्याही मुस्लिम सत्तेस संपूर्ण दक्षिण भारतावर एकछत्री अंमल स्थापन करता आला नाही. मुस्लिमांत देखील स्थानिक व परकीय असा आपसपत संघर्ष होता. त्यातूनच या सत्ता संपुष्टात आल्या देशमुख, देशपांडे या स्थानिकांनी त्याचा लाभ घेऊन स्वतःची प्रभाव क्षेत्रे निर्माण केली. पुढे या बहामनीशाहीची विजापूर, अहमदनगर, वऱ्हाड, बिदर व गोवळकोंडा इत्यादी स्वतंत्र शाहया निर्माण झाल्या. त्यामुळे सातारा जिल्हयावरील बहामनीची सत्ता संपुष्टात आली. सातारा जिल्हयावर विजापूरच्या आदिलशहाची सत्ता निर्माण झाली होती. ती मराठयांच्या स्थापनेपर्यंत टिकून राहिली.

आदिलशाही कालखंडात साताऱ्याच्या प्रशासनात हिंदू व मुस्लिम असा संबंध होता . या डोंगराळ प्रदेशात हिंदुचे वर्चस्व होते तर शहरी व मैदानी भागावर मुस्लिमांचे वर्चस्व होते.

साताऱ्याच्या परिसरात कडेकपाऱ्यात मराठा सरदारांचे, देशमुखांचे आणि पाटलांचे वजन होते. त्यांच्या बळावरच विजापूरकरांनी कोकण प्रदेशावर आपले वर्चस्व निर्माण केले आणि नंतरच्या कालखंडात छ. शिवाजी महाराजांनाही विरोध करण्याचा प्रयत्न केला परंतु या सर्व सरदारांनी पुढे स्वराज्य कार्यात राजांनाच मदत केल्याने विजापूरकरांचे सातारा परिसरावरील वर्चस्व नष्ट होत गेले होते.

१७व्या शतकात छ.शिवाजी महारांजानी विजापूरची आदिलशाही, उत्तरेतील अतिशय बलाढय असणारी मुघल सत्ता पश्चिमेकडे समुद्रावर वर्चस्व ठेवणारा कोकण विभागातील सिद्दी, गोव्यामधील पोर्तुगीज व इंग्रज यांच्याशी अविश्रांत लढत देऊन मराठ्यांचे सार्वभौम असणारे स्वतंत्र राज्य निर्माण करण्यात यश मिळविले. सहिष्णुता आणि लोकोपयोगी, लोककल्याणाची कामे हा या स्वराज्याचा पाया होता. सातारा व साताऱ्याचा परिसर हा शिवाजीराजे व त्यांच्या वंशजांच्या कर्तबगारीशी अत्यंत जवळून निगडीत होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळी जिंकून घेतल्यानंतर इ.स.१६५९ मध्ये अफझलखानाचा वध सातारा जिल्हयातील प्रतापगडाच्या पायथ्याला केला. त्यानंतर पन्हाळयापर्यत मजल मारली. पन्हाळयाच्या वेढयातून निसटून पुण्याच्या लाल महाल वाडयात दबा धरून बसलेल्या शायिस्तेखानावर हल्ला करून त्यास जखमी करून पळवून लावले. त्यानंतर सुरत शहर लुटले. पुढे मिर्झा राजा जयसिंगाची स्वारी होऊन पुरंदरचा तह केला. या तहानंतर महाराजांनी मुघलांना सहाय्य केले. मुघल व मराठयांच्या संयुक्त फौजांनी सातारा जिल्हयातील फलटण, ताथवडा व खटाव ही ठिकाणे जिंकली. पुढे महाराजांनी आग्ऱ्याहून परतल्यावर दुसऱ्यांदा इ.स.१६७० मध्ये सुरतेवर स्वारी केली. पुढे साताऱ्यापासून ७ कि.मी.अंतरावरील परळीचा व सातारा किल्ला जिंकून घेतला. तसेच चंदनवंदन, पांडवगड, नांदगिरी, केळंजा आणि ताथवडा हे किल्ले महाराजांच्या ताब्यात आले. सन १६७४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. तसेच सन १६७५ मध्ये वाई छत्रपती शिवाजी महाराजांच्या ताब्यात आली. इ.स.१६७६ च्या सुमारास दोन महिने त्यांचे वास्तव्य साताऱ्यात होते. यानंतर ३ एप्रिल १६८० रोजी शिवाजी महाराजांचे रायगडावर निधन झाले.

छत्रपती शिवाजी राजांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी महाराज गादीवर आले. औरंगजेब बादशहादेखील इ. स. १६८२ मध्ये दक्षिण विजयासाठी दक्षिणेत उतरला. छत्रपती संभाजी राजांना एकाच वेळी मुघल, पोर्तुगीज व सिद्दी या सर्व शत्रुंशी लढा द्यावा लागला. कोल्हापूर प्रांतावर नेमणुकीस असणाऱ्या मुकर्रबखानास संभाजी राजांना संगमेश्वर येथे पकडण्यात यश मिळाले. सन १६८९ मध्ये छ.संभाजी राजांना हालहाल करून ठार करण्यात आले. त्यानंतर छ. राजाराम महाराजांना गादीवर बसविण्यात आले. ते सुरक्षिततेसाठी जिंजीकडे गेले. सातारा परिसरातील विविध किल्ले सन १६९० पर्यत मुघलांनी जिंकून घेतले. रायगडाचा पाडाव झाला. येसूबाई आणि बाल शाहू मुघल कैदेत गेले. पुढे या परिस्थितीत बदल होऊन मराठयांनी एक एक किल्ला जिंकून घेण्यास सुरूवात केली.

मराठयांची खरी शक्ती किल्ल्यांमध्ये असल्याने औरंगजेबाने स्वतः किल्ले घेण्यास प्रारंभ केला. त्याने वसंतगड व सातारच्या किल्ला जिंकून घेतला. छत्रपती राजाराम महाराजांचा सिंहगडा किल्ल्यावर १७०० साली मृत्यू झाला. त्यानंतर त्यांची पत्नी ताराबाई हिने मराठा राज्याची सुत्रे हाती घेतली. शेवटी २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर मुक्कामी तो मरण पावला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहूची सुटका झाली. त्यावेळी मराठी सत्तेचे प्रमुख केंद्र सातारा हे होते. साताऱ्यातून राणी ताराबाई कारभार पहात होती. शाहू व महाराणी ताराबाई यांच्यात यादवी युद्ध झाले. त्यात शाहूचा विजय झाला. छत्रपती शाहूने साताऱ्यात अनेक लोकोपयोगी कार्ये केली. छत्रपती शाहूची राजधानी प्रथम किल्ल्यावर होती. पुढे किल्ल्याच्या उत्तरेकडील उतारावर शाहूनगर नावाचे शहर त्याने इ. स. १७२०–२१ मध्ये वसविले. हेच आजचे सातारा होय. छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर रामराजा उर्फ दुसऱ्या शाहूचा राज्याभिषेक ११ डिसेंबर १७७८ रोजी झाला. परंतु छत्रपतींचे अधिकार व महत्त्व हळूहळू कमी केले. दुसरा शाहू ४ मे १८०८ रोजी मरण पावला. २५ सप्टेंबर १८१९ च्या तहानुसार इंग्रजांचे सार्वभौमत्व मान्य करून छत्रपती प्रतापसिंह राजांना मराठा गादी प्राप्त झाली. ब्रिटिशांनी प्रतापसिंहाना सर्वाधिकार न देता सातारला इंग्रज रेसिडेंट नियुक्त केला होता व त्याच्या सहमतीनेच या राजांना या राज्यांचा राज्यकारभार पाहणे गरजेचे ठरवले होते. या योजनेनुसार जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ साताऱ्याचा पहिला रेसिडेंट म्हणून कार्यरत झाला. त्याला सहाय्यक

म्हणून माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या विश्वासातील बाळाजीपंत नातू याची नियुक्ती करण्यात आली. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. छत्रपती प्रतापसिंहाना ब्रिटिशांनी पदच्युत केले. त्यांच्या जागी त्यांचे बंधू श्रीमंत आप्पासाहेब यांना १८३९ मध्ये करार करून गादीवर बसविले. श्रीमंत आप्पासाहेब यांना औरस संतती नसल्यामुळे दत्तक वारस नामंजूर करून १६ मे १८४९ रोजी सातारा येथे जाहीरनामा काढून त्यानुसार सातारा संस्थान खालसा केले.

सन १८५७ च्या उठावास सातारा जिल्हयाने पाठिंबा दिला होता. या उठावाच्या वेळी सातारा संस्थानाकडे ब्रिटिशांचा पाहण्याचा हेतू स्वार्थी व शोषण करण्याचा होता. सातारा संस्थान खालसा करण्याच्या इंग्रजांच्या स्वार्थी कृतीने संस्थानिकावर निष्ठा बाळगून असलेले सरदार घराणे व इतर लोकातही असंतोष पसरला होता. अशावेळी रंगो बापूने सर्व लोकांना संघटित केले. सातारा जिल्हयाने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत योगदान दिल्याचे दिसून येते. राष्ट्रीय सभेची स्थापना झाल्यानंतर मवाळ व जहाल गटाच्या नेतृत्त्वाखाली भारतीय स्वातंत्र्य लढा लढला जाऊ लागला. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेले गणेश उत्सव व शिवजयंती उत्सव यासही सातारा जिल्हयात मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळाला होता. गणेश मेळा चळवळ, होमरूल चळवळ, सत्यशोधक चळवळ, असहकार चळवळ, औंध संस्थानातील लढा, सविनय कायदेभंग चळवळ, बिळाशीचे बंड, सन १९४२ चे चले जाव आंदोलन, छोडो भारत लढा व प्रतिसरकार, साताऱ्याने सन १९४७ चा स्वातंत्र्य लढा यामध्ये सहभाग घेतला होता. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केला होता.

सातारा जिल्हयातील स्थापत्याचा विचार केला असता असे दिसते की, प्राचीन काळापासून मराठा काळापर्यंत स्थापत्य कलेचा विकास मोठया प्रमाणावर झालेला दिसत नाही. याचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील लोकांचे राहणीमान हे साधे असून त्यांनी सांस्कृतिक विकासाच्यादृष्टिने कलेच्या क्षेत्राकडे लक्ष दिले नाही. केवळ गरजेपुरत्याच आवश्यक असणाऱ्या कलेकडे लक्ष पुरविलेले दिसते. दक्षिणेत मौर्य, चालुक्य आणि पल्लव यांच्या काळात स्थापत्य शिल्प यांचा पूर्ण विकास झाला होता. पुढे मराठा काळात म्हणजेच छ.शिवाजी महाराजांच्या काळात मुघल शाहयांच्या धामधुमीमुळे विकास झाला नाही. पेशवे काळात मात्र थोडयाफार प्रमाणात हा विकास झालेला आढळून येतो.

मराठा काळात सातारा जिल्हयात धार्मिक दृष्टया त्यामध्ये मंदिरे, मशिदी, दर्गे मोठया प्रमाणात निर्माण झालेली आहेत. **मराठा मंदिर स्थापत्यातील पहिला टप्पा हा इ.स.१६३० ते इ.स.१७१९ पर्यतचा होय.** १४ व्या शतकात उत्तरेतील मुघलांनी दक्षिणेत आपली सत्ता स्थिर केली. त्यांच्या पदरी मराठा सरदारांनी नोकरी स्वीकारली. पुढे १६ व्या शतकात विजापूरच्या इब्राहिम आदिलशहाच्या कारकिर्दीत हिंदू व मुस्लीम यांच्यात सांस्कृतिक देवाण-घेवाण होवून नवीन सामाजिक रचना अस्तित्वात आली. या काळात हिंदू हे इस्लामी सत्तांच्या दरबारामध्ये प्रशासनामध्ये विविध पदावर कार्यरत होते.

मराठा सत्तेच्या उदयामुळे मराठा प्रदेशामध्ये सुरूवातीस अनेक धार्मिक घडामोडी घडून आल्या होत्या. वतनदारांनी स्थानिक जनतेवर आपला वचक ठेवण्यासाठी मंदिराच्या आश्रयदात्यांचा उपयोग केला. मराठा वतनदारांनी केलेल्या साहयामुळे सुलतानांनी सहिष्णू धोरण स्वीकारून वतनदारांना धार्मिकदृष्टया सवलत दिली.

१७ व्या शतकामध्ये मराठा कारागीरांनी इस्लामी स्थापत्यातील प्रसिद्धीस आलेले तंत्र स्वीकारले. १७ व्या शतकात वतनदार हे प्रमुख होते. त्यामुळे कारागीरांचा वेगवेगळया परंपराचा अनुभव व वतनदारांची गरज एकमेकांना पुरक ठरली. इस्लामी काळामध्ये बांधलेली सुरूवातीची व मराठा स्वातंत्र्य युद्धा पूर्वीची मराठा मंदिरे ही संमिश्र परंपरेचे फलीत होते. अशा प्रायोजकतेखाली संमिश्र विस्ताराला, विकासाला आणि मोठया प्रमाणावरील बदलास संधी होती. नवीन उदयास आलेला राजकीय व सामाजिक वर्गाच्या गुणविशेषामुळे स्थापत्यीय विकासावर मोठया प्रमाणावर प्रभाव पडला.

मराठयांच्या स्वातंत्र्ययुद्धातील यशामुळे मराठयांचे स्वतंत्र राज्य निर्माण झाले. त्यावेळी मराठा सरदारांनी आपले अस्तित्व दाखविण्यासाठी धार्मिक कृतीव मंदिरांचे माध्यम स्वीकारले. त्यामुळे मराठयांनी यादव काळातील पडझड झालेल्या वास्तूंचे संवर्धन व जतन करण्यास प्रारंभ केला. त्याचबरोबर नवीन मंदिरांच्या बांधकामास सुरूवात झाली. मराठयांना इस्लामी स्थापत्याकडून मिळालेले नवीन तंत्र यादव स्थापत्यापेक्षा वेगळे होते. इस्लाम स्थापत्य व यादव स्थापत्य यांचा एकत्रित परिणाम म्हणजे मराठा स्थापत्याचा विकास होय.

प्रारंभीच्या काळातील मंदिरांची पडझड झाल्यामुळे स्थापत्याचा नमुना स्पष्ट मिळत नाही. प्रारंभीच्या काळातील टिकून राहिलेल्या मंदिरामधील स्थानिक दक्षिणी परंपरा व इस्लामी तंत्र हे महत्त्वाचे पैलू आहेत. प्रारंभीच्या काळातील मंदिराच्या बांधकामात विट व दगड यांचा वापर केला जात होता. तर दगडी बांधकामात चुना व माती यांचा वापरलेला जात होता. या काळातील मंदिरामध्ये यादव परंपरेतील खांब व तुळईची पद्धत व इस्लामी रचनेतील घुमट कमान हे संयुक्तीक दिसतात. या काळातील मंदिर सजावटीचा विषय हा हिंदू असला तरी त्याचे मूळ इस्लामिकमध्ये आहे. या पद्धतीची मंदिरे सातारा जिल्हयात थोडयाफार प्रमाणत आढळतात.

पहिल्या टप्प्यातील मंदिराची संरचना हिंदू मान्यतेनुसार बांधण्यात आली. सातारा जिल्हयामधील पाल, शिखर शिंगणापूर, प्रतापगड किल्ल्यावरील भवानी मंदिर, आसले येथील भवानी मंदिर, तडवळे येथील रामेश्वर मंदिर, वाईचे रोकडोबा मंदिर इत्यादी मंदिरे अस्तित्वात आहेत.

मराठाकालीन मंदिराच्या या पहिल्या टप्प्याच्या मंदिराचे बांधकाम व रचना पाहिली असता असे दिसते की, त्या मंदिराच्या बांधकामावर यादव शैलीतील मंदिर स्थापत्याचा प्रभाव पडलेला होता. ही मंदिरे समकालीन हिंदू व इस्लामी सल्तनत विशेषतः आदिलशाही स्थापत्य तंत्राच्या बांधकामाचे मिश्रण असलेले दिसते. या टप्प्यातील मंदिराची मूळ संरचना ही एक चौरस दगडी स्वतंत्र मंडपाची आहे. या मंदिराच्या स्थापत्यामध्ये घटकांच्या आंतरक्रिया व मराठयांची अनुकूलता ही फार वेगाने होणारी प्रतिक्रिया होती.

या टप्प्यातील मंदिराचे जोते किंवा पीठ हे साध्या व विस्तीर्ण स्वरूपाचे आहे. ते दगडाने बांधलेले आहे. ते लहान असून सजावट केलेले आहे.चौथऱ्यामध्ये एकावर एक दगडांचे तीन किंवा चार थर चौरस व सपाट व कोणत्याही मोलुमेशिवाय असतात. नंतर सरळ काढण्यासाठी त्यास थोडासा आकार दिलेला आहे. जोते मंदिराच्या कडेने सभोवती भिंतीच्या बाहेर किंचित प्रक्षेपित होतात. पहिल्या टप्प्यातील नंतरच्या मंदिरामध्ये विस्तारित जोते मंदिराभोवती प्रदक्षिणा पथाची रचना करते

पहिल्या टप्प्यातील मंदिराची भिंत दगड–चुना याचा वापर करून बांधण्यात आली आहेत. दगडी बांधकाम केलेला पॅरापेट खुल्या प्रकारचा आहे. या टप्प्यात, पॅरापेटवर दिसणारी कमळ कळीची चित्रे कोरेलेली आहेत. या काळातील मंदिरे ही गावाच्या बाहेर बांधलेली आहेत. या मंदिराचे गर्भगृह हे चौरसाकृती असून त्याचे माप ८ फूट लांब व ८ फूट रूंद असे आहे.

मराठाकालीन पहिल्या टप्प्यातील मंदिरे ही गावाच्या बाहेर बांधलेली आहेत. या मंदिराचे गर्भगृह हे चौरसाकृती असून त्याचे माप ८ फूट लांब व ८ फूट रूंद असे आहे. या मंदिरांच्या गर्भगृहामध्ये दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यामध्ये दिसणारे प्रकाश योजना किंवा वायूविजनासाठी तयार केलेल्या जाळीदार खिडक्या नाहीत.

प्रारंभीची मराठा मंदिरे  मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध सुरू झाल्यापूर्वी बांधली गेली. दक्षिणी सुलतानांच्या सेवेत असणाऱ्या स्थानिक समाजातील उदयन्मुख कुटुंबांनी मंदिरांचे प्रायोजकत्व स्वीकारले. या संशोधनमध्ये वापरलेली  वर्गीकरण प्रणाली स्थापत्यशास्त्रीय नमुन्यांवर आधारित आहे. दीडशे वर्षाहून अधिक वर्षाची मराठा परंपरा तीन विशिष्ट टप्प्याटप्प्याने विभागली आहे, प्रारंभिक, मधला व शेवटचा टप्पा. ही विभागणी मराठा मंदिरे व त्यांचा राजकीय विकास यांच्यातील घनिष्ठ संबंधावर आधारित आहे. मराठी परंपरेचा विकास १६२० च्या सुमारास सुरू झाला आणि हे त्यांच्या स्थापत्यकलेच्या स्थापनेच्या पहिल्या टप्प्यापर्यत घडला आणि तो पेशव्यांच्या उदयापर्यत चालू होता.

दुसरा टप्पा हा इ.स.१७२० ते इ.स.१७६१ पर्यतचा आहे. छत्रपती शाहू महाराजांच्या संमतीने पेशव्यांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी उत्तरेमध्ये आक्रमक साम्राज्य विस्ताराचे धोरण स्वीकारले. त्यांनी गुजरात, माळवा, बुंदेलखंड या प्रदेशावर वर्चस्व निर्माण केले.  दिल्लीवर आक्रमण करून मुघल सत्तेवर दहशत बसविली. मराठयांच्या या विजयामुळे उत्तरेत मोठया साम्राज्याची स्वामीत्व व प्रभावी धोरणाचा एकाधिकार मिळाला. पेशव्यांच्या नेतृत्वाखाली मराठयांच्या उत्तरेकडील मोहिमा यशस्वी झाल्या. तेथे पेशव्यांनी शिंदे, होळकर व पवार, नागपूरकर भोसले या सरदार घराण्यातील व्यक्तींची नियुक्ती केली. मराठयांना उत्तरेत सत्ता मिळाल्याने आनंदी जीवन जगण्यास सुरूवात केली. तेथे मराठयांची सत्ता निर्माण झाल्याने तेथून मोठया प्रमाणात पैसा तिजोरीत येऊ लागला.

या काळात राजकीय स्थिरता व समृद्धता लाभल्याचा परिणाम मराठयांच्या जीवन पद्धतीवर झाला. साम्राज्य विस्तार करताना मराठा सरदार समृद्ध व शक्तीशाली बनले. राजकिय विकासामुळे कला आणि कलात्मक कृतीला प्रेरणा मिळते. त्यातूनच मंदिर स्थापत्याला प्रोत्साहन मिळाले. अशी कलात्मक कृती किंवा मंदिर स्थापत्य हे पेशवे व त्यांचे सरंजामदार यांचा आवडता विषय होता. पेशव्याच्या प्रशासनाखाली धार्मिक विधी, मूर्तीपुजा राजवाडयांमध्ये सुरू झाली. शिंदे व होळकर सरदारांनी धार्मिक कृतींना मदत केली. आजही महाराष्ट्रात मंदिर व घाटाच्या रूपाने त्याचे अस्तित्त्व टिकून आहे.

१७ व्या शतकातील प्रारंभीच्या मुघलांच्या दक्षिण आक्रमणानंतर महाराष्ट्रामध्ये मुघल स्थापत्याचा प्रभाव पडला. मुघल स्थापत्याची काही उदाहरणे वगळता महाराष्ट्रामध्ये प्रारंभीची मुघल शैलीचे बांधकाम मिळत नाहीत. पेशवे काळात मुघल स्थापत्याचे घटक मराठा मंदिरांमध्ये दिसू लागले.

मराठा संस्कृतीत नद्यां व नद्यांचे संगम यांना धार्मिकदृष्टया महत्त्व होते. पेशवा व सरंजमादार यांनी नदीकाठी मंदिराची उभारणी केली. मध्यकाळातील मंदिरांचे सर्वात महत्त्वाचे अंग म्हणजे घाट होय. घाट म्हणजे मंदिर व नदीला जोडणाऱ्या उंच पायऱ्या होत. घाटांचा वापर धार्मिक विधी, दैनंदिन आंघोळीसाठी, धुण्यासाठी व पाणी पिण्यासाठी केला जात असे. त्यामुळे ही सामाजिक व सांस्कृतिक देवाणघेवाणीची ठिकाणे बनली.

प्रारंभीच्या काळातील मंदिरांचे प्रकार मध्यकाळामध्ये स्थानिक व पुनरूत्थान या दोन प्रकारात परिवर्तीत झाला. स्थानिक मराठा मंदिराचा विकास झाला. यामध्ये भूमिज तत्त्वांचा समावेश केला असला तरी यावर इस्लामीक रचनेचा विस्तार आणि सजावट यांचा प्रभाव दिसतो. स्थानिक व पुनरूत्थानवादी प्रकाराच्या संमिश्रणातून मराठा मंदिर प्रकार विकसित झाला.

दुसऱ्या टप्प्यातील सातारा जिल्हयातील मंदिरामध्ये प्रामुख्याने खवलेश्वर मंदिर बोरखळ, शकुंतलेश्वर मंदिर वडूथ, महादेव मंदिर विरमाडे, ब्रम्हेंद्रनाथ स्वामी मंदिर धावडशी, येथील मेरूलिंग मंदिर मोरघर, अतिबलेश्वर मंदिर महाबळेश्वर, माहूली येथील काशीविश्वेश्वर मंदिर, शिवमहादेव मंदिर (श्रीपतराव पंतप्रतिनिधी), बिल्वेश्वर मंदिर, रामेश्वर मंदिर, विष्णू मंदिर, विठोबा मंदिर, भैरोबा मंदिर व काशिविश्वेश्वर मंदिर वाई इत्यादी मंदिरांचा समावेश

होतो. मध्य टप्पा मराठा राज्याच्या स्थिर आणि समृद्धतेमुळे लगेचच आपल्याला परिपक्व स्वरूपात घेऊन जातो.

तिसरा टप्पा हा पहिल्या माधवराव पेशव्याच्या कारकिर्दीपासून ते पेशवेकाळाच्या अखेरीपर्यंतचा कालखंड होय. पानीपतच्या तिसऱ्या युद्धामध्ये मराठयांचा पराभव होऊन त्यात मराठयांची फार मोठी हानी झाली. तेथून पुढे राजकीय परिस्थितीत गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

या काळातील राजकीय परिस्थितीचा परिणाम अर्थिक, सांस्कृतिक व स्थापत्य शैलीवर झाला. मंदिराचे आश्रयदाते नष्ट झाले. यानंतर मराठा मंदिर स्थापत्यामध्ये मोठया प्रमाणावर बदल झालेला दिसतो. पहिल्या टप्प्याच्या अखेरीस आश्रयदात्यामध्ये खंड पडला त्यावेळेस दुसऱ्या टप्प्यात मंदिरांची पुनर्बांधणी झाली. त्यावेळी मंदिर स्थापत्यामध्ये बदल दिसतो. दुसऱ्या टप्प्याच्या अखेरीस दोन मराठा मंदिर प्रकार चांगल्या प्रकारे स्थिर झाले होते. मराठा उच्च राजकीय स्तरावर पोहोचल्याने त्यांना आर्थिक स्थैर्य आणि ते मजबूती लाभली. तिसऱ्या टप्प्यात आश्रयदात्याचे स्वरूप बदलले.

दुसऱ्या टप्प्याच्या अखेरीस मराठा सत्तेचे केंद्र सातारा येथून पुण्यास गेले. पुणे मराठा राजकारणाचे केंद्र बनल्यामुळे पुण्याचे महत्त्व वाढले. पेशव्यांनी पुणे येथे अनेक मंदिरे उभारली. सातारा जिल्हयामध्ये आश्रयदाते माहुलीहून वाईजवळ आणि स्थानिक कुटुंबांनी मंदिर बांधलेल्या इतर ठिकाणी राहावयास गेले. गणेश मंदिरांनी आश्रदात्यांना आकर्षित केले आणि आठ बाजूनी आठ देवतांच्या अवताराचे स्मरण करीत विकसित झाली. तिसऱ्या टप्प्यामध्ये नदीकाठी मंदिराबरोबरच शहरातील मंदिर स्थापत्य चालू राहीले. शहरामधील मंदिरांचा उदय हा महाराष्ट्राच्या राजकिय व सांस्कृतिक केद्रांबराबरच शहरांच्या विकासाचे वैशिष्टे आहे.

सातारा येथील मंदिर स्थापत्य पूर्वीचे स्थापत्यशैली व पुणे येथील कल्पनांचा सार यांचे मिश्रण होते. सातारा, सांगली व वाई येथील स्थापत्यीय प्रकार सूक्ष्म होता तिसऱ्या टप्प्यातील मराठा मंदिरे दक्षिण भारतातील लोकप्रिय कल्पना मराठा मंदिराच्या स्थापत्यीय विस्तारामध्ये सुधारणा करून  बांधली गेली. या टप्प्यात दक्षिण महाराष्ट्रात यादव मंदिरावर आधारलेली अलंकृत पुनरूत्थानी मंदिर व इतर मंदिर परंपरा खंडीत झाली.

मराठा मंदिरात अखेरच्या काळामध्ये फारसा बदल झाला नाही. प्रादेशिक प्रभाव व विशिष्ट परिस्थितीमधील गरज यामुळे काही मोठे बदल करण्यात आले. लाकडी मंडपाच्या जोडणीखेरीज मंदिराचा सामान्य आराखडा बदलला नाही.

तिसऱ्या टप्प्यातील मंदिरे मराठा मंदिर परंपरेचा सार होती. जेव्हा मराठा सत्ता भरभराटीत होती त्यावेळी ही मंदिरे बांधली गेली. मंदिरांमध्ये महत्त्वाकांक्षी सजावट व चैतन्य दिसते. ही मुख्य प्रवाहाच्या प्रकारापेक्षा नाविन्यपूर्ण वैशिष्टये आणि काही तरी अद्वितीय निर्माण करण्याची तीव्र इच्छा चालूच राहीली.

तिसऱ्या टप्प्यातील मंदिरामध्ये सातारा जिल्हयातील मंदिरामध्ये भिमाशंकर मंदिर बोपर्डी, माहुली येथील राधाशंकर मंदिर, ओझर्डे येथील सोनेश्वर मंदिर, धोम येथील सिद्धेश्वर मंदिर, झीनत उन्निसाची मशीद (बेगम मशीद), रहिमतपूर येथील मशीद इ.महत्त्वाच्या धार्मिक स्थळांची माहिती दिलेली आहे.

मराठाकालीन मंदिराचे पागोळयापर्यंतचे बांधकाम दगड चुन्यामध्ये केले आहे तर शिखराचे बांधकाम वीट चुन्यामध्ये केले आहे शिखरास चुन्याचा गिलावा केलेला आहे. उपशिखरांचे कळस लाकडी आहेत. मंदाराच्या पागोळयाच्या खाली ठराविक अंतरावर गोल लोखंडी कडयांचा वापर केलेला आहे. मंदिराची तटबंदी दगड वीट चुन्यामध्ये बांधलेली आहे. तिसरा टप्पा समृद्ध मराठा मंदिराची परंपरा मराठ्यांचे ऱ्हासाबरोबर इंग्रजांच्या हातात अचानक कशी आली हे दर्शिवितो.

मुस्लिम धार्मिक स्थापत्यामध्ये सातारा जिल्हयातील झीनत उन्निसाची मशीद(बेगम मशीद) प्रसिद्ध आहे. औरंगजेबाची कन्या झीनत उन्नीसा ही येसूबाई व शाहूराजे बादशाही कैदेत होते, ती सन १७२१ मध्ये मरण पावली. तिच्या स्मरणार्थ शाहू महाराजांनी एक मशीद बांधली. तिला बेगम मशीद असे म्हणतात व दुसरी रहिमतपूर येथील मशीद प्रसिद्ध आहे. या दोन्ही मशीदी या एक मुस्लिम स्थापत्याचा अजोड नमूना आहे. या मशीदीचे बांधकाम हे मराठाकाळात झालेले असले तरी अजूनही हे बांधकाम टिकून आहे.

नदीच्या पात्रात स्नान व धार्मिक विधीसाठी घाट बांधले जात असत. त्याचा वापर दैनंदिन कामकाजासाठी केला जात असे. घाट बांधकाम हे सोपे व कमी खर्चाचे होते. सातारा जिल्ह्यामध्ये धोम, मेणवली, वाई, वाकेश्वर, आसले, पाचवड, विरमाडे, मर्ढे, वडूथ, बोरखळ,

माहुली, कोडोली, अंगापूर, कराड या ठिकाणी घाट आहेत. नदीमध्ये बांधलेले घाट हे मजबूत व टिकाऊ असत. हे घाट सर्व सोयीनियुक्त असत. घाटाचा आकार हा घाट बांधणारे आश्रयदाते त्यावेळची आर्थिक परिस्थिती नदीचा प्रवाह व तीर्थस्थानाचे महत्त्व यावर ठरलेला असे.

मराठा काळात तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी मंदिराच्या भोवती यात्रेकरूंच्या राहण्याकरिता धर्मशाळा बांधल्या गेल्या. याचे बांधकाम दगड, विटा व चुन्याचा बांधकामासाठी वापर केला जात असे. अशा प्रकारच्या धर्मशाळा, माहूली येथील काशिविश्वेश्वर, रामेश्वर, पाल येथील खंडोबा, अंगापूर येथील महादेव मंदिर, गणेश मंदिर व नेर येथील काशिविश्वेश्वर मंदिर येथे आहेत.

मृत पावलेल्या व्यक्तीच्या आठवणीसाठी समाधी किंवा छत्री बांधतात. समाधी व छत्रीच्या मध्यभागी शिवलींग असते. सातारा जिल्ह्यामध्ये भुईंज, औंध, नांदोशी, बोरबन, बोरगाव, गिरवी, जांब, कण्हेरखेड, कोपर्डे, निगडी व राजापूर येथे समाधी आहेत. साधू संतांच्या समाधी मंदिरांच्या स्वरूपात असतात.

मराठा काळातील वास्तू बांधकामामध्ये लाकडाचा मोठया प्रमाणावर वापर केलेला होता. पाणी व वाऱ्यापासून लाकडांचे संवर्धन करण्यासाठी त्यास जवसाचे तेल लावले जात असे. मराठी साम्राज्याच्या ऱ्हासामुळे व गरीबीमुळे मराठयांच्या नेतृत्वात कमी आली. अनेक वाडे उजाड झाले. वाडयाचा फार मोठा भाग वापराविना पडून राहिला. नदीच्याकाठी असलेल्या वाडयांचे नदीच्या पूरामुळे मोठे नुकसान झाले. हळुहळू संपूर्ण ढाचा पडेपर्यंत लाकडे कुजत राहिली. या सर्व बाबींमुळे वाडे नष्ट झाले.

मराठी सत्तेचा ऱ्हास झाल्यानंतर एकोणीसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत अनेक वाडे आगीच्या भक्षस्थानी पडले. शिवकाळामध्ये सध्याच्या सातारा जिल्ह्यामध्ये फलटणचे निंबाळकर, म्हसवडचे माने, बुध, मलवडी, राजापूर, मोळचे घाटगे घराणे, खटावचे खटावकर, करंजखोपचे धुमाळ, सोळशीचे यादव, भाडळयाचे घोरपडे, मांडवेचे जाधव, तारळेचे महाडीक, पाटणचे पाटणकर, तळबीडचे मोहिते, भोसरे येथील गुजर व भुईंजचे जाधवराव यांनी तत्कालीन राजकारणामध्ये आपला ठसा उमटविला होता. निंबाळकर, घाटगे, खटावकर व घोरपडे यांना अदिलशाही दरबारामध्ये चांगले स्थान होते. महाडीक, मोहिते व गुजर हे छ.

शिवाजी महाराजांचे नातेवाईक होते. जाधव, घोरपडे यांनी आपल्या पराक्रमाने आपले स्थान निर्माण केले. यांनी आपल्या मूळ गावी वाडे बांधले.

वरीलपैकी अनेक घराण्यांचे वाडे नेस्तनाबूत झालेले आहेत. काही वाडयांच्या फक्त अवशेषच शिल्लक आहेत. आधुनिकीकरणाने वाडयामध्ये आधुनिक पद्धतीने बदल झालेले आहेत. अशा परिस्थितीमध्ये अस्तित्वात असलेल्या अवशेषावरून वाडयाचा अभ्यास करावा लागतो. या काळातील वाडे पांढऱ्या माती व दगडांमध्ये बांधलेले दिसतात. यामध्ये टोकदार कमानी, घुमटाकार छत, खापरी नळ, अवजड दगडी हस्त, पूर्ण दगडी बांधकाम हे घटक १६ व्या शतकातील दक्षिणेतील मुस्लीम स्थापत्य विशेषतः विजापुरी प्रकार दर्शवितात. नंतरच्या मराठा कामामध्ये संपूर्ण दगडी बांधकाम दिसत नाही. या काळातील वाडयांमध्ये चौक, सोफा, तुळई व हस्त ही वैशिष्टये दिसतात. शिवकाळातील बांधकामामध्ये चौक व तुळई व हस्तासाठी लाकूड वापरले आहे. सातारा जिल्ह्यामध्ये शिवकाळातील सुस्थितीमध्ये असलेले वाडयांचे बांधकाम नाही.

सातारा जिल्हयातील प्रमुख वाडयामध्ये भुईंज येथील जाधवराव यांचा वाडा, अनपटवाडी येथील अनपट यांचा वाडा, बावधन येथील गायकवाडांचा वाडा, फत्त्यापूर येथील शाळुंकर वाडा, साप येथील कदमांचा वाडा, तारळे येथील महाडीक यांचा वाडा, नाना फडणिसांचा वाडा(मेणवली), अदालतवाडा, रंगमहाल, तख्ताचा वाडा, मोतीबाग वाडा वाई, जयराम स्वामी वाडा, किन्हईचा वाडा इत्यादी होत.

या वाडयातील खोल्या, त्या वाडयाची तटबंदी, भिंती त्यासाठी वापरलेले दगड, लाकडे यांच्यावरून त्यावेळची सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते. वाडयाच्या केलेल्या बांधकामावरून आपल्याला तत्कालीक तंत्रज्ञाची व बुद्धीकौशल्याची जाणीव होते. लाकडावर कोरलेल्या नक्षीवरून त्यावेळच्या कलेचे सुद्धा दर्शन होते. या वास्तूमुळे प्रेरणा, स्फूर्ती व आत्मसन्मान वाढीस मदत होते. ऐतिहासिक परंपरेची जाणीव होते व त्यांचीही वाढ होण्यास मदत होते. वाडयातील भित्तिचित्राववरून मध्ययुगीन काळातील मराठी राज्याची सुबत्ता, धार्मिक परंपरा, समजुती, वेशभूषा आणि तत्कालिन जीवनशैलीची व समाजजीवनाची माहिती मिळते.

या वाडयांशिवाय खंडाळा तालुक्यातील शिरवळ येथील देशमुख, वडगाव येथील पोतनीस, कोपर्डे व सालपे येथील शिंदे, हिंगणगाव येथील भोईटे, खामकरवाडी येथील लेंढे, फलटण तालुक्यातील वाठार निंबाळकर येथील निंबाळकर, गिरवी येथील कदम, माण तालुक्यातील कुळकजाई येथील घाटगे, खटाव तालुक्यातील राजापूर व बुध येथील घाटगे, खटाव येथील खटावकर, सिद्धेश्वर कुरोली व औंध येथील पंतप्रतिनिधी, राजाचे कुर्ले येथील भोसले, कराड येथील पंतप्रतिनिधीचा भुईकोट, पाटण तालुक्यातील तारळे येथील महाडीक, सातारा तालुक्यातील मांडवे येथील जाधव व देशमुख, पसरणी येथील शेख मीर व जावळी येथील मोरे यांचे वाडे मराठाकालाचे अस्तित्त्व दाखवून देतात. या वाडयांची दुरावस्था झालेली आहे. यातील काही वाडयांच्या फक्त चौकटीच उभ्या आहेत. तर काही वाडयांच्या दगडी व विटांच्या भव्य कमानी शिल्लक आहेत. काहींचे तर फक्त अस्तित्व दाखविते. काही वाडयांच्या फक्त संरक्षण भिंतीच उभ्या आहेत. काही वाडयांचे अस्तित्वच नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. काही वाडयांचे आधुनिकीकरणाने स्वरूपच पालटून गेले आहे. त्यामुळे या वाडयांबाबत तत्कालीन वास्तशैलीची माहिती देता येत नाही.

संरक्षण हे मानवी जीवनाचे महत्त्वाचे अंग आहे. मानव आपले संरक्षण करण्यासाठी अनेक उपाय योजना करत आलेला आहे. प्रारंभी नैसर्गिक आपत्ती नंतर हिंस्त्र प्राणी नंतर मानव प्राणी असे संकटाचे स्वरूपही बदलत गेले. संकटाच्या स्वरूपाबरोबर संरक्षणाचेही स्वरूप बदलत गेले. प्रारंभीच्या काळातील जंगल, जंगलतील झाडे, गुहा, भूमीगत घरे अशी संरक्षणाच्या व्यवस्थेत बदल होत गेले. यातूनच कोट, किल्ला, गढी अशी संरक्षणव्यवस्थेचे प्रकार निर्माण झाले.

मराठाकाळामध्ये विशेषत: शिवकाळामध्ये डोंगरी किल्ले, भुईकोट, व जलदुर्ग या प्रकारच्या किल्ल्यांना अत्यंत महत्त्व मिळाले. छ. शिवाजी महाराजांनी किल्ल्यांचे महत्त्व ओळखून अनेक किल्ले नव्याने बांधले, जुने किल्ले दुरूस्त केले. आपल्या महसूलाचा फार मोठा भाग किल्ले बांधणे, दुरूस्त करणे व किल्ल्यांवर सुविधा करणे यावर खर्च केला. मराठयांची प्रशासकीय कार्यालये किल्ल्यावर होती. मराठयांनी किल्ल्यांच्या साह्याने स्वराज्याचे अनेक संकटातून रक्षण केले. पेशवेकाळामध्ये मराठी सत्तेचा विस्तार झाला. मराठयांनी आक्रमक

धोरण स्वीकारल्याने मराठयांचे किल्ल्यांकडे फारसे लक्ष राहीले नाही. पेशवाईच्या अस्तानंतर ब्रिटीशांनी किल्ले पाडून टाकले.

मराठयांच्या स्वातंत्रययुद्धामध्ये सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांनी फार मोठी कामगिरी केली आहे. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळापासून सातारा हे मराठयांची राजधानी बनली होती. छ. शाहू महाराजांच्या मृत्यूपर्यंत राज्यकारभाराची सूत्रे सातारा येथूनच हालत असत.

सातारा जिल्ह्यात अनेक डोंगरी किल्ले आहेत. एक भुईकोट आहे परंतु त्याचे अस्तित्त्व एका बुरूजापुरतेच राहीले आहे. डोंगरी प्रदेशात किल्ल्यांचे महत्व असाधारण होते. किल्ल्यांचे संरक्षण व्हावे यासाठी दोन गोष्टीकडे लक्ष पुरविले जात होते. त्या म्हणजे किल्ल्यास निसर्गतः लाभणारी अभेद्यता, यामध्ये तटबंदी, माची, गडाचे दरवाजे, खंदक, मेट, किल्ल्यावरील संरक्षण वास्तूंचे बांधकाम, पहारेकरी, किल्ल्यावरील दारूकोठाराच्या संरक्षणाबाबतची दक्षता व किल्ल्यावरील प्रशासकीय अधिकारी व सैनिक हे होत.

मध्ययुगीन काळात किल्ला हे एक लष्करी ठाणे होते. त्यामुळे त्याचे संरक्षण होणे हे अत्यंत गरजेचे होते. या किल्ल्यांच्या जोरावरच छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली होती. एवढेच नव्हेतर या स्वराज्यावर आलेली संकटे किल्ल्यांमुळेच टाळता आली होती. या सर्व गोष्टीमुळे किल्ल्यांचे महत्व वाढतच होते. या किल्ल्यांना नैसर्गिकरित्या संरक्षण लाभले होते. विशेषतः यामध्ये गिरीदुर्गाचा समावेश होता. तर काही किल्ल्यांना तटबंदी बांधून संरक्षण केलेले होते. हे किल्ले सुरक्षित राहावेत यासाठी किल्ले बांधताना तशा प्रकारची व्यवस्था केली जात होती. ही व्यवस्था करताना किल्ल्याच्या पायथ्यापासून ते बालेकिल्ल्यापर्यत सर्व व्यवस्था बारकाईने केली जात होती. त्यासाठी बहिर्गत संरक्षण व्यवस्था व अंतर्गत संरक्षण व्यवस्था केलेली होती. बहिर्गत संरक्षण व्यवस्थेमध्ये छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील अगदी शूद्र समजल्या जाणाऱ्या जातीतील लोकांपासून ते उच्च वर्गीयापर्यतच्या लोकांना सामावून घेतले होते. किल्ल्यावरील अंतर्गत संरक्षण व्यवस्थेत तीन समान दर्जाचे अधिकारी ठेवून ते एकमेकास जबाबदार राहतील याकडे लक्ष दिले होते.

किल्ल्यावरील जलसंवर्धन हे टाके, तलाव, विहीरी याद्वारे केले जात होते. विशेष म्हणजे ही टाकी बनविताना पावसाचे पाणी त्यामध्ये कसे साठून राहिल याकडे लक्ष पुरविले जात होते. त्यासाठी जमिनीत पाणी मुरून जावू नये म्हणून मोठा दगड कापून त्यात पाणी

साठविले जात होते. तसेच मोठया खडकाचा छेद घेऊन हे पाणी साठविले जात असे. विशेषतः तलावांना अंगचेही पाणी लागत असे. त्यामुळे वर्षभर पाणीपुरवठा व्हावा यादृष्टिने तयारी केली जात होती.

अतिवृष्टीच्या प्रदेशामध्ये प्रतापगड, वैराटगड, केंजळगड, मकरंदगड, भैरवगड, वासोटा, अंजिक्यतारा, सज्ञनगड, वसंतगड, किल्ले सुभानमंगळ, दातेगड, गुणवंतगड, कमळगड, मच्छिंद्रगड, पांडवगड, सदाशिवगड इ. किल्यांचा समावेश होतो. तर अल्प पर्जन्यमानाच्या प्रदेशामध्ये येणारे किल्ले म्हणजे चंदन–वंदन, कल्याणगड, वारूगड, वर्धनगड, महिमानगड, ताथवडा उर्फ संतोषगड इ.चा समावेश होतो. जलव्यवस्थापनाच्या दृष्टीने पाहिल्यास अतिवृष्टी प्रदेशातील किल्ल्यांवर प्रामुख्याने तळी व विहीरी यामधून पाण्याचा साठा केला जात होता. प्रामुख्याने तत्कालिन पाण्याचा साठा पर्जन्यमानावरच अवलंबून होता. हे पाणी वर्षभर पुरेल यादृष्टीने पावसाळयात पाण्याचा साठा करण्याचे नियोजन केलेले दिसते.

अल्प पर्जन्यवृष्टीच्या प्रदेशामधील किल्ल्यांवरील जलव्यवस्थापन हे तळी, विहीरी याबरोबरच खडकात खोदून टाके बनविलेली दिसून येते. या टाक्यांमुळे पाण्याचे बाष्पीभवन अत्यंत कमी प्रमाणात होते. पाणी ही स्वच्छ राहण्यास मदत होते. यामध्येही कोरेगाव तालुक्यातील कल्याणगड वगळता बहुतांश किल्ल्यावरील टाके ही तटबंदीच्या बाहेर खोदलेले दिसतात. कल्याणगडवरील पाण्याचे टाके फार मोठे असून ते त्याला तटबंदीने संरक्षित केलेले आहे. यामुळे किल्ल्यावरील शिबंदी इतर किल्ल्यांच्या मानाने जास्त असल्याने त्यांना पाणी वर्षभर पुरण्यासाठी ही व्यवस्था केलेली दिसते. महिमानगड, भूषणगड, संतोषगड व वारूगड याठिकाणी पाण्याचे टाके तटबंदीच्या बाहेर आहे. किल्ल्यावरील मध्ययुगीन काळातील पडझड झालेल्या वास्तूंचे अवशेष पाहता येथे किल्ल्यावरील शिबंदी कल्याणगडाच्या तुलनेत कमी असल्याचे दिसून येते. वर्धनगड व चंदन–वंदन या किल्ल्यावर मोठी तळी आहेत. ही तळी पावसाळयात तुडुंब भरलेली असतात. मात्र उन्हाळयात यात पाणी नसते. याचे कारण सध्या या तळयात गाळ साचलेला आहे.

खेडयातील व शहरातील प्रतिष्ठित लोकांनी अनेक नवीन विहीरी बांधल्या. यामध्ये प्रशासनाने कोणत्याही स्वरूपाची मदत केली नाही. या विहीरी जर सार्वजनिक उपयोगात आणल्यातर सरकारकडून त्या विहीरी मालकास आर्थिक मदत होत असे.

तळी व टाके म्हणजे आकाराने मोठे ते तळे व लहान असणारे टाके होय. य ादोन्हीमध्ये पावसाचे पाणी, दुसरीकडून आणले गेलेले पाणी, किंवा मूळचे पाणी साठविलेले असते. भवानराव प्रतिनिधीनी सातारा येथे मंगळवार पेठेमध्ये मंगळवार तळे व औंध येथे तळे बांधले. चौरसाकृती असलेले हे तळे दगड चुन्यामध्ये बांधलेले आहे.

समाजातील उदार व परोपकारी लोक स्वतःच्या खर्चाने तलाव विहीरी बांधत किंवा गाव किंवा गावातील प्रमुख लोक स्वतःच्या जबाबदारीवर गावची सोय करीत. त्यासाठी लागणारा खर्च मागणी केल्यास शासन देत असे. छ. शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी भोसले यांनी शिखर शिंगणापूर येथे तलाव बांधला. याशिवाय सातारा जिल्हयामध्ये लिंब येथील बारा मोटेची विहीर, भुईंज येथील जाधवरावांची विहीर, चाहूर येथील बारामोटेची विहीर, चाहूर येथील राजा राणीची विहीर, बावधन येथील गोखले यांची विहीर, बावधन येथील थोरली विहीर, कोरेगाव येथील कमानीची विहीर, नागेवाडी येथील विहीर, सोळशी येथील महाजन यांची विहीर, सातारा येथील बाजीराव पेशवे यांची विहीर व कराड येथील नकटया रावळाची विहीर इत्यादी होत.

कुंड हे तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी स्थानासाठी बांधलेले मोठया आकाराचे पण उथळ हौदासारखे असून अप्रत्यक्ष पाहाणी करताना असे आढळते की, जास्तीत जास्त दोन व अडीच मीटर आणि साधारणपणे दहा मीटर रूंदीचे चौरस बांधकाम असते. याला बारवेसारख्या पायऱ्या असतात.

बारवेची रचना ही उंटगळ, अटकाव जोड पद्धतीची असते. याशिवाय बांधकामात दुसऱ्या पद्धतीत तंत्राचा वापर केला जात होता. बारवेची विशिष्ट रचना असते. संरक्षक भिंतीला आतून एक सुरक्षापथ, कुंड, दगडी पायऱ्या ठेवलेल्या असत. बारव, तीन प्रवेशयुक्त बारव, चारप्रवेश युक्त बारव व मंडपयुक्त बारवजलमांडवी, एकमंडपयुक्त बारव, दोन मंडपयुक्त बारव , तीन मंडपयुक्त बारव, पोखरणी, तडाग इ. प्रकार पडतात.

अशाप्रकारे सातारा जिल्हयातील मराठाकालीन शिल्पशैलीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, महाराष्ट्रातील इतर जिल्हयाच्या तुलनेत सातारा जिल्हा हा वास्तूशिल्पशैलीत मराठा काळात प्रगतीपथावर होता. मोठया प्रमाणावर शिल्पे तयार झालेली होती.

# प्रकरण सहावे

# मूल्यमापन/निष्कर्ष, शोध आणि शिफारशी

## ६.१ मूल्यमापन/निष्कर्ष

सातारा जिल्हयातील मराठाकालीन वास्तूंचा अभ्यास करीत असताना त्यामध्ये प्रामुख्याने धार्मिक वास्तू, निवासी वास्तू, जलस्थापत्य, संरक्षण वास्तू इत्यादीचा अभ्यास केल्यानंतर त्यांची पुढील वैशिष्टये आढळतात.

### ६.१.१ सातारा जिल्हयातील मराठाकालीन मंदिराची पायाभूत वैशिष्टये

मराठाकालीन मंदिराचा अभ्यास करताना परंपरेने चालत आलेले देशी स्थापत्य व पुनरूत्थान स्थापत्य अशा दोन स्वाभाविक प्रकारामध्ये केलेला दिसतो.

#### ६.१.१.१ देशी स्थापत्यामध्ये भिंती, छप्पर किंवा शिखर आढळले –

महाराष्ट्रामध्ये परंपरेने चालत आलेली मंदिर स्थापत्यकला म्हणजे देशी स्थापत्य होय. ही कला यादवकाळापासून भरभराटीस आली होती. पुढे मराठा काळातही ती टिकून होती. मराठाकाळातील देशी स्थापत्य कलेमध्ये मंदिराच्या घटकानुसार पुढील वैशिष्टये दिसतात.

**अ) भिंती**

१) या मंदिराच्या भिंती साध्या व जोते सजावटीचे असते.

**ब) छप्पर किंवा शिखर हे इण्डो इस्लामिक पद्धतीचे आढळतात.**

१) छप्पर किंवा शिखराचे स्वरूप रचनात्मक हिंदू तत्त्वे असलेले असते.

२) यामध्ये भूमितीय घटक व रचनेमध्ये इस्लामी घटक असतात.(घुमट, कमान व मेघडंबरी)

३) शिखराच्या रचनेतील काही घटकांवर व सजावटीवर मुघल स्थापत्याचा प्रभाव आढळतो.

**क) सामग्री व बांधकाम –**

१) या प्रकारच्या मंदिराचे बांधकाम करताना दगडी रचनात्मक पद्धतीबरोबरच इण्डो इस्लामिक बांधकाम पद्धतीचा वापर केलेला असतो.

२) दगडी व वीट बांधकामामध्ये सिमेंटींग म्हणून चुन्याचा वापर केलेला आहे.

३) सजावटीसाठी व ओल्या बांधकामासाठी घुमट, कमानी यांचा वापर केलेला असतो.

४) सजावटीमध्ये यादव व इस्लामिक परंपरा एकत्र आणलेल्या असतात. सजावटीचे तंत्र यादव परंपरेचे व चुना, मलम व गिलावा इस्लामिक परंपरेचे वापरलेले असते.

५) अखेरच्या टप्प्यात मंडपाच्या काही भागाच्या बांधकामासाठी लाकडाचा वापर ही इस्लामी परंपरा आढळते.

६) लाकडी खांब आणि मुघल सायप्रस खांब पुनर्निर्माण करणाऱ्या कमानी व टोकदार कमानीचा वापर केलेला आढळतो.

**ड) आराखडा**

सातारा जिल्हयातील देशी मंदिरे ही पूर्व पश्चिम मुखी व नंतरच्या काळात घाट आणि नदीच्या दिशेने तोंड करून बांधलेली दिसतात. मंदिरामध्ये गर्भगृह अंतराळाच्या माध्यमातून जोडलेला असतो. गर्भगृह निरंधार असतो. गर्भगृह चौरस असते. मंदिराच्या भिंती सरळ व साध्या असतात. मंडप चौकोन किंवा आयताकृती असतो. (पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात चौरस असतो.) मंडपामध्ये अर्धस्तंभ असतात. कधीकधी ते मुक्त असतात. छप्पर सपाट किंवा घुमटाकार असून ते स्तंभ, तुळई व कमानीवर आधारलेले असते. मंडपाच्या तुळई किंवा कोपऱ्याच्या जोडापासून घुमटाकार छताला आधार देणारे स्क्विंच असतात. छत वीट किंवा दगडामध्ये असून घंटेच्या आकाराचे असते. मंडपाला एकच प्रवेशद्वार असते. कधीकधी बाजूच्या भिंतीमध्ये प्रवेशद्वार असते. संपूर्ण इमारत चौथऱ्यावर असते. अखेरच्या टप्प्यामध्ये अंतराळ द्वारमंडपामध्ये रूपांतरित झालेले असते सायप्रस खांब व टोकदार कमानी असतात. गॅलरी मंडपाच्या परिघाने सभोवती असते. सजावट राजवाडा परंपरे स्थापत्य पद्धतीतील असते. लाकडी खांबाच्या रांगाचा शेवट भिंतीने किंवा बंद मंडपाने होतो.

**इ) चौथरा**

सातारा जिल्हयातील मंदिरांचा चौथरा पाहिला असता असे दिसून आले की त्याचा आकार हा साधा असून उपयुक्त आहे. या चौथऱ्यावर दक्षिणी इस्लामी स्थापत्याचा प्रभाव पडलेला आढळतो. मराठाकालीन प्रारंभीची जी मंदिरे बांधली गेलेली आहेत. त्याचे चौथरे हे भारदस्त दिसत नाहीत. या चौथऱ्यास काही ठिकाणी दगडी ढापाच्या दोन किंवा तीन थरांचा चौथरा दिसतो. मराठाकालीन मंदिराच्या दुसऱ्या टप्प्यात चौथरा रचनेच्या किंचीत थोडासा बाहेर आलेला दिसून येतो. या चौथऱ्याचे उपपीठ तीन किंवा चार थरांचे असलेले पाहावयास

मिळते. चौथऱ्याच्या सुरूवातीच्या टप्प्यापेक्षा दुसऱ्या टप्प्यातील चौथरा किंचीत उंच आहे. दुसऱ्या टप्प्यातील चौथऱ्याच्या वरच्या थरावर उलटी पाकळी अवयवासह कोरलेली आहे. तळाच्या थरावर एक समान वरील थराची पुनरावृत्ती केलेली आहे. चौथऱ्याचा वरील थर खालील थरापेक्षा किंचीत बाहेर असतो. यामुळे खालील थराचे संरक्षण होते. मराठाकालीन मंदिराच्या चौथऱ्याला अंतर्गोल मोलुमे असतात. तिसऱ्या टप्प्यामध्ये चौथरा मोठया आकाराचा आणि अधिक प्रभावी आहे. खुल्या प्रदक्षिणा पथासाठी मूळ रचनेच्या मर्यादेपुढे चौथरा आलेला असतो. चौथऱ्याला तीक्ष्ण मोलुमेचा थर मोठा दिलेला दिसून येतो. मराठाकालीन मंदिराच्या चौथऱ्याचे मोलुमे साधे, उंच व ठळक आहेत.

**ई) भिंतींचा पृष्ठभाग**

मराठाकालीन मंदिराच्या भिंती सरळ असून त्यामे बांधकाम हे दगड चुन्यात केलेले आहे. या भिंतीवर अधूनमधून मोलुमे आहेत. भिंतीना क्वचितच खिडक्या आहेत. भिंतीच्या स्तंभामध्ये दरवाजा आहे. भिंती पागोळयापर्यंत प्रक्षेपित झालेल्या दिसतात. या भिंतीचे पागोळे उतरत्या दगडाचे आहेत. या पागोळयांना हस्तांचा आधार आहे. भिंतीवर कपीशिर्षाचा पट्टा किंवा प्लॅस्टरमधील मोलुमे तिसऱ्या टप्प्यामध्ये सुरूच्या खांबाजवळ अंतराळ द्वारमंडपाच्या वर सपाट छत आहे. या भिंतीवर जे छत तोलले गेलेले आहे. त्या छतावर मुघल पद्धतीतील फुलांची नक्षी आहे.

**फ) शिखर –**

मराठाकालीन मंदिराच्या शिखरावर यादव व इस्लामिक स्थापत्याचा प्रभाव आढळतो. या शिखरामध्ये दक्षिणे व इस्लामी घटकांचे मिश्रण आढळते. या शिखरावर असणाऱ्या रपागोळयास हस्ताने आधार दिलेले मोलुमे अरराहेत. शिखराचे मूळ उभे थर किंवा मजले आहेत. शिखर भूमिज स्वरूपाचे आहे. कूटाची निर्मिती यादव व इस्लामिक तंत्र व सजावट पद्धतीने केलेली आहे. शिखरामध्ये मोठया प्रमाणावर विविधता आढळते. शिखरामध्ये दोन वेगळया संस्कृतीच्या मिश्रणाचा कळस आढळतो. संपूर्ण रचना कंदाच्या आकाराची असून खाचलेला घुमट असतो. कमानीचे कोनाडे टोकदार कमानी रिकाम्या किंवा देवतांच्या प्लास्टर मधील प्रतिमा असणाऱ्या चुनेगची असते. समकेंद्रीयतेने मजल्यांची संख्या १ ते ५ असते. व

शंकूच्या आकाराचे शिखर असते. १२ व १६ बाजू असलेल्या बहुभूज भूमितीय या इस्लामी वास्तूकलेचा प्रभाव असतो.

### ६.१.२ पुनरूत्थानवादी मंदिर प्रकाराची वैशिष्टे

या मंदिर प्रकारामध्ये पुढील प्रकारची वैशिष्टे आढळून येतात.

#### अ) सामग्री व बांधकाम

या मंदिरांमध्ये दगडांचा वापर मर्यादित केलेला आहे. मंदिरांच्या दगडांची गुणवत्ता व स्वरूप हे प्रादेशिक विविधतेवर अवलंबून आहे. बांधकामे तंत्रे तुळई व खांबाच्या रचनात्मक बांधकामाच्या पारंपारिक पद्धतीवर आहे. रचनेला आधार देणारे खांब आणि तुळईची पारंपारिक रचनात्मक पद्धतीची कोपरे, कमानी, कोनाडा, घुमट यांचा समावेश असलेला पाहावयास मिळतो. मंडपाचे छत घुमटाकार आहे. दगडी खांब मोकळे व थोडेस भिंतीमध्ये असतात. कधीकधी दगडी बांधकाम कोरडे आहेत. सिमेंटिंग म्हणून चुन्याचा वापर केलेला आहे. मंदिराच्या भोवती असणाऱ्या खोल्यांच्या बांधकामामध्ये इस्लामिक घटकांचा वापर दिसून येतो.

#### ब) आराखडा

देशी मंदिरासारखीच या मंदिरांची आराखडयाची रचना आहे. गर्भगृह, अंतराळ, मंडप अशी रचना दिसून येते. आराखडा तारकाकृती अष्टकोनी टप्प्यांचा पाहावयास मिळतो. या मंदिरांच्या टप्प्यांच्या आराखडयामध्ये यादव तत्त्वे दिसून येत नाहीत. आराखडयाचे टप्पे उभ्या स्वरूपात भिंतीची रचना दर्शवितात. ते आडवे पट्टे आणि क्रमामध्ये आढळतात. चौरस गर्भगृहाच्या भिंती साध्या पद्धतीच्या असून कधीकधी मोलुमेचा पट्टा दिसतो. अंतराळ चौरसाकृती आहे. मंडपाचे बंद मंडप व खुला मंडप असे दोन प्रकार आहेत. मंडपास चौरस आकाराच्या पायऱ्या आहेत. बहुतांशी मंडपास तीन प्रवेशद्वारे आहेत. मंडपाचे छत रचनात्मक चौरसाचे असून मंडपाला अर्धस्तंभ आहेत. खुल्या मंडपामध्ये बैठकीची व्यवस्था आहे. मंडपाचा आराखडा चौरस किंवा टप्प्यांचा पाहावयास मिळतो. चार खांबामुळे छपराचा खण तयार होतो. छत रचनात्मक चौरसाचे किंवा घुमटाकार आहेत. एका खणामध्ये नंदीची प्रतिमा आहे. टप्प्याच्या मंडपास तिन्ही बाजूस प्रवेश मंडप आहे. वळचणीला हस्ताने आधार दिलेला दिसून येतो. चौरस मंडप आयताकृती अंतराळात बदललेला आहे. मंदिराचे छत खणासह सपाट आहे. खुला मंडप असेल तर बैठकीची व्यवस्था भिंतीला लागून असलेली दिसते.

### क) चौथरा

मराठाकालीन मंदिराचा हा चौथरा दगडामध्ये बांधलेला आहे. हा चौथरा सिमेंटिग सामग्री शिवाय बांधलेला आहे. चौथऱ्यास वरच्या उलटया पाकळयांची निर्मिती असते. अशी रचना पहिल्या टप्प्यातील आहे. दुसऱ्या टप्प्यात दोन चौथऱ्याची निर्मिती केली गेली. तिसऱ्या टप्प्यात चौथऱ्यावर सजावट केली गेली.

### ड) भिंतीचा पृष्ठभाग

भिंतीच्या पृष्ठभागावर सुशोभित मोलूके आणि कोरीव काम केलेले आहे. मंदिराच्या पृष्ठभागास लागून खांब बसविले आहेत. मोलूकाचा पट्टा सभोवती फिरविला गेला. मोलूकाचा क्रम खांबाप्रमाणेच केलेला आहे. मंदिराच्या सजावटीचा विषय बंद मंडपाच्या भिंतीवर आहे. मंडपाचा प्रकार टप्प्याचा किंवा तारांकृत केलेला दिसून येतो. खुल्या मंडपात तुळई व हस्तासह खांब असतात.

### इ) शिखर

मराठाकालीन मंदिराचे शिखर हे दोन प्रवाहामध्ये आहे. भूमिज मंदिरापासून शिखराची रचना तयार झालेली आहे. ही मंदिरे शेखरी आराखडयावर बांधलेली आहेत. शिखरे ही सजावट, स्तंभाचे प्रकार, तारांकृत आणि लंब कोनीय आराखडा असलेली आहेत.

### ६.१.३ निवासी वास्तूंची वैशिष्टये –

सातारा जिल्ह्यातील निवासी वास्तूंचा अभ्यास करताना घरे व वाडयांचा विचार करावा लागतो. सामान्य जनांची साधी होती. सरदार, वतनदार व श्रीमंत लोक वाडयामध्ये रहात असत. वाडे एक, दोन, तीन व चार चौकी असत. वाडे दोन, तीन मजली असत. वाडयामध्ये सोपे असत सोप्यातील खांब साधे असत त्यांना दगडी तळखडा असे. चौकातील जोत्याला लोखंडी गोल कडया आहेत. त्याचा उपयोग घोडी बांधण्यासाठी केला जात असे. चौकातील पावसाचे पाणी बाहेर जाण्यासाठी बंदिस्त गटाराची सोय केलेली दिसून आली. शिवकालीन वाडे दगड व पांढऱ्या मातीच्या विटांचा वापर केलेला दिसून आला. शिवकालातील वाडयांच्या भिंतीमध्ये वापर केलेले दगड मध्यम आकाराचे व ओबड थोबड आहे. वाडयांना ३० ते ४० फूट उंचीची तटबंदी होती असे दिसून आले. वाडयांना बुरूज असून बुरूजांना जंग्या होत्या. वाडयाच्या भिंती ४ ते ६ फूट रूंदीच्या आहेत.

वाडयांना भव्य प्रवेशद्वार असे. शिवकालीन वाडयांना साध्या कमानी होत्या. शिवोत्तर काळामध्ये वाडयांना भव्य टोकाची कमान असे. काही वाडयांच्या प्रवेशद्वाराच्या कमानी पडलेल्या आहेत. प्रवेशद्वाराचे ६ फूट उंचीपर्यंतचे बांधकाम दगडी आहे तर उर्वरित बांधकाम विटांमध्ये केलेले आहे. प्रवेशद्वारस दिंडी दरवाजा आहे. दरवाजास लोखंडी पट्टया ठोकून मजबूत केलेला आहे

वाडयाच्या चौकटीवर कोरीवकाम केलेले असे. चौकटीच्या ललाटबिंबावर गणेशपट्टी असे. दुसऱ्या टप्प्यापर्यंत गणेशपट्टीच्या वरील बाजूस उलटया कमळफुलांचे तोरण असे. पहिल्या व दुसऱ्या मजल्याचे छत कडीपाटाचे असे. वाडयामध्ये विहीरी खणून पाण्याची सोय करण्यात आली होती. विहीरीतून पाणी उपसण्यासाठी रहाटाचा किंवा चाकाचा वापर केला जाई.

प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस ओटे असत. दरवाजाच्या आतील बाजूस ढेलज असे येथे पहारेकरी असत. वाडयामध्ये दरबार हॉल, मुदपाकखाना, सदर, देवघर असे. वरील मजल्यावर जाण्यासाठी भिंतीमधून जिने असत. दरबार हॉलमध्ये सुरूचे खांब असत. दोन खांब महिरपीमुळे जोडले जात, कमानीला केळफूल असे. भिंतीवर चित्रे काढलेली असत. वाडयाचे बांधकाम दगड, विट व माती किंवा चुन्याचा वापर केलेला असे. तुळईच्या हस्तावर पिसारा फुलविलेल्या मोराचे, पोपट व शरभाचे व उलटया व सुलटया कमळाची काष्टशिल्प कोरलेले असत. काही वाडयाचे तुळईचे हस्त साधे असत. वाडयाच्या भिंतींना मातीचा गिलावा दिलेला होता . मातीमध्ये गवत, डिंक व सरस मिसळत असत. भिंतीमध्ये धान्याचे पेव असत. वाडयामध्ये गुप्त खोल्या व तळघर असत. आजही अनेक वाडयामध्ये तळघरे सापडतात. तटबंदीच्या भिंतीमध्ये किंवा वाडयाच्या भिंतीमध्ये शौचलय असे. वाडयामध्ये पेवाची किंवा पाटीची शौचालय होती. वाडयाचे छप्पर अर्धगोल कौलारू असे.

### ६.१.४ संरक्षक वास्तूंची वैशिष्टये –

संरक्षक वास्तूमध्ये गढी, कोट व किल्ल्यांच्या समावेश होतो. सातारा जिल्ह्यामध्ये काही गावांना तटबंदी असल्याचे दिसून येते. आधुनिक काळामध्ये गावाभोवती असणारी तटबंदी जरी नष्ट झाली असली तरी गावाच्या सुरूवातीस प्रवेशद्वारे आहेत. त्यावरून गावाभोवती भक्कम तटबंदी असल्याचे दिसते. काही ठिकाणी अद्यापही प्रवेशद्वारास भक्कम दरवाजा दिसतो.

सातारा जिल्ह्यामध्ये डोंगरी किल्ल्यांची संख्या जास्त आहे. यापैकी काही किल्ले आसपासच्या प्रदेशावर देखरेख ठेवण्यासाठी बांधण्यात आले. शिवकालामध्ये या किल्यांनी महत्वाची भूमिका बजावली. किल्याचे महत्व ओळखून शिवाजी महाराजांनी आपल्या महसूलाचा बराच मोठा भाग किल्ल्याच्या बांधणीसाठी व दुरूस्तीसाठी खर्च केला. किल्याचे तटबंदी, दरवाजा, बुरूज, चोरवाटा, अंधार कोठडी, धान्याची कोठारे, पाण्याची सोय हे संरक्षणादृष्टीने महत्त्वाचे घटक आहेत. याशिवाय लगोरीसारखे घटक आहेत. सातारा जिल्ह्यातील बहुतांशी किल्ल्यांची तटबंदी नैसर्गिक आहे. काही ठिकाणी तटबंदी बांधलेली आहे. भौगोलिकदृष्टया सातारा जिल्ह्यातील काही किल्ले दुष्काळी भागात असल्याने पाण्याची व्यवस्था वेगळया प्रकारे केलेली होती. उन्हाळयामध्ये पाणी टिकून राहावे पाण्याच्या टाक्यांना आतून चुन्याचा गिलावा केलेला आहे. काही किल्यावर किल्याच्या बाहेर तटबंदीखाली, किल्ल्याच्या उतारावर टाके खोदलेली आहेत.

सातारा जिल्ह्यातील सर्वच किल्ल्यावरील इमारती पडलेल्या आहेत. परंतु अस्तित्वात असलेल्या अवशेषावरून किल्ल्यावरील घरे अत्यंत साधी दगड मातीची असल्याचे दिसते. प्रतापगड, अजिंक्यतारा, सज्ञनगड, कल्याणगड या किल्यांची प्रवेशद्वारे अद्याप अस्तित्त्वात आहेत.

### ६.१.५ जलवास्तूंची वैशिष्टये –

सातारा जिल्ह्यातील जलवास्तूंचा अभ्यास करताना प्रामुख्याने विहीरीचा विचार करावा लागतो. यामध्ये लिंब शेरीची बारामोटेची विहीर महत्त्वाची आहे. या विहीरीमध्ये नाग, कमळफुले, व शरभ यांची शिल्पे कोरलेली आहेत. विहीरीमध्ये असणाऱ्या हॉलमध्ये नाग, कमळ, चक्र, अंबारी असेलला हत्ती व मोराची शिल्पे आहेत. गोखले यांच्या विहिरीमध्ये शिल्पे नाहीत परंतु विटांनी बांधलेल्या या विहीरीतील कमानी आकर्षक आहेत. या विहीरीमध्ये व नागेवाडीच्या विहीरीमध्ये बांधकाम करताना सुरूवातीस पिंपळाचे लाकूड वापरेलेले आहे. इतकी वर्षे पाण्यात असूनही ते लाकूड सुस्थितीमध्ये आहे. या काळातील विहीरीमध्ये किंवा विहीरीच्या, तळयाच्या आसपास कोठेतरी नागाचे शिल्प आढळते. यावरून नागाचा पाण्याचा जवळचा संबंध दिसून येतो. विहीरीमधील किंवा आसपास आढळणारे नागाचे शिल्प कालांतराने गायब झाल्याचे दिसून येते. मराठाकाळात शिवकाल व प्रारंभीच्या काळामध्ये विहीरीमध्ये एकाच

बाजूने सरळ पायऱ्या बांधलेल्या दिसतात. परंतु नंतरच्या काळात तुलनामकदृष्टया कमी जागेचा वापर करण्यासाठी त्यास इंग्रजी एल अक्षराच्या आकार दिलेला दिसून येतो. आसले येथील विहीरीमध्ये बाह्यबाजूने परीघाबरोबर पायऱ्या बांधलेल्या आहेत.

सातारा जिल्हयातील मराठाकालीन स्थापत्य शिल्पांना राजकीय, सामाजिक व धार्मिक दृष्टीने वारसा मिळाला असल्याने त्यांच्यात भरीवपणा आलेला पाहावयास मिळतो. कोणत्याही गोष्टीचा भरभराट यावयाची असेल तर त्यास राजकीय वारसा असणे गरजेचे असते कारण त्या प्रदेशावर राज्य करणाऱ्या राजा हा त्या स्थापत्यांकडे सामाजिक व धार्मिक दृष्टीने पाहत असतो त्यामुळे त्यात मोठया प्रमाणात भर पडत असते. राजकीय वारसा लाभल्यामुळे त्या वास्तूंकडे परंपरेने पाहिले जाते. सातारा जिल्ह्यातील मंदिर वास्तूशिल्पामुळे धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास समजतो. मराठाकालीन धार्मिक परिस्थिती ही त्या मंदिर वास्तूंवरून लक्षात येते. तसेच त्या काळातील सामाजिक परंपरा समजण्यास मदत होते. मुस्लिम दर्गे व मशिदी यावरून मुस्लिम स्थापत्यकला समजण्यास मदत होते. त्यावेळी मुस्लिम राज्यकर्त्यानी व मराठा सत्ताधिशांनी जे मुस्लिम स्थापत्यास संरक्षण दिले होते. त्यातून ही कला सुस्थितीत राहिलेली दिसून येते.

सातारा जिल्ह्यातील निवासी वास्तूशिल्पामुळे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती प्रकाशात येते. मराठा काळातील वास्तू बांधण्याची कला, त्याची रचना, वाडयातील बैठक व्यवस्था, ओसरी नगारखाना इत्यादीवरून त्याकाळातील सामाजिक व सांस्कृतिक माहिती मिळण्यास मदत होते. या निवासी वास्तूवरून राजे व सरदार लोकांची प्रतिष्ठा समजण्यास मदत होते. वाडे म्हणजे केवळ निवास नव्हे तर वैभवही समजण्यास मदत होते.

संरक्षण स्थापत्यामध्ये विशेषतः किल्ल्यांचा समावेश होतो. त्या किल्ल्यावर संरक्षणासाठी असणाऱ्या वास्तू व तटबंदी यावरून किल्ले हे मराठा काळात कशापद्धतीने संरक्षणाचे कार्य करीत होते याची माहिती समजण्यास मदत झाली आहे. मराठा काळातील जलस्थापत्यामुळे त्या काळातील धार्मिक व सामाजिक इतिहास समजण्यास मदत होते. त्या काळात ज्या देवदेवता, प्राणी, पक्षी यांच्या चित्रावरून त्या काळातीळा धार्मिकतेच्या दृष्टीने त्यांना किती महत्त्व होते हे समजण्यास मदत होते. विहीरी, तळी व बारव यांच्या रचनेवरून त्या काळातील सामाजिक व धार्मिक इतिहास समजतो. बांधकाम शैली कशाप्रकारची होती हे

समजण्यास मदत झाली आहे. त्या काळात जलस्थापत्यामध्ये वाडयात विहिरी खणलेल्या दिसून येतात. याचीही माहिती मिळण्यास मदत होते. आजच्या पिढीला मराठे काळातील वास्तू शिल्पशैली निश्चितच मार्गदर्शक ठरणारी आहे.

## ६.२ शोध –

या विषयाच्या अभ्यासातून पुढील बाबी प्रकाशात आल्या.

१. शिवकाळामधील मंदिराच्या चौकटी प्राचीन काळातील व शिवोत्तर काळातील मंदिरांच्या चौकटीपेक्षा लहान आहेत. यावरून याकाळामध्ये आक्रमकांपासून मंदिरे सुरक्षित नव्हती. कमी उंचीची चौकट हा त्यावरील अनेक पर्यायापैकी एक पर्याय होता.

२. मराठाकालीन मंदिरामध्ये सममितपणा दिसत नाहीत त्यामुळे याकाळामध्ये कुशल कारागीराची कमतरता होती असे दिसून येते.

३. मंदिरांमध्ये शरभ, कमळकळीची रांग, नागाची शिल्पे, मोर, छतावरील सहस्त्रदल, हत्ती, चौकटवरील तोरण, किर्तीमुख इ. शिल्पे व तारांकृत विधान या घटकांच्या माध्यमातून प्राचीन परंपरा जपण्याचा मराठयांनी प्रयत्न केला.

४. पुनरूत्थान प्रकारची मंदिरे उभारून पुन्हा उज्वल भूतकाळामध्ये जाण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसते.

५. प्रारंभीच्या काळातील मराठा स्थापत्यावरील असणारा इस्लामी स्थापत्याचा प्रभाव अपवादात्मक घटक सोडल्यास नंतरच्या काळात कमी होत गेल्याचे दिसते.

६. शिखर, छत, स्तंभ व रचना यांच्यातील प्रकार व विविधता यातून मराठा मंदिर स्थापत्यशैलीचे वेगळेपण दिसून येते.

७. लष्करी मोहिमांनिमित्त देशाच्या इतर भागामध्ये मराठे गेल्यानंतर त्या प्रदेशामध्ये त्यांनी जी मंदिरे पाहिली त्या प्रकारची मंदिरे परत आल्यावर त्यांनी आपल्या भागामध्ये बांधली. त्यासाठी संबंधीत प्रदेशातील कारागीर आपल्या प्रदेशात आणले. हे कारागीर येथेच राहीले त्यांच्या बरोबर त्यांची संस्कृतीही इथेच रूजली. त्यामुळे अनेक संस्कृतींचा संगम झाला.

८. मराठाकालीन वास्तूंमध्ये धार्मिक वास्तूंचे अस्तित्त्व धार्मिकतेमुळे टिकून राहिले व काही जलवास्तूंचे अस्तित्त्व उपयुक्ततेमुळे टिकून राहिले. जे उपयुक्त वाटले नाही त्याचे

अस्तित्त्व नष्ट झाले. प्रामुख्याने किल्ल्यावर आढळणारे गंडभेरूडाचे शिल्प सातारा जिल्ह्यामध्ये मात्र समाधीवर व मंदिरामध्ये   आढळते.

९.    चतुर्गज विजयी गंडभेरूड व द्विपंखधारी शरभ एकाच ठिकाणी आढळत नाहीत. परंतु भुईंज येथील रायाजी जाधव यांच्या समाधीच्या जोत्याचा उपपीठावर आढळतात.

१०. सातारा जिल्ह्यामध्ये गंडभेरूड फक्त भुईंज येथील रायाजी जाधव यांच्या समाधीच्या जोत्याच्या पपीठावर व करंजखोप येथे भैरवनाथाच्या मंदिरामध्ये आढळते.

११. मराठे सरदार देशातील कोणत्याही भागामध्ये गेले, तिथे स्थायिक झाले तरी त्यांनी आपल्या मूळ गावाशी

असणारी नाळ तोडली नाही. मूळ गावामध्येही त्यांनी मंदिरे व वाडे उभारले.

१२. सातारा जिल्ह्यातील मराठाकालीन मंदिरामध्ये अकरा वेगवेगळया प्रकारचे छत बांधलेले आहेत. अशा प्रकारचे छत प्राचीन काळातील मंदिरांमध्ये पहायला मिळत नाहीत.

१३. सातारा जिल्ह्यातील मराठाकालीन मंदिरांमध्ये वेगवेगळया प्रकारच्या सात प्रकारच्या कमानी आढळतात. सुलतानशाही स्थापत्यकलेमध्ये टोकाची कमान आढळते. शहाजहानच्या काळामध्ये बहूपर्णी कमान प्रथम दिसते. छ.शाहू महाराजांच्या काळामध्ये ती सातारा जिल्ह्यातील स्थापत्यकलेमध्ये दिसते.

१४. सातारा जिल्ह्यातील मराठाकालीन मंदिरांमध्ये सहा प्रकारचे खांब आढळतात. या पैकी चार प्रकार सुरूच्या खांबाचे आहेत.

१५. भव्य खांब हे मोगल स्थापत्याचे वैशिष्टय असून वाई येथील वाई येथील विष्णू लक्ष्मी, काशिविश्वेश्वर  मंदिरामध्ये दिसून येतात.

१६. मराठकाळातील मंदिरे ही समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींनी, सरदारांनी व सावकारांनी आपले अस्तित्त्व राखण्यासाठी, आपल्या प्रतिष्ठेसाठी बांधली. शासनाचा यामध्ये सहभाग नसे.

१७. पेशवेकाळामध्ये घाटांची मोठया प्रमाणावर वाढली.

१८. सातारा ही मराठयांची राजधानी होती. त्यामुळे प्रारंभीच्या काळामध्ये मराठाकालीन स्थापत्य चळवळ  सातारा व साताऱ्याच्या परिसरामध्ये प्रामुख्याने माहूली येथे केंद्रीत होती. यामध्ये औंधचे पंतप्रतिनिधी,  अनगळ व अंगापूरचे देशमुख यांचे मोठे योगदान

आहे. माहूली येथील बांधलेले काही घाट ईर्षेने बांधलेले आहेत. शाहूंच्या काळामध्ये पेशवे व रास्ते यांचे नातेसंबंध झाल्यानंतर ही स्थापत्य चळवळीचे केंद्र वाईकडे सरकले. वाई येथे रास्ते यांनी अनेक मंदिरे व वाडे बांधले.

१९. सातारा जिल्ह्यातील मराठाकालीन मंदिरांमध्ये पाच वेगळया प्रकारची शिखरे आढळतात. या शिखरांवर प्राचीन कालीन शिखरांचा व दक्षिणेतील गोपुरे शिखर रचनांचा प्रभाव आढळतो. यांच्या मिश्रणातून मराठयांनी स्वतःची एक वेगळी मंदिर स्थापत्यशैली निर्माण केली.

२०. वडूथ येथील शकुंतेश्वर मंदिराची कल्पना नानासाहेब पेशवे यांना म्हैसूर प्रांतातील कावेरी नदीतील बेटावरील श्रीरंगाच्या मंदिरावरून सुचली. शिवसमुद्रम येथेही अशाच प्रकारचे शिवालय आहे. यावरून म्हैसूर प्रांतातील मंदिरशैलीचा प्रभाव वडूथ येथील शकुंतेश्वर मंदिरावर पडल्याचे सिद्ध होते. माथवराव पेशव्याने कर्नाटकवर स्वारी केली. यावेळी आनंदराव रास्ते या स्वारीमध्ये होते. त्यांच्यावर स्वारीचा चांगला परिणाम झाला. त्यांनी बंगलोरचा गणपती व बसवण्णा यावरून वाईचा ढोल्या गणपतीची मूर्ती बनविली आहे. यासाठी कर्नाटकमधून कारागीर आणणे सहाजिकच होते या वरून मूर्तीवर कर्नाटक कलेचा प्रभाव पडल्याचे सिद्ध होते.

२१. मराठाकालीन समाधीचे मंदिर, चौथरा व छत्री असे स्वरूप दिसून येते. मराठा स्थापत्याच्या दुसऱ्या टप्प्यापर्यंत समाधीचे स्वरूप हे घुमट व चौथऱ्याचे दिसून येते नंतरच्या काळामध्ये मंदिराचे स्वरूप आल्याचे दिसते.

२२. मराठाकालामध्ये घुमटाची चौकट अत्यंत लहान आहे. मराठयांची सत्ता विस्तारल्यानंतर मंदिरांच्या चौकटी मोठया झाल्या तरीही घुमटांच्या चौकटी लहानच राहिल्या. घुमटांमध्ये एका माणसालाही व्यवस्थित आतमध्ये जाता येत नाहीत.

२३. घुमटाच्या पायऱ्या या घुमटाला जोडलेल्या नाहीत घुमटाचे पीठ व पायऱ्या यामध्ये अंतर असल्याचे दिसून येते. आणिबाणीच्या काळामध्ये पायऱ्या बाजूस काढल्यातर घुमटामध्ये प्रवेश करणे आणखी कठीण व्हावे हा हेतू असावा.

२४. प्राचीन काळामध्ये पीठाचे महत्त्व फारसे लक्षात आले नाही, परंतु मध्यकाळामध्ये घुमटाच्या पीठाचे महत्त्व समजले त्यामुळे पीठाची उंची वाढवून घुमटाच्या गर्भगृहामधील शिवलिंग वाजूस करून आतमध्ये लपण्यासाठी जागा केलेली दिसते.

२५. सरदार, पराक्रमी व्यक्ती, राजघराण्यासंबंधी व्यक्ती असेल तर त्याच्या समाधीच्या पीठावर शरभ व कमळ किंवा सहस्त्रदल कोरलेले असते.

२६. घुमटाच्या भिंतीच्या वरील बाजूस चौफेर कमळकळी व पिंपळाचे पानाची रांग कोरलेली किंवा त्या आकाराचे दगड उभे बसविलेले असतात.

२७. संतांच्या समाधीवर वृंदावन असलेले दिसून येते

२८. भुईंज व मांडवे येथील जाधव घराण्यातील व्यक्तींच्या समाधीला चौरंगाचे पाय आहेत. असेच पाय पाटखळ येथील संगमेश्वर मंदिरासमोर असलेल्या नंदीमंडपास आहेत. दोन्ही ठिकाणचे पाय स्वतंत्र कोरलेले आहेत. दोन्ही चौरंगाच्या पायाची शैली एकसारखी असल्याने ही बांधकामे एकाच काळातील असल्याचे सिद्ध होते.

२९. भुईंज येथील रायाजी जाधव, तडवळे येथील अज्ञात व्यक्तीची समाधी व कण्हेरखेड येथील बायजाबाई शिंदेच्या समाधीवर एक तोंड व तीन शरीरे असलेले माशांचे शिल्प आहे. इस्लाम स्थापत्यकलेमध्ये विशेषत: विजापूर शैलीमध्ये माशांना महत्त्व मिळालेले आहे. परंतु विजापूरी शैलीतील माशांची शैली व या समाधीवरील माशांची शैली पूर्णपणे वेगळी आहे.

३०. पुणे येथे बाजीराव पेशव्याने शनिवारवाडा बांधल्यानंतर इतर मराठे सरदारांनीही वाडे बांधण्यास सुरूवात केल्याचे दिसून येते. शिवकालामध्ये छ. शिवाजी महाराजांनी वाडे बांधण्यास विरोध केला असला तरी खटावचे कृष्णराव खटावकर, बुधचे झुंजारराव घाटगे, राजापूरचे घाटगे, म्हसवडचे माने व करंखोपचे धुमाळ ही सरदार घराणी आदिलशहाच्या दरबारामध्ये आपला आब राखून होती त्यांनी वाडे बांधले. हे वाडे बांधताना मोठे दगड व पांढऱ्या मातीच्या मोठया विटा वापरलेल्या आहेत. यापैकी सध्या कोणताही वाडा अस्तित्त्वात नसला तरी या वाडयांचे अवशेष अजूनही शिल्लक आहेत. या अवशेषावरून वरील मताला दुजोरा मिळतो.

३१. मराठी सत्तेच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये भाजक्या विटांचा वाडा बांधणीमध्ये मोठया प्रमाणावर वापर झालेला दिसतो. मराठाकाळातील बांधकामामध्ये काळानुसार वेगवेगळया मापाच्या विटा वापरलेल्या आहेत.

३२. फलटणचे निंबाळकर, पाटणचे पाटणकर व तारळयाचे महाडीक हे रामभक्त होते. निंबाळकरांनी श्रीराम मंदिर बांधले. पाटणकर व जाधव घराण्यांचे वंशज त्यांच्याकडे असणारी रामाची मुर्ती रामदास स्वामींनी दिल्याचे सांगतात. यावरून रामदास स्वामींचे सरदार घराण्यांशी चांगले संबंध असल्याचे दिसून येते. ९८२२७५५१७९

३३. सर्व वाडयांच्या भिंती चार ते पाच फूट रूंदीच्या आहेत. वरच्या मजल्यावर जाण्यासाठी भिंतीमधून जिने असून अरूंद आहेत. या जिन्यामधून एकावेळी एकाच माणसाला जाता येते. या भिंतीचा उपयोग धान्याचे पेव करण्यासाठीही केलेला दिसतो.

३४. प्रत्येक वाडयामध्ये सांडपाणी वाहून जाण्यासाठी बंदिस्त गटाराची सोय असल्याचे दिसते.

३५. किन्हई व फत्यापूर येथील वाडयामध्ये पाटीची शौचालय असल्याचे दिसून आले. हा मैला वाहून नेणारा समाज गावांमध्ये होता असे दिसते. यावरून तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर काही प्रमाणात प्रकाश पडतो.

३६. सातारा जिल्ह्यातील मराठाकालीन वाडयामध्ये गुप्त खोल्या, तळघरे आढळली आहेत. किन्हई व फत्यापूर येथे गुप्त खोल्या व फत्त्यापूर, कण्हेरखेड व तारगाव येथे तळघरे आढळली आहेत. तारगाव येथे संपूर्ण गावामध्ये जुन्या घरामध्ये तळघरे आहेत असे सांगितले जाते. या तळघरांचा उपयोग धान्याचे पेव म्हणून केला जात असे. आणीबाणीच्या प्रसंगी लपून राहण्यासाठी केला जात असे. फत्त्यापूर व किन्हईच्या वाडयामध्ये क्रांतीसिंह नाना पाटील काही महिने राहिल्याचे सांगितले जाते. यावरून या वाडयांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचे दिसते.

३७. वाडयांमध्ये लाकूडकाम मोठया प्रमाणावर झालेले दिसून येते. वाडयाची चौकट, देवघर, दिवाणखाना तुळई, खांब, हस्त व छत लाकूडकामामध्ये केलेले आहे. मराठी सत्तेच्या दुसऱ्या टप्प्यापासून लाकडावरील कलाकुसर ही मोठया प्रमाणावर प्रगत झालेली दिसते. वाडयाच्या चौकटीच्या ललाटबिंबावर गणेश पट्टी व बाजूस फुलांची व वेलीची तर काही चौकटीवर द्राक्षवेलीची कलाकुसर केलेली आढळते. भुईंज येथील वाडयातील चौकटीवरील

तोरणावर घोडयाचे तीन मुखे कोरलेली आहेत. उंबरासोडून सर्व चौकटीवर लहान कलाकुसर कोरलेली आहे. वाडयांच्या दिवाणखान्यामध्ये सुरूचे खांब आहेत. शहाजहानच्या काळामध्ये अशा प्रकारचे खांब प्रथम आढळतात. परंतु मराठयांच्या तिसऱ्या टप्प्यात मराठा स्थापत्यामध्ये ते आढळतात. दिवाणखान्यातील मंडप महिरपीने जोडलेले दिसतात. महिरपीवर वेलीची कलाकुसर कोरलेली असते. या मंडपाची मोठी कमान माळवा शैलीची आहे. या शैलीमध्ये मराठाशैलीतील पोपटाची शिल्पे  कोरलेली असतात. वाडयांचे छत कडीपाटाचे आहे. सर्व वाडयामधील देवघरांना लाकडी पट्टयांच्या  जाळया आहेत. तुळईच्या दर्शनी बाजूस पिसारा फुलविलेला मोर त्याच्या दोन्ही बाजूस शरभ असलेले काष्ठशिल्प आहे. मसूर येथील जगदाळे यांच्या वाडयामध्ये मोराच्या शिल्पाऐवजी पोपटाचे शिल्प आढळते. या मंडपावर मोगल शैलीबरोबरच माळवा शैलीचा प्रभाव दिसतो. यावरून उत्तर भारतीय कारागीरांना महाराष्ट्राबरोबरच सातारा जिल्ह्यामध्ये चांगली संधी मिळाल्याचे दिसून येते. खामकरवाडी  येथील लेंगरे व बावधन येथील कुलकर्णी यांचा वाडयातील हस्त फार मोठे असून या हस्तावर दोन्ही बाजूस कमळाची फूले कोरलेली आहेत. वडगाव येथील जयराम स्वामीच्या मठाच्या प्रवेशद्वार व वाई येथील विष्णू लक्ष्मी मंदिराचे प्रवेद्वारास कमळाच्या फूलाचे तोरण आहे.

३८. मराठी सत्तेच्या दुसऱ्या टप्प्यापासून सातारा जिल्ह्यातील स्थापत्य शैलीमध्ये मोगली शैली दिसू लागली. माधवराव पेशव्यांच्या काळामध्ये कर्नाटकच्या स्वारीमुळे कर्नाटकची शैली आनंदराव रास्ते यांच्या माध्यमातून वाई येथे आली. या शैलीची मंदिरे किंवा वाडे बांधण्यासाठी लागणारे कारागीर संबधीत प्रदेशातून आणणे सहाजिकच होते. त्यामुळे स्थानिक कारागीरांची इथे कमतरता होती किंवा स्थानिक कारागीर तितके कुशल नव्हते. त्यामुळे स्थानिक कला ऱ्हासाकडे गेली.

३९. मराठाकाळामध्ये गाव, कसबा व पेठेभोवती कोट किंवा तटबंदी बांधून संरक्षित केल्याचे दिसते. यावरून मराठी सत्ता विस्तारूनही गावातील लोक सुरक्षित नसल्याचे दिसून येते.

४०. शिवकाळामध्ये किल्ल्यांना असणारे महत्त्व पेशवेकाळामध्ये मराठी सत्ता विस्तारल्याने राहिले नाही त्यामुळे किल्ल्याकडे दुर्लक्ष होऊन किल्ल्यांचे मोठे नुकसान झाले.

४१. संरक्षण वास्तूमधील पाणी हा एक महत्वाचा घटक असल्याने किल्ल्यावरील जलव्यवस्थापनाला महत्त्व दिले गेले. सातारा जिल्ह्यातील किल्ले अतिवृष्टी व दुष्काळी भागात असल्याने दोन्ही ठिकाणी जलव्यवस्थापन वेगळया स्वरूपामध्ये केल्याचे दिसते.

४२. सातारा जिल्ह्यातील वैराटगड व महिमानगड येथे चोरवाटा आहे. इतर किल्ल्यांवर त्या दिसून येत नाहीत. शिरवळचा भुईकोट किल्ला फक्त एका बुरूजापुरताच शिल्लक राहिला आहे.

४३. वैराटगडावरील बालेकिल्ला वरून्न माचीपर्यंत उभा तटबंदी व बरूजांनी विभागला आहे. यावरून बालेकिल्ल्यावर दोन्ही बाजूंनी हल्ला होत असावा. अशी तटबंदी कोणत्याही किल्ल्यावर दिसत नाही वारूगडाचे हे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

४४. सातारा जिल्ह्याला बारवांची परंपरा आहे. गुरसाळे येथे प्राचीनकालीन बारव आहे. जलवास्तू व प्राणी शिल्पे यांचे फार जुने नाते असल्याचे दिसते. प्राचीन काळापासून महाराष्ट्रातील जलवास्तूंमध्ये वेगवेगळी शिल्पे आढळून येतात. ही परंपरा मराठाकाळामध्ये असलेली आढळून येते. सातारा जिल्ह्यामधील जलवास्तूही यास अपवाद नाहीत.

४५. प्राचीन काळी बारव बांधताना मोठया प्रमाणावरील जागेचा वापर केला जाई. परंतु त्यामानाने पाणी कमी प्रमाणात पाणी साठा असे. मराठाकाळामध्ये पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीच्या पाण्याचा वापर करण्यासाठी विहीरी खोदण्यात आल्या. या विहीरीमध्ये उतरण्यासाठी एकाच बाजूने पायऱ्या बांधण्यात आल्या. पाण्याजवळ गेल्यानंतर कमान बांधण्यात आली विहीरीचा आकार गोल व एकाच बाजूने बांधण्यात आलेल्या पायऱ्या व मध्येच कमान काही विहीरीमध्ये छोटाशी खोली किंवा हॉल यामुळे विहीरीचा आकार शिवलिंगासारखा दिसतो. शिवकाळातील काही विहीरी चौकोनी आकाराच्याही आहेत.

४६. विहीरीतील पाणी उपसण्यासाठी बगाड बांधण्यात आली. या विहीरीमध्ये बांधकाम करताना जिथे बेसाल्ट खडक लागला नाही तिथे पिंपळाच्या लाकूड वापरून खाली त्याचे कडे वापरून त्याच्यावर बांधकाम केले आहे. हे पिंपळाचे लाकूड अद्यापही चांगल्या स्थितीमध्ये आहे. या लाकडाचे केमीकल अनॅलिसीस पाहीले असता पिंपळामध्ये

स्टीरॉईडचे  प्रमाण जास्त असल्याने ते पाण्यामध्ये त्याच्यावर कोणताही परिणाम होत नाही असे दिसून आले.

४७. पुढील काळामध्ये कमी जागेमध्ये विहीर खोदताना विहीरीच्या पायऱ्या विहीरीच्या परिघास लागून बाहेरील बाजूस बांधल्याचे दिसते.

४८. प्राचीन काळातील बारवांमधील काही शिल्पे मराठाकाळामध्ये दिसतात. या शिल्पांमध्ये नाग, हत्ती, कमळफूल, किर्तीमुख ही महत्त्वाची शिल्पे आहेत. काही विहीरीमध्ये शरभाची शिल्पे दिसतात. राजघराणे व सरदार घराण्यातील व्यक्तींनी बांधलेल्या विहीरीमध्ये शरभाची शिल्पे दिसतात. शरभ शिल्प किल्ला, मंदिर, दिपमाळ व विहीरीमध्ये दिसते. ते वाडयामध्ये दिसत नाही. यावरून शरभ हे शिल्प पराक्रम व राजकीय सत्ताधीश व अधिकारी यांच्याशी संबंधीत असल्याचे दिसते. मराठाकाळातील हे शिल्प दुसऱ्या टप्प्यामध्ये मोठया प्रमाणामध्ये दिसते. पुढील काळामध्ये काही अपवाद वगळता ते दिसत नाही. किर्तीमुख भुईंज व बावधन येथील विहीरीमध्ये दिसते.

४९. कमळ आणि पाणी यांचा फार जवळचा संबंध आहे. पाण्यामध्येच कमळ फुलते. कमळ हे लक्ष्मीचे प्रतिक समजले जाते. विष्णूच्या हातामध्येही कमळाचे फूल असते. विष्णूला नारायण असेही म्हटले जाते. वराहपुराणामध्ये नारायण याचा अर्थ पाण्यावर झोपणारा असा सांगितला आहे. त्यामुळे विहीरीमध्ये कमळशिल्प कोरलेली असतात.

५०. हत्तीचा जवळचा संबंध पाण्याशी येतो. गजलक्ष्मी हे प्राचीन काळी प्रसिद्ध शिल्प होते. या शिल्पामध्ये लक्ष्मीच्या दोन्ही बाजूस दोन हत्ती असून लक्ष्मीच्या डोक्यावर सोंडेतून पाण्याचा अभिषेक करतात. यावरून हत्ती व पाणी यांचा संबंध समजतो.

५१. नाग व पाणी यांचा इतर कोणत्याही शिल्पांपेक्षा घनिष्ठ संबध आहे. महाभारतामधील बालपणातील कौरवांनी भीमावर विषप्रयोग करून पाण्यामध्ये फेकून दिले व तो नागलोकमध्ये गेला ही कथा व युधिष्ठिर व यक्ष प्रश्नोत्तर प्रसंग व कालीया मर्दन हे प्रसंग सर्वश्रूत आहेत. यावरून नाग व यक्ष जमातीच्या लोकांचे पाण्यावर नियंत्रण असल्याचे समजून येते. याशिवाय अही म्हणजे नाग होय, नागाच एक अर्थ हत्ती असाही होतो. हत्ती व नाग यांचे ऐक्य हरप्पा संस्कृतीमध्ये होते. नाग हे पाण्याचे रक्षक मानले गेल्यानेच जिथे विहीर, तळे असेल तिथे किंवा जवळपास नागाचे शिल्प हमखास पहायला मिळते. नाग

याच अर्थ सात असाही होतो. सात आसरा याही जलाशी संबंधीत आहेत. नाग, नियंत्रण, रक्षण या नागाच्या संबधीत बाबी पाहील्यास पाण्याचा नियंत्रित वापर केला पाहीजे असा संदेश यातून मिळतो.

## ६.३ सूचना

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये प्रामुख्याने सातारा जिल्ह्यातील धार्मिक वास्तू, निवासी वास्तू, संरक्षक वास्तू व जलवास्तू यांचा वास्तू कलेच्या अंगाने अभ्यास करण्यात आलेला आहे. हा अभ्यास करताना काही बाबी पुढे आल्या आहेत की याबाबींबाबत विचार करणे गरजेचे आहे. या शोधप्रबंधाच्या विषयास अनुसरून काही सूचना करण्यात येत आहेत. या सूचना संशोधकांना, अभ्यासकांना व समाजाला उपयोगी पडतील. या सूचना पुढील प्रमाणे आहेत.

१. सातारा जिल्ह्यातील मराठाकालीन धार्मिक, निवासी, संरक्षक व जलवास्तू या काळाच्या ओघात नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. संशोधकाच्या दृष्टीने या वास्तू प्राथमिक साधने आहेत, अभ्यासकाच्या दृष्टीने या वस्तू अभ्यासाची साधने आहेत, तर समाजाच्या दृष्टीने प्रेरणास्थाने, श्रद्धास्थान व प्राचीन वारसा आहे. त्यामुळे या वास्तू टिकविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहेत.

२. प्राचीन व समृद्ध वारसा असणाऱ्या वास्तू टिकविण्यासाठी त्यांचे संवर्धन व जतन करणे गरजेचे आहे.

३. आधुनिकीकरण करताना अनेक ऐतिहासिक वास्तू, ठिकाणे नष्ट करण्यात येत आहेत. या ऐतिहासिक वास्तू व ठिकाणांबाबत समाजामध्ये काहीही माहिती नसते. ही माहिती व त्याचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविल्यास समाजातील अनेक लोक पुढे येतील. त्यासाठी ती माहिती समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

४. धार्मिकतेमुळे मंदिरे टिकून आहेत, अनेक मंदिरांचे जिर्णोद्धार केला जात आहे. त्यामुळे मंदिरांचे मूळ रचना नष्ट होते. त्यासाठी मंदिराची पुनर्रचना करताना मूळ रचना तशी राहील यादृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

५. मंदिराच्या मूळ रचनेचे महत्त्व माहितीचे अज्ञान व आधुनिकतेचे आकर्षण यामुळे हा ठेवा नष्ट होत आहे. हे थांबविले पाहिजे.

६. समाध्या या वैयक्तीक व खाजगी संपत्ती असल्याने व त्याची देखभाल होत नसल्याने काही समाध्या आडवळणी असल्याने त्याकडे दुर्लक्ष होत आहे. यामुळे त्या विनाशाच्या मार्गावर आहेत.

७. निवासी वास्तू या वैयक्तीक व खाजगी असल्याने त्याकडे समाजाचे दुर्लक्ष होत आहे. काही वास्तू वापराविना पडून असल्याने व अशा वास्तूमधून अनेक मौल्यवान ऐतिहासिक वस्तू चोरीला गेल्याने वास्तूचे फार मोठे नुकसान होत आहे. हे थांबविले पाहिजे.

८. संरक्षक वास्तूंच्या बाबत या पाच सहा वर्षामध्ये संवर्धनाला चालना मिळालेली आहे. परंतु अनेक ठिकाणी हे संवर्धन योग्य प्रकारे होत नाही. त्याचे मूळ स्वरूप नष्ट होत आहे. यासाठी योग्य मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे.

९. सातारा जिल्ह्यातील गावाशेजारील किंवा गावातील अनेक जलवास्तू या कचराकुंडी बनल्या आहेत. अनेक झाडेझुडपे उगविल्याने फार मोठे नुकसान झालेले आहे. काही शेतातील जल वास्तू अद्यापही वापरामध्ये आहेत परंतु तिथेही झाडे झुडपे उगविल्यामुळे त्यांनाही धोका निर्माण झालेला आहे. हे टाळण्यासाठी उपयोजना झाली पाहिजे.

१०. विहीरीमध्ये पिंपळाचे लाकूड वापरलेले आहे. हे लाकूड पाण्यामध्ये दिर्घकाळ टिकून राहते असे दिसून आले आहे. यावर आणखी सखोल संशोधन होऊन या लाकडाचा आणखी कोणत्या प्रकारे उपयोग होऊ शकतो याचा अभ्यास झाला पाहीजे.

## ६.४ शिफारशी

वरील सूचनासाठी पुढील शिफारसी करण्यात आल्या आहेत त्या शिफारसी पुढील प्रमाणे आहेत.

१. प्रथम सातारा जिल्ह्यातील सर्व ऐतिहासिक स्थळांचा सर्व्हे करावा व सुस्थितीमध्ये असणाऱ्या व पुनरूज्जीवन करता येऊ शकेल अशा वास्तूंना संरक्षित वास्तू म्हणून घोषित करायला हवे.

२. या वास्तूंचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जावेत.

३. सर्व्हे केल्यानंतर कोणत्या ठिकाणी कोणते ऐतिहासिक स्मारक आहे याबाबतची माहीती व त्याचे अस्तिवाचे गावाच्यादृष्टीने असणारे महत्त्व संबंधीत गावातील लोकांना समजावून सांगितल्यास गावातील लोक ती ऐतिहासिक स्मारके वाचविण्याचा प्रयत्न करतील.

४. ऐतिहासिक वास्तूंचे जतन व संवर्धन करण्याबाबत कोणत्याही शासनावर पूर्णपणे अवलंबून रहाणे योग्य नाही. अलीकडील काळामध्ये समाजामध्ये जुन्या मंदिराचे पुनरूज्जीवन करण्याचा प्रयत्न होत आहे. परंतु यामध्ये मंदिरांचे प्राचीनत्व हरवत आहे. हे टाळण्यासाठी मध्ययुगीन स्थापत्याचा अभ्यास असण्नाऱ्या व्यक्तीची आवश्यकता आहे. अशा स्मारकांना संरक्षक स्मारक म्हणून घोषित केल्यानंतर हे शक्य होऊ शकते.

५. संरक्षक स्मारक म्हणून जाहीर केल्यानंतर पुरातत्त्व विभागाच्या देखरेखीखाली स्थानिक लोकांची समिती नेमावी ही समिती नेमताना समितीतील सदस्यास या कामाबद्दल माहिती असलेला व राजकारणापासून तटस्थ राहणारा असावा. या समितीचे काम स्मारकांची दुरूस्ती करून घेणे स्मारकांचे जतन करणे व स्मारकाचा दुरूपयोग होणार नाही याची घेणे हे राहील.

६. स्मारकाचे जतन व संवर्धन करण्यासाठी लागणारे अर्थिक सहाय्य काही प्रमाणामध्ये शासनाने करावे. काही प्रमाणात स्थानिक लोकांकडून किंवा सामाजिक संघटना किंवा एखाद्या कंपनी कडून मिळू शकते. अनेक कंपन्या असे अर्थिक सहाय्य करू शकतात.

७. अशा ऐतिहासिक स्थळांना पर्यटनाचे ठिकाण बनविण्याच्या दृष्टिने प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी संबंधीत स्थळाबाबत ऐतिहासिक महत्त्व व स्थापात्याची वैशिष्टये माध्यमातून

प्रसिद्ध करावीत. यामुळे पर्यटनाला चालना मिळू शकते. याशिवाय स्थानिक लोकांना रोजगारही मिळू शकतो.

८. पर्यटन स्थळ बनल्यानंतर पर्यटकांकडून पर्यटन कर घेतला जाऊ शकतो. यातून पर्यटन स्थळाचा विकास केला जाऊ शकतो.

९. पर्यटन स्थळांचा विकास होत असताना ज्या बाबींपासून पर्यटन स्थळाचे किंवा ऐतिहासिक स्थळांचे नुकसान होते अशा बाबींना सक्त मनाई करण्यात यावी. यामुळे स्वच्छता राहील व ऐतिहासिक स्मारकास नुकसान पोहोचणार नाही.

१०. हे सर्व करताना मूळ उद्देश ऐतिहासिक स्मारकांचे जतन व संवर्धन करणे व पर्यटनास चालना देणे हा आहे हे विसरता येणार नाही.

११. यासाठी संबंधीत परिसरामधील विद्यापीठाच्या माध्यमातून महाविद्यालयातील इतिहास विभागाची किंवा इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांची किंवा यामध्ये रस असणाऱ्या विद्यार्थ्यांची मदत होऊ शकते. यांच्या माध्यमातून स्मारकांचे संवर्धन होऊ शकते.

१२. याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची अभ्यास सहल होऊन त्यांना स्मारकांच्या स्थापत्य कलेची माहिती मिळेल यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर पडेल व संबंधीत स्थळाची विद्यार्थ्यांकडून प्रसिद्धी होऊ शकेल पर्यटनाला चालना मिळेल.

१३. विद्यार्थ्यांना मिळालेल्या माहितीचा उपयोग स्थानिक इतिहास लिहीण्यासाठी होऊ शकतो.

१४. पूर्णपणे पडलेले वाडे आता उभे करता येणार नाहीत परंतु जे आहेत त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे. वाडे ही खाजगी संपत्ती असल्याने संवर्धन करण्यात अडचण येणारच. याला फक्त संबधीत मालकांना पूर्वजांच्या स्मृती जतन करण्याची जाणीव करून देणे याशिवाय दुसरा पर्याय दिसत नाही. जे वाडे अर्धवट पडलेले आहेत. ते दुरूस्त करून जतन करावेत. यामध्ये वस्तूसंग्रहालय सुरू करता येऊ शकते.

१५. पर्यटनस्थळ, वस्तूसंग्रहालय यांच्या माध्यमातून यांच्या माध्यमातून वाडयांचे अस्तित्त्व टिकविता येऊ शकते. फलटण येथील निंबाळकरांचा श्रीराम मंदिराजवळील वाडा अशाच प्रकारे अत्यंत चांगल्या प्रकारे जतन केलला आहे.

१६. किन्हई येथील वाडा अद्यापही बऱ्याच प्रमाणावर संवर्धन करता येऊ शकतो. त्यादृष्टीने प्रयत्न केले पाहीजेत.

१७. संरक्षक वास्तू या मराठयांच्या प्रेरणास्थान आहेत. या चार पाच वर्षामध्ये दुर्गसंवर्धन संघटनांच्या माध्यमातून दुर्गसंवर्धन चळवळीने काही प्रमाणामध्ये गती घेतलेली आहे. परंतु त्यांच्या शक्तीला मर्यादा पडतात. मुळात काही किल्ले कोणाच्या मालकीचे आहेत हेच समजत नाही. याबाबत मात्र शासनाशिवाय पर्याय दिसत नाही. शासनाने सर्व किल्ले शासनाच्या मालकीचे म्हणून जाहीर करावेत. त्यानंतर ते दुर्गसंवर्धन संघटनांकडे काही अटी घालून सूपर्त करावेत. हे करताना स्थानिक लोकांना विश्वासामध्ये घेणे गरजेचे आहे. दुर्गसंवर्धन करताना स्थानिक शाळा व महाविद्यालये यांचा उपयोग होईल. खाजगी अर्थिक संस्थाही यासाठी मदत करू शकतात. यातून स्थानिकांना रोजगार मिळेल.

१८. सर्व स्थानिक लोकांना तिथे घडलेल्या घटना माहित नाहीत. त्यासाठी स्थानिक इतिहास लेखनाला प्रोत्साहन दिले जावे. यासाठी ऐकीव माहितीचे संकलन केले पाहीजे. जितका वेळ लागे तितकी ही माहिती दुर्मिळ होईल कारण वयस्कर माणसांकडूनच ही माहिती मिळू शकते. त्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

१९. किल्ल्यांच्या परिसरामध्ये अनेक दुर्मिळ वनऔषधी वनस्पती आहेत, काळाच्या ओघात त्या नष्ट होत चाललेल्या आहेत. संवर्धन करताना या बाबींचाही विचार करावा लागेल. या वनऔषधी वनस्पतींना नष्ट होण्यापासून थांबवावे लागेल. यासाठी या वनस्पती ओळखून त्यांची लागवड करून त्यामध्ये वाढ करावी लागेल. यामुळे अर्थाजनामध्येही वाढ होऊ शकते.

२०. किल्ले संवर्धनामध्ये वन खात्याची फार मोठी अडचण येते. यासाठी वनखात्याचे संवर्धनाच्या दृष्टीने जाचक असणारे नियम शिथिल किंवा बदल करावे लागतील. त्यामुळे संवर्धन संघटनांना काम करणे सहज अशक्य होईल.

२१. शासनाने किंवा विद्यापीठाने प्रत्येक भागातील ऐतिहासिक स्मारकांच्या सम्वर्धनाची जबाबदारी  माध्यमिक शाळांपासून पदवीत्त्यर शिक्षण देणाऱ्या संस्थांवर सोपवावी त्याचबरोबर त्यासाठी अर्थिक स्त्रोतही उपलब्ध करून द्यावा. त्यामुळे संवर्धन व्यवस्थित होऊ शकेल.

२२. ज्याप्रमाणे वाडे हे खाजगी संपत्ती आहेत त्याच प्रमाणे विहीरी खाजगी मालकीच्या आहेत. यातील अनेक विहीरी अद्यापही वापरामध्ये आहेत.तरीही अशा विहीरीची देखभाल व्यवस्थित ठेवली जात नाही. या विहीरीमध्ये लहान झुडुपांची मोठी झाडे झालेली आहेत. त्यामुळे काही विहीरीचे फार मोठे नुकसान झालेले दिसते. काहींचे नजिकच्या काळामध्ये होणार हे स्पष्ट दिसते. या विहीरींना पाण्याचे स्त्रोतही चांगले आहेत. काही विहीरीमध्ये कचरा टाकला जातो त्यामुळे हा वारसा अल्पकाळामध्ये नष्ट होतील हे स्पष्ट दिसते. असे जर झाले तर या विहीरीमधील ऐतिहासिक शिल्पे, शिलालेख व जलस्थापत्य नष्ट होईल. त्यामुळे असे होऊ नये यासाठी प्रयत्न केले पाहिजे. यासाठी संबधीत शेतकऱ्यांवर ही जबाबदारी टाकून त्यांच्या कडून झुडपे काढून टाकण्यास सांगावे लागेल. ज्या विहीरी वापरामध्ये नाहीत त्या विहीरी वापरामध्ये आणण्याचा प्रयत्न्न केला पाहीजे. यामुळे संबंधीत गावातील लोकांचा पाण्याचा प्रश्न काही प्रमाणामध्ये सुटू शकतो. याबरोबरच जलस्थापत्य टिकेल.

२३. ज्या विहीरींना नुकसान पोहोचले आहे त्या विहीरी तज्ञ मार्गदर्शनाखाली दुरूश्त करून घ्याव्यात व त्या कशा वाचतील हे पहाणे गरजेचे आहे.

२४. हे सर्व करताना स्थापत्यकलेतील प्राविण्य मिळविलेल्या मार्गदर्शनाखाली होणे आवश्यक आहे. यासाठी काही लोकांना प्रशिक्षण द्यावे लागेल.

२५. प्रत्येक तालुक्याच्या स्तरावर प्रशिक्षण देणे सुरू केले पाहिजे. म्हणजे अनेक इच्छुक तरूणांना याचे ज्ञान मिळेल. त्याचा उपयोग संवर्धनासाठी उपयोगी पडेल.

२६. ही सर्व ऐतिहासिक वारसा टिकविण्यासाठी त्यास पर्यटनची गरज आहे. त्यामुळे रोजगार वाढेल.

या वास्तूतून आपणास सर्व इतिहास आढळतो. त्यामुळे या वास्तू आपला चिरंतन ठेवा आहे. त्याचे जतन होणे गरजेचे आहे. कालौघात या वास्तू जरी नष्ट झाल्या तरी हा शोधप्रबंध पुढील पिढीस मार्गदर्शक ठरेल.

# संदर्भ ग्रंथ सूची

## मराठी प्राथमिक साधने


१. प्रत्यक्ष पाहणी व वर्णन, दि.२५/१०/२०१८ वेळ दुपारी ३.३० वाजता

२. प्रत्यक्ष पाहणी व वर्णन, दि.२७/१०/२०१८, वेळ– सायं. ५.०० वा.

३. प्रत्यक्ष पाहणी व वर्णन, दि.२७/१०/२०१८, वेळ– सायं. ५.३० वा.

४. प्रत्यक्ष पाहणी व वर्णन, दि.२७/१०/२०१८, वेळ– सायं. ६.०० वा.

५. प्रत्यक्ष पाहणी व वर्णन, दि.१२/१२/२०१८, वेळ– दुपारी ३.३० वा.

६. प्रत्यक्ष पाहणी व वर्णन, दि.१९/१२/२०१८, वेळ– दुपारी २.३० वा.

७. प्रत्यक्ष सर्वेक्षण व निरीक्षण दि.६.२.२०१८ वेळ सकाळी ९.०० वाजता.

८. प्रत्यक्ष सर्वेक्षण व निरीक्षण दि.८.१२.२०१९ वेळ सकाळी ९.०० वाजता.

९. प्रत्यक्ष सर्वेक्षण व निरीक्षण दि.२८.१२.२०१९ वेळ सकाळी १०.०० वाजता.

१०. प्रत्यक्ष पाहणी व वर्णन, दि. २५/१२/२०१८, वेळ :– दुपारी १.३० वाजता

११. प्रत्यक्ष पाहणी व वर्णन, दि. २५/१२/२०१८, वेळ :– दुपारी १.३० वाजता

१२. प्रत्यक्ष सर्वेक्षण व माहिती, दि.२२ जूलै २०१८, वेळ दुपारी ३.३० वा.

१३. प्रत्यक्ष सर्वेक्षण व माहिती, दि.२३ जलै २०१८, वेळ दुपारी ३.०० वा.

१४. प्रत्यक्ष सर्वेक्षण व निरीक्षण दि.६.२.२०१८ वेळ सकाळी ९.०० वाजता.

१५. प्रत्यक्ष सर्वेक्षण व माहिती, दि.१७ जून२०१८, वेळ दुपारी २.३० वा.

१६. प्रत्यक्ष सर्वेक्षण व माहिती, दि.२२ जून २०१८, वेळ दुपारी ३.३० वा.

१७. प्रत्यक्ष सर्वेक्षण व माहिती, दि.२५जून २०१८, वेळ दुपारी ३.३० वा.

१८. प्रत्यक्ष पाहणी व वर्णन, दि. २३/१२/२०१८, वेळ :– दुपारी ३.३० वाजता

१९. प्रत्यक्ष पाहणी व वर्णन, दि. २३/१२/२०१८, वेळ :– दुपारी ३.३० वाजता

२०. साप वाडयाशेजारील विहीरीतील शिलालेख

२१. मयमत ग्रंथ, श्लोक iii/८४

**गॅझेटियर्स**

१) गॅझेटियर्स ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, गव्हमेंट प्रेस बॉम्बे, **१८९६**

२) जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतीकोश, खंड १– महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९९२

३) पाठक अ.शं.(संपा.)महाराष्ट्र : इतिहास – प्राचीन काळ (खंड १ , भाग –२) स्थापत्य व कला(प्रारंभिक ऐतिहासिक काळ ते यादव काळ), दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, २००२,

४) पाठक अरूण(संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १८८५

५) पाठक अरूणचंद्र(संपा.) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, साहित्य संस्कृति मंडळ महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९९

६) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९६३

७) सातारा जिल्हा जनगणना अहवाल, २००१

८) सातारा जिल्हा जनगणना अहवाल, सन १९०१ ते २००१

**इंग्रजी प्राथमिक साधने**

1. Report of the Archeological Survey of India, (1931, 32, 33)
2. Indian Antiquery, Vol- 9

**मराठी दुय्यम साधने**

१) अमात्य रामचंद्रपंत, रामचंद्रपंत अमात्य प्रणीत स्वराज्यनिती आज्ञापत्र, ढेरे रा. चि.(संपा.), पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २१ जुलै, २०१४

२) अमात्य रामचंद्रपंत, आज्ञापत्र, संपा खरे ग.ह. व भिडे स.रा., पुणे, १९६०

३) आगलावे प्रदीप, ‘संशोधन पध्दती शास्त्र व तंत्र’, विद्या प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, २०००

४) आगाशे अनिता, पंधरा मोटेची विहीर व लिंबचा परिसर, लघुप्रकल्प, डेक्कन महाविद्यालय, पुणे येथे सन २०१४ मध्ये  सादर केलेला आहे.

५) आपटे बी.के. मराठा वाल पेंटिग्ज, पृ.३२

६) आपटे द.वि., स.म.दिवेकर(संपा.), शिवचरित्र प्रदिप शिवापूर दप्तर यादी, पुणे,१९२५

७) भांडारकर पु. ल., 'सामाजिक संशोधन पध्दती', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, तिसरी आवृत्ती, १९८७

८) भावे वा.कृ. , पेशवेकालीन महाराष्ट्र,आवृत्ती ३, वरद प्रकाशन, २०१०, पुणे

९) भिंताडे वि. रा., १९९९, शैक्षणिक संशोधन (तिसरी आवृत्ती), नित्य नुतन प्रकाशन, पुणे.

१०) दळवी दाऊद, भारतातील मुस्लिम स्थापत्यकला, ग्रंथाली प्रकाशन, माटुंगा, मुलुंड मुंबई, २०१४

११) दळवे अरूण, राष्ट्रकूटकालीन कंधार, अप्रकाशित पीएच.डी.प्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड, २००४

१२) दळवी दाऊद, भारतातील मुस्लिम स्थापत्यकला, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २५ डिसेंबर २०१४

१३) दाते य.रा.(संपा.), मराठी शब्दकोश, विभाग तिसरा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ मुंबई, १९३४

१४) देगलूरकर गो.ब., सा रम्या प्रतिष्ठाण नगरी, भारतीय इतिहास संकलन समिती पुणे, २००५

१५) देशपांडे महेश, साताऱ्याच्या परिसरात, २००८

१६) देशपांडे प्र.न.(संपा.), मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड चौथा, २००३

१७) देशपांडे अ.ना. प्राचीन महाराष्ट्रातील वाकाटकांचा इतिहास, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९९५

१८) देशपांडे सु.र., भारतीय शिल्पवैभव प्राचीन–मध्ययुगीन, १३५ ते १४१

१९) देव शां.भा., महाराष्ट्र एक पुरातत्त्वीय समालोचन, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, दादार, मुंबई, १९६८

२०) दीक्षित मोरेश्वर गंगाधर(संपा.), मराठे शाहीतील शिलालेख, नागपूर, १९६२

२१) दोशी साराय(संपा.), शिवाजी ॲण्ड फॅसेटस ऑफ मराठा कल्चर, मार्ग प्रकाशन, मुंबई, १९८२

२२) गद्रे प्रभाकर, मंदिर स्थापत्याचा इतिहास, मंगेश प्रकाशन नागपूर, २०१०

२३) गायकवाड आर.डी. व इतर, शिवाजी महाराजांचे सहा किल्ले, प्रकाशक, प्रा.डॉ.सौ.हेमलता रामचंद्र गायकवाड, सातारा, फेब्रुवारी २००९, पृ. १५१, १५२

२४) गारडे अशोक, राजापूर दर्शन, श्रेयस ऑफसेट, बुध, २००४

२५) घाणेकर प्र.के., अथातो दुर्गजिज्ञासा, स्नेहल प्रकाशन, पुणे, ९ एप्रिल २००५

२६) गुप्त चंद्रशेखर, प्राचीन विदर्भाचा ऐतिहासिक भूगोल, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, २००४

२७) जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतीकोश, खंड १, १२

२८) काचोळे, दा. धों., सामाजिक संशोधन पध्दती, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती १९९३

२९) कान्हेरे गोपाळ कृष्ण, टेम्पल्स ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र माहिती केंद्र(माहिती व जनसंपर्क संचालनालय–जनरल) सरकार महाराष्ट्र, १ जानेवारी १९८९

३०) कर्वे चिं.ग., जोगळेकर स.आ. व जोशी य.गो.(संपा.), महाराष्ट्र परिचय

३१) कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृती

३२) खांडगे मंदा, वैभव पेशवेकालीन वाडयांचे, साई प्रकाशन, पुणे, २००२

३३) खरे ग.ह., दक्षिणेकडील मध्ययुगीन इतिहासाची साधने, खंड १, भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे, १९३०

३४) कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपूर, २००२

३५) लांजेकर रू. ज., सातारा जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळे, १९९३

३६) मंगरूळकर, मिना, आवटे कमलादेवी, कट्टी आर. एस., भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण, एप्रिल २००८

३७) महाडीक जी.एस., प्राचीन महाराष्ट्रातील कला, आधार पब्लिकेशन, अमरावती, १ एप्रिल २०१२

३८) माने ग.का., डॉ.महाडीक जी.एस., शिवकालीन किल्ल्यांचा समग्र अभ्यास, शिवनेरी पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्युटर्स, अमरावती, ३ एप्रिल २००९

३९) मेंहदळे ग.भा., श्री राजा छत्रपती खंड २, भाग २, पुणे, १९९६

४०) मिराशी वा.वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कारीव लेख, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, १९७४
४१) मिराशी वा.वि., सातवाहन आणि पश्चिम क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७९
४२) मोरवंचीकर रा.श्री., भारतीय जलसंस्कृती स्वरूप आणि व्याप्ती, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, ११ जुलै २००६
४३) मोरवंचीकर रा.श्री., मराठी अनुवाद भलगे प्रदीप, मध्ययुगीन जलसंधारण–जलव्यवस्थापन देवगिरीद–दौलताबाद, सुमेरू प्रकाशन, डोबिंवली
४४) मुळे, रा. रा., व उमाटे, वि.तु., शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे (तिसरी आवृत्ती) सवंत पिंपळापुरे, विद्या बुक्स, औरंगापुरा, औरंगाबाद, १९८९,
४५) पाळंदे आनंद, डोंगरयात्रेत दिसलेल्या दुर्गवास्तू, प्रफुल्लता प्रकाशन, पुणे १५ एप्रिल २०१४
४६) पाठक अ.शं., बारवस्थापत्य : एक आढावा, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९८, पृ. ४०१
४७) पाठक अरूणचंद्र, महाराष्ट्रातील बारव स्थापत्य आणि पारंपारिक जलव्यवस्थापन, अपरांत प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, २०१७.
४८) पाटील माया, मंदिर–शिल्पे मराठवाडयातील काही शिल्प आणि मंदिरस्थापत्य, ग्रंथाली प्रकाशन मुंबई, १६ एप्रिल २०१४
४९) पाटणे संभाजीराव, स्वातंत्र्य संग्रामातील सातारा जिल्हा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सवी समिती सातारा, १९९२
५०) पुरंदरे बाबासाहेब, पुरंदरच्या बुरूजावरून, १९९८
५१) राजवाडे वि.का., मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड १८, मुंबई, १९१४ लेख क्रं.४६
५२) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड१, मुंबई १९८८
५३) साने का.ना.(संपा.), मल्हार रामराव चिटणीस विरचित शककर्ते श्री शिवछत्रपती महाराज हयांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, १९२४
५४) सांकलिया ह.श्री, अस्मिता महाराष्ट्राची

५५) संशोधन मुक्तावली, भाग पहिला

५६) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, शहाजी, पा.नं. २१

५८) सेन एस.एन., शिवछत्रपती, १९२०

५९) शेणोलीकर ह.श्री. व देशपांडे प्र.न., महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, मोघे प्रकाशन कोल्हापूर, १९७२, पृ.२, ३

६०) शिवदे सदाशिव, महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे– खंड १, स्नेहल प्रकाशन पुणे, २०१३

६१) शिवदे सदाशिव, महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे– खंड २, स्नेहल प्रकाशन पुणे, २०१५

६२) शिवकालीन पत्रसारसंग्रह पुणे, १९८८

६३) ताडफळे, म.वि. प्रतापगड परिचय़ मिरज, १९३९, ग.ह.खरे विश्वकोश खंड १०

६४) तांबे जगन्नाथ दिनकर, परमहंस ब्रम्हेंद्र स्वामी महाराज, श्री देव भार्गवराम देवस्थान कमिटी धावडशी, १८ एप्रिल १९९९

६५) तांबे जगन्नाथ दिनकर, परमहंस, श्रीदेव भार्गवराम विश्वस्त देवस्थान कमिटी, धावडशी, नॅशनल ऑफसेट सातारा, २०१८

६६) तापकीर संदीप, खंडाळे गणेश(संपा.), दुर्गांच्या देशातून, गरूडझेप प्रकाशन, पुणे, दिवाळी अंक, २०१२

६७) तेंडुलकर महेश, शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था, स्नेहल प्रकाशन, पुणे, १४ ऑगस्ट २००९

६८) ठाकरे के.सी., प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी

**इंग्रजी दुय्यम साधने**

1. Best J. W., ‘Research in Education,’ New Delhi, Prentice Hall of India. 1996

2. Buch, M. B. (ED), Fourth Survey of ‘Research in Education’ Vol. II. New Delhi, Prentice Hall of India, 1991.

3. Cunningham, Inscription of Ashok, C.I.I., Vol.1 1 877

4. George Michel, Architecture And Art In Deccan- Sultanate, Mughal And Maratha Period(Cup), And Cambridge University Press, London, 1999
5. Gale Omvhet, Cultural Revolt In Colonel Society, 1976
6. Canigham, Stup Of Bharhut Lekh No. 135, 138, 139
7. Deglurkar J.B., Temple Architecture And Sculpture of Maharashtra
8. Journal of the Bombay branch of the Royal Asiyatik Society Vol. 8, Bombay
9. Kulkarni G.T., The Maratha Mughal relations Twenty five fateful Years (1682 to 1707 A.D.) Poona, 1983
10. Sardesai G.S.(Ed.), Selection from the Peshwa Duftar Vol.42, Bombay, 1934
11. Sardesai G.S., New History of the Marathas, Vol. 2, Bombay 1971
12. Sen S.N., Military System of the Maratha, 1958
13. Malik A.C., Stone of the Bombay and Satara District Badoda , 1959
14. Mirashi V.V., Apigraphiya India, Delhi, Vol. 29
15. Mirashi V.V., Studies In Indology, Vol. 1

**प्रकाशित पीएच.डी.व एम.फिल.शोधप्रबंध**

१) कुलकर्णी अनुश्री, वाडा आर्क्टिटेक्चर ऑफ महाराष्ट्र प्रिझर्व्हेशन ऑफ महाराष्ट्रीयन कल्चरल हेरिटेज, एम.एस्सी. प्रकाशित लघुप्रबंध, द युनिव्हर्सिटी ऑफ ईडनबर्ग(स्कॉटलंड)

२) माटे म.श्री., मराठा आर्क्टिटेक्चर(इ.स.१६५० ते १८५०), प्रकाशित शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६०

**अप्रकाशित पीएच.डी.व एम.फिल.शोधप्रबंध**

१) कोरडे डी.डी., वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास(इ.स.१९०० ते २०००) अप्रकाशित पीएच.डी.शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१३

२) पाटील अभय, कराड शहराचा इतिहास, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, २०११

३) सोहोनी आशुतोष, टेम्पल आर्किटेक्चर मराठाज इन महाराष्ट्र, अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध, डी माँटफोर्ट युनिव्हर्सिटी, लैसेस्टर, १९९८

४) काळे व्ही.सी., सातारा जिल्हयातील किल्ल्यांचे मराठा स्वातंत्र्य युद्धातील ऐतिहासिक महत्त्व, १६८९–१७०७, टि. म. वि. पुणे, एम.फिल. प्रबंध, जुलै २००८

५) भोसले एस.एच., सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा–एक चिकित्सक अभ्यास (इ. स.१६०० ते १९००), टि. म. वि. पुणे, एम. फिल. प्रबंध, ऑक्टोबर २००८

**वेब साईट(संकेतस्थळे)**

1) www.mah.gov.in

2) https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand10/index

**वृत्तपत्रे व मासिके**

१) दै.ऐक्य, १३ एप्रिल २००८

२) लोकमत न्यूज दि.३० जून २०१८

३) ठोसर हरीहर, राष्ट्रकुटांचा प्रारंभिक इतिहासावर नविन प्रकाश, भारतीय इतिहास आणि संस्कृती मुंबई, पुस्तक १०३, (त्रैमासिक–ऑक्टो ते डिसेंबर १९८९)

**मुलाखती**

१. प्रकट मुलाखत, प्रा. डॉ. श्रीमती कुलकर्णी स्वराली, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे दि. २५.१०.२०१८, वेळ– सकाळी ११.३० वा.

२. मुलाखत – सागर भोसले– ७/२/२०१८, वेळ दुपारी ३.०० वाजता

## परिशिष्टे क्र.१

# भेट दिलेल्या स्थळांची यादी :

### धार्मिक वास्तू : मंदिर व मज्जीद

| | | |
|---|---|---|
| १. एवर्जीनाथ मंदिर, अंगापूर | ३९. एकवीरा मंदिर, किन्हई | ७७. पिंगळजाई मंदिर, पिंगळी |
| २.गणेश मंदिर, अंगापूर | ४०.राममंदिर, किन्हई | ७८. भवानी मंदिर, प्रतापगड |
| ३. शिवमंदिर, अंगापूर | ४१. शिवमंदिर, किन्हई | ७९.मज्जिद, रहिमतपूर |
| ४.मोकळाई मंदिर, औंध | ४२. यमाई मंदिर, किन्हई | ८०. जानुबाई मंदिर, राजापूर |
| ५. केदारेश्वर मंदिर, औंध | ४३. शिवमंदिर, किवळ | ८१. शिवमंदिर, रणदुल्लाबाद |
| ६.विष्णूलक्ष्मी मंदिर, औंध | ४४. महादेव मंदिर, कोपर्डे, | ८२. शिवमंदिर, साप |
| ७.यमाई मंदिर, औंध | ४५. मारूती मंदिर, खंडाळा | ८३.बहूलेश्वर मंदिर, सातारा |
| ८.यमाई मंदिर, औंध मूळपीठ | ४६. कोटेश्वर मंदिर, लिंब | ८४. गणकेश्वर मंदिर, सातारा |
| ९.भैरवनाथ मंदिर, बावधन | ४७. शिवमंदिर, कुळकजाई | ८५.कोटेश्वर मंदिर, सातारा |
| १०. हनुमान मंदिर, भक्तवडी | ४८. सिद्धेश्वर मंदिर, कुरोली | ८६. कृष्णेश्वर मंदिर, सातारा |
| ११.शिवमंदिर, भक्तवडी | ४९. अतिबळेश्वर मंदिर, महाबळेश्वर | ८७.विठ्ठल मंदिर, सातारा |
| १२.भिमाशंकर मंदिर, बोपडी | ५०. रूद्रेश्वर मंदिर, महाबळेश्वर | ८८.शंभू महादेव, शिंगणापूर |
| १३.कोर्टेश्वर मंदिर, दत्तनगर | ५१. महादेव मंदिर, मालगाव | ८९. अमृतेश्वर मंदिर, शिंगणापूर |
| १४.भार्गवराम मंदिर, धावडशी | ५२. महादेव गणपती मंदिर, विरमाडे | ९०. कालभैरव मंदिर, शिरवळ |
| १५. सिद्धेश्वर मंदिर, धोम | ५३. बिल्वेश्वर मंदिर, माहुली | ९१. केदारेश्वर मंदिर, शिरवळ |
| १६. भैरवनाथ मंदिर, एनकूळ | ५४. काशिविश्वेश्वर मंदिर, माहुली | ९२. विठ्ठल मंदिर, शिरवळ |
| १७. गोपाळकृष्ण मंदिर, गिरवी | ५५. राधाशंकर मंदिर, माहुली | ९३. शूळपानेश्वर मंदिर, सोळशी |
| १८. महादेव मंदिर, गिरवी | ५६. रामेश्वर मंदिर, माहुली | ९४. सोनेश्वर मंदिर, ओझर्डे |
| १९. मारूती मंदिर, गिरवी | ५७. संगमेश्वर मंदिर, पाटखळ | ९५. वाकेश्वर मंदिर, सोनगाव |
| २०. विठ्ठल मंदिर, गिरवी | ५८.खंडोबा मंदिर, मलवडी | ९६. रामेश्वर मंदिर, तडवळे |
| २१. महादेव मंदिर, गुरसाळे | ५९. विष्णू मंदिर, मलवडी | ९७. महादेव मंदिर, तारगाव |
| २२.भैरवनाथ मंदिर, जांब | ६०. रामेश्वर मंदिर, मर्ढे | ९८. तारककेश्वर मंदिर, तारगाव |
| २३.जननी मंदिर, पानस | ६१. यमाई मंदिर, मसूर | ९९. विठ्ठल मंदिर, तारगाव |
| २४. शिवमंदिर वडगाव (जयराम स्वामी) | ६२. अमृतेश्वर मंदिर, मेणवली | १००. चामुंडादेवी मंदिर, वडगाव |
| २५. जयराम स्वामी मठ, वडगाव | ६३. विष्णू मंदिर मेणवली | १०१. हनुमान मंदिर, वडगाव |
| २६.काळेश्वर मंदिर, चिमणगाव | ६४. मेरूलिंग मंदिर मोरघर | १०२. कृष्ण मंदिर, वडगाव |
| २७. कण्हेरेश्वर मंदिर, कणेरखेड | ६५. शिव मंदिर, मुरूम | १०३. महादेव मंदिर, वडगाव |
| २८.मारूती मंदिर, कण्हेरखेड | ६६. शाकंबरी मंदिर, नागेवाडी | १०४.राम मंदिर, वडगाव |
| २९. विठ्ठल मंदिर, कण्हेरखेड | ६७. काशिविश्वेश्वर मंदिर, नेर | १०५. शंकर मंदिर, वडगाव |
| ३०. सखूबाई मंदिर, कराड | ६८. महादेव मंदिर, पाचवड | १०६. शकुंतेश्वर मंदिर, वडूथ |
| ३१. शिवमंदिर, करंजखोप | ६९. राममंदिर, पाचवड | १०७. गोविंद रामेश्वर मंदिर, वाई |
| ३२. शिवमंदिर, कारखेल | ७०.विष्णू मंदिर, वाई | १०८. काशिविश्वेश्वर मंदिर, वाई |

| | | |
|---|---|---|
| ३३. खवलेश्वर मंदिर, बोरखळ | ७१.खंडोबा मंदिर, पाल | १०९. महागणपती मंदिर, वाई |
| ३४. सप्तमातृका मंदिर, खामकरवाडी | ७२.भैरवनाथ मंदिर, पांडे | ११०. विष्णू लक्ष्मी मंदिर, वाई |
| ३५. हिंग्लाई मंदिर, खंडाळा | ७३. शिवमंदिर, पांडे | १११. वाकेश्वर मंदिर, वाकेश्वर |
| ३६. शिवमंदिर, खंडाळा | ७४. रामवरदायिनी मंदिर, पार | ११२. महादेव मंदिर, वाठार निंबाळकर |
| ३७.लक्ष्मी नारायण मंदिर, खटाव | ७५. शिवमंदिर, पार | ११३. बाणलिंग मंदिर, वावरहिरे |
| ३८.शिवमंदिर, खटाव | ७६. श्रीराम मंदिर, फलटण | ११४. येवतेश्वर मंदिर, येवतेश्वर |

## समाधी, छत्री:

| | | |
|---|---|---|
| १. अंबोजी घाटगे, राजापूर | ९. पतंगराव जाधवराव, भुईंज | |
| २. रूपा पुरी, औंध | १०. बायजाबाई शिंदे, कण्हेरखेड | |
| ३. भवानी शंकर गोसावी, नांदोशी | ११. शिंदे घराण्यातील व्यक्ती, कोपर्डे | |
| ४. रायाजी जाधव, भुईंज | १२. संताजी जाधव, मांडवे | |
| ५. सखुबाई, बोरवन, तारगाव | १३. ब्रम्हेंद्र स्वामी, मर्ढे | |
| ६. भाऊसिंग जाधव, बोरगाव | १४. रंगनाथ स्वामी निगडी | |
| ७. धर्मराज गोसावी, नांदोशी | १५. गोपालनाथ स्वामी, त्रिपुटी | |
| ८. अज्ञात छत्री, गिरवी | १६. निंबाळकर घराण्यातील समाध्या वाठार | |

## निवासी वास्तू : वाडे

| | |
|---|---|
| १. अनपट वाडा, अनपटवाडी | ११. शिंदे यांचा वाडा कोपर्डे |
| २. कुलकर्णी वाडा, बावधन | १२. जाधव यांचा वाडा, मांडवे |
| ३. प्रतापराव गुजर यांचा वाडा, भोसरे | १३. जगदाळे यांचा वाडा, मसूर |
| ४. जाधवरावांचा वाडा, भुईंज | १४. नाना फडणवीस यांचा वाडा, मेणवली |
| ५. शाळुंकर वाडा, फत्त्यापूर | १५. सावकारांचा वाडा, नांदोशी |
| ६. कदम वाडा, गिरवी | १६. शेख मिर यांचा वाडा, पसरणी |
| ७. महादजी शिंदे यांचा वाडा, कण्हेरखेड | १७. पाटणकर वाडा, पाटण |
| ८. लेंढे यांचा वाडा, खामकरवाडी | १८. निंबाळकर वाडा, फलटण |
| ९. खटावकरवाडा, खटाव | १९. भोसले यांचा वाडा, राजाचे कुर्ले |
| १०. पंतप्रतिनिधी यांचा वाडा, किन्हई | २०. अंबोजी घाटगे यांचा वाडा, राजापूर |
| ११. इंद्रोजी कदम यांचा वाडा, साप | २२. अदालत वाडा, सातारा |
| १२. पंतप्रतिनिधींचा वाडा, शिरवळ | २३. महाडीक यांचा वाडा, तारळे |
| १३. पोतनीस यांचा वाडा, वडगाव | २४.निंबाळकर यांचा वाडा, वाठार |


## संरक्षक वास्तू

| | |
|---|---|
| १. अजिंक्यतारा | १७. जंगली जयगड |
| २. वैराटगड | १८. कमळगड |
| ३. वसंतगड | १९. केंजळगड |
| ४. सदाशिवगड | २०. सज्जनगड |
| ५. सुभानमंगळ | २१. दातेगड |
| ६. प्रतापगड | २२. मकरंदगड |
| ७. वासोटा | २३. |
| ८. वर्धनगड | |
| ९. महिमानगड | |
| १०. संतोषगड | |
| ११. वारूगड | |
| १२. भूषणगड | |
| १३. पांडवगड | |
| १४. कल्याणगड | |
| १५. चंदन | |
| १६. वंदन | |


## जल वास्तू : विहीर/बारव

| | | |
|---|---|---|
| १. आसले | ११. हिंगणगाव येथील विहीर | २१. पालवण |
| २. बारा मोटेची विहीर, लिंबशेरी | १२. जोशी विहीर | २२. राजापूर |
| ३. गोखले विहीर, बावधन | १३. नकटया राऊळाची विहीर, कराड | २३. कृष्णेश्वर बारव, सातारा |
| ४. बारा मोटेची विहीर, भुईंज | १४. केंजळ | २४. महादरे, तळे |
| ५. जाधवरावांची विहीर, भुईंज | १५. खंडाळा | २५. थोरल्या बाजीरावची विहीर, सातारा |
| ६. राज राणीची विहीर, भुईंज | १६. कोपर्डे | २६. शिरवळ |
| ७. धावडशी येथील विहीर | १७. कोरे यांची बारव, पळशी | २७. सोळशी |
| ८. फत्त्यापूर | १८. कुरोली | २८. तारगाव |
| ९. गणेशवाडी, नागठाणे | १९. नागेवाडी | २९. थोरली विहीर, बावधन |
| १०. गुरसाळे | २०. नांदोशी | |


**परिशिष्टे क्र.२**




भार्गवराम मंदिर पावडशी




बिल्वेश्वर मंदिर क्षेत्रमाहुली




सिद्धेश्वर मंदिर धोम




सिद्धेश्वर मंदिर धोम




काशिविश्वेश्वर मंदिर□माहुली




श्री क्षेत्र मेरूलिंग मंदिर□मोरघर




रामेश्वर मंदिर क्षेत्रमाहुली



संगमेश्वर मंदिर पाटखळ



यमाईदेवी मंदिर किन्हई



अमृतेश्वर मंदिर मेणवली

## परिशिष्टे क्र.३

सातारा जिल्ह्यातील मराठाकालीन वास्तूंमधील कमानीचे प्रकार



केळफूलशिवाय बहुपर्णी कमान



केळफूल असलेली बहुपर्णी कमान



टोकाची कमान □कळीचा दगड नसलेली□



टोकाची कमान □कळीचा दगड असलेली□




खांदा कमान □शोल्डर आर्च□



त्रिपर्णी कमान

## परिशिष्टे क्र.४


## सातारा जिल्ह्यातील मंदिरांमधील छतांचे प्रकार



अष्टकोणी टप्प्याचे छत



अष्टकोणी अर्धगोल टप्प्याचे छत




घुमटाकार छत



वर्तुळाकार टप्प्याचे छत



चौरसाकृती



शंकूकृती



रचनात्मक



चौरस अर्धगोल



चौरस टप्प्याशिवाय



वर्तुळाकार टप्प्याशिवाय

## परिशिष्टे क्र.५

## सातारा जिल्ह्यातील मराठाकालीन खांबाचे प्रकार

### सुरूच्या खांबांची शैली



अष्टकोनी सुरूचा खांब




गोल सुरूचा खांब



कोरीव कामयुक्त सुरूचा खांब



पानाची नक्षीयुक्त अष्टकोनी खांब



चौरस सुरूचे खांब



साधा सुरूचा खांब

## यादव शैलीतील खांब










## परिशिष्टे क्र.६

## सातारा जिल्ह्यातील मराठेकालीन मंदिरावरील शिखरांचे प्रकार











## परिशिष्टे क्र.७

## सातारा जिल्ह्यामधील मराठेकालीन मंदिरातील स्क्विंचचे प्रकार









